
ग्रं. सं. ठाणे.
विषय
स. क्र.





# ॥बद्रीनाथ॥
# ॥पशुपतिनाथ॥

प्रा. सौ. मेधा काळे




REFBK-0024347



म. ग्रं. सं. ठाणे
विषय प्रवास
सं. क्र. ६५४
९२१३१६६

5 DEC 1984
9 DEC 1984
3 DEC 1984
30 DEC 1984
6 JAN 1985
13 JAN 1985
6 FEB 1985
20 FEB 1985
23 JUN 1985
3 JUL 1985
7 JUL 1985
14 AUG 1985
21 MAR 1990
13 MAY 1987
13 MAY 1987
18 JUL 1987
26 JUL 1987
6 JUL 1988
5 JUL 1989
28 FEB 1990
3 JUL 1993

संदर्भ भूप्रवास
६५४
२४३४८
१५१०१८४




REFBK-0024347

शालीमार प्रकाशन
माळीवाडा, म. फुले रोड
अहमदनगर ४१४००१

१

*Treasure of Travel Books*

Shalimar Prakashan
Maliwada, M Phule Road
Ahmednagar 414001

॥ बद्रीनाथ ॥ पशुपतिनाथ ॥

लेखिका

© प्रा सौ मेधा यशवंत काळे

प्रकाशक

शालीमार प्रकाशन

माळीवाडा, म फुले रोड

अहमदनगर ४१४००१

प्रकाशन क्रमांक

५

आवृत्ती

पहिली–१९८४

मुद्रक

श्री. म श. परभाणे

सुभाष प्रिंटिंग प्रेस

पुणे ४११०३०

फोटो ब्लॉक्स

व्ही. जोशी ॲन्ड कं.

पुणे ४११०३०

मुखपृष्ठ चित्रकार

श्री अनंत सालकर

पुणे ४११०३०

मुखपृष्ठ व आर्ट प्लेटस् छपाई

स्वरुप मुद्रण

पुणे ४११०३०

बहुरंगी कल्हर ब्लॉक

एस. डी. नेरॉय

मुंबई

मुखपृष्ठ

बद्रीनाथ, पोखरा, कुमारी देवी, स्वयंभूनाथ

मूल्य रुपये

एकूणचाळीस

मलपृष्ठ

पाच मजली न्याट पोला, भक्तपूर (नेपाळ)

करण्यास सहकार्य दिले सर्वांची मी ऋणी आहे माझे वडील श्री रा ना तथा अण्णासाहेब झोळ तसेच श्वशुर ती. काका– ह कृ तथा बाळासाहेब काळे याचे आशीर्वाद पाठीशी आहेतच आमच्या प्रवासाच्या वाटचालीत ती सौ सासूबाई शरीराने प्रत्यक्ष साथ देऊ शकल्या नाहीत. परंतु प्रेमळपणाने त्यांनी नेहमीच साथ दिली पुस्तक प्रकाशित करण्यासाठी प्रोत्साहन दिले त्यांचे आशीर्वाद कायम पाठीशी राहोत हीच परमेश्वर चरणी प्रार्थना आहे कल्याणचे पर्यटनप्रमी वाचक श्री वसंतराव सहस्रबुद्धे यांची वेळोवेळी मदत झाली हे कृतज्ञतापूर्वक नमूद करीत आहे

रसिक वाचक, हौशी पर्यटक यांच्या ऋणातून मुक्त होणे अशक्यच त्यांच्याच सदिच्छेमुळे, मौलिक सहकार्यामुळे प्रवास व प्रवासवर्णने याची वाटचाल चालू आहे

महाशिवरात्र —सौ. मेधा काळे

दि. २९।२।८४. अहमदनगर.



## प्रा. सौ. मेधा यशवंत काळे
## प्रकाशित साहित्य

१) शालीमारची साद (द्वि आ)

२) कोणार्क ते कन्याकुमारी (द्वि आ)

३) गीर गिरनार गरबा

४) हल्दीघाटीतून कुलूघाटीत

शुपतिनाथ ॥

| | |
|---|---|
| १७७ डाऊन झेलम एक्स्प्रेस. | १ |
| शिंदे राजघराण्याचे ग्वाल्हेर. | १४ |
| ऐतिहासिक नगरी– आग्रा. | २४ |
| कुमाऊ प्रदेशाची वाटचाल | ३५ |
| राणीखेत ते कर्णप्रयाग. | ४३ |
| शंकराचार्यांचे जोशीमठ. | ४५ |
| बद्रीनाथधाम. | ४८ |
| बद्रीनाथ ते कौसानी. | ५२ |
| कौसानी– गांधीजींचे स्वित्झर्लंड. | ५५ |
| अलमोडा. | ५९ |
| नैनिताल. | ६३ |
| जिम कॉर्बेट पार्कची सफर. | ७० |
| ऐ लखनौ, तुझे मेरा सलाम है. | ८० |
| गोरक्षनाथांचे गोरखपूर. | ८९ |
| काठमांडूच्या वाटेवर | ९२ |
| नेपाळविषयी थोडेसे. | ९६ |
| कथा दोन शहरांची– पाटण, भडगाव. | १०३ |
| विशालबुद्ध अवलोकन करीत आहे. | १११ |
| श्री पशुपतिनाथ दर्शन. | ११६ |
| जीवित कुमारीदेवी, हनुमानढोका दरबार चौक | १२५ |
| 'माछापूछरे' च्या छायेत. | १३३ |
| पोखरा ते भैरहवा. | १४२ |
| बुद्धदेवाच्या जन्मभूमीत– लुम्बिनी. | १४४ |
| सिलीगुडीकडे. | १४७ |
| कांचनगंगेच्या छायेत– दार्जिलिंग. | १४९ |
| दार्जिलिंग ते हौरा | १५८ |
| कलकत्ता महानगरी. | १६२ |
| टू अप् हौरा– बॉम्बे मेल. | १७९ |

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
६५
दा. क्र. २७३७७
प्रवास
ग्रंथ. शाखा (स्थळ प्रत)

## १७७ डाऊन झेलम एक्स्प्रेस

दहा वर्षांपूर्वी काश्मीरमधील शालीमारपर्यंतचा एक महिन्याचा दीर्घ प्रवास केला होता त्यानतर दर दोन वर्षांनी दिवाळीच्या सुटीत भारतभ्रमण करण्याचा योग आला होता यशवत, उल्का, उदय, ती काका याच्याबरोबर बरीच भ्रमती करून भारतातील बहुतेक प्रसिद्ध पर्यटनस्थळे पाहिली होती ती काकानी आता सत्तरी पार केली होती पण उत्साह कायम होता चि उल्काच तर आता दहावीच वर्ष मेरीटमध्ये येण्याविषयी सर्वांच्या आशा तिच्यावर केंद्रित झालेल्या. अभ्यासासाठी दिवाळीची सुटी राखून ठेवायची होती आणि प्रवासाला जायचे तर मुलाना घेऊनच जायचे या आमच्या निर्धारामुळे दिवाळीतील प्रवासाची हौस मागे घ्यावी लागली खर तर प्रवासासाठी नोव्हेंबर--डिसेंबर हाच काळ अधिक चागला १९८३ च्या मार्च महिन्य'त एस् एस् सी बोर्डाची परीक्षा झाली आणि मग मात्र उन्हाळच्याच्या सुटीत प्रवासाला कुठे जायच याविषयी जोरदार चर्चा सुरू झाली भारताच्या पूर्व भागाबद्दल आकर्षण होतच, परतु आसाममधील अशात परिस्थितीमुळे तो विचार सोडून दिला नगाधिराज हिमालयाच्या दर्शनाची ओढ सर्वांनाच वाटत होती काश्मीर, कुलू, मनाली येथील हिमालय पूर्वीच्या प्रवासात पाहिला होता उत्तर-पूर्व पधराशे मैल पसरलेल्या हिमालयाच्या

पुनर्दर्शनासाठी सगळेच उत्सुक झाले त्या अनुरोधाने प्रवासाचा मार्ग पक्का होऊ लागला

हा नवा प्रवास बद्रीनाथ ते पशुपतिनाथ– दार्जिलिंग असा ठरला चार धामापैकी रामेश्वर, द्वारका, जगन्नाथपुरीला यापूर्वीच जाऊन आलो होतो उत्तरेकडील पवित्र बद्रीनाथधामाच्या दर्शनाची सर्वांना उत्कंठा होती बद्रीनाथ दर्शनासाठी हरिद्वार–हृषिकेशहून बहुतेक लोक जातात पण यशवताना वेगळी वाट शोधण्यात आनंद वाटतो नैनितालहून बद्रीनाथला जाण्यासाठी मार्ग उपलब्ध आहे उत्तर प्रदेश पर्यटन विभागाच्या कुमाऊ मंडल विकास निगमच्या पॅम्प्लेट वरील नकाशा पाहून प्रवासाचा मार्ग त्यांनी ठरवला नैनितालला जायचे म्हणजे उत्तरपूर्व रेल्वेने काठगोदाम स्टेशनला पोहोचायला हवे आग्रा फोर्ट ते काठगोदाम 'कुमाऊ एक्स्प्रेस' ही डायरेक्ट रेल्वे, उपलब्ध असल्याची माहिती टाईमटेबलवरून मिळाली आग्र्याला जाण्यासाठी अतिशय सोयीची झेलम एक्स्प्रेस आहे

लहानपणी पाहिलेले आग्रा उल्का–उदयला आठवत नव्हते शालीमारच्या पहिल्या प्रवासाच्या वेळी आग्र्याच्या दयाळ बागेला भेट देताना म्हटल होत की उदय मोठा होऊन परत येथे येईपर्यंत येथील राधास्वामी मंदिराचे काम पूर्ण होईल १९०४ साली काम सुरू झालेल्या या मंदिराची प्रगती कोठपर्यंत आली हेही पहायचे होते कुमाऊ एक्स्प्रेसने आग्रा–काठगोदाम प्रवास करून वसने हिमालयातील कुमाऊ–गढवाल प्रदेशातील पर्यटन स्थळे पहायची होती नैनिताल, राणिखेत, अल्मोडा, बद्रीनाथ पाहून पुढचा प्रवास करायचा असे ठरले कुमाऊ प्रदेशातील कौसानीची भेट चुकवून चालणार नव्हती पूज्य म गांधींनी १९३० साली जेथे दहा दिवस वास्तव्य केले होते व हिंदुस्थानचे स्वित्झर्लंड म्हणून ज्याला संबोधले होते त्या निसर्गरम्य कौसानीचे चित्र वारंवार डोळ्यासमोर उभे राहू लागले. विख्यात शिकारी जिम कॉर्बेटच्या रोमहर्षक शिकारकथा वाचल्याने कुमाऊ प्रदेशातील जिम कॉर्बेट पार्कच्या सफरीविषयी विलक्षण उत्सुकता वाटत होती

पंधराशे मैल लांबीच्या हिमालयाचा पाचशे मैल भाग नेपाळ प्रदेशात आहे हिमालयाच्या सव्वीस हजार फूटांपेक्षा अधिक उंचीच्या चौदा उत्तुंग शिखरांपैकी आठ नेपाळमध्ये आहेत भारताबाहेरचा पहिला देश पहायचा तो नेपाळ–जगातले एकमेव हिंदू राष्ट्र– हे निश्चित केले काठमांडूला पशुपतिनाथच्या दर्शनाचा लाभ होणार म्हणून ती काका आनंदित झाले इतिहासाविषयी मला जबरदस्त प्रेम तर शिल्पकलेविषयी यशवताना काठमांडू परिसरातील पॅगोडा शैलीची मंदिरे, राजप्रासादावरील शिल्पकृती पहायला मिळणार म्हणून ते खूष होते काठमांडूची जीवितकुमारी कशी असते? पहाण्याची उत्कंठा होती 'महान' चित्रपटात

पुनर्दर्शनासाठी सगळेच उत्सुक झाले त्या अनुरोधाने प्रवासाचा मार्ग पक्का होऊ लागला

हा नवा प्रवास बद्रीनाथ ते पशुपतिनाथ– दार्जिलिंग असा ठरला चार धामांपैकी रामेश्वर, द्वारका, जगन्नाथपुरीला यापूर्वीच जाऊन आलो होतो उत्तरेकडील पवित्र बद्रीनाथधामाच्या दर्शनाची सर्वांना उत्कठा होती बद्रीनाथ दर्शनासाठी हरिद्वार–हृषिकेशहून बहुतेक लोक जातात पण यशवताना वेगळी वाट शोधण्यात आनद वाटतो नैनितालहून बद्रीनाथला जाण्यासाठी मार्ग उपलब्ध आहे उत्तर प्रदेश पर्यटन विभागाच्या कुमाऊं मडल विकास निगमच्या पॅम्प्लेट वरील नकाशा पाहून प्रवासाचा मार्ग त्यानी ठरवला नैनितालला जायचे म्हणजे उत्तरपूर्व रेल्वेने काठगोदाम स्टेशनला पोहोचायला हवे आग्रा फोर्ट ते काठगोदाम 'कुमाऊ एक्स्प्रेस' ही डायरेक्ट रेल्वे, उपलब्ध असल्याची माहिती टाईमटेबलवरून मिळाली आग्र्याला जाण्यासाठी अतिशय सोयीची झेलम एक्स्प्रेस आहे

लहानपणी पाहिलेले आग्रा उल्का–उदयला आठवत नव्हते शालीमारच्या पहिल्या प्रवासाच्या वेळी आग्र्याच्या दयाळ बागेला भेट देताना म्हटल होत की उदय मोठा होऊन परत येथे येईपर्यंत येथील राधास्वामी मदिराचे काम पूर्ण होईल १९०४ साली काम सुरू झालेल्या या मंदिराची प्रगती कोठपर्यंत आली हेही पहायचे होते कुमाऊ एक्स्प्रेसने आग्रा–काठगोदाम प्रवास करून बसने हिमालयातील कुमाऊ–गढवाल प्रदेशातील पर्यटन स्थळे पहायची होती नैनिताल, राणिखेत, अल्मोडा, बद्रीनाथ पाहून पुढचा प्रवास करायचा असे ठरले कुमाऊं प्रदेशातील कौसानीची भेट चुकवून चालणार नव्हती पूज्य म गाधींनी १९३० साली जेथे दहा दिवस वास्तव्य केले होते व हिंदुस्थानचे स्वित्झर्लंड म्हणून ज्याला सबोधले होते त्या निसर्गरम्य कौसानीचे चित्र वारवार डोळ्यासमोर उभे राहू लागले विख्यात शिकारी जिम कॉर्बेटच्या रोमहर्षक शिकारकथा वाचल्याने कुमाऊ प्रदेशातील जिम कॉर्बेट पार्कच्या सफरीविषयी विलक्षण उत्सुकता वाटत होती

पधराशे मैल लाबीच्या हिमालयाचा पाचशे मैल भाग नेपाळ प्रदेशात आहे हिमालयाच्या सव्वीस हजार फूटापेक्षा अधिक उचीच्या चौदा उत्तुग शिखरांपैकी आठ नेपाळमध्ये आहेत भारताबाहेरचा पहिला देश पहायचा तो नेपाळ–जगातले एकमेव हिंदू राष्ट्र– हे निश्चित केले काठमाडूला पशुपतिनाथच्या दर्शनाचा लाभ होणार म्हणून ती काका आनदित झाले इतिहासाविषयी मला जबरदस्त प्रेम तर शिल्पकलेविषयी यशवतांना काठमांडू परिसरातील पॅगोडा शैलीची मदिरे, राजप्रासादावरील शिल्पकृती पहायला मिळणार म्हणून ते खूष होते काठमांडूची जीवितकुमारी कशी असते? पहाण्याची उत्कठा होती 'महान' चित्रपटात

अमिताभचे गाणे काठमांडूजवळच्या पाच मजली पॅगोडा मंदिराजवळ चित्रीत केले आहे ते मंदिर पहायला उदय सज्ज झाला होता पशुपतिनाथच्या शिवलिंगावर अमिताभने केलेला दुधाचा अभिषेक पाहून हे मंदिर पहाण्याविषयीही त्याला उत्कंठा वाटत होती तर भगवान गौतमबुद्धाचे जन्मस्थळ असलेल्या ऐतिहासिक लुम्बिनी बगीच्याला कधी भेट देऊ असे मला वाटत होते नेपाळच्या भेटीत निसर्गसुंदर पोखरा व्हॅलीची भेट चुकवून चालणार नव्हती हिमालयाच्या अन्नपूर्णाची शिखरे जणू भेटीसाठी साद घालीत होती !

काठगोदामहून नेपाळला पोहोचायचे म्हणजे काठगोदाम लखनौ प्रवास करून लखनौ–गोरखपूर मार्गाने नेपाळमध्ये प्रवेश करायचा लखनौ परत पहायला मिळणार म्हणून उल्का खूष होती नऊ वर्षांपूर्वी पाहिलेलं लखनौ तिला आठवत नव्हतं 'उमराव जान' पाहिल्यावर उल्का म्हणाली होती की नवाबानी गाजव-लेल्या लखनौचं वैभव, थाट पहायलाच हवा, गोरखपूर म्हटलं की डोळ्यासमोर उभा राहतो गीताप्रेस गोरक्षनाथानी वसवलेल्या गोरखपूरला त्याच्या शिष्यांनी बांधलेल्या संगमरवरी मंदिराच्या दर्शनाचाही लाभ होणार होता. गोरखपूरहून सुमारे शंभर कि मी अंतरावर नेपाळची सरहद्द आहे नेपाळ पाहून गोरख-पूरला परतल्यावर पूर्वेकडील प्रवासाचा तिसरा शेवटचा टप्पा पूर्ण करा-यचा होता

दार्जिलिंगला पोहोचायचे म्हणजे गोरखपूरहून सिलीगुडीला यायला हवे त्यासाठी गोरखपूर–सिलीगुडी मीटरगेजच्या थेट प्रवासासाठी गौहत्ती एक्स्प्रेस सोयीची होती भारतातील उटकमंड, माऊंट अबू, मसुरी इ थंड हवेची ठिकाणे पाहिली होती दार्जिलिंग राहिले होते टायगर हिलवरून दिसणारा सूर्योदय व कांचनगंगाची हिमशिखरे पहायची होती दार्जिलिंगहून परतीचा प्रवास करताना कलकत्त्याची पुनर्भेट होणार होती बालपणी पाहिलेला हावडा ब्रीजच फक्त उल्काला आठवत होता झेलम एक्स्प्रेसने सुरू होणारा प्रवास हौरा–बॉम्बे एक्स्प्रेसने संपणार होता

रेल्वे प्रवासाचा ५६०० कि मी अंतराचा मार्ग एकदा निश्चित झाल्यावर रेल्वे सर्क्युलर तिकीटासाठी नगर रेल्वे स्टेशनवर चक्कर मारली पूर्वी रेल्वे सर्क्युलर तिकीटासाठी चीफ कमर्शियल सुपरिटेंडेंट, व्ही टी स्टेशन, मुंबई येथे पत्रव्यवहार करावा लागे हल्ली प्रत्येक स्टेशनवर सर्क्युलर टूर तिकीट मिळ-ण्याची सुविधा झाली आहे नगर स्टेशनवर टूर तिकीटासाठी अर्ज दिला उल्का, उदय, यशवंत, ती. काका व मी अशी पाच तिकीटे काढली चार मे ८३ ची झेलम एक्स्प्रेसची नगर आग्रा अशी पाच रिझर्वेशन्स मिळाली पुढील आग्रा–काठगोदाम प्रवासाच्या बर्थ रिझर्वेशनची तार केली तसेच हौरा–नगर या

परतीच्या प्रवासाचीही तार केली तारा करून रिझर्व्हेशन करण्याची सोय फारच चागली पण त्यासाठी व्यवस्थित नियोजन मात्र लागते रिझर्व्हेशन मिळाल्याने निर्धास्तपणे प्रवासाच्या तयारीला लागलो.

नेपाळ प्रवासासाठी आवश्यक असलेले सर्वांचे पासपोर्ट साईजचे फोटो काढून घेतले नगर कलेक्टर कचेरीतील सौजन्यामुळे तत्परतेने त्याचदिवशी नेपाळ प्रवासासाठी भारताचे नागरिक असल्याचे ओळखपत्र मिळाले फोटोवर कलेक्टर कचेरीचे शिक्के मारून मिळाले टायफाईड, कॉलरा याची इजेक्शन्स घेऊन सरकारी डॉक्टरचे तसे प्रमाणपत्र जवळ असणे आवश्यक होते माझा भाऊ डॉ राजेंद्र झोळ याने ते काम लगेच केले नेपाळप्रवासाची तयारी पूर्ण झाली

शाळा-कॉलेजची सुटी २० एप्रिलपासून सुरू झाली होती यशवताची रजाही मजूर झाली होती पहाता पहाता चार मे उजाडला पाच जणांच्या पाच सुटकेस, एक होल्डॉल तयार झाले होल्डॉल सुटसुटीत होण्याकडे तीं काकाचे लक्ष होते काश्मीर ते कन्याकुमारी प्रवासात साथ दिलेली बास्केट सोबतीला होतीच. मागील दीर्घ प्रवासाचे अनुभव लक्षात घेऊन बेडेकर लोणच्याची मोठी बाटली बरोबर घेतली सुईदोरा, कपडे वाळत घालण्यासाठी प्लॅस्टिकची दोरी टॉर्च, कुलूप, नित्योपयोगी औषधी गोळ्या, कात्री इ बारीकसारीक पण महत्त्वाच्या वस्तूची एक स्वतत्र हॅंडबॅग तयार केली ती बाईच्या आग्रहास्तव बेकरीतून मैद्याची बिस्कीटे तयार करून घेतली प्रवासात कॅमेरारोल खात्रीशीर मिळत नसल्याचा पूर्वीचा अनुभव होता पूर्वी काही डयूडेट झालेल्या रोलमुळे चागले फोटो वाया गेले होते उदयने फोटोग्राफरकडून पाच रोल आणले

प्रवासात भेट देण्याच्या निरनिराळ्या पर्यटनस्थळांचे क्रमवार नकाशे, पम्प्लेटस् लावण्यात यशवत सकाळपासून मग्न होते चार दीर्घ प्रवासाच्या अनुभवामुळे ते जरी निर्धास्त होते तरी मी मात्र बेचैन होते मनात असख्य विचार गर्दी करीत होते प्रवासात शेवटपर्यंत बर्थचे रिझर्वेशन मिळेल का ? मे महिना असल्याने आग्रा, लखनौ, गोरखपूरला उन्हाचा त्रास होईल का ? हिमालयात थडी-पावसाचा त्रास होईल का ? सामान हरवणार तर नाही ? कोणी आजारी तर पडणार नाही ? अनेक शका मनाला भेडसावीत होत्या पण आता उल्का-उदय मोठे झाले होते त्याचा आधार वाटत होता तीं काकांचाही मोठा आधार होता सकाळीच विघ्नहर्त्या गणरायाचे दर्शन घेतले मग मात्र मन शात झाले गणरायाच्या आशीर्वादाने भावी प्रवास सुखकर होईल असा आत्म-विश्वास वाटू लागला

सध्याकाळ झाली आमरस पुरी बेताबर ताव मारला प्रवासाच्या आमच्या गप्पात सामील झालेली आमची छोटी पुतणी शिल्पा म्हणाली, " काकू नेपाळमध्ये

विमानात बसू नका वर विमानाची भीती वाटते " रात्री दहाला येणारी झेलम एक्स्प्रेस दोन तास लेट आहे असे फोनवर चौकशी करता कळले रात्री अकराला स्टेशनवर गेलो आम्हाला निरोप द्यायला माझे दीर श्री अशोकराव व जाऊ सौ अरुणा, आमच्या समोर रहाणारे श्री नानासाहेब घुमरे, उदयचे अनेक मित्र आले होते सर्वांनी प्रवासाला वारवार शुभेच्छा दिल्या अखेर झेलम आली तीन वर्षांपूर्वी १७८ अप झेलम एक्स्प्रेसने कुलूघाटीचा प्रवास सपवून दिल्लीमार्गे नगरला परतलो होतो तर आता १७७ डाऊन झेलम एक्स्प्रेसने हिमालयदर्शनासाठी मध्यरात्री नगरचा निरोप घेतला

बर्थवर पडल्यापडल्या झोप लागली तरी रात्रभर पर्यटनस्थळाविषयीच स्वप्ने पडत होती सकाळी सातच्या सुमाराला जाग आली गाडी खाडवा स्टेशनावर उभी होती तोंड धुऊन सर्वांनी चहा घेतला तेथे उल्काची आवडती कचोरी मिळाली पुढे होशगाबादजवळ नर्मदा माईचे दर्शन झाले सकाळी नऊला भोपाळला पोहोचणारी झेलम दुपारी बाराला तेथे पोहोचली बरोबर घेतलेला जेवणाचा डबा उघडला पुरी, भाजी, चटणी, लोणचे मस्त जेवण झाले प्रवासातील घरचे हे पहिले आणि शेवटचे जेवण होते महिनाभर बाहेरच्या जेवणाला तोंड द्यावे लागणार होते

भोपाळ स्टेशन गेल्यानतर झेलम दिल्लीकडे निघाली नगरला दोन तास लेट असलेली झेलम लेट होत होत एकूण पाच तास लेट झाली होती आम्हाला सध्याकाळी पोहोचणारी झेलम रात्री पोहोचणार होती रात्री खूप उशीरा आम्हाला पोहोचून उतरण्याऐवजी अलीकडे ग्वाल्हेरला उतरावे असा प्रस्ताव यशवतनी माडला ग्वाल्हेरला एक रात्रीचा मुक्काम करून दुसऱ्या दिवशी सध्याकाळी आग्र्याला जाण्याच्या त्यांच्या बेतास सर्वांनीच मान्यता दिली कारण आग्रा पूर्वी पाहिले होतेच ग्वाल्हेर हे नवीन गाव प्रवासात पहायला मिळेल याचा सर्वांनाच आनद वाटला वाईटातून कधी चागले निघते ते असे ग्वाल्हेरला झेलम रात्री आठ वाजता पोहोचली सामान उतरवून घेतले प्लॅटफॉर्मवरील रेल्वे विश्रामालयात जागा मिळाल्याने हायसे वाटले हमालाकरवी वरील मजल्यावर सामान नेले हातपाय धुऊन कपडे बदलले तेव्हा बरे वाटले स्टेशनसमोरीलच हॉटेलमध्ये रात्रीचे जेवण घेतले शिंदे राजांनी एक काळ गाजवलेल्या राजधानीत मुक्कामाला आलो होतो

❋

## शिंदे राजघराण्याचे ग्वाल्हेर

ग्वाल्हेर रेल्वे विश्रामालयाच्या गच्चीवर सकाळी आठ वाजता उभे राहिलो तर सोनेरी सूर्यप्रकाशात ग्वाल्हेरच्या किल्ल्याचे दर्शन झाले किल्ला पाहण्याची ओढ सर्वांनाच वाटू लागली स्टेशनसमोरील हॉटेलमध्ये कचोरी,सामोसे, चहा असा भरपूर नाष्टा केला. एक टेम्पो ठरवून किल्ल्याकडे निघालो किल्ल्याच्या पायथ्याशी वीस मिनीटातच पोहोचलो पूर्वेकडील मार्गाने चढ असल्याने वाहने वर जात नाहीत किल्ल्याच्या दुसऱ्या पश्चिम बाजूने लांबच्या रस्त्याने मात्र किल्ल्यावर वाहन जाऊ शकते त्या बाजूला उरवाही गेट आहे असे कळले किल्ल्यावर जाण्यास असे दोन मार्ग आहेत पूर्वेकडील मार्गाने दगडी पायऱ्यावरून चढू लागलो या मार्गावर पूर्वी सात दरवाजे होते आता फक्त पाचच अस्तित्वात आहेत उल्का उदय आमच्यापुढे लवकर चढून आमची वाट पहात होते वेळ सकाळची होती तरी ग्वाल्हेरचा मे महिन्यातील उन्हाळा जाणवू लागला होता हळूहळू पायऱ्या चढत, मधूनच विश्रांती घेत तीनशे फूट उंचीचा चढ चढून किल्ल्याच्या सर्वात वरच्या हत्ती दरवाजात आलो तेव्हा सकाळचे दहा वाजले होते

ग्वाल्हेरच्या या प्राचीन दुर्गाचे उल्लेख जुन्या शिलालेखात गोपगिरी, गोपाद्री, गोपाचल या नावाने येतात गोपाल शब्दापासून ग्वाल शब्द आला व

त्यावरून ग्वालियर–ग्वाल्हेर असे नाव पडले.ग्वाल्हेरच्या प्राचीन नगरी व दुर्गाच्या निर्मितीविषयी एक दतकथा रूढ आहे या दुर्गाजवळच कुतलपूर नावाचे नगर होते तेथील सूरजसेन हा राजा कुष्ठरोगपीडीत होता एकदा तो या पहाडावर शिकारीला गेला असताना तहानेने व्याकूळ झाला तेथे त्याला एक साधू भेटला साधूने राजाला या पहाडावरील एक तळे दाखवले त्या तळ्याचे पाणी पिताच राजाचा कुष्ठरोग बरा झाला राजाने आनदित होऊन साधूची सेवा करण्याची इच्छा व्यक्त केली साधूने राजाला सरोवराचा विस्तार करण्यास सुचविले राजाने सरोवराचा विस्तार करून ते नीट बाधले जवळच दुर्गही बाधला साधूचे नाव ग्वालिप होते त्याच्या स्मृतीप्रित्यर्थ राजाने दुर्गाला ग्वालियर नाव दिले. साधूने सरोवराचे नाव सूरजकुड ठेवले साधू राजाला म्हणाला की जोपर्यंत इथल्या राजाचे वशज आपल्या नावाच्या अती पाल शब्द लावतील तोपर्यंत ‧याची सत्ता टिकेल त्या वशातील ८३ वा राजा तेजकरण याने आपल्या नावापुढे पाल शब्द लावला नाही म्हणून तो शेवटचा राजा ठरला साधूची भविष्यवाणी खरी ठरली

ग्वाल्हेरच्या किल्याने अनेक साम्राज्ये पाहिली या किल्ल्यावर एकशेदहा राजानी राज्य केले सहाव्या शतकात गुप्ताचे साम्राज्य होते पुढे तो मिहीर कुलाच्या ताब्यात होता त्यावेळी या दुर्गावर सूर्यमदिराची निर्मिती झाली त्यानतर प्रतिहार वशातील राजा भोज याने राज्य केले दहाव्या शतकात खजुराहोचा चदेल राजा धग याची सत्ता होती त्यानतर कछवाह राजानी दोन शतके येथे राज्य केले विद्याकलांना प्रोत्साहन दिले दुर्गावर अनेक मदिरे उभारली तेराव्या शतकाच्या सुरुवातीला किल्ल्यावर दिल्लीचा सुलतान इल्तमश याने आक्रमण केले. राजपूत राजांचा सहार केला नंतरची दोन शतके किल्यावर मुसलमानांचा अमल होता तोमर वशातील राजपूत राजा वीरसिंह याने किल्ला जिंकून मुस्लीम सत्ता सपुष्टात आणली तोमर वशाच्या सव्वाशे वर्षांच्या सत्तेत डोंगरसिह राजाचा काळ सर्वात वैभवशाली होता त्याचवेळी या किल्ल्यावर जैन तीर्थंकराच्या विशाल मूर्ती उभारल्या गेल्या राजा मानसिह हा नतरचा राजा स्थापत्य, शिल्प, सगीत अशा कलाचा भोक्ता होता त्याने या कलाना उत्तेजन दिले

सोळाव्या शतकात हा किल्ला इब्राहीम लोदीच्या व नतर मोगलांच्या ताब्यात गेला किल्ल्याचे दुर्भाग्य सुरू झाले मूर्तीचा विध्वस करण्यात आला. मोगल सम्राट अकबरने इ स १५५९ मध्ये हा किल्ला ताब्यात घेतल्यावर सुमारे दोन शतके तो मोगलाच्या ताब्यात होता मोगलकाळात या किल्ल्याचा उपयोग बदीखाना म्हणून करण्यात आला जहांगिरच्या काळात शिखाचे सहावे गुरु हरगोविंद येथे कैदेत होते औरगजेबाचा भाऊ मुरादबक्षही येथे बंदिवासात होता.

पुढे येथेच त्याला ठार मारण्यात आले मोगल राजघराण्यातील अनेक व्यक्ती किल्ल्यात बंदिवासात होत्या

इ स १७५४ मध्ये हा किल्ला मराठ्यानी जिंकला १७७७ मध्ये पेशव्यांनी तो महादजी शिंदे यांच्या ताब्यात दिला त्यानी किल्ल्याचा विस्तार केला १८५७ च्या स्वातन्त्र्ययुद्धात क्रांतिवीरानी हा किल्ला जिंकला १८५८ मध्ये इंग्रजांबरोबरच्या युद्धात झाशीची राणी लक्ष्मीबाई यानी येथे हौतात्म्य पत्करले १८८६ साली इंग्रजानी परत हा किल्ला शिंदे सरकारच्या ताब्यात दिला एकोणिसाव्या शतकात शिंदे घराण्यातील राजानी या संस्थानाची खूप प्रगती केली स्वातन्त्र्यानंतर ग्वाल्हेर–नरेश जयाजीराव शिंदे यानी स्वखुषीने भारतीय संघराज्यात ग्वाल्हेर संस्थान विलीन केले विद्यमान राजे श्री माधवराव शिंदे व राजमाता विजयामालाराणी यांच्यातील संघर्ष सर्वश्रुतच आहे

ग्वाल्हेरचा हा ऐतिहासिक महत्त्वाचा किल्ला अतिशय भरभक्कम आहे किल्ला दोन मैल लांब असून त्याच्या पक्क्या दगडी भिंती पस्तीस फूट उंचीच्या आहेत त्यावर मोठे बुरुज आहेत दगडी भिंती पस्तीस फूट उंचीच्या आहेत त्यावर मोठे बुरुज आहेत घुमटधारी कळस आहेत. किल्ल्यावर पोहोचल्यावर तेथील पुराण वस्तु संशोधन कार्यालयात गेलो गाईड बरोबर घेऊन किल्ल्यावर फेरफटका मारण्यास सुरूवात केली

प्रथम सास बहू मंदिर नावाने प्रसिद्ध असलेल्या दोन वैष्णव मंदिराजवळ पोहोचलो मोठे मंदिर सासमंदिर तर छोटे मंदिर बहूमंदिर म्हणून ओळखले जाते मंदिर उभारतानाही सासूला दिलेला मान पाहून गंमत वाटली कछवाह राजवंशातील राजा महिपाल याने इ स १०९३ मध्ये मोठे मंदिर उभारले राजा महिपालची माता विष्णुभक्त होती तिच्यासाठीच हे मंदिर बांधले प्रवेशद्वारी ब्रह्मा, विष्णु, महेश यांच्या मूर्ती आहेत दोन्ही बाजूला शिलालेख आहेत मंदिरात प्रवेश करण्यासाठी तिन्ही बाजूला देवड्यांचे मार्ग आहेत देवड्या व पडवी यांच्यावर हे मंदिर दुमजली आहे तर गाभाऱ्यावर तीन मजली आहे गाभाऱ्याच्या भव्य घटाकार, गोलाकार छताची उंची सुमारे पचवीस मीटर आहे, छताला मध्यभागी चार स्तंभ व बाजूच्या भींतीतील बारा स्तंभ आधार देतात मंदिरावरील अंतर्बाह्य नक्षीकाम कोरीव काम अप्रतिम आहे भिंतीवरील कलाकुसर उल्लेखनीय आहे राजपूत शैलीच्या या मंदिरात अनेक देवतांच्या मूर्ती व सुंदर नक्षीकाम पाहून चितोडगडवरील मीरादेवीच्या मंदिराची आठवण झाली सास-बहूमंदिरातील लहान मंदिर म्हणजे मोठ्या मंदिराची एक छोटी प्रतिकृतीच आहे फरक इतकाच की अष्टकोनी स्तंभावर त्याचे छत आधारलेले आहे राजा महिपालची राणी शिवभक्त होती तिच्यासाठी हे मंदिर उभारले मंदिराच्या

मध्यभागी पिंड होती पण सध्या मंदिराचा गाभारा पूर्णपणे नष्ट झालेला दिसतो. मंदिरातील मूर्ती औरंगजेबाने फोडल्या आज या मंदिरात पूजा अर्चा होत नाही मंदिराच्या दाराची चौकट मात्र खूपच नक्षीदार आहे

सासमंदिराच्या समोर दारूगोळा ठेवण्याचे कोठार, तसेच तोफा आहेत' बहूमंदिराच्या कट्टयावरून संपूर्ण ग्वाल्हेरचे मनोरम दृश्य दिसते ही मंदिरे पाहून थोडे पुढे आल्यावर भव्य गुरूद्वार आहे पाय धुऊन गुरुद्वाराच्या विशाल आवा-रात प्रवेश केला शिखांचे सहावे गुरू हरगोविंद यांच्या स्मरणार्थ या नव्या गुरूद्वाराचे काम चालू आहे शिखांचे पाचवे गुरू अर्जुनसिंग यांच्या हत्येनंतर सहा वर्षांनी शिखांचे सहावे गुरू हरगोविंदसिंग यांना अमृतसरहून दिल्लीला मोगल दरबारात बोलावण्यात आले मोगल सम्राट जहांगिरच्या या काळात १६१२ मध्ये त्यांना येथे कपटाने कैदेत ठेवण्यात आले होते या गुरुद्वारात मोठ्या चबुतऱ्यावर गुरू गोविंदसिंगांचे मोठे चित्र आहे गुरू ५२ कळयांचा कुडता—बंडी घालीत 'बंडी चोर' असे गुरूचे नाव पडले नंतर जहांगीरला चूक उमगल्या-नंतर सहावे गुरू हरगोविंदाची मुक्तता करण्यात आली गुरूंच्यामुळे बंदिवासातील इतर राजपूत राजांचीही सुटका झाली गुरुद्वाराच्या संपूर्ण भिंतीवर तसेच छतावर 'रंगीबेरंगी, पांढऱ्या चिनी मातीच्या चमकदार टाईल्सचा मुबलक वापर केला आहे त्यामुळे तीन मजल्यापर्यंत काम पूर्ण झालेले हे गुरुद्वार मोठे शोभिवंत व स्वच्छ दिसते तिसऱ्या मजल्यावरून बाजूचे तीन तलाव दिसतात एका खिडकीतून 'तेलीका मंदिर' दिसते गुरुद्वाराच्या बाजूला राहण्यासाठी खोल्या आहेत जेवणासाठी लंगर आहे दूरदूरहून आलेल्या शीख बांधवामुळे गुरुद्वार गजबजून गेले होते

थोडे पुढे गेल्यावर 'तेलीका मंदिर' या उंचच्या उंच मंदिराच्या प्रशस्त प्रांगणात प्रवेश केला हे मंदिर इ स ८५० च्या सुमारास मिहीर भोज या प्रतिहार राजाने बांधले मंदिराचे मूळ नाव तेलगण मंदिर राजा तिलगपाल याच्या एकुलत्या एका मुलीचे लग्न या मंदिरात झाले होते मंदिराच्या प्रवेशद्वारी दोन्ही बाजूला नक्षीदार पाने, नृत्य करणाऱ्या युवती तसेच गंगा—यमुना या जल-देवतांच्या सुंदर मूर्ती कोरल्या आहेत मंदिराला आयताकार गाभारा असून भिंतीवर कलाकुसर आहे मंदिरात अनेक नक्षीदार महिरपी कोनाडे असून देव-देवतांच्या मूर्ती कोरल्या आहेत मंदिराच्या बाजूनी कळसावर चैत्य असून सूर्यप्रकाश आत येण्यास वर मोठे गवाक्ष आहे त्यावर नक्षीदार कमान आहे मंदिराचे शिखर द्राविडी शैलीचे असून २५ मीटर उंच आहे पूर्वी मंदिराच्या चारी बाजूला मंडप होते. आवारात जैन तीर्थंकरांच्या काही मूर्ती दिसतात 'तेलीका

मदिर' पाहून परतताना प्राचीन सूरजकुड दिसते राजा सूरजपालचा कुष्ठरोग याच कुंडातील पाणी प्राशनाने दूर झाला होता अशी आख्यायिका आहे

फिरत फिरत मुख्य मानसिग राजवाड्याजवळ आलो. उन्हामुळे घशाला कोरड पडली होती माठात ठेवलेल्या थडगार पाण्याने तहान भागवली राजवाडा पाहण्यासाठी तिकीटे काढली व गाईडसमवेत आत प्रवेश केला हा भरभक्कम राजवाडा १४८६ ते १५१७ मध्ये बाधण्यात आला त्यावर सहा सुदर घुमट आहेत प्रथम राजवाड्यातील सगीत महालात गेलो राजा मानसिगाला आठ राण्या होत्या या आठ राण्यासाठी आठ मोठे नक्षीदार कोनाडे तेथे आहेत तेथे बसून त्या सगीत सभेत सहभागी होत त्यानतर आहे मानमदिर महाल तेथील नक्षीदार जाळ्यात पूर्वी हिरे बसवलेले होते राजा तेथे पूजाअर्चा करीत असे तेथे चोवीस खिडक्या असून त्या आतुन परिक्रमामार्ग आहे दरबार महालात लढाईच्या वेळी खास दरबार भरत असे राजासाठी आसन असून राण्याना बसण्यासाठी जाळ्याच्या आत खास व्यवस्था केली आहे प्रेक्षणीय शीशमहल हा हवामहल असून बाहेरील हवा आतमध्ये खेळण्यास खास व्यवस्था केली आहे कमळाचा आकार दिलेल्या पत्थरात दिव्याची व्यवस्था पूर्वी केली जाई नृत्य-महालातील दगडी कोरीव काम उत्कृष्ट आहे पाचशे वर्षांपूर्वीचा दिलेला रग अजूनही आहे जाळीच्या खिडक्याच्या आत राण्या आसनस्थ होऊन नृत्य पहात तेथील प्रसाधनकक्षात आरशाची व्यवस्था होती पडदा सोडायला असलेल्या रिगा आजही दिसतात गाईडने नतर राजा मानसिगच्या राणीचे शयनगृह दाखवले बाजूच्या गोलामध्ये पूर्वी आरसे बसवले होते त्यातून प्रकाश परावर्तित होऊन खोली उजळून निघे झूला महलमध्ये राजाच्या आठही राण्या झोका खेळत शत्रू आला तर लपून वार करीत लढाईत पराभव होत आहे हे पाहताच स्त्रिया जोहार करीत त्यासाठी पंचवीस फूट खोल जोहारकुड आहे वरच्या झरोक्यातून मारलेली उडी जोहारकुडात पडत असे होळीच्या दिवसात या कुंडाभोवतीच होळीही साजरी केली जात असे या कुंडाखाली सध्या बरेच पाणी आहे होळीच्या वेळच्या हास्याचा मधुर ध्वनी, जोहार करतानाचा निर्धार आणि मूक अश्रू हे सारे काही अनुभवलेले ते जोहारकुंड एखाद्या स्थितप्रज्ञासारखे वाटले

गाईडने नतर एक तळघर दाखवले त्याचे नाव फाशीघर औरगजेबाने येथे मुरादला फाशी दिले यासबंधीची एक हकीकतही गाईडने सागितली सरस्वतीबाई नावाची मुरादची एक हिंदू प्रेयसी होती तिने कैदेत असलेल्या मुरादची सुटका करण्याचा निर्धार केला त्यानुसार त्याची सुटका झालीसुद्धा पण जगलात दूर निघून जाण्यापूर्वी सरस्वतीबाईच्या घरी जाण्याची केलेली चूक

मुरादला फार महागात पडली परत कैद केलेल्या मुरादला औरगजेबाने विलब न लावता या तळघरात फाशी दिले

किल्ला पाहून पायथ्याशी आलो तेथे आहे पूर्वीचा गुजरीमहाल राजा मानसिगची नववी राणी होती मृगनयनी एकदा राजा शिकार करून परत येत असताना दोन रेड्याची झुज पराक्रमाने सोडवणाऱ्या या सुदर ग्रामकन्येवर राजा खूष झाला तिच्याबरोबर त्याने लग्न केले पण तिच्या तीन अटी होत्या-मुलाला गादी मिळावी, स्वतत्र महाल बांधावा व तिच्या मूळ गावापासून पाटाने या महालापर्यंत पाणी खेळवावे अर्थातच मोहित झालेल्या राजाने या अटी मान्य केल्या मत्स्यगधेने राजा शतनूला घातलेल्या अटीची आठवण झाली आज या गुजरीमहालात खुले वस्तुसग्रहालय आहे

म्युझियममध्ये प्रवेश करताच प्रथम दिसले 'शालभजिका' हे प्रख्यात शिल्प शालभजिका ही वृक्षदेवतेची मूर्ती भग्न असली तरी अलौकिक शिल्प-कलेचा नमुनाच मोनालिसासारखे मृदू पण गूढ स्मित चेहऱ्यावर विलसत असलेल्या या मूर्तीचा बाधा कमनीय सुडौल आहे केसाची वळणे हुबेहूब आहेत. या मूर्तीचा पासष्ट लाख रुपयाचा विमा उतरवण्यात आला आहे पहिल्या कक्षात एकवीस शिलालेख आहेत चामुडरायाचा उल्लेख असलेला तोरण शिलालेख त्यात आहे प्राचीन ब्राह्मी लिपीपासून आधुनिक देवनागरी लिपीपर्यंत कशी उत्क्राती होत गेली हे दर्शवणारा तक्ता तेथे आहे अरबी फारशी भाषेतील शिलालेखही आहेत दुसऱ्या कक्षात पाषाण स्तभांचे दहा शिलालेख आहेत पाषाण स्तभांची परपरा मौर्य काळात सम्राट अशोकापासून सुरू होते पूर्वी काष्ठ स्तभ होते. खरोखर, भूतकालीन अंधारात गडप झालेले आर्थिक, भौगोलिक, सामाजिक जीवन थोडेफार प्रकाशात आणण्याचे काम शिलालेख करीत असतात एका कक्षात धार जिल्ह्यातील बाघ गुफातील भगवान गौतम बुद्धाच्या सबधित सातव्या शतकातील चित्रकलेची दृश्ये आहेत विविध कक्षात अनेक प्राचीन मूर्ती आहेत एका दालनात मुगल शैलीतील मोगल राजाची चित्रे आहेत कागरा शैलीतील राजा मानसिह, राधा-कृष्ण यांची चित्रे आकर्षक आहेत शिवाजी महाराजाचे हातात फूल असलेले चित्र पाहून मजा वाटली

ग्वाल्हेरचा किल्ला व पायथ्याजवळचे म्युझियम पाहून टेम्पोने बाजारच्या चौकाकडे निघालो चौक ओलाडून सुमारे अर्धा कि मी सरळ बाजारच्या रस्त्यावर उतरून उजवीकडे वळालो या ठिकाणी महत्त्वाची दोन ऐतिहासिक स्मारके आहेत एक आहे अकबराचे गुरू महमद गौस याचा मकबरा तर त्या शेजारी आहे सगीतसम्राट तानसेन यांची समाधी प्रवेशद्वारी महमद गौस याचे सातवे विद्यमान वशज सय्यदसाहब यांनी मोठ्या आस्थेवाईकपणे स्वागत केले.

या वास्तूची ऐतिहासिक हकीकत अस्खलित उर्दू मिश्रित हिंदीत कथन केली हा मकबरा ४३२ वर्षांपूर्वी बांधला मकबरा १०० फूट उंच आहे त्यावर कवडी चुन्याचे पक्के प्लॅस्टर आहे बाजूला कमानी असून फारशी भाषेत शिलालेख आहे त्यावर कोरले आहे– 'मैं अकबर हूँ। ये मेरे धर्मके गुरू है।'

शेजारी संगीतसम्राट तानसेन याची समाधी आहे एका चिंचेच्या झाडाखाली उंच चबुतऱ्यावर हे छोटेखानी स्मारक आहे सय्यदसाहेबांना विनती केल्यावर त्यांनी तानसेनचे सारे जीवन चित्रच आमच्यासमोर उभे केले इतिहासाचे सखोल ज्ञान व मधुर वाणी यामुळे पाहता पाहता त्यांच्याबरोबर आम्हीही भूतकाळात गेलो ग्वाल्हेरपासून अठरा मैलावर असलेले बेहट हे तानसेनचे मूळ गाव त्याच्या वडिलांचे नाव मकरंद पांडे जातीने गौड ब्राह्मण असलेले पांडे मुले जगत नाहीत म्हणून ग्वाल्हेरचा प्रसिद्ध सूफी साधू महमद गौस याला शरण गेले त्याच्या चरणावर मस्तक टेकवून त्यांनी संतानप्राप्तीचा आशीर्वाद मागितला प्रसन्न होऊन महमद गौस आशीर्वाद देत म्हणाले की तुझ्या घरी असे बालक जन्म घेईल की जे आपल्या कर्तृत्वाने पुढे इतिहासात प्रसिद्ध होईल मकरंद पांडे यांना पुढे झालेला मुलगाच तानसेन होय त्याचे मूळ नाव रामतनू स्वत मकरंद पांडे उत्तम गायक असल्याने लहान वयातच त्याला संगीताची गोडी लागली. त्याचे थोरले काका रामदासस्वामी हे वृंदावनचे संतगायक हरिदासस्वामी यांचे शिष्य होते रामतनूचा गोड आवाज पाहून रामदासस्वामींनी त्याला संगीतशिक्षणासाठी हरिदासस्वामींच्या हवाली केले रामतनूने त्यांच्याकडे बारा वर्षे संगीताचा अभ्यास केला संगीतविद्येत प्रावीण्य मिळवून व गुरूचा आशीर्वाद घेऊन देशातील विविध संगीत केंद्रांना भेटी देत तो फिरत राहिला ग्वाल्हेरच्या राजा विक्रमजितने त्याच्या मधुर गायनावर प्रसन्न होऊन त्याला तानसेन ही पदवी दिली त्यानंतर हरिदासस्वामींचा भक्त असलेल्या रेवा नरेश रामचंद्र यांनी तानसेनला आपल्या राज्यातल्या प्रमुख गायकाचा मान दिला वयाच्या पन्नासाव्या वर्षापर्यंत तो या राजसभेत होता त्याच्या कीर्तीचा सुगंध अकबरापर्यंत पोहोचला अकबराने रामचंद्राकडे तानसेनची मागणी केली अकबराचा रोष कुणावर होऊ नये म्हणून तानसेन अकबराकडे गेला इ स १५५६ पर्यंत तो तेथे राहिला दिवाण–ए–खासच्या जलशात तानसेनला 'मियाँ' हा किताब मिळाला

तानसेनचा विवाह हुसैनी या मुस्लीम मुलीशी झाला त्याने मुस्लीमधर्माचा स्वीकार केला का नाही याबाबत विद्वानात मतभेद आहेत त्याला सुरतसेन, सरतसेन, तरंगसेन व विलासखाँ हे चार पुत्र व सरस्वती ही कन्या होती आज मुलीकडूनच फक्त वंशज आहेत तानसेन हा केवळ गायक नव्हता तर कवीही होता ध्रुपदसंगीतात त्याचे स्थान अद्वितीय होते त्याच्या संगीताने वृक्षवेली व

शिलाखंडही प्रभावित होत असत त्याने दीपराग आळवला की दिवे उजळत किंवा मेघमल्हारच्या ताना छेडल्या की आकाशात मेघ जमून ते वृष्टी करू लागत संगीतसार व रागमाला हे संगीतविषयक ग्रथ लिहिलेल्या तानसेनने हिंदीभाषेत शेकडो पदे रचली अशी तीनशे पदे आज उपलब्ध आहेत तानसेनचा मृत्यू १५८९ मध्ये दिल्ली येथे झाला त्याच्या अंतिम इच्छेनुसार अकबराने त्याचे शव ग्वाल्हेरला पोहोचवले तिथे महमद गौस याच्या कबरीशेजारी त्याला चिरनिद्रा देण्यात आली तानसेनच्या मृत्यूमुळे कलाक्षेत्राची जी हानी झाली तिचे वर्णन स्वत अकबराने एका दोह्यात केले आहे–

**पीथलसों मजलिस गई, तानसेनसों राग।**

**हँसिबौ रमिबौ बोलिबौं, गयौ बीरबल साथ।।**

पीथल कवीबरोबर मैफल गेली तानसेनबरोबर संगीतातील रागरागिण्या गेल्या बिरबलबरोबर हास्यविनोद गेला तानसेनची स्तुती करताना महाकवी सूरदास म्हणतात

**भलो भयो विधि ना दियो शेषनाग के कान**

**धरा मेरू सब डोलते तानसेनकी ताना ॥**

विधीने शेषाला कान दिले नाही हे ठीकच झाले, नाहीतर तानसेनची तान ऐकून शेष डोलायला लागला असता व त्याच्या मस्तकावरील पृथ्वी व मेरुपर्वत हे अस्थिर बनून डगमगू लागले असते

तानसेनच्या पुण्यतिथीच्या वेळी अनेक गायक व वादक समाधीजवळ जमून श्रद्धापूर्वक स्वरांजली वाहतात समाधीवर चादर चढविण्यात येते. खानदानी गायिकाही येतात या दोन्ही स्मारकांना सरकारी मदत नाही याची खंत सय्यद-साहेबांनी व्यक्त केली संस्थान काळात मात्र अतिशय चांगली व्यवस्था ठेवण्यात येत असे असे ते म्हणाले एवढ्यात दोन स्त्रिया दर्शनाला आल्या त्या गायिका असून नेहमी दर्शनास येतात असे कळले

तानसेनच्या समाधीचा भावपूर्ण निरोप घेऊन फूलबाग मध्ये आलो विस्तृत बगीच्याच्या या परिसरातच झाशीच्या शूर राणीचे देहावसान झाले मर्दानी पोषाखात घोडदौड करीत जाणाऱ्या राणीवर इंग्रज सेनापती सर ह्यू रोजच्या नेतृत्वाखालील इंग्रज सैनिकांनी बंदुकीच्या गोळ्या झाडल्या घोड्यावरून घायाळ होऊन खाली पडलेल्या राणीला फूलबाग व किल्ला याच्यामध्ये असलेल्या नदीवर पालखीतून नेण्यात आले एका विशाल वृक्षाखाली अग्निसंस्कार झाला. इंग्रजांशी

लढत हौतात्म्य पत्करलेल्या राणीचा अश्वारूढ पुतळा फूलबागेमध्ये आहे ग्वाल्हेरचे राजकवी भा रा तांबे यांच्या काव्यपंक्ती स्मारकावर कोरल्या आहेत

रे हिंद बांधवा थांब या स्थळी, अश्रू दोन ढाळी
ती पराक्रमाची ज्योत मावळे, इथे झाशीवाली
कडकडा कडाडे बिजली,
शत्रूची लष्करे थिजली,
मग कीर्तिरूप ती उरली,
ती हिंदभूमीच्या पराक्रमाची इतिश्रीच झाली,

फूलबागेच्या बाजूला मोतीमहाल आहे जिवाजीमहाराज शिंदे यांनी इ स १८७२ मध्ये सचिवालय म्हणून ही भव्य वास्तू बांधली आज तेथे सरकारी कचेऱ्या आहेत तेथील सेवकच असलेल्या गाईडने काही दालने दाखवली महाराजांचा पार्लमेंट मीटींग हॉल सुंदर असून छतावर आकर्षक डिझाईन आहे राधाकृष्णाचा मोठा फोटो तेथे आहे गाईडने बळेच तेथे पैसे ठेवायला सांगितले आणि आमच्या देखतच उचलूनही घेतले संगीतमहालात आता कोर्ट भरते भिंतीवर सोनेरी डिझाईन असून छताला मोठे झुंबर आहे समोरासमोर आरसे आहेत बाजूला कारंजी आहेत रंगमहाल किंवा हवामहालात चितारलेला दसऱ्याचा देखावा तसेच सिंहाच्या शिकारीचा देखावा प्रेक्षणीय आहे चिडीया महलमध्ये विविध पक्ष्यांची चित्रे असून बोटभर उंचीची चित्रित केलेली कृष्णमूर्ती रेखीवपणामुळे लक्ष वेधून घेते रागमाला दालनात बुंदेलखंडी कलमशैलीत विविध राग भिंतीवर चित्रित केले आहेत नागपूरवाला नावाचा चित्रकार खास यासाठी ग्वाल्हेरला बोलावला होता प्रत्येक चित्रावर राग-रागिणींची नावे लिहिली आहेत प्रत्येक दालनातून बाहेर पडताना बाहेरचे सेवक हसून सलाम करीत होते पण बक्षिसीच्या आशेने केलेले ते सलाम आम्ही सोयिस्कररीत्या टाळत होतो बक्षिसी न देता पुढे जाणाऱ्या आमच्याकडे पाहून त्यांचे हसरे चेहरे कसे होत असतील याची कल्पना येऊन मनोमन हसू येत होते मोतीमहाल मधून बाहेर पडताना गाईडने लांबलचक सलाम केला त्याने व्यवस्थित माहिती दिल्याबद्दल त्याला मात्र नाराज केले नाही एव्हढ्यात आगऱ्याहून एक ग्रूप आलेला दिसल्याबरोबर त्याने पैसे खिशात टाकून लगेच त्यांच्याकडे धाव घेतली

ग्वाल्हेरच्या धावत्या भेटीत जयविलास पॅलेसमध्येही गेलो हा महाल इटालियन शिल्पकृतीच्या धर्तीवर बांधला आहे शिंदे राजघराण्याच्या मालकीच्या या राजवाड्याचा काही भागच पर्यटकांना दाखविण्यात येतो प्रवेश फी तीन रुपये आहे जिवाजीराव शिंदे यांच्या कारकीर्दीत ग्वाल्हेर संस्थान भारतात

विलीन झाले विजया राजे शिंदे या त्याच्या महाराणी व माधवराव शिंदे हे विद्यमान राजे

राजवाड्यातील पस्तीस दालनात म्युझियम आहे ते पाहताना शिंदे राजघराण्याच्या वैभवाची कल्पना येते छतावर उत्कृष्ट पेंटिंग असलेली दालने आहेत जुने चांदीचे डिनर सेट, एकावेळी अडीचशे पाहुणे बसू शकतील असा भव्य डायनिंग हॉल आहे डायनिंग टेबलभोवती छोटे रूळ असून कटग्लास व चांदीचा वापर केलेल्या छोटया ट्रॉलीतून पाहुण्यासाठी विविध पदार्थ आणले जात विविध दालनात देखणे नक्षीदार पर्शियन गालीचे, ब्राझिलमधून आणलेले कटग्लास फर्निचर, कृष्णजन्म साजरा करण्यास इटालियन काचेचा पाळणा, निरनिराळ्या शिकारीच्या वेळी मिळालेली पदके, राणीच्या रत्नखचित स्लीपर्स, अनेक तैलचित्रे, परदेशातून मिळालेल्या भेटी आहेत औरंगजेब व शहाजहानची तलवार या उल्लेखनीय वस्तू युरोपमधील सर्व विलासी वस्तू येथे आहेत

ग्वाल्हेरचा धावता फेरफटका संपवून दुपारी तीनला स्टेशनजवळील हॉटेलात पोहोचलो सर्वांनाच कडकडून भूक लागली होती आलूमटारचा गरमगरम रस्सा, दही, लोणचे, पुलाव असे मस्त जेवण मिळाले आरामात जेवण आटोपून रेल्वे विश्रामालयात येऊन तासभर विश्रांती घेतली दुपारी पाचच्या सुमारास स्टेशनवर आलो तोच समोरून पंजाब मेल धडधडत आली सामान चढवले जागाही मिळाली ग्वाल्हेरसारख्या ऐतिहासिक गावाचे दर्शन झाल्याने मनाला समाधान वाटत होते ग्वाल्हेर स्टेशन सोडल्यावर चंबळच्या खोऱ्यातून प्रवास सुरू झाला मध्येच चंबळ नदीच्या पूलावर गाडी थांबली दरोडेखोरांनी गाडी अडवली की काय अशी भीती मनात डोकावली पण सुदैवाने तसे काही नव्हते सायंकाळी सातच्या सुमारास आग्राकँट स्टेशनवर आलो तेथेही रेल्वे विश्रामालयात जागा मिळाली स्टेशनवरच जेवण आटोपून विश्रामालयात परतलो सर्वांनाच विश्रांतीची नितांत आवश्यकता होती


*

## ऐतिहासिक नगरी–आग्रा


आग्र्याच्या वास्तव्यातील पहिला दिवस उजाडला नऊ वर्षांपूर्वी आग्र्याला भेट दिल्यानतर पुनर्भेटीचा योग आला होता लहानपणी पाहिलेले आग्रा मुलाना काहीच आठवत नव्हते इतिहासाचा अभ्यास झाल्याने ते दोघे आता अधिक चौकस झाले होते आग्र्याची ऐतिहासिक स्मारके पाहण्यासाठी टांगा ठरवला टांग्यातून शहर चागले पाहता यते सकाळचे नऊ वाजले होते पण ऊन इतके कडक पडले होते की घामाच्या धारा वाहू लागल्या होत्या


महाभारतात आग्र्याचा उल्लेख अग्रवन असा आहे येथे कसाचे कारागृह होते भारतात आल्यावर आर्यांनी यमुनेकाठी येथे वस्ती केली त्यावरून आर्यगृह–अग्रवन–आग्रा असे नाव पडले शिकदर लोदीने आग्रा शहराची सन १५०३ मध्ये राजधानी म्हणून निवड केली पुढे पाच वर्षांनी मोगल सम्राट अकबराने आग्र्यात प्रवेश केला लालकिल्ल्याचे बाधकाम केले या लाल किल्ल्यातच तो सन १६०५ मध्ये मरण पावला हा लालकिल्ला प्रथम पहायचा होता प्रमुख प्रवेशद्वाराजवळ उतरलो अकबराला हा किल्ला उभारण्यास आठ वर्षे लागली होती दोन कि मी घेर व सुमारे सत्तर फूट उची असलेल्या ह्या किल्ल्याच्या बाधकामास पस्तीस लाख रुपये खर्च आला जहागीर, शहाजहान व औरगजेब यांनी या किल्ल्याच्या बाधकामात भर घातली आजही किल्ला अगदी भक्कम आहे किल्ल्यात दक्षिणे-

↓ हरगोविंदसिंग, गुरुद्वार




↓ ग्वाल्हेर किल्ला





सास बहू मंदिर, ग्वाल्हेर



तानसेन मकबरा, ग्वाल्हेर

कडील 'अमरसिंह गेट' या प्रवेशद्वाराने प्रवेश केला या गेटसबंधी ऐतिहासिक कथा अशी आहे शहाजहानच्या दरबारातील खजिनदार सलावतखान याने जोधपूरचा अमरसिंह राठोड याच्यावर खोटे आरोप केले. त्यामुळे अमरसिंहावर भर दरबारात वार करण्यात आला जखमी झालेल्या अमरसिंहाने याच गेटमधून भरधाव घोडा नेला व प्राण सोडला त्याच्या विधवा पत्नीने दगडावर डोके आपटून प्राणत्याग केला पुढे बादशहाला कळले की आरोपात तथ्यांश नव्हता ज्या गेटमधून अमरसिंह बाहेर पडला ते गेट त्याचे स्मारक म्हणून अमरसिंह गेट या नावाने ओळखले जाते धन्याला दुःखाने वेगाने नेणाऱ्या स्वामिभक्त घोड्याचाही दगडी पुतळा गेटवर कोरला आहे

गाईडसमवेत जहांगीर महालात प्रवेश केला या महालात हिंदू शिल्पकलाही दिसते जोधाबाई महालात कमानी हिंदू पद्धतीच्या असून त्यावर कमळे कोरली आहेत छतावर सोनेरी पेंटींग असून भिंतीवर मोर, बदक, पोपट असे विविध पक्षी चित्रीत केले आहेत शहाजहानने बांधलेला 'खास महल' हा संपूर्ण पांढऱ्या संगमरवराचा व मोगल शैलीचा आहे. त्याचे प्रांगण विशाल आहे अंगूरी बाग, संगमरवरी पदपाथ, कारंजी आकर्षक आहेत शीशमहलमध्ये आरशाच्या तुकड्यांचा कलात्मक उपयोग केला आहे तेथील हमामखाना ऊर्फ शाही स्नानघरात संगमरवरी टाक्या, कारंजी प्रेक्षणीय आहेत तेथूनच वॉटरगेट या दरवाजातून यमुनातीराकडे जाता येते सध्या या मार्गाच्या शेवटी लोखंडी दरवाजा बसवून तो बंद करण्यात आला आहे यमुना नदी तेथे पश्चिमवाहिनी असल्याने अधिक पवित्र समजली जाते अकबराची हिंदू महाराणी जोधाबाई या मार्गाने यमुना दर्शनाला जाई यमुना दर्शन घेतल्याशिवाय ती भोजन घेत नसे

जहांगीरने आपली प्रिय राणी नूरजहान हिच्यासाठी बांधलेल्या संगमरवरी जस्मिन बुरुजामध्ये पूर्वी मौल्यवान हिरे, माणके, रत्ने बसवली होती व तो सोन्याने मढवलेला होता ह्या अष्टकोनी बुरुजाचे बांधकाम नूरजहानने स्वतः काढलेल्या नकाशाप्रमाणे झाले होते तेथील महालात सुशोभित कारंजी आहेत जस्मिन बुरुजाच्या संगमरवरी खांबावर विशिष्ट कोन करून बसवलेल्या आरशाच्या तुकड्यात यमुनेकाठचा ताजमहाल स्पष्ट दिसतो पूर्वी तेथे हिरा बसवला होता त्यात पडलेले प्रतिबिंब दृष्टी अधू झालेला शहाजहान न्याहाळीत असे आपल्या मुलाच्या औरंगजेबाच्या कैदेत असताना दूरवर दिसणाऱ्या ताजमहालकडे टक लावून पहात शहाजहानने शेवटचा श्वास सोडला

दिवाण ए आम दोनशे फूट लांबीचा व साठ फूट रुंदीचा असा दालन आहे तो चाळीस स्तंभांवर आधारलेला आहे मूळच्या तांबड्या दगडाच्या बांधकामावर शुभ्र कवडी चुन्याचे प्लॅस्टर आहे अंतःपुरातील बेगमांना दरबारातील

कामकाज पाहण्यासाठी झरोका ठेवला असून तेथे संगमरवरी जाळ्या ठेवल्या आहेत बादशहाचे सिंहासन संगमरवरी आहे पूर्वी त्यास चांदीचे रेलींग होते. औरंगजेबाच्या दरबाराचे फ्रेंच प्रवासी बर्नियर याने यथार्थ वर्णन लिहिले आहे. दिवाण ए आम मध्येच न्याय मागण्यासाठी एका धोबिणीने सोन्याची घटा वाजवून जहांगिरकडे नूरजहानविरूद्ध कैफियत सादर केली होती एके दिवशी निशाणबाजी-च्या खेळात नूरजहानच्या हातून एक धोबी मरण पावला धोबीण आक्रोश करीत बादशहाजवळ आली व तिने न्यायाची याचना केली बादशहाच्या कसोटीची वेळ आली पण त्याने शातपणे न्याय दिला की ' तुझ्या पतीच्या मृत्यूला माझी बेगम कारणीभूत आहे तेव्हा तुला झालेल्या तीव्र दु:खाचा स्वीकार आरोपी नूरजहानने करावा ' त्यासाठी त्याने स्वत:चे मस्तक उडविण्याची सजा दिली म्हणजे तिला पतिनिधनानंतर होणाऱ्या दु:खाची कल्पना येईल अर्थात हा न्याय धोबिणीने मंजूर केला नाही गाईडच्या तोंडून अस्खलित हिंदीत ही कथा ऐकताना रमून गेलो

किल्ल्यात जहांगिरी महालासमोर पटांगणात पाच फूट उंचीचा एक अखंड हौद आहे कपासारखा आकार असलेल्या या हौदाचा घेर पचवीस फूट आहे विशेष म्हणजे त्याच्या आत उतरायला पायऱ्या आहेत ' जहांगिरी हौद ' या नावाने ओळखल्या जाणाऱ्या या हौदात नूरजहान बादशहाच्या स्नानासाठी अत्तरमिश्रित गुलाबजल तयार करीत असे

दिवाणे खास या महालात बादशहा सरदार, सेनापती, राजदूत यांच्याशी खाजगी सल्लामसलत करीत असे समोरच एक अखंड काळ्या संगमरवराचे नक्षीकाम असलेले तख्त आहे त्या काळ्या तख्तावर बसून जहांगीर प्राण्यांच्या झुंजी पहात असे १८५७ च्या स्वातंत्र्यसमरात या आसनावर एक तोफेचा गोळा पडून तो समोरच्या संगमरवरी महालाच्या कमानीवरही पडला कमानीला भोक पडून तडा गेला आसनही एका बाजूला फुटले या दगडावर सोन्याची कसोटी घेता येते म्हणून त्याला ' कसोटी पत्थर 'ही म्हणतात छायाचित्र काढण्यासाठी गाईडने या तख्तावर बसवून आम्हाला क्षणभर नामधारी बादशहा बनवले दूरवरचा ताजमहालही छायाचित्रात टिपला गेला शहाजहान वापरीत असलेले पांढरे संगमरवरी तख्तही तेथे आहे

चितोडगडच्या पाडावानंतर मोगलसम्राट अकबराने आणलेले दोन दरवाजे एका दालनात ठेवले आहेत अकरा फूट रुंदी असलेल्या या ब्रॉंझच्या प्रचंड दरवाजांवर सुरेख नक्षीकाम आहे गाईडने सांगितले की लॉर्ड कर्झनने मूळ दरवाजा विलायतेत नेला व मॉडेल म्हणून हा दरवाजा ठेवला एका दालनातील छताचा कोपरा नवा, सोनेरी नक्षीकामाने मढवलेला दिसला लॉर्ड कर्झनने पूर्वी हा भाग कसा दिसत असेल ही कल्पना यावी म्हणून तो करवून घेतला

सर्व किल्ला पाहून झाला पण छत्रपती शिवाजी महाराजाना अडकवून ठेवलेली जागा पहायची राहिल्याने हुरहूर वाटत होती सध्या लष्कराच्या ताब्यात किल्ल्याचा बराचसा भाग आहे त्यातील वीटा-चुन्याने बद केलेली ती ऐतिहासिक कोठी दुरूनच पाहून समाधान पावलो. खरोखर, येथे शिवाजी महाराजाचे भव्य स्मारक व्हायला हवे असे मात्र वाटले

किल्ल्याची भव्यता मनात साठवीतच ताजमहालकडे निघालो भर दुपारचे ऊन तापले होते ताबडया दगडाचा वापर केलेल्या प्रवेशद्वाराजवळ उतरलो या प्रवेशद्वारावर कुराणातील वचने कोरली आहेत विशेष म्हणजे ऐंशी फूट उंची-वरील अक्षरे व सर्वात खालील अक्षरे एकाच रुंदीची दिसतात कारण वरील अक्षरे सर्वात मोठी असून त्यानतरची अक्षरे लहानलहान होत गेली आहेत ती सर्व सारख्याच आकाराची दिसतात ताजचे मूळ प्रवेशद्वार पूर्वी चादीचे होते भरतपूरच्या जाटाच्या आक्रमणात ते लुटले गेले

प्रवेशद्वारातून आत प्रवेश केल्यावर एकदम आकाशाच्या विशाल पार्श्व-भूमीवर भव्य ताजमहाल दिसतो आणि क्षणभर भान हरपून जाते ताजच्या भव्य प्रागणात आल्यावर दोन रागात बगीचा दिसतो तर मध्ये शुभ्र सगमवरी टाक्यात कारजी आहेत ताजची रचना शिल्पकाराने अशी कौशल्याने केली आहे की त्याच्या भव्यपणाला समोरील प्रागण व बगीचा यानी उठाव यावा पाहणाऱ्याला विशिष्ट अतरावरून शुभ्र सगमवरी ताज एकदम दिसावा अशीच त्याची आखणी केली आहे बगीचा पार केल्यावर ताबडया दगडाचा प्रमुख चबुतरा आहे बाजूच्या दोन जिन्यांनी सगमरवरी पायऱ्या चढून गेल्यावर दुपारच्या उन्हात चमकणाऱ्या ताजचे जवळून दर्शन झाले ताजमहाल मकबरा १८६ फूट लाबीरुंदीचा चौकोनी असून चारही कोपरे वळल्यामुळे तो चार मोठ्या बाजू व चार लहान बाजू असा अष्टकोनी आहे चारी बाजूला चार सगमरवरी मीनार आहेत ताजच्या प्रवेश कमानीच्या आत दोन्ही बाजूला कुराणातील वचने अशाप्रकारे कोरली आहेत की सर्वात वरील व सर्वात खालील अक्षरे एकाच रुंदीची दिसतात ताजचे वैशिष्टय आहे त्याच्या पन्नास फूट व्यासाच्या, तीस फूट उंचीच्या घुमटात त्यावर पूर्वी सोन्याचा कळस होता

ताजमहालच्या आत प्रवेश केल्यावर घुमटाच्या बरोबर मध्यभागी मुमताज-महालची कबर आहे बाजूला शहाजहानची कबर आहे या सगमरवरी शुभ्र कबरींवर सुंदर नक्षीकाम आहे तसेच या दोघाच्या मृत्यूवर्षांची इ स १६२९ व व १६६६ नोंदही कबरींवर आहे कबरीभोवती अष्टकोनी नाजूक सगमरवरी जाळी आहे मूळ कबरींखाली खऱ्या कबरी असून तेथे जाण्यासाठी उताराचा मार्ग

आहे शहाजहानची लावण्यवती बेगम मुमताजमहल शहाजहान दक्षिणेवरील मोहीमेत असताना बऱ्हाणपूरला १६२९ मध्ये मरण पावली प्रथम तिचे दफन बऱ्हाणपूरला झेनाबाद बगीचात केले मृत्यूपूर्वी मुमताजने शहाजहानकडून असे वचन घतले होते की असे अप्रतिम स्मारक बांधले जावे की ज्याला सर्व जगात तोड नसेल त्यानुसार यमुनेकाठी शहाजहानने ताजमहालसाठी जागा निश्चित केली देशविदेशातून निरनिराळे आराखडे मागविण्यात आले तुर्कस्थानच्या उस्ताद इसाखानचे डिझाईन त्यातून पसत करण्यात आले त्यानुसार सन १६३२ ते १६५४ अशी बावीस वर्षे एकवीस हजार कारागीरांनी अविरत कष्ट करून ताजची उभारणी केली हिंदुस्थानातील कारागीर तर होतेच पण पर्शिया, तुर्कस्थान, अरेबिया येथूनही नामांकित शिल्पकार, गवंडी व कारागीर पाचारण करण्यात आले कारागिराच्या वसाहतीसाठी ताजगंज नावाचे गाव शेजारी वसविण्यात आले जयपूर जवळील मकराना येथील शुभ्र सगमरवरी दगडाचा मुबलक वापर करण्यात आला हिरे, माणके, रत्ने जगाच्या कानाकोपऱ्यातून आणून बसवली गेली

शहाजहानची आणखी एक कल्पना होती की यमुनेच्या पैलतीरी काळचा सगमरवरी दगडाने स्वत:साठी एक मकबरा बाधायचा त्याप्रमाणे त्याने सुरू केलेल्या कामाचे अवशेष आजही यमुनेच्या पैलतीरी दिसतात स्वत:चा मकबरा व ताजमहाल एका सगमरवरी पूलाने जोडायचा अशी अदाजे दहा कोटी रुपयाची त्याची योजना होती शहाजहानच्या दुर्दैवाने त्याला त्याच्या मुलाने औरंगजेबानेच कैदेत ठेवल्याने ही कल्पना मूर्त स्वरूपात येऊ शकली नाही ताजमहालच्या सौंदर्यात अधिक भर घालणाऱ्या या कल्पनेला जग मुकले हे मात्र खरे ताज बाधून झाल्यावर काही वर्षांनी सन १६६६ मध्ये आग्ऱ्याच्या लाल किल्ल्यात ताजकडे टक लावून पहात आपल्या लाडक्या मुलीच्या जहाँआराच्या बाहूत शहाजहानने शेवटचा श्वास सोडला दुसऱ्या दिवशी त्याचा मृतदेह घाईघाईने होडीत घालून यमुनानदीतून ताजमहालच्या काठावर आणण्यात आला त्याच्या मृतदेहाला शाही दफनाचा मान मिळू नये यापेक्षा त्याचे आणखी काय दुर्दैव असणार? एकोणीस वर्षांच्या वैवाहिक जीवनानतर छत्तीस वर्षे ताटातूट झालेल्या त्याच्या चिरनिद्रित प्रिय राणीशजारी त्याचे दफन करण्यात आले मुमताजची कबर ताजच्या घुमटाखाली मध्य बिंदूखाली आहे तर शहाजहानची काही अतरावर आहे त्याने जर अगोदरच ठरवले असते की स्वत:लाही ताजमध्ये दफन करायचे तर मध्यबिंदूपासून समान अतरावर आखणी करून मुमताजची कबर तयार केली असती पण स्वत:चा मकबरा यमुनेच्या पैलतीरी करण्याची त्याची योजना असल्याने ताजमध्ये दोन्ही कबरी मध्यबिंदूपासून समान अतरावर नाहीत

ताजमहालच्या मागील बाजूला गेल्यावर यमुनेचा प्रवाह दिसतो खरोखर, यमुनाकाठच्या या रम्य जागेइतकी दुसरी कुठलीही भूमी ताजच्या भव्यतेसाठी अपुरी पडली असती भर दुपारच्या उन्हात उजळून निघालेला धवलशुभ्र ताज प्रातःकाळी सौम्य, धूसर, तांबूस रंगात न्हाऊन निघतो तर सायंकाळी दिसतो तेजःपुंज निळ्या लोलकासारखा ! पौर्णिमेच्या रात्री शीतल चंद्रकिरणात न्हाऊन निघणाऱ्या ताजची शोभा अवर्णनीयच

ताजमहालच्या दर्शनाने इतके तृप्त झालो होतो की दुपारच्या जेवणाचा विसरच पडला होता पर्यटकांच्या गर्दीतून वाट काढीत ताजमहाल जवळील ताजगंजच्या चौकात आलो दही, रोटी, आलूमटारचे जेवण उरकले दुपारचे तीन वाजून गेले होते आग्र्याच्या पहिल्या दिवसाच्या भेटीत लाल किल्ला, ताजमहाल पाहिल्यावर नूरजहान राणीच्या पित्याचा मकबरा-एतिमाद औद-दौला पाहण्यासाठी यमुनानदीवरील प्रचंड पूल पार करून तेथे पोहोचलो

नूरजहान राणीच्या जन्माची हकीकत एखाद्या कथाकादंबरीला लाजवील अशी विलक्षण आहे नूरजहानचा पिता घियासबेग हा इराणमधील तेहरानच्या एका सरदाराचा मुलगा पित्याच्या मृत्यूनंतर नशीब काढण्यासाठी म्हणून तो हिंदुस्थानात आला. जवळपासची पुंजी संपलेली आहे, भुकेने व्याकूळ झाला आहे अशा विमनस्क परिस्थितीत त्याच्या पत्नीने एका मुलीला जन्म दिला हालअपेष्टांच्या परिस्थितीला कंटाळून आवेगाने तिने या नवजात अर्भकाला झुडपात टाकून दिले टाहो फोडणाऱ्या या बालिकेला एका वाटसरूने उचलून परत तिच्या दुःखी मातापित्याच्या हवाली केले ही नवजात बालिका म्हणजेच मेहरुन्निसा-सूर्यप्रभा पुढे तिच्या पित्याची बादशहा अकबराच्या दरबारात नेमणूक झाली अकबराचा विषयासक्त राजपुत्र सलीम उर्फ जहांगीर याची नजर लावण्यवती मेहरुन्निसावर गेली तिची त्याच्यापासून सुटका करण्यासाठी अकबराने बरद्वानचा सुभेदार शेर अफगाण याच्याबरोबर तिचे लग्न लावून तिला तिकडे पाठवून दिले अकबराच्या मृत्यूनंतर जहांगीर गादीवर आल्यावर त्याने शेर अफगाणला कपटाने ठार मारले नूरजहानला तिच्या आईसमवेत आग्र्याला आणले सहा वर्षेपर्यंत चाललेल्या जहांगीरच्या प्रियाराधनेला यश आले जहांगीरशी विवाह झाल्यावर मेहरुन्निसा नूरजहान-जगत्प्रभा म्हणून ओळखली जाऊ लागली नूरजहान त्याची सर्वांत लाडकी राणी बनली

जहांगीरने नूरजहानचा पिता मिर्झा घियासबेग याला राज्याचे मुख्य खजिनदार बनवले एकदा घियासबेगविरुद्ध तक्रार केली गेली की तो खजिन्यातील रक्कम आपल्या मूळगावी इराणला नेतो जहांगीरने जेव्हा त्याची समक्ष शहानिशा करण्यासाठी स्वतः मोजदाद केली तेव्हा खजिन्यात रक्कम बरोबर आढळली.

तेव्हा जहांगीरने मिर्झा घियासबेगला 'एतिमाद-उद-दौला' विश्वासाचे प्रतीक- हा किताब बहाल केला

नूरजहानने सहा वर्षांत बांधून घेतलेला हा पित्याचा मकबरा एतिमाद-औद-दौला या नावाने ओळखला जातो मकबऱ्याच्या आकर्षक प्रवेशद्वारातून प्रवेश केल्यावर प्रथम दिसतो सुंदर बगीचा पाण्याचा हौद, कारंजी यामुळेही मकबऱ्याची शोभा वाढली आहे या मकबऱ्याचा नकाशा स्वत नूरजहान राणीने काढला होता सत्तर फूट चौरस मापाचा हा दुमजली मकबरा बांधताना खर्चाची पर्वा तिने केली नाही मोगल शैलीच्या परंपरागत भव्य आकारावर भर देण्यापेक्षा या मकबऱ्यात कलात्मक दृष्टीवर भर देण्यात आला आहे संपूर्ण संगमरवरी अशा या मकबऱ्यात विविधरंगी संगमरवरांनी फुले,वेली,फळे,वेलबुट्टया,चौकोन, पंचकोन, षटकोन अशा आकृत्यांचे आकर्षक डिझाईन तयार केले आहे कमानीवर इतके बारीक नक्षीकाम आहे की कुडत्यावरील किंवा साडीच्या काठावरील नक्षीकाम आठवावे. बाजूच्या अखंड संगमरवरातील नाजूक जाळयामुळे शोभा वाढली आहे एके ठिकाणी नूरजहान व जहांगीर यांची अगदी छोटी छायाचित्रे आहेत जहांगीरची ख्याती आहे त्याच्या मद्यासक्तीबद्दल नूरजहान ते कसे विसरणार ? नूरजहानने या मकबऱ्यावर रंगीबेरंगी वेलबुट्टयाशिवाय सुरयाही हुबेहूब कोरून घेतल्या आहेत एका सुरईवर सहा मासे चित्रित केले आहेत गाईडने नूरजहानला उद्देशून बादशहा म्हणत असलेले शेर सुनवले –

न पिना हराम है ।
न पिलाना हराम है ।
पिनेके बाद होशमें आना हराम है ।

जहांगीर–नूरजहान यांच्या इष्काला मर्यादा नव्हती जहांगीर म्हणे –

ए नूरजहाँ, सफर करे तो चमनकी कर, बाजारमें क्या रखा है ?
कातिल करना है तो आँखोसे कर, तलवारमे क्या रखा है ?

जहांगीर आणखी म्हणे

ए सनम चाँदनी रात हो
दरियाका किनारा हो
नूरजहाँ हमारे पास हो
और एक शराबका प्याला हो !

गाईडने जिन्याने मकबऱ्याच्या वरच्या मजल्यावर आणले. वर मूळ मकबऱ्याशी संलग्न असे चार अष्टकोनी स्तंभ देखणे दिसतात. त्यामुळे सर्व मकबरा एकजिनसी दिसतो ताजमहालमध्ये असलेल्या चार कोपऱ्यातील स्वतंत्र मिनारामुळे एकजिनसीपणाचा अभाव वाटतो या मकबऱ्यात मोगल शिल्पातील परंपरागत शैलीच्या घुमटाचीही योजना केलेली नाही एखाद्या दागिन्याच्या सुबक पेटीसारखा हा मकबरा दिसतो

मकबऱ्यात नूरजहाच्या पित्याची व आईची कबर आहे तेथील छताला पेंटिंगसाठी वापरलेले सोने वितळण्यासाठी सुरजमल जाटने नंतर छताला आग लावली होती पण नुसते पेंटिंग असल्याने सोने तर मिळाले नाहीच पण छत मात्र खूपच खराब झाले या कबरीच्या चबुतऱ्यावरील पिंगट रंगाचा इटालियन संगमरवर आजही चमकतो नूरजहानच्या मानलेल्या पित्याची–ज्याने तिला बालपणी उचलून तिच्या आई वडिलांच्या हवाली केले होते त्याचीही कबर आहे आपल्या पित्याच्या मकबऱ्यात त्याला स्थान देऊन नूरजहानने त्याचे ऋण अंशत फेडले त्याशिवाय तिच्या भावाच्या कबरी व तिच्या पहिल्या पतीपासून झालेल्या मुलीची कबरही तेथे आहे आपल्या सर्व आप्तांना या सुंदर मकबऱ्यात कृतज्ञ भावनेने चिरनिद्रा देणाऱ्या नूरजहानची धन्य आहे मनात विचार येतो की या मनोहारी मकबऱ्याची निर्माती व तिचा जोडीदार जहांगीर यांचे मकबरेही असेच कलापूर्ण असतील पण तसे नाही नूरजहानच्या मृत्यूनंतर तिच्या इच्छेनुसार तिला अगदी सामान्य माणसाप्रमाणे लाहोरला रावी नदीच्या काठी दफन केले गेले. तेथे अत्यंत साधा मकबरा उभारण्यात आला त्यावर एक उर्दू शेर कोरला आहे

एकांतमे बनी इस कब्रपर
कोई गुलाब न उगाए जाए।
कोई बुलबुल न गाए
कोई दीया न जलाए
कोई पतंगा न फडफडाए।

जहांगीरचा मृत्यू काश्मीरहून दिल्लीकडे परतताना वाटेत झाला त्याच्या मकबऱ्यावर नूरजहानने खालील शब्द कोरून ठेवले आहेत–

हरी घासके सिवाय यहाँ कुछ न हो
क्योंकि यह एक नश्वर निरीह प्राणीको कब्र है
और सदा कब्रही रहेगी।

खरोखर, नूरजहान एक लावण्यवती तर होतीच पण कलात्मक दृष्टी असलेली कुशल रचनाकारही होती सर्वात महत्त्वाचे म्हणजे तिची वृत्ती काव्यात्म होती ताजपेक्षा आकाराने लहान असलेला हा मकबरा शिल्पकृतीत मात्र ताज-पेक्षा काकणभर सरसच आहे मोठ्या तृप्त मनाने मकबरा पाहून मुक्कामी परतलो स्टेशनवरच रात्रीचे भोजन घेतले आग्राभेटीतील पहिल्या दिवशी मोगल शिल्पकृतीच्या सौंदर्याचा प्रत्यय आला होता

आग्रा वास्तव्यातील दुसरा दिवस उजाडला अकबर बादशहाचा मकबरा पाहण्यासाठी सिकदराकडे टॅक्सीने निघालो सिकदरा गावी हा मकबरा आग्रा-मथुरा दिल्ली रस्त्यावर आग्र्याहून नऊ कि. मी अंतरावर आहे अकबराची हृदयस्पर्शी जन्मकहाणी आठवत होती पराभूत झालेला बादशहा हुमायून दिल्ली सोडून आश्रयासाठी रानोमाळ भटकत होता आज येथे तर उद्या तेथे ! बरोबर थोडे विश्वासू नोकर चाकर होते राणी हमीदाबानू गर्भवती होती प्रवासात तिचा निभाव कसा लागणार या विवचनेत बादशहा होता सिंध प्रातात मुक्काम असताना हमीदाबानू प्रसूत होऊन पुत्ररत्न झाले बादशहाला पुत्र झाला म्हणजे केव्हढा मोठा उत्सव करायला हवा पण विजनवासातील हुमायूनला पुत्रप्राप्तीची बातमी ज्या नोकराने सांगितली त्याला बक्षीस द्यायला कफल्लक हुमायूनजवळ काहीही नव्हते शेवटी आठवण होऊन त्याने जवळची कस्तुरीची डबी बाहेर काढली व तिच्यातील चिमूटभर कस्तुरी नोकराला देत तो म्हणाला, " या कस्तुरी-प्रमाणे मुलाच्या कीर्तीचा सुगध सर्वत्र पसरू दे ! ' पित्याचे बोल खरे करणाऱ्या मोगल सम्राट अकबराच्या पन्नास वर्षाच्या कृतार्थ राजकीय जीवनाचा पूर्णविराम म्हणजे हा मकबरा अकबराने आपल्या हयातीतच हा मकबरा बाधायला सुरुवात केली व जहांगीरने तो पूर्ण केला

एकशेवीस एकराच्या विशाल क्षेत्रात पधरा लाख रु खर्चून उभारलेला हा मकबरा मोगल शिल्पकृतीचा खास नमुना आहे चौदा वर्षे त्याचे बाधकाम चाललेले होते मकबऱ्याचे प्रवेशद्वार तांबड्या दगडाचे असून त्यावर विशाल कमान आहे तेथे नौबतखाना असून छतावर चार सगमरवरी मीनार आहेत आग्र्याच्या लाल किल्ल्यात इ. स १६०५ साली मरण पावल्यावर अकबर बादशहाला सिकदराला दफन केले त्याची कबर असलेल्या खोलीतील छत आकर्षक आहे ते पूर्वी सोन्या-चादीने मढवलेले होते तेथे कोहिनूर हिराही बसवला होता असे म्हणतात. पुढे जाटानी ही कबर लुटली या कबरीचे वैशिष्ट्य असे की अकबराचा देह मक्केच्या दिशेला दफन न करता उगवत्या सूर्याकडे डोके असलेल्या स्थितीत ठेवण्यात येऊन दफन करण्यात आला कारण सूर्य हा अकबराने सुरू केलेल्या दिने-इलाही पथाचा मुख्य घटक होता. मकबऱ्यावर पिरॅमिडसारखा चबुतरा आहे पहिले तीन टप्पे

तांबड्या दगडातील असून वरचा सगमरवरी आहे आकर्षक बगीचा, शांत वातावरण यामुळे हे मोगल स्मारक मनावर परिणाम करून जाते सिकदरा पाहून स्टेशनवर परतलो दुपारचे जेवण घेऊन तासभर विश्राती घेतली

ऊन उतरल्यावर स्टेशनवरून बसने पाच कि मी अतरावर असलेल्या दयालबागला पोहोचलो तेथे राधास्वामी महाराजांच्या समाधीचे काम चालू आहे नऊ वर्षांपूर्वी येथे आलो होतो तेव्हा १९०४ साली सुरू झालेले बाधकाम चालूच होते समाधीचे काम कुठपर्यंत आले आहे हे पाहण्याची उत्सुकता होतीच आग्र्याच्या खत्री कुटुबातील शिवदयालसिंग यांनी १८६१ साली राधास्वामी सप्रदायाची स्थापना केली, त्याना लहानपणीच सिद्धी प्राप्त झाली होती त्याचे शिष्य त्याना ' स्वामीजी महाराज म्हणून सबोधत वयाच्या साठाव्या वर्षी १८७८ साली त्यानी देह ठेवला दयालबाग येथे स्वामी बागेत ते कुटीर बाधून रहात व धार्मिक कृत्ये करीत

राधास्वामी मदिराचे प्रचड बांधकाम ऐंशी वर्षांपूर्वी सुरू झाले २२० फूट लांबी रुदीचे हे चौकोनी स्मारक पधरा फूट उचीच्या मोठ्या चबुतऱ्यावर विराजमान आहे, समाधीच्या जागी पायात वाळूचे थर आढळल्याने पाया पचेचाळीस फूटपर्यंत खोल नेण्यात आला वीट बाधकामाच्या गोलाकार विहिरी बांधून त्यात काँक्रीट ओतून कमानी बाधल्या व त्यावर हे वरील बाधकाम आधारीत आहे अशी माहिती तेथे मिळाली पहिल्या मजल्याभोवती सुदर व्हराडा असून सगमरवरी कमानी आहेत राजस्थानातील मकराना, जैसलमेर तसेच बडोदा, ग्वाल्हेर, पाकिस्तानातील नौशेरा या ठिकाणाहून निरनिराळ्या रगाचा सगमरवर आणण्यात आला पाने, फुले, वेली याची सुदर डिझाईन्स स्तभाच्या कमानीवर करताना या सगमरवराचा विपुल वापर करण्यात आला भितीवर नक्षीदार पॅनेल आहेत त्यात गुजरातमधील नर्मदा नदीत मिळणारे मौल्यवान खडे बसवले आहेत व्हराड्याच्या छतालाही उत्कृष्ट सगमरवरी फरशा बसवल्या आहेत.

राधास्वामी मदिराचे काम म्हणजे भारतीय शिल्पकलाकृतीचा उत्कृष्ट नमुना होय वर्षानुवर्षे चाललेल्या या बांधकामाच्या सुरुवातीला काम करणाऱ्या कारागिरांची मुलेही वयस्कर झाली असून त्यांची मुले आता त्याना छिन्नी–हातोडी घेऊन मदत करीत आहेत थोडक्यात कारागिरांची आता तिसरी पिढी काम करीत आहे मदिरावर उंच उच संगमरवरी स्तभ घडवायचे काम चालू होते पायऱ्या उतरून खाली आलो तळमजल्यात स्वामीचा फोटो असून भक्तिभावाने त्याची पूजा चालू होती. नियोजित मंदिराचे सपूर्ण दृश्य दर्शवणारे रेखाचित्र बाजूला लावले आहे त्यावरून मदिराच्या भव्यतेची कल्पना येते स्मारकाच्या कोपऱ्यात १०४ फूट उचीचे चार मोनार होणार आहेत समाधीची

उची दोनशे फूट होणार असून बत्तीस फुटाचा सोनेरी कळस उभारण्यात येणार आहे. या स्मारकाच्या बांधकामाचा बराचसा भाग पसत न पडल्याने परत पाडण्यात आला असे तेथील व्यवस्थापकांनी सांगितले आग्रा जगप्रसिद्ध आहे ताजमहालसाठी पण दयालबागेतील या स्मारकासाठीही तो प्रसिद्ध व्हावा अशी राधास्वामी सप्रदायाची इच्छा आहे स्मारकाच्या बाहेर आल्यावर पूर्ण झाल्यावर हे स्मारक कसे दिसेल याचे चित्र रगवीत उभे होतो तेव्हढ्यात एक बगाली पर्यटक तेथे आला आमच्याशी ओळख करून घेत तो म्हणाला की चार मीनार, घुमट यावरून हे स्मारक मोगलशैलीचे वाटते त्याने त्या स्मारकाच्या बांधकामावर बरीच टीका केली तुमचे म्हणणे अगदी बरोबर आहे एवढेच आम्ही त्याला म्हणू शकलो "छे छे, नुसतं अस म्हणून चालणार नाही, थाबा मी येथील व्यवस्थापकांनाच चागले सुनावतो" असे म्हणत तो आतमध्ये निघून गेला आम्ही मात्र उल्का उदय पुढे कधी येथे येतील तेव्हा त्याना स्मारक पूर्ण झालेले दिसो एव्हढीच इच्छा करीत स्मारकाचा निरोप घेतला

दयालबागेत खरेदीसाठी अनेक लहान मोठी दुकाने आहेत सतरज्या कनाती, सूटकेसेस, साड्या इ मालांनी दुकाने भरलेली दिसतात विविध दुकानांचे एजट बाहेर गिऱ्हाईकाना आपल्या दुकानात चलण्याचा आग्रह करीत होते ताजमहालच्या छोट्या मोठ्या असख्य प्रतिकृतींनी दुकाने सजलेली होती प्रेमाचे प्रतीक असलेल्या ताजमहालच्या प्रतिकृतीची खरेदी प्रत्येक पर्यटक करतोच थोडीफार खरेदी करून रेल्वे विश्रामालयात परतलो तेव्हा सायकाळचे सहा वाजले होते सामान घेऊन टॅक्सीने आग्राफोर्ट स्टेशनवर पोहोचलो आग्राफोर्ट–काठगोदाम कुमाऊ एक्स्प्रेसचा रिझर्व्हेशन चार्ट पाहिला चार्टवर आमची नावे पाहून हायसे वाटले नगर स्टेशनहून पाठवलेल्या तारेमुळे आरक्षण झाले होते रात्रभर आरामशीर प्रवास झाला की दुसऱ्या दिवशी उत्साहाने सर्व पाहता येते स्टेशनवरच रात्रीचे जेवण उरकले आग्र्याच्या प्रसिद्ध पेठ्यांची खरेदी केली ठीक नऊ वाजता कुमाऊ एक्स्प्रेसने आग्रा स्टेशन सोडले थोड्याफार गप्पा मारून प्रत्येकाने बर्थचा ताबा घेतला दिवसभराच्या धावपळीमुळे गाढ झोप लागली

*

## कुमाऊं प्रदेशाची वाटचाल

पहाटे सहा वाजता जाग आल्यावर कल्पना आली की रेल्वेतून बर्थवर आपला प्रवास चालू आहे दिवस उजाडला होताच रेल्वे रामगंगा नदीवरचा प्रचंड पूल पार करीत होती बरेली स्टेशनवर गाडी थांबली तेव्हा 'बरेलीके बाजारमें झुमका गिरा रे,' हे गाणे आठवले बरेली प्रसिद्ध आहे नक्षीकाम केलेल्या सुंदर भांड्यासाठी येथून ही भांडी परदेशीही निर्यात होतात मात्र उत्तर प्रदेशातील हे संमिश्र दाट लोकवस्तीचे गाव जातीय दंगलीमुळे ही कुप्रसिद्ध आहे बरेली जंक्शनहून रेल्वेचा ब्रॉड गेजचा फाटा रामपूर मोरादाबाद मार्गे दिल्लीला जातो तर दुसरा लखनौला जातो बरेलीला गाडी अर्धातास थांबली खापराच्या कपात चहा घेतला खरा पण तोंड अगदी मचूळ झाले तासभराने पंतनगर स्टेशन आले चोवीस वर्षांपूर्वी कृषी विद्यापीठची स्थापना येथे झाली येथे विमानतळही आहे कुमाऊं प्रदेशाला पंतनगर हा जवळचा विमानतळ आहे. नंतर आले लालकुँवा स्टेशन तेथून मीटरगेज रेल्वेचा फाटा काशीपूर गावी जातो कॉर्बेट नॅशनल पार्कला काशीपूर–रामनगरमार्गे जाता येते सकाळचे नऊ वाजले तेव्हा गाडी हल्द्वानी स्टेशनवर थांबली गाडीतील बहुसंख्य प्रवासी तेथे उतरले हल्द्वानी गावाची बाजारपेठ मोठी असून कुमाऊं प्रदेशाला मालाचा पुरवठा येथूनच होतो.

हल्द्वानीचा बसडेपो मोठा आहे तेथून नैनिताल, राणीखेत, कर्णप्रयाग, अल्मोडा, गोपेश्वरपर्यंत बसेस सारख्या मिळतात याच बसेस पुढे काठगोदामला येतात त्यामुळे तेथे बसमध्ये जागा मिळणे अवघड जाते म्हणून पर्यटक काठगोदाम या शेवटच्या रेल्वेस्टेशनवर उतरण्याऐवजी हल्द्वानीला उतरणे पसंत करतात. त्यामुळे गाडी बहुतेक रिकामीच झाली काठगोदाम हल्द्वानीहून पाच कि. मी अंतरावर आहे

सकाळी दहाला काठगोदामला पोहोचलो प्रथम काम केले रेल्वेच्या पुढील आरक्षणाचे कुमाऊ प्रदेशात आठवडाभर राहणार होतो त्यामुळे आठवड्यानंतरच्या तारखेचे काठगोदाम–लखनौ आरक्षण केले लखनौ–गोरखपूर या पुढील प्रवासाच्या आरक्षणासाठी तार केली काठगोदाम–लखनौ एक्स्प्रेस तेथूनच निघत असल्याने बर्थचे आरक्षण मिळायला अडचण आली नाही. त्यानंतर दुसरे काम केले सामान कमी करण्याचे दोन सुटकेस क्लोकरुममध्ये ठेवल्या कारण दहा दिवसांनी परत तेथेच यायचे होते. काठगोदाम रेल्वेस्टेशन अतिशय स्वच्छ होते. विविध प्रकारची फुलझाडे असलेल्या कुंड्या शोभेत भर घालीत होत्या यावर्षीचे स्वच्छतेचे पहिले बक्षीस या स्टेशनला मिळाले असा बोर्ड उत्काने दाखवला.

काठगोदाम डोंगराच्या पायथ्याशी गोला नदीकाठी वसले आहे तेथून जंगलतोडीतील लाकडाचा व्यापार होतो येथे लाकडाचे प्रचंड गोदाम असल्याने काष्ठ-गोदाम–काठगोदाम असे नाव पडले स्टेशनवर उत्तरप्रदेश पर्यटन विभागाचा स्टॉल आहे तेथून कुमाऊ प्रदेशाची पॅम्प्लेट्स मिळवली प्राचीन परंपरेनुसार हिमालय पर्वताचे क्षेत्र नेपाळ, केदार (गढवाल), जालंदर (हिमाचल प्रदेश) काश्मीर व कूर्माचल (कुमाऊ) या पाच खंडात वाटले आहे काठगोदाम, टनकपूर, रामनगर जोडणाऱ्या पर्वतीय क्षेत्राला कुमाऊ म्हणतात कुमाऊं प्रदेशात तीन जिल्हे आहेत नैनिताल, अल्मोडा व नेपाळ–तिबेटशी संलग्न असलेले पिठोरगड

अतिप्राचीन काळात मार्कंडेय, कौशिक, गर्ग या ऋषीमुनींची कुमाऊ ही तपोभूमी व साधनास्थळ होते. स्कंदपुराणात विष्णूच्या कूर्म अवताराच्या उत्पत्तीचे वर्णन आहे अयोध्येचा राजा राम, लक्ष्मण व सीता यांनी कूर्माचलची यात्रा केली होती दक्षाच्या यज्ञानंतर भगवान शिवाने येथे तप केले होते कुमाऊच्या पहिल्या राजवंशाची स्थापना आठव्या शतकात कत्यूरीने केली त्यानंतर चंदवंशीय राजांनी अठराव्या शतकापर्यंत राज्य केले. १७९० मध्ये नेपाळच्या गुरख्यांनी कुमाऊच्या राजांना हरवून कब्जा मिळवला नंतर इंग्रजांच्या सहाय्याने त्यांनी १८१५ मध्ये गुरख्यांपासून कुमाऊ प्रदेश मुक्त केला इंग्रजांनी नैनितालप्रदेश ताब्यात घेतला व राहिलेल्या प्रदेशावर चंदवंशीय राजांनी राज्य केले अल्मोडा ही त्यांची राजधानी. स्वातंत्र्यानंतर हा सर्व प्रदेश उत्तर प्रदेश राज्याचा भाग बनला

प्रथम जायचे होते राणीखेतला बस बारा वाजता होती तोपर्यंत स्टेशन-वरील भोजनगृहात जेवण आटोपले भोजनगृह स्वच्छ तर होतेच पण जेवणही गरमगरम व चवदार होते जेवण आटोपून बाहेर आलो बस बारा वाजता होती पण ती हल्दवानीवरून भरून आली होती बसायला एकाठिकाणी जागा न मिळता वेगवेगळ्या ठिकाणी मिळाल्या काठगोदाम राणीखेत व ८४ कि. मी अंतराचा प्रवास सुरु झाला

सुरुवातीला राणीबाग गाव लागले नागमोडी वळणे घेत गाडी हिमालय पर्वतराजीतून प्रवास करू लागली ज्यालकोट गावाजवळ बसचे रेडिएटर गरम झाल्याने प्रचंड वाफा निघू लागल्या ड्रायव्हरने तावडतोब बस थाबवली तेव्हा गरम वाफेचा एक मोठा लोट बाहेर पडला गाडी पेट घेणार या धास्तीने बाहेर पडण्यास प्रवाशांनी एकच गर्दी केली आम्ही दाराजवळच बसलो होतो त्यामुळे सर्वात प्रथम खाली उतरलो गाडीच्या एकाच दारातून बाहेर उडी टाकण्यासाठी प्रत्येकजण प्रयत्न करू लागला लहान मुले चेंगरली एक वृद्ध तर खाली पडला. गाडीतील एक मिलिटरी जवान तर सर्वांना मागे खेचून पुढे उडी ठोकू लागला एकच गोधळ उडाला ते पाहून ड्रायव्हर, कंडक्टर संतापाने मोठमोठ्याने ओरडू लागले "कुछ खतरा नही है, डरो मत !" एकमेकाशी धक्काबुक्की करीत सर्वजण खाली उतरले तोच धाडकन आवाज झाला एका जाडजूड ग्रामीण स्त्रीला भीतीने दातखीळ बसून फीट आली होती सुदैवाने जवळच डोंगरातील थड पाणी नळावाटे अखडपणे वाहत होते ड्रायव्हरने भराभर ते थड पाणी बादली भरभरून इंजिनवर टाकले व एक बादली पाणी लोकांना बाजूला सारून त्या बाईच्या डोक्यावर ओतले गाडीही थड झाली होती व ती बाईही शुद्धीवर आली मग आपल्याच मूर्खपणाला नावे ठेवत सर्वजण गाडीत चढले गाडी सुरू झाली खरी पण ज्यालकोट गाव कायमचे स्मरणात राहिले एका प्रवाशाने सागितले की, मधुमक्षिका पालन केंद्र म्हणून ज्यालकोट प्रसिद्ध आहे

ज्यालकोटनतर बस भवाली गावी थाबली भवाली गाव खोल दरीत वसले आहे चीड वृक्षाची रेलचेल आहे भवाली कुमाऊ प्रदेशातील एक आरोग्य स्थळ मानले जाते तेथील सॅनिटोरियम जुने व मोठे आहे भवालीचा फळांचा बाजारही मोठा आहे आजूबाजूला सफरचद, आबे अशा फळांची उद्याने, नर्सरी आहेत स्टँडजवळ फळांची अनेक दुकाने होती पण सीझन नसल्याने सफरचदे महाग होती भवालीहून रस्त्याचे फाटे फुटतात पश्चिमेकडे अकरा कि मी अतरावर नैनिताल आहे दुसरा उत्तरेचा मार्ग राणीखेतला जातो पूर्वेचा मार्ग अल्मोड्याला जातो तसेच महत्त्वाची गोष्ट म्हणजे भीमताल, साततताल, नौकुचियाताल, नलदमयंती ताल ही महत्त्वाची सरोवरे भवालीच्या आजूबाजूला दहा बारा कि. मी अंतरावर

आहेत. नैनितालऐवजी भवालीला एक दोन दिवस मुक्काम केला तर ही प्रेक्षणीय सरोवरे अल्पखर्चात पाहता येतील भवालीला अर्धा तास थांबून बस राणीखेतच्या दिशेने निघाली वाटेत तावडा रग दिलेले एक मोठे मदिर दिसले शेजारच्या प्रवाशाला विचारल्यावर त्याने माहिती दिली की वीस वर्षांपूर्वी नीमकरोली महाराजांनी बांधलेले हे कैंची मदिर होय बिर्लांनी मदिराचा जीर्णोद्धार केला. नवरात्रात येथे मोठा उत्सव होतो

दुपारी दोनच्या सुमारास खेरणा गाव लागले तेथे चहा घेतला थड वारे वाहत होते राणीखेत जवळ येऊ लागले नावाप्रमाणे हे गाव सुदर असेल का असे वाटत होते उच उच चीड, पाईन, देवदार वृक्ष, डोंगराच्या उतारावरची टप्प्याटप्प्यावरची हिरवीगार शेती हे दृश्य संपूच नये असे वाटत होते चीडच्या वृक्षाच्या बुध्याना खाचा पाडून त्यात पत्र्याचे त्रिकोणी आकाराचे डबे लावलेले होते. त्यात डिंक पाझरताना दिसत होता सध्याकाळच्या सहाच्या सुमारास बस राणीखेत कँटोनमेंट हद्दीजवळ थाबली माणशी दीड रुपया टॅक्स वसूल करण्यात आला थड हवेच्या ठिकाणी जायचे म्हणजे खिसा मात्र गरम हवा सर्पाकार रस्त्याच्या कडेकडेने बस जात असताना आजूबाजूला गुलाबाची असख्य झाडे दिसत होती पानसुद्धा दिसणार नाही अशी शेकडो झाडे दिसत होती लालचुटूका पिवळी, केशरी, पाढरीशुभ्र, गुलाबी अशी ती गुलाब फुले, टुमदार घरे पाहून राणीखेत नावाप्रमाणेच सुदर आहे यात शका राहिली नाही गावातल्या मालरोडने स्टँडवर पोहोचलो सीझन सुरू होण्यास थोडा अवकाश असल्याने मुक्कामासाठी जागा मिळायला अडचण आली नाही हॉटेल अलका मालरोडच्या सुरुवातीला होते पहिल्या मजल्यावर प्रशस्त गॅलरी असून तेथे टेबलखुर्च्या माडलेल्या असल्याने समोरच्या नदादेवी, नदकोट पर्वतराजीचे सौन्दर्य बसल्याबसल्या आरामात न्याहाळता येते अधार पडू लागला होता. भूकही लागली होती जेवणाची ऑर्डर दिली हातपाय धुऊन आवरले जेवण तयार व्हायला, वेळ होता दिवसभर बसून कटाळाही आला होता हॉटेलच्या चालकानी सुचवले की जवळच प्रख्यात मनकामेश्वर मदिर आहे जेवण तयार होईपर्यंत दर्शन घेऊन या

मालरोडच्या वरील रस्त्यावर जवळच राणीखेतच्या कुमाऊ रेजिमेंटने बाधलेले मनकामेश्वर मदिर आहे फिरत फिरत दहा मिनीटातच तेथे पोहोचलो. मदिराच्या प्रशस्त आवाराच्या प्रवेशद्वारी रायफलधारी कुमाऊ सैनिक उभा होता मदिरात राधाकृष्णाची मोहक मूर्ती आहे मूर्तीच्या मस्तकावर अत्यत सुदर मुकूट होता १९७२ मध्ये जीर्णोद्धार झालेले हे मदिर सगमरवरी आहे अतिशय शात वातावरण होते पुजारी महाराष्ट्रीयन ब्राह्मणासारखा होता. त्याने

आमची अगत्याने चौकशी केली प्रसाद दिला, दर्शन घेऊन लॉजवर परतलो. गरम गरम जेवण तयार झाले होते आलूमटार, डाल फ्राय, अचार, सॅलेड, गरम परोटे जेवण मस्त होते जेवणावर ताव मारला भरपूर जेवण झाल्याने पलगावर पडल्या पडल्याच सर्वजण झोपी गेलो

पहाटे पाच वाजता जाग आलो गरम पाणी मागवून स्नान केले सर्व आवरून सातला जवळच्या टॅक्सी स्टँडवर गेलो राणीखेतच्या जवळची पर्यटन-स्थळे पाहण्यासाठी ९० रु ला टॅक्सी ठरवली सीझन सुरू व्हायचा होता म्हणून नाहीतर आणखी पैसे मोजावे लागले असते सकाळच्या थंड हवेत विलक्षण उत्साह वाटत होता टॅक्सी ड्रायव्हर गप्पिष्ट होता या गावाला राणीखेत नाव कसे पडले असे त्याला विचारले तो म्हणाला की, एका दतकथेनुसार कुमाऊ प्रदेशातील राणी या गावच्या निसर्गसौदर्याने इतकी मोहित झाली की ती या गावातच राहू लागली कालातराने या गावाचे नाव राणीखेत रूढ झाले अर्थात राणीच काय कोणीही मोहीत होईल असेच या गावचे सौंदर्य आहे विशेषत असख्य फुलानी डवरलेले गुलाबाचे ताटवे वेड लावतात राणीखेत १८३० मीटर उचीवर असून पाच कि मी लाब वे दोन कि मी रुद पहाडावर वसले आहे इग्रजानी १८६९ मध्ये राणीखेतचा विकास केला


टॅक्सीने प्रथम दहा कि. मी अतरावरील बाबा हैडाखान मदिरात पोहोचलो पिरॅमिडसारख्या दिसणाऱ्या व उच सोनेरी कळस असलेल्या या मदिराच्या स्वच्छ आवारात प्रवेश केला तेव्हा दोन्ही बाजूच्या झाडांवरील असख्य टपोऱ्या गुलाब-पुष्पानी आमचे स्वागत केले मन एकदम प्रसन्न झाले तोच पहाडी आवाजातील आर्त स्वर कानावर आले त्या स्वरांनी आकर्षित होऊन मंदिरात प्रवेश केला मदिराचा गोरापान तरुण पुजारी डोळे मिटून विलक्षण तल्लीन होऊन गात होता " सद्गुरु नाम है तेरा, शरण मैं आया " त्याचे दोन साथीदार वाद्यांची साथ देत होतेच पण अधूमधून तेही सूरात सूर मिसळत होते अवीट गोडीचे ते गीत ऐकत साईबाबासारख्या दिसणाऱ्या व शाल असलेल्या मूर्तीसमोर आम्ही भान हरपल्यासारखे बसलो तो पुजारी एखाद्या देवदूतासारखा दिसत होता इतक्या आर्ततेने म्हटलेले भक्तिगीत यापूर्वी कधीही ऐकले नव्हते ते गीत कधीच संपू नये असे वाटत होते पण वेळेचे बधन होतेच अगदी नाईलाजानेच ते सूर मनात साठवीत मंदिराबाहेर आलो मदिर अतर्बाह्य शुभ्र सगमरवराने मढवले आहे मदिर ज्यानी स्थापन केले त्या बाबाचे अनेक परदेशी शिष्य असून मंदिराच्या देखभालीसाठी परदेशाहून ते पैसे पाठतात शम्मीकपूर हा सिनेनटही बाबाचा भक्त आहे आवारात बाजूला आतरराष्ट्रीय अतिथीगृह आहे बाबाचे वास्तव्य कधी मदिराशेजारी आश्रमात तर कधी हल्द्वानी येथील कुटीत असते मदिराच्या

आवारातून हिमालयाचे मनोहर दृश्य दिसते निघताना उत्काने गुलाबाच्या फुलात फोटो काढायची हौस भागवून घेतली शात, स्वच्छ वातावरण असलेल्या ह्या मदिराचा निरोप घेताना जड गेले


राणीखेतच्या कॅन्टोन्मेंटच्या रस्त्याने झूलादेवी मंदिराजवळ आलो या मंदिरात भक्तांनी नवसफेडीसाठी दिलेल्या असख्य छोटचा मोठचा घंटा टागलेल्या दिसतात मदिराचे पुजारी पूजा करीत होते पूजा सपेपर्यंत त्या घटा मोजण्याचा प्रयत्न केला पण लगेच कटाळून नाद सोडून दिला पूजा सपल्यावर गध लावत व प्रसाद देत पुजाऱ्याने माहिती सागितली की पाचशे वर्षापूर्वी येथे घनदाट जगल होते येथे सिंहांचा धुमाकूळही फार असे येथील एका साधूला देवीने स्वप्नात दृष्टात दिला की मदिर उभारून देवीची प्रतिष्ठापना कर, मग भय राहणार नाही तेव्हापासून जगलात सिंह असले तरी त्यांच्यापासून भीती राहिली नाही अजूनही आजूबाजूच्या जगलात सिंह आहेत पण त्याच्यापासून भीती नाही अर्थात पूर्वीच्या मानाने रुपयात एक पैसाही जगल राहिले नाही अशी खतही त्यानी व्यक्त केली येथील देवीला झूलादेवी नाव का पडले हे सागताना ते म्हणाले की, " मदिराची उभारणी झाल्यावर ज्यांनी ती केली ते झाडावर झुले खेळत एक दिवस देवीने दृष्टांत दिला की, " मुझे भी झूलेमें बिठा देना ! " त्या आदेशानुसार देवीची मूर्ती झूल्यात स्थापन करण्यात आली म्हणून तिला झूलादेवी नाव पडले मदिराच्या या पुजाऱ्याचे नाव धर्मानद पत असे होते त्याचे पूर्वज महाराष्ट्रातील असल्याने आमच्याशी ते अगदी जिव्हाळचाने बोलत होते

या मदिराजवळ टेकडीवर राममदिर आहे पायऱ्या चढून मदिरात पोहोचलो या मदिराच्या निर्मितीला पन्नास वर्षे झाली दिल्ली व वृदावनकडून कारागीर पाचारण करण्यात आले होते मंदिरात प्रभू रामाची मूर्ती असून संगमरवरी भितींवर तुलसी रामायणातील श्लोक कोरले आहेत हे मदिर ज्या मौनीबाबांच्या प्रेरणेने बाधण्यात आले त्यांचा आश्रम शेजारीच आहे त्यांचे दर्शन मिळेल का, अशी पुजाऱ्याजवळ चौकशी केली तेव्हा तो म्हणाला की बाबाची पूजा चालू आहे ती सपल्यावर दर्शन मिळेल मंदिरासमोरील हिरवळीवर अर्धा तास बसलो नतर आश्रमातून बेल वाजवल्याचा आवाज आला पुजारी म्हणाला " बाबानी दर्शनाला बोलावले आहे, चला " उत्सुकतेने एका स्वच्छ सारवलेल्या खोलीत प्रवेश केला. पेटलेल्या धुनीसमोर अत्यत तेजस्वी चेहऱ्याचे मौनीबाबा आसनस्थ होते पाणीदार डोळे असलेल्या बाबाच्या वयाचा अदाज त्याच्या चेहेऱ्यावरून मुळीच लागत नव्हता मौनव्रत असल्याने त्यानी पाटीवर लिहून विचारले, " कहाँसे आये ? " आम्ही उत्तर दिल्यावर पाटी पुसून पुन लिहिले, " कहाँ जा रहे हो ? " बद्रीनाथला जात आहोत असे सागितल्यावर मंदिर नेमके कोणत्या तारखेला उघडणार याची

↓ नूरजहान राणी



↓ एतिमाद्-उद्-दौला, - आग्रा अंतर्भाग





एक मीटर व्यासाचा डॉ. संपूर्णानंद टेलीस्कोप, नैनिताल वेधशाळा



नैनिताल सरोवर

त्यांनी पाटीवर लिहून कल्पना दिली तसेच पुढील प्रवासाबद्दल शुभेच्छा दिल्या. बाबांचे दर्शन घेताना हिमालयातील साधुसंताचे दर्शन झाल्याचे समाधान वाटले

प्रख्यात चौबोटिया फलोद्यानात त्यानंतर टॅक्सीवाल्याने नेले २११६ मीटर उंचीवरील पहाडातील या उद्यानात सफरचंद, चेरी, बदाम, पीच, अक्रोड अशा विविध फळांच्या बागा आहेत आमच्या दुर्दैवाने मे महिन्यात फळांचा सीझन नसल्याने ताज्या फळांचा आस्वाद घेता आला नाही पण हिरव्यागार वृक्षराजीतून भटकताना एक आगळाच आनंद वाटला उद्यानात प्रयोगशाळा, ट्रेनिंग सेंटर आहे कॅंटीनमध्ये सफरचंदाच्या ज्यूसचा आस्वाद मात्र घेतला

कॅंटोन्मेंटरोडने परतताना एका ठिकाणी थांबून चीड वृक्षाच्या खोडातील खाचातून डिंक कसा पाझरतो व तो कसा गोळा करतात हे पाहिले टॅक्सी ड्रायव्हरने तेवढ्यात एक पाकळ्यापाकळ्यांची लाकडासारखी कठीण गोलाकार वस्तू आणून दिली ते चीड वृक्षाचे फळ होते त्या नक्षीदार गोलाच्या अनेक शोभिवंत वस्तू तयार करतात ड्रायव्हरने वर झाडाकडे लक्ष वेधले तर अशी सुकलेली अनेक फळे झाडावर डोलत होती पूर्ण सुकल्यावर ती झाडाखाली पडतात " माझी आठवण म्हणून हे फळ घेऊन जा व त्याला सुरेख रंग देऊन शोकेसमध्ये ठेऊन द्या " ड्रायव्हर हसून अदबीने म्हणाला

राणीखेत–अलमोडा मार्गावर पांच कि मी अंतरावरील प्रसिद्ध कालिका-माता मंदिराच्या पायथ्याशी उतरलो टेकडीवरील कालीदेवीचे दर्शन घेतले मंदिराच्या बाजूला फुलांची नर्सरी आहे. मंदिरासमोरून डोंगरदऱ्यांचे निसर्ग-दृश्य सुरेख दिसते दर्शन घेऊन परतताना वाटेत राणीखेतचे प्रसिद्ध गोल्फमैदान पाहिले तसेच कुमाऊ रेजिमेंटचे लष्करी मैदान पाहिले तेथे जवानांच्या खेळांच्या स्पर्धा सुरू होत्या

लॉजवर परतलो तेव्हा सकाळचे साडेदहा वाजले होते. सामान सकाळी निघतानाच आवरून ठेवले होते हॉटेलचे बिल दिले त्याच टॅक्सीतून एस् टी. स्टॅंडवर आलो. स्टॅंडवरच जेवण केले कर्णप्रयागकडे जाणाऱ्या बसची प्रतीक्षा करीत बसलो

✻

## राणीखेत ते कर्णप्रयाग

दुपारी बारा वाजता राणीखेत बसस्टँडवरून कर्णप्रयागकडे बसने निघालो राणीखेत–कर्णप्रयाग १३४ कि मी अंतराचा प्रवास होता रस्ता पहाडी प्रदेशातील होता आजूबाजूचे हिरवेगार उंच उंच वृक्ष, डोंगरदऱ्या पार करीत अडोतीस कि मी गेल्यावर द्वारहाट गावी बस थांबली दुपारचे चार वाजले होते तेथे चहा घेतला द्वारहाट प्रसिद्ध आहे प्राचीन मूर्तिकलेसाठी या गावाला सोळाव्या शतकातील तीस मंदिरांचा समूह आहे त्यापैकी बद्रीनाथ मंदिर, मृत्युंजय, ध्वज, काली, दुर्गा ही मंदिरे प्रसिद्ध आहेत अशी माहिती मिळाली

इतक्यात अनपेक्षितपणे आकाशात ढग जमले व जोराचा पाऊस सुरू झाला. त्यात लग्नाच्या वऱ्हाडाचे तीस चाळीस लोक बळेच बसमध्ये घुसले खर तर बस अगोदरच पूर्ण भरली होती त्यात ही गर्दी पण कंडक्टर कोणालाच नाही म्हणत नव्हता एव्हढेच नव्हे तर गर्दीमुळे टपावर जाऊन बसलेल्या लोकाना मागच्या बाजूने टपावर चढून तिकीटे देत होता द्वारहाटहून अगदी जिकीरीचा प्रवास सुरू झाला. बसमधील सीट्स अगदीच अडचणीच्या अशा होत्या त्यात सामान व माणसांची गर्दी, खेचाखेच ! रस्ता वळणाकार चढाचा गाडीचा वेग जेमतेम होता वऱ्हाडातील दोन तरूण चिकार दारू प्याल्याने मोठमोठ्याने वाटेल ते बडबडत होते

आणि त्यांच्या आचरट चाळ्यांना सारेजण हसून दाद देत होते एका बाजूला उंच पहाड तर दुसऱ्या बाजूला रामगंगा नदीचा प्रवाह असा प्रवास चालू होता. बाहेर निसर्गदृश्य सुरेख होते पण बसमधील कलकलाटाने डोके दुखायला लागले होते तेवढ्यात बस बंद पडली अंधार पडायला सुरूवात झाली होती ड्रायव्हरने सर्वांना उतरायला सांगितले त्या बसमधून शंभर माणसे बाहेर उतरली ड्रायव्हर गाडी सुरू करण्याची खटपट करू लागला प्रवासी गप्पा मारीत वेळ घालवत होते उल्का-उदय रामगंगा नदीच्या खळाळत्या प्रवाहात पाय सोडून बसले. एक तासाभराने बस सुरू झाली पण वेग नव्हता गैरसैण या छोटेखानी गावात रात्री आठ वाजता पोहोचलो कंडक्टरने जाहीर केले, ' इंजिन खराब आहे गाडी पुढे जाऊ शकणार नाही ' काही प्रवाशांनी हळूहळू तसेच चलण्याचा आग्रह केल्यावर तो म्हणाला की बस पुढे नेऊ पण घाटात ती बंद पडली आणि जंगलात थांबावे लागले तर काय करणार ? ते ऐकून काहींनी तेथे रस्त्यालगतच पथाऱ्या पसरल्या तर काही एस् टीतच झोपून राहिले अनपेक्षितपणे या छोट्या गावात मुक्काम करावा लागलेला पाहून अंगावर काटा उभा राहिला डोंगराच्या कुशी-तील हे गाव अंधारात जणू गडप झाल्यासारखे वाटत होते गावात मुक्कामासाठी डाक बंगला आहे असे कळल्यावर थोडा हुरूप आला उदय व यशवंत रात्रीच्या अंधारात चाचपडत तेथे जाऊन आले तेथे जागा शिल्लक नव्हती गावात लॉजही नव्हते गावातील एक शिक्षक मुक्कामाला खोली भाड्याने देतो अशी माहिती कोणीतरी दिली तेथे चौकशी केली खोली म्हणजे गोठाच होता दोन खाटा खोलीत होत्या व एक पडवीत होती दरवाजा नव्हता, लाईटही नव्हता सुदैवाने पाण्याचा नळ असलेली छोटी मोरी होती संडास तर नव्हताच आलेल्या प्रसंगाला तोंड देणे भाग होते प्रवासाने तर शिणलो होतोच पण थंडीत स्टँडपासून त्या गोठ्यापर्यंत बॅगा उचलून आणाव्या लागल्या रात्र कशी जाणार काळजीच होती. कारण टॉर्चच्या उजेडात विविध प्रकारचे किडे फिरताना दिसत होते यशवंत मात्र निश्चिंत होते एका रात्रीचा तर प्रश्न आहे, असाही अनुभव यायला हवा असे ते म्हणाले थंडगार पाण्याने हातपाय धुतले जेवणावरची वासनाच उडाली होती गरम दूध मात्र मिळाले रात्र कशीबशी काढली शांत झोप कशी येणार ? सकाळी पाचलाच उठलो गावाबाहेर शेतात प्रातर्विधी उरकावा लागला हातपाय तोंड धुऊन बॅगा घेऊन स्टँडवर आलो गैरसैण गावाचे नाव उदयने ठेवले ' गैरसोय ' या गावात मुक्काम करणारे आम्हीच बहुतेक पहिले महाराष्ट्रीयन कुटुंब असावे स्टँडवर चहा मिळाल्यावर उत्साह आला

साडेसहाच्या सुमाराला बस कर्णप्रयागकडे निघाली तीस कि मी अंतराचा प्रवास राहिला होता सकाळच्या रम्य वातावरणात हिमालयातून प्रवास सुरू होता वाटेत आदिबद्री नावाचे छोटे गाव लागले रस्त्याच्या बाजूला चार पाच दगडी मंदिरांचा समूह दिसला ही मंदिरे भुवनेश्वरच्या मंदिरांच्या शैलीची वाटली.

ऋग्वेदाच्या पुरुषसूक्ताचा निर्माता ऋषी नारायण यानी येथे तपस्या केली ते हे स्थान हिंदूधर्मीय ब्रह्मा, विष्णु, महेश, गणेश, शक्ती असे पचपरमेश्वर मानतात तसेच प्राचीन पचबद्री अस्तित्वात आहेत राजबद्री किंवा ध्यानबद्री हे मुख्य बद्री योगबद्री पंडुकेश्वरला आहे हिवाळचात बर्फवृष्टी झाल्यावर बद्रीनाथचे मुख्य मंदिर बंद होते त्यावेळी पडुकेश्वरला उत्सवमूर्ती असते कपलाबद्री अथवा भविष्यबद्री तपोवनात आहे नरसिंह बद्री जोशीमठला आहे पचबद्रीपैकी पहिले आदिबद्री पहायला मिळाले

आदिबद्री गावानतर बस सिमली गावाजवळ थाबली. पिंडार नदी बाजूने वेगात वाहत होती सिमली गावानजीकच्या मैदानात हिरवीगार शेते दिसत होती बस कर्णप्रयागकडे पिंडार नदीच्या सान्निध्यात चालली होती खऱ्या अर्थाने आमचा प्रवास उत्तरखंडात सुरू झाला होता हा प्रदेश आहे सप्तसिंधूचा वेद काळात आर्यांची वस्ती याच परिसरात होती सिंधू हा शब्द नदीसाठी वापरला जाई विष्णुगगा (अलकनदा), धौलीगगा, नदाकिनी, पिंडार, मदाकिनी, भागीरथी आणि नायर या सप्तसिंधू यापैकी पिंडार नदीच्या धवलशुभ्र खळखळ वाहणाऱ्या प्रवाहाच्या कडेने प्रवास सुरू होता सकाळी नऊच्या सुमाराला बस कर्णप्रयागला थांबली कुमाऊ प्रदेशाचा प्रवास सपून गढवाल प्रदेशात प्रवेश केला

गढवाल म्हणजे गढांचा प्रदेश ऋग्वेदात शभर गढाचे वर्णन केले आहे गढवाल हे पूर्वीच्या काळातले ऋषीमुनीचे तपस्थळ राजा सगरच्या भस्म झालेल्या साठ हजार पुत्राच्या उद्धारासाठी भगीरथाने केलेल्या तपामुळे गगावतरण येथेच झाले पाडव कैलास पर्वतावर जाताना येथूनच गेले पश्चिमेला हिमाचल प्रदेश, पूर्वेला कुमाऊं, दक्षिणेला शिवालीक, व उत्तरेला बद्रीनाथजवळील माना या गढवालच्या सीमारेषा आहेत गढवाल पूर्वी उत्तरखड म्हणून ओळखला जाई गगोत्री, यम्नोत्री, केदारनाथ, बद्रीनाथ ही पवित्र धार्मिक स्थळे गढवालमधीलच ! तसेच मध्यमहेश्वर, तुगनाथ, कल्पेश्वर, रुद्रनाथ व केदारनाथ हे पचकेदारही प्रसिद्ध आहेत गढवालचा दोन तृतीयाश भाग पर्वतमय आहे नदादेवी, दुनागिरी, त्रिशूल, नीलकठ, केदार, प्रभात हे पर्वत प्रसिद्ध आहेत गढवाल हा डेहराडून, तेहरी गढवाल, पौरी गढवाल, चमोली व उत्तरकाशी असा पाच जिल्ह्याचा प्रदेश !

कर्णप्रयागचा बसस्टँड नदीकाठीच आहे हरिद्वार, हृषिकेश, बद्रीनाथकडे जाणाऱ्या गाड्यांना कर्णप्रयागवरूनच जावे लागते' प्रयाग म्हणजे सगम. अलकनंदा व पिंडार या नद्याचा संगम कर्णप्रयागला झाला आहे बसस्टॅन्डजवळच कर्णमंदिर आहे सगमाकाठी उभे राहूनच कर्णराज अर्घ्यदान करीत असे कर्णप्रयागला कण्व-ऋषींचा आश्रम होता शकुंतला व दुष्यत यांची प्रथमभेट येथेच झाली होती असे हेपुराणकाळपासूना प्रसिद्ध कर्णप्रयाग !

*

## शकराचार्यांचे जोशीमठ

कर्णप्रयाग स्टँडवर चहा, नाष्टा आटोपल्यावर जोशीमठ बसमध्ये सामान चढवले कर्णप्रयाग–जोशीमठ हा ८१ कि मी. अतराचा प्रवास सुरू झाला अलकनदा नदीची सोबत होतीच एका बाजूला हिमालयात उगम पावलेल्या अवखळ अलकनदेचा प्रवाह तर दुसऱ्या बाजूला उच पहाड, वळणाकार रस्ते बस ड्रायव्हर कुशलतेने ड्रायव्हिंग करीत होता बसची लांबी कमी असल्याने वळणे सुलभ जात होते वाटेत साधुसंत, बैरागी बद्रीनाथ धामाकडे यात्रेला पायी जाताना दिसत होते वेळ दुपारची असूनही थडगार वारे वाहत होते दुपारी बाराच्या सुमारास नदप्रयाग गाव आले नदप्रयाग यदुवशाची राजधानी होती. यदुवशातील नद राजाला सर्व सुखे असूनही पुत्रसुख मात्र नव्हते दुःखी यशोदा राणीने येथे तप केले विष्णूने वर दिला की देवकीला पुत्र होईल व यशोदा त्याला वाढवील नदप्रयागला मदाकिनी व अलकनदा याचा सगम होतो बसमधून हा सगम दिसला पचप्रयाग असे आहेत – कर्णप्रयाग, नदप्रयाग, देवप्रयागला भागीरथी व अलकनदा यांचा सगम होऊन अलकनदा लुप्त होते रुद्रप्रयागला मदाकिनी अलकनदेला मिळते तर विष्णुप्रयागला धौली नदी अलकनदेशी एकरूप होते

दुपारी एकच्या सुमारास चमोली हे महत्त्वाचे गाव लागले चमोली जिल्ह्याचे नाव आहे गोपेश्वर हे जिल्हयाचे मुख्य ठिकाण तेथून पाच कि मी

अंतरावर असून अलकनंदा पार करून दुसऱ्या बाजूला जावे लागते. बद्रीनाथहून केदारनाथला जाण्यासाठी चमोली, गोपेश्वर, उखीमठ, गुप्तकाशी असा मार्ग आहे. चमोलीनंतर टगनी नावाचे छोटे गाव गेल्यावर अलकनंदा नदीवरील पूल पार करून बस दुसऱ्या बाजूला आली. इतका वेळ खिडकीत बसून खळखळत्या नदीचा देखावा मजेने पाहणारा उदय नाराज झाला. कारण आता नदीऐवजी उंच उंच पहाडांचे दृश्य दिसू लागले. पीपलकोटी या महत्त्वाच्या गावी बस दोनच्या सुमारास पोहोचली. कर्णप्रयागहून ४८ कि. मी. असलेल्या पीपलकोटीला यात्रेकरूंना उतरण्यासाठी चांगल्या धर्मशाळांची सोय आहे. नंतर चढाचा रस्ता सुरू झाला. हेलंग गावी बस थांबली. तेथून नऊ कि. मी. अंतरावर कल्पेश्वर हे पंचकेदारपैकी स्थान आहे. वळणाकार रस्ते पार करीत जोशीमठला सुमारे चारला पोहोचलो. बसस्थानकाजवळील पर्यटन विभागाचे ट्रॅव्हलर्स लॉज मिळण्यास अडचण पडली नाही. जोशीमठला उतरण्यासाठी बिर्लांचे दुमजली सुंदर अतिथी भवन आहे. तेथील दरही अत्यल्प आहेत. पण अगोदर पत्र देऊन रिझर्व्हेशन करावे लागते. जोशीमठला उतरल्यावर नळाच्या थंडगार पाण्याने हातपाय धुतले. सकाळी आंघोळीला सुटी द्यावी लागली होती. आताही पाणी बर्फासारखे थंड असल्याने आंघोळ टाळली. थोडी विश्रांती घेऊन साडेपाचच्या सुमारास बाहेर निघालो.

पुराणातील कथेप्रमाणे हिरण्यकश्यपूने जोशीमठ येथे विष्णूची पूजा करून अमर राहण्याचा वर मिळवला होता. विष्णूने नृसिंहाचे रूप घेऊन त्याचा वधही येथेच केला म्हणून जोशीमठ 'नृसिंह बद्री' नावाने ओळखले जाते. जोशीमठच्या मुक्कामात प्रथम नृसिंहमंदिराला भेट देण्यासाठी उताराच्या रस्त्याने निघालो. पायऱ्या उतरून मंदिराजवळ पोहोचलो. तेथे चार-पाच हजार लोकांचा मेळा भरला होता. नटून थटून आलेल्या गोऱ्यापान गढवाल कन्यका दिसल्या. गढवाली माणसेही खूप होती. मंदिराच्या आवारात दडरिया नावाचा एक माणूस पूजा करीत होता. त्याच्या अंगात आल्याने तो थरथर कापत होता. एक बोकड तेथे बांधला होता. त्याच्यावर हल्ला करून त्याला मारून त्याचे रक्त तर तो प्यालाच पण त्याचे कच्चे मांसही त्याने खाल्ले. एवढेच नव्हे तर बावीस शेर कच्च्या तांदळाचा परातभर भात खाल्ला. एक गुळाची संपूर्ण ढेप संपवली, शेवटी बादली भर पाणी प्याला व खाली पडला. सगळच काही अलौकिक. सुपरह्यूमन शक्तीचा नृसिंह अंगात संचारल्याने हे सर्व शक्य होते. बद्रीनाथ मंदिर हिवाळ्यात बंद झाल्यावर देवाची गादी जोशीमठला आणण्यात येते. पूजाअर्चा मग जोशीमठलाच चालते. मंदिर उघडण्यापूर्वी गादी वर जाण्याअगोदर उन्हाळ्यात हा मेळा भरतो. जोशीमठला योगायोगाने हा सोहळा पाहण्याचा योग आला. नृसिंहाच्या या प्राचीन मंदिरात रक्ताचा सडा पडला होता. मंदिरात दर्शन घेऊन गर्दीतून वाट काढीत बाहेर पडलो, संध्याकाळ झाली होती. गार वारे वहात होते. दाक्षिणात्य पद्धतीच्या एका हॉटेलमध्ये संध्याकाळचे जेवण घेऊन मुक्कामी परतलो.

जोशीमठच्या वास्तव्यातील दुसरा दिवस उजाडला आज स्नान चुकवून चालणार नव्हते सकाळी स्नान आटोपून, चहा ब्रेड नाष्टा करून जोशीमठमधील धार्मिक स्थळे पाहण्यास बाहेर निघालो. सकाळच्या कोवळ्या उन्हात पायऱ्या चढून श्रीशंकराचार्यांच्या गुंफेच्या दर्शनासाठी आलो. गुंफेत अखंड ज्योत तेवत असते गुंफेत शंकराचार्यांची समाधी आहे तेथे शेजारी एक अमर कल्पवृक्ष आहे त्या वृक्षाखाली उभे राहून केलेली इच्छा पूर्ण होते असे तेथील पुजारी म्हणाला उल्काला म्हटल–"वृक्षाखाली उभे राहून मेरीटमध्ये येण्याची तुझी इच्छा मनात आण" उल्का कल्पवृक्षाखाली उभी राहिली आणि ती काकानी कॅमेऱ्यात तिचा फोटो टिपला चारी बाजूच्या पहाडाचे दृश्यही छान दिसत होते.

थोडया पायऱ्या चढून वर श्रीशंकराचार्यांच्या दुमजली मठात आलो जोशीमठचे पूर्वीचे नाव ज्योतिर्मठ पंचबद्रीपैकी हे एक स्थान होते कत्युरी काळात जोशीका मठ नाव होते व हे राजधानीचे ठिकाण होते शंकराचार्यांच्या मठाचे आवार स्वच्छ होते फुलझाडे होती पदमार्गावर संस्कृत वचनाचे फलक होते आद्यशंकराचार्यांचा पूर्वीचा मठ भूकंपात नष्ट झाल्यावर सध्याचा मठ इ. स. १८९८ मध्ये बांधला या पीठाच्या विद्यमान शंकराचार्यांचे नाव श्रीस्वामी विष्णुदेवानंद सरस्वती महाराज अलाहाबादहून स्वामीजी येणार म्हणून साफ-सफाई सुरू होती मठात शृंगेरी, शारदा, ज्योतिर्मठ येथील शंकराचार्यांचे फोटो होते एका मंहिरपीत वेद होते मठाला वर चारीबाजूला गॅलरी आहे शंकराचार्यांचे आगमन होणार म्हणून सर्वत्र उत्साहाचे वातावरण होते

मठाचे दर्शन घेऊन जवळची त्रोटकाचार्य गुंफा पहायला आलो तेथे प्रथम त्रिपुरसुंदरीची मूर्ती आहे खाली गुंफा असून तिच्यात शंकराचार्य व त्यांचे शिष्य त्रोटकाचार्य ध्यानधारणा करीत तेथील पुजाऱ्याने महामृत्युंजय शिवलिंगाचे महात्म्य सांगितले शंकराचार्य मानससरोवर यात्रेला गेले होते तेथे साक्षात् भगवान शंकराने त्याना शिवलिंग दिले ते स्फटिकलिंग होते पांढरे शुभ्र स्फटिक लिंग अंधारातही चमकते ज्योतिर्पिठाचे प्रथम संस्थापक त्रोटकाचार्य मानले जातात त्यांच्या अखंड ध्यानधारणेमुळेच हे महामृत्युंजय शिवलिंग येथे मिळाले. पुजारी म्हणाला की, तुम्ही डोळे मिटून मनात कसलेही विचार न आणता स्वस्थ बसा त्याप्रमाणे आम्ही समोरील जमिनीवर दहा मिनीटे डोळे मिटून बसलो पुजारी श्लोक म्हणू लागला खरोखर तेथे मनाला अपूर्व शांतता लाभली शंकराचार्यांच्या वास्तव्याने पुनीत झालेली ती गुंफा, शांत वातावरणात घुमणारे पुजाऱ्याच्या श्लोकाचे स्वर आणि मिटल्या डोळयासमोर वारवार येणारे ते स्फटिकलिंग, काही केल्या डोळे उघडावेसे वाटेनात पुजाऱ्याचा स्वर हळू हळू कमी झाला व त्याने डोळे उघडण्यास सांगितले, तेव्हा कुठे सर्वजण भानावर आलो तीर्थ घेऊन बाहेर आलो आता वेध लागले होते बद्रीनाथ दर्शनाचे ! ❋

## बद्रीनाथ धाम

प्रवासाचा शेवटचा टप्पा जोशीमठ– बद्रीनाथ ५१ कि. मी. अंतराचा सुरू झाला जोशीमठहून निघाल्यावर प्रथम रस्ता उताराचा आहे आधी विष्णु-प्रयाग दिसले या ठिकाणी अलकनदा व धौली नदी यांचा सगम होतो भर दुपारीही थडगार वारे हैराण करीत होते थडीने अगावर काटे येत होते खोलवर वाहणाऱ्या अलकनंदाचे अद्‌भुत दृश्य मनाला वेडावून टाकत होते पहाडातून, दगडधोंड्यातून फेसासारखा प्रवाह वाहत होता जोशीमठ ते गोविंदघाट हा चार कि मी. अंतराचा प्रवास सपल्यावर विष्णुगंगा पूल पार करताच चढाचा रस्ता सुरू झाला गोविंदघाटाहून पूर्वेकडील फाट्यावर व्हॅली ऑफ फ्लॉवर्स व शिखांचे हेमकुडसाहेब ही दोन ठिकाणे लागतात गोविंदघाटाहून नऊ कि मी. अंतर पार केल्यावर बस पडुकेश्वरला थाबली महाभारतातील कथेनुसार पडुराजाने दोन हरणाचा समागम चालू असताना तीराने त्याची शिकार केल्याने त्याला येथे शाप मिळाला येथेच नकुलाचाही जन्म झाला

पडुकेश्वरहून सकाळी सहा ते दुपारी चार पर्यंत ठराविक वेळी जोशीमठ व बद्रीनाथहून येणाऱ्या गाड्या पाच वेळा सोडतात पुढील रस्ता अरुद असल्याने ही योजना आहे एकच वाहन या रस्त्याने जाऊ शकते जोशीमठ १५२४ मीटर उचीवर आहे तर बद्रीनाथची उची आहे ३१४९ मीटर ! १६२५ मीटर उचीचा

चढाचा रस्ता बस पार करीत होती पूर्वी तर पायीच जावे लागत होते. हनुमान-चट्टी या ठिकाणी बस थाबली शेवटचा टप्पा राहिला होता हवा खूपच थड होती ऑक्सिजन विरळ होता देवदर्शिनी हे बद्रीनाथच्या अलीकडे एक कि मी अतरावरील ठिकाण तेथून बद्रीनाथ मदिराचा सोनेरी कळस पाढऱ्याशुभ्र पर्वतराजीत उठून दिसतो देवस्थानाचे दर्शन घडताच गाडीतील भाविकांनी एकच घोष केला जयबद्री–जयविशाल !

बद्रीनाथला रात्रीचा मुक्काम पर्यटन विभागाच्या 'देवलोक' मध्ये केला. पहाटेच सर्वांना जाग आली सर्व आवरून मोठ्या भाविकतेने मदिराकडे निघालो. बद्रीनाथच्या पवित्र धामाचा इतिहास हिमालयाइतकाच प्राचीन आहे स्कंदपुराण श्रीमद्भागवतपुराण, मत्स्यपुराण, नारदपुराण, महाभारत यामध्ये बद्रीनाथचा उल्लेख आहे प्राचीन काळात तेथे बद्रीवृक्षांचे–बोराचे वन होते म्हणून बद्रीवन हे नाव पडले सत्ययुगात नाव होते मुक्तीप्रद ! द्वापारयुगात येथे मणिभद्र आश्रम होता राजा विशालने येथे ध्यानधारणा केली धर्मराजाची पत्नी मातामूर्ती व त्यांच्या नर-नारायण या दोन पुत्रांनी तेथे प्रार्थना केली. नरनारायण आश्रमाची स्थापना केली मत्स्यपुराणात नरनारायण असे दोन अवतार आहेत. नारद-पुराणात नारदमुनींनी येथे भेट दिली होती असे म्हटले आहे कृष्णाचा शिष्य उद्धव त्याच्या सूचनेनुसार नरनारायण आश्रमात तपस्येसाठी गेल्याचा उल्लेख महाभारतात आहे

असे हे उत्तरेकडील पवित्र धाम ! अलकनदा नदीच्या उजव्या तीरावर गावाच्या मध्यभागी बद्रीनाथचे मंदिर विराजमान आहे अलकनदाचे धवलशुभ्र पाणी दररोज मदिराला जणू स्नान घालते मदिराच्या महाद्वारातून आत गेल्यावर दोन्ही बाजूस देवड्या आहेत पुढे सभामडप व मागे गाभारा अशी रचना आहे शभर माणसे बसू शकतील असा मोठा सभामडप असून मोठमोठ्या कमानीतून हवा उजेड भरपूर आत येतो. सभामडपावर उच कळस आहे सपूर्ण दगडी बांधकाम असलेल्या अशा या मदिराभोवतो प्रदक्षिणामार्ग आहे गढवालच्या महाराजानी १३ व्या शतकाच्या अखेरीस हे सध्याचे मदिर बाधले अहिल्याबाई होळकरांनी मंदिरावर सोन्याचा कळस चढवला शाळिग्राम शिळेची नारायणाची मूर्ती आहे चतुर्भुज अशी ही तीन फूट उंचीची मूर्ती पद्मासनावर ध्यानमुद्रेत आहे मूर्तीच्या दोन हातात शख व चक्र असून दोन हात जोडलेले आहेत गुळगुळीत अशा या मूर्तीच्या अगावर सोनेरी वस्त्रे, अलकार, आभूषणे असून मस्तकावर हिरेजडित मुकुट चमकत होता. या मूर्तीसबधी अशी हकीकत आहे की बौद्ध धर्मप्रसारानतर तिबेटी बौद्धधर्मीयानी येथील नारदकुडात विष्णुची ही मूर्ती टाकली आदिशकराचार्यांनी पुढे आठव्या शतकात वैदिक धर्माची पुन प्रतिष्ठा

केली बदरीक्षेत्रात एक मठ स्थापन केला तसेच नारदकुंडातून ही मूर्ती काढून तिची पुनश्च स्थापना करून उद्धार केला मूर्ती पाण्यात सतत राहिल्याने वाळू घासून घासून मऊ, पॉलीश केल्यासारखी गुळगुळीत झाली. मूर्तीच्या डाव्या हाताला लक्ष्मीची चवरी ढाळीत असलेली मूर्ती आहे त्यापलीकडे नरनारायणाच्या शंख, चक्र, गदा, पद्मधारी मूर्ती आहेत उजवीकडे कुबेर व गणपती आहे या मूर्तीच्या खालच्या पायरीवर उजव्या बाजूला गरुड मध्ये उद्धव व डाव्या बाजूला नारद यांच्या मूर्ती आहेत नारायणाच्या मूर्तीच्या पलीकडे अक्षय्य तेवणारा नदादीप आहे तिसऱ्या प्रहरी राजभोग होतो त्यासाठी रोज दोन-तीन मणाचा भात केला जातो आमटीही त्याबरोबर असते. या भाताला नैवेद्य मूर्तीला दाखवल्यावर तोच भात प्रसाद म्हणून यात्रेकरूना देण्यात येतो श्राद्धाकरता लागणारे पिंडही त्याच भाताचे मिळतात

मंदिराचा मुख्य पुजारी नंबुद्री ब्राह्मण असून त्यास रावळ म्हणतात हिवाळयात मंदिरावर १० ते १५ फूट उंचीचे बर्फ असते मार्गशीर्ष ते वैशाख तेथे कोणीही नसते वैशाखात तेहरी गढवालचा राजा व राजमाता यांच्या उपस्थितीत शुभमुहूर्तावर मंदिर उघडण्यात येते. त्यावेळी बर्फ वितळलेले असते कर्णप्रयागजवळील सिमली गावाहून निघालेल्या तिळाच्या तेलाच्या कलशाची यात्रा येथे तेव्हा संपून नित्यनियम स्नानानंतर भगवानावर ते तेल माखतात नोव्हेंबर महिन्यात बर्फ पडायला सुरुवात होण्यापूर्वी रावळ मूर्तीची पूजा करतात मग भगवान व मंदिर यांना एकांतवासात टाकून पुजारी व बद्रीनाथची वस्ती पंडुकेश्वर, जोशीमठ येथे येते त्यावेळी नारायणाची उत्सवमूर्ती जोशीमठ येथे आणण्यात येऊन तेथेच पूजा अर्चा होते बद्रीनाथ मंदिर पाच कि मी लांब व एक कि मी रुंद दरीत नरनारायण नीलकंठ पर्वतात वसले आहे. नीलकंठ पर्वताचे शिखर ३१२२ मीटर उंचीचे आहे नरनारायण पर्वतावर पडलेल्या बर्फाच्या चादरीत मंदिर गुरफटल्यासारखे वाटते मंदिराशेजारी मणिनाग पर्वत असून पांडव महाभारत युद्धानंतर याच मार्गाने स्वर्गारोहणासाठी हिमालयात गेले असा समज आहे

देशाच्या कानाकोपऱ्यातून आलेल्या विविध भाषिक आबालवृद्ध भाविकांनी मंदिर गजबजून गेले होते सारे वातावरण मंगल, पवित्र वाटत होते दर्शन घेऊन अलकनंदानदीवरील पूल पार करून उजव्या तीरावरील तप्तकुंडाजवळ आलो तेथे गरम पाण्याचा झरा आहे अग्निदेवतेला या कुंडाखाली राहण्याची विष्णुनी आज्ञा केल्याने पाणी उष्ण राहते असा समज आहे स्त्रियांना स्नानासाठी स्वतंत्र व्यवस्था आहे सर्वांनीच नैसर्गिक उष्ण पाण्याच्या स्नानाचा लाभ घेतला

अलकनदेतील नारदशिला, ब्रह्मशिला, नरसिंहशिला, मार्कंडेयशिला व गरुडशिला पवित्र मानतात डावीकडे सूर्यकुड आहे.

बद्रीनाथहून १० कि मी अतरावर माना गाव आहे समुद्रसपाटीपासून १०५६० फूट उच असलेल्या मानाला सरस्वती नदीच्या किनाऱ्यावरील बदरीकाश्रमात व्यासगुफा आहे एका मोटया खडकाखालील या गुफेत व्यासांनी भारत हा ग्रथ व भागवत पुराण लिहिले या खडकाचा आकार पुस्तकासारखा म्हणून त्यास 'व्यास गुफा' म्हटले जाते बाजूला गणेशजींनी लेखनिकाचे काम जेथे केले ती 'गणेश गुफा' आहे माना ही गढवालची उत्तरसीमा आहे तेथून पधरा किलोमीटर अंतरावर तिबेट-चीनची सरहद्द सुरू होते मानाचे माछी लोक बद्रीनाथला 'भोटीया देवता' मानतात बद्रीनाथपासून जवळच असलेल्या अलकनदेच्या उजव्या तीरावरील ब्रह्मकपाल या प्रशस्त सपाट खडकावर पितरांचे श्राद्ध करण्यास गर्दी होते

बद्रीनाथ धामी एक दिवस मुक्काम करून दुसऱ्या दिवशी प्रातःकाळी देवालयात जाऊन परत दर्शन घेतले जेवण आटोपून परतीच्या प्रवासासाठी स्टँडवर आलो बद्रीनाथ ते कर्णप्रयाग बसला अवकाश होता एकाने सुचविले की बद्रीनाथ–गोपेश्वर बस बाजूला उभी आहे त्यात बसा गोपेश्वर कर्णप्रयागच्या अलीकडे चमोलीजवळ अलकनदा नदीच्या दुसऱ्या काठावर आहे जिल्ह्याचे ठिकाण असलेल्या गोपेश्वरहून सकाळीच अल्मोडा ही थेट बस मिळेल बस तेथूनच सुटते, त्यामुळे जागाही मिळेल त्याप्रमाणे कर्णप्रयागऐवजी गोपेश्वरला मुक्काम करण्याचे ठरले

*

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
ग्रं. क्र.
शाखा (स्थळ प्रत)

## बद्रीनाथ ते कौसानी

बद्रीनाथ ते गोपेश्वर परतीचा प्रवास अलकनदा नदीच्या सान्निध्यात सुरू झाला. अलकनदेचा उगम बद्रीनाथपासून दहा किलोमीटर अंतरावरील अलकापुरी येथील हिमनदीतून (ग्लेसियर) होतो हे स्थान १४४०० फूट उचीवर आहे. तेथून विष्णुगगा नाव असलेली ही नदी पाच प्रवाहात वाहते अठरा कि मी अतरावर तिला सरस्वती नदी मिळते या सगमाचे नाव आहे केशवप्रयाग. बद्रीनाथला तिचा प्रवाह भगवानाच्या पायाला स्पर्शून जातो असे मानले जाते. धौली व विष्णुगगा याचा सगम बद्रीनाथला होतो व या जोडप्रवाहाला तेथून अलकनदा हे नाव मिळते

अशा या पुण्यसलीला अलकनदेचे सान्निध्य सपूच नये असे वाटत होते खरे तर हिमालयाच्या सान्निध्यात गेल्यावर एक आगळी हुरहूरच वाटायला लागते त्रासून गेल्यावर हिमालयात निघून जावसं वाटतय, असं आपण उगीच नाही म्हणत कुणीतरी म्हटल आहे ना की हिमालयाच्या नुसत्या दर्शनानेच मनातले विकार, वासना पळून जातात

जोशीमठला पाचच्या सुमारास पोहोचलो सायकाळी सातला चमोलीला उतरलो. सामान उतरवले लगेच टॅक्सीने अलकनदेवरील पूल पार करून दुसऱ्या काठावरील गोपेश्वरला आलो पाऊस सुरू झाला नव्याने सुरू झालेल्या हॉटेल

मानधातामध्ये मुक्कामाला आलो हॉटेलमधून दऱ्याखोऱ्यांचे व त्यातील मानवी वस्तीचे सुरेख दृश्य दिसते तेवढ्यात एक प्रचड ढग तरगत आला सर्वत्र धुकेच धुके पसरले. तो ढग तरगत हळू हळू दूर निघून गेला आणि पुन त्या दऱ्या-खोऱ्या हसू लागल्या तुरळक धुके दिसत होते लहानपणी पाठ केलेले गाणे आठवले ' खोल खोल खालती, धुक्यात हासते दरी '

आवरून गोपेश्वरला गावात चक्कर मारण्यासाठी निघालो बाजारच्या रस्त्याने दुसऱ्या टोकापर्यंत गेल्यावर तेथे एक प्राचीन दगडी मदिर दिसले हे मदिर पाडवकालीन असून आत शिव पार्वतीच्या मूर्ती आहेत विशेष म्हणजे पार्वतीची उभी मूर्ती आहे मदिरात शिलालेख आहे भुवनेश्वरच्या शैलीच्या या मदिराचा कळस खाली पडला होता. बाजारच्या रस्त्याने [illegible]

कड कुतुहलान पाहत होते महाराष्ट्रीयन येथे येत नसावेत. आमचे बोलणे ऐकून ही कोणती भाषा असावी असे भाव त्यांच्या चेहऱ्यावर उमटत काहींनी तर न राहवून विचारलेच तुम्ही बंगाली प्रवासी का ? तर काहींना आम्ही गुजराती प्रवासी वाटलो गावातील लोक गोरेपान, कपाळावर गध लावलेले दिसत होते गढवाली स्त्रियांच्या नाकात नथीपेक्षा मोठा दागिना होता फिरत फिरत गोपे-श्वरच्या सिव्हील हॉस्पिटलजवळ गेलो तेथून उचावरून खाली अलकनदेच्य-खोऱ्याचे सुदर दृश्य दिसले अलकनदेने तेथे धनुष्याकार वळण घेतले आहे तोच पुन ढगाचे आक्रमण होऊ लागले थोडा थोडा पाऊसही सुरू झाला तेव्हा धाई-धाईत हॉटेलमध्ये परतलो तेथील व्यवस्थापकाला सकाळी चारला उठवण्याची सूचना केली.

बरोबर पाच वाजता स्टँडवर आलो अलमोडा–गोपेश्वर बस रात्रीच मुक्कामाला आली होती तीच साडेपाच वाजता निघणार होती पुढच्या जागा मिळाल्या अल्मोडाला जाण्यापूर्वी त्याच मार्गावरील कौसानीला एक दिवस मुक्काम करायचा होता गोपेश्वरहून निघून चमोलीला अर्ध्या तासात पोहोचलो बस आता कर्णप्रयागकडे धावू लागली आठच्या सुमाराला कर्णप्रयागला आलो तेथे गाडी अर्धा तास थांबली अलकनदा–पिंडारचा सगम पुन्हा एकदा पाहिला साडेआठच्या सुमाराला बस अल्मोडाकडे निघाली पिंडार नदीच्या कडेकडेने बस निघाली प्रथम सिमली गाव लागले सिमलीहून दुसऱ्या फाट्याने निघालो बसमध्ये उत्तर प्रदेश जलनिगमचे इंजिनियर होते त्यानीच ओळख करून घेतली दोन इंजिनियर एकत्र आल्यावर मग काय ! गप्पा थोड्याच वेळात रंगल्या ड्रायव्हरने गाडीत लावलेल्या कॅसेटवर खड्या आवाजातील कुमाऊ लोकगीत ऐकताना मजा तर वाटत होतीच पण त्या गीताचे प्रत्यक्षात [illegible]

सौदर्याचे वर्णन असणाऱ्या या लोकगीताचे प्रमुख शब्द होते–

पी जाओ, पी जाओ मेरे पहाडका ठंडो पानी ।

आजूबाजूला हिरवेगार उंच पहाड व खोल दऱ्यातून अवखळपणे वाहणारी पिंडार नदी, शीतल, उत्साहवर्धक हवा. प्रवासाचा अजिबात कटाळा येत नव्हता. थराली गाव आले तेथे इंजिनिअर श्री नवीनचंद्र जोशी यांना उतरायचे होते आम्हा सर्वांना त्यानी मोठ्या अगत्याने चहा दिला यशवंत पैसे देऊ लागल्यावर ते म्हणाले, "आप हमारे मेहमान है ।' आम्ही त्यांना महाराष्ट्रात येण्याचे आमंत्रण दिले

ग्वालदम या उंचावरील गावी बस साडेअकरा वाजता थांबली गरम गरम भात, वरण, बटाट्याची रस्सेदार भाजी असे जेवण मिळाले हॉटेलवालाही अगत्यपूर्वक आग्रह करून वाढत होता. ग्वालदम गाव बरेच मोठे आहे चीनची सरहद्द तेथून जवळच असल्याचे कळले. त्या नंतर बस कत्युर प्रदेशातून जाऊ लागली शरयूगंगा व गोमती या दोन नद्यांच्या खोऱ्यातील भागाला कत्युर प्रदेश म्हणतात पूर्वी जोशीमठ ही या प्रदेशाची राजधानी होती नंतर बैजनाथ ही । दुपारी दोनच्या सुमारास गोमती व शरयूगंगा नद्यांच्या संगमावर मंदिराचा समूह दिसला ड्रायव्हरला अगोदरच विनंती केल्याने त्याने थोडा वेळ गाडी थांबवली पटकन उतरून मंदिरात गेलो हे गरूड बैजनाथ मंदिर पुराणकालापासून प्रसिद्ध आहे शंकर–पार्वती विवाह बैजनाथ येथे झाला पांडवानी येथे मंदिरे उभारली मंदिरातील पार्वतीची सहा फूट उंचीची उभी पाषाणमूर्ती अतिसुंदर आहे कन्याकुमारीच्या मूर्तीची आठवण झाली तेराव्या शतकातील गणेश, सूर्य ब्रह्म यांच्याही सुरेख मूर्ता आहेत मध्यंतरी पार्वतीची ही पाषाण मूर्ती चोरीला गेली होती दोन वर्षे शोध लागला नाही तेव्हा विद्यार्थ्यांनी हरताळ पाळला आंदोलन केले त्यानंतर मुंबई विमानतळावर मूर्ती परदेशी जात असताना सापडली व प्राचीन मूर्तीकलेचा एक अनमोल नमुना चोरी होण्यापासून बचावला बैजनाथ गाव मोठे असून तेथून एक फाटा बगेश्वर या मंदिराच्या गावी जातो तर दुसरा अलमोडाला जातो.

बैजनाथच्या मंदिराचे दर्शन घेता आले म्हणून ड्रायव्हरचे आभार मानले बस आता पुढे निघाली रस्त्याच्या दोन्ही बाजूच्या शेतातून मैलन्‌मैल गव्हाची पिके डोलत होती पिवळाजर्द झालेला गहू काढणीला आला होता अधूनमधून तांदळाची हिरवीगार पिके दिसत होती १६ कि मी अंतर पार करून कौसानीला दुपारी तीनला पोहचलो

※

## कौसानी : गांधीजींचे स्वित्झर्लंड

कौसानी ! प्राचीन काळात कौशिक मुनींची तपोभूमी असलेले, हिमालयातील अल्मोडा जिल्ह्यातील छोटेसे निसर्गसुंदर गाव कौशिकऋषींच्या नावावरून 'कौसानी' नाव रूढ झाले थंड, आल्हाददायक हवेत मुक्कामासाठी गांधी आश्रमाकडे निघालो ! कौसानीची आंतरराष्ट्रीय प्रसिद्धी इ स १९२९ मध्ये म गांधींनी येथे बारा दिवस वास्तव्य केल्याने झाली गांधी आश्रम बसस्थानकापासून अर्धा कि मी अंतरावर थोड्या उंचीवर आहे आश्रमाभोवती प्रशस्त आवार असून तिथे टपोऱ्या गुलाबपुष्पाची रेलचेल आहे. शेजारी दोन मजली अतिथीगृह असून स्वतंत्र भोजनालय आहे आश्रमाचे व्यवस्थापक श्री सूरजनाथ दुबे यांनी आस्थेवाईकपणे चौकशी करून राहण्यासाठी खोली दिली त्यांनी हसत प्रवाशांना सुचविले की, 'हा आश्रम आहे लॉजिंग, बोर्डींगसारखे हॉटेल नाही प्रवाशांनी स्नेहार्द्र वातावरणाचा लाभ घ्यावा. आश्रमात सायंकाळी प्रार्थनेला यावे."

दुमजली अतिथीगृह साधे, स्वच्छ आहे खोलीत चार कॉटस् होत्या तसेच स्वतंत्र प्रसाधनगृह होते खोलीसमोर प्रशस्त व्हराडा आहे हातपाय धुतले. तोपर्यंत चहा आला त्यानंतर दोन तास विश्रांती घेतली संध्याकाळचे साडेसहा वाजून गेले अतिथीगृहातील पर्यटक गांधी आश्रमात जमू लागले

पन्नास वर्षापूर्वी आजच्या गांधी आश्रमाची वास्तू म्हणजे नॉर्मन ट्रूप नावाच्या इंग्रजाच्या मालकीची कोठी होती बाजूला डोंगर उतरणीवर असलेल्या चहाच्या बगिच्याचा हा मालक नि संतान मरण पावला त्याची सर्व मालमत्ता इंग्रज सरकारकडे जमा झाली या वास्तूचे प्रथम डाक बंगल्यात रूपांतर झाले इ स १९२९ साली म गांधी भारत भ्रमणावर असताना उत्तर प्रदेशच्या कार्यकर्त्यांनी त्यांना कौसानीला विश्रांतीसाठी येण्याची विनंती केली त्यांच्या आग्रहाप्रमाणे महात्माजी कौसानीला आले. परंतु इंग्रजांनी त्यांना डाक बंगल्याच्या उंचावर असलेल्या स्टेट बंगल्यात उतरू दिले नाही गांधीजी डाक बंगल्यात बारा दिवस वास्तव्याला होते. बरोबर कस्तुरबा होत्या शिवाय पधरा कार्यकर्ते होते असे हे गांधीजींच्या वास्तव्याने पुनित झालेले कुटीर इ स. १९६४ साली उत्तर प्रदेशाच्या मुख्यमंत्री सुचेता कृपलानी यांनी गांधी मेमोरियल ट्रस्टमार्फत या गांधी आश्रमाला ऐतिहासिक स्मारक म्हणून घोषित केले बडोदा येथील लक्षाधीश व्यापारी श्री जिवाभाई पटेल सेवाभावान आश्रमाच्या विस्ताराचा महत्त्वपूर्ण कार्यभाग सांभाळतात

संध्याकाळचे सात वाजले गांधी आश्रमात वास्तव्यास आलेले देशाच्या कानाकोपऱ्यातील पर्यटक भक्तिभावाने प्रार्थनेला जमले एकाने प्रथम गांधीजींचे आवडते भजन म्हटले गुजराती संतकवी नरसी मेहताच्या

**वैष्णव जन तो तेने कहिये**<br>**जो पीड पराई जाने रे ।**<br>**पर दु.खे उपकार करे तो**<br>**ये मन अभिमान न आने रे ।।**

या प्रसिद्ध पंक्तीमुळे वातावरण भारल्यासारखे झाले हिंदी भाषिक प्रवाशाने संत कबीराचा दोहा म्हटला, तर दुसऱ्याने सूरदासांचे भजन आळवले पंजाबी प्रवाशाने गुरूनानकजींचे भजन म्हटले, तर बंगाली प्रवाशाने रवींद्र गीत गाईले. एका महिलेने मीराबाईची

**मेरे तो गिरीधर गोपाल,**<br>**दुसरो न कोई ।**<br>**जाके सिर मुकुट मेरो पति सोई ।।**

ही भक्तिरचना सुरेल आवाजात आळवली भारावलेल्या मनाने मी संत ज्ञानेश्वराचे पसायदान म्हटले, प्रार्थनेत रामकृष्ण मिशनचा कार्यकर्ता असलेला एक इंग्रज नागरिकही सामील झाला होता

प्रार्थनेनंतर सर्वांनी महात्माजींना मूक श्रद्धांजली वाहिली गांधीआश्रमाशी निगडीत महत्त्वपूर्ण हकीकत म्हणजे त्यांनी येथे 'अनासक्ति योग' ही भगवद्-

गीतेवर टीकाटिप्पणी करणारे पुस्तक हातावेगळे केले म गांधींच्या जीवनावर भगवद्गीतेचा विशेष प्रभाव होता त्याना ज्ञान व भक्तीची प्रेरणा गीतेतून मिळाली होती गीतेतील निष्काम कर्मयोगाचा महिमा– अनासक्तीचा सिद्धान्त 'अनासक्ती योग' या पुस्तकरूपाने प्रकाशित झाला गाधीजींनी आषाढ कृष्ण द्वितीया २४ जून १९२९, कौसानी (हिमालय) असे नमूद करून प्रस्तावना पूर्ण केली आहे गांधी आश्रमात त्यांच्या जीवनातील महत्त्वाच्या प्रसगांची छायाचित्रे आहेत सूत कातताना वृक्षाखाली बसलेले गाधीजी जसे दिसतात तसेच कुष्ठरोग झालेल्या रुग्णाईताची सेवा करतानाही ते दिसतात त्यान्ची इग्रज शिष्या कॅथरीन हिलमन हिला गाधीजींनी पाठवलेले पत्र फ्रेम करून लावलेले आहे कॅथेरीनला आपली कन्या मानून गाधीजीनी तिचे नाव सरलाबेन असे ठेवले होते सरलाबेनने परत जावे म्हणून ब्रिटिशानी तिचा खूप छळ केला पण छळवाद चुकविण्यासाठी सरलाबेन शेतात, घरात लपून राहिली. स्वदेशी गेली नाही म गांधींच्या उपदेशाप्रमाणे महिलासाठी तिने लक्ष्मी आश्रम काढला गतवर्षीच ती मरण पावली तिच्या इच्छेनुसार हिंदूपद्धतीने तिच दहन करण्यात आले

म गाधीच्या जीवनातील अनेक प्रसगांची स्मृती जागृत करणारी आणि विविधतेतून एकात्मतेचा हृदयगम सगम साधणारी आश्रमातील सध्याकाळ अविस्मरणीयच

दुसऱ्या दिवशी सकाळचे साडेपाच वाजले कौसानीचा सूर्योदय पाहण्यासाठी सर्व पर्यटक सज्ज झाले होते आश्रमासमोर लागूनच एक लाबलचक कट्टा आहे आश्रमातील, तसेच टूरिस्ट बसने सूर्योदय पाहण्यासाठी खास आलेल्या पर्यटकांची आश्रमासमोर सहाच्या सुमाराला एकच गर्दी झाली. दूरवर पूर्व दिशेकडे सर्वांची नजर लागली होती सूर्यदेवाची प्रभा हळूहळू समोर दूरवर हिमशिखराआड पसरू लागली पण ढगाचा पाठशिवणीचा खेळ चालू होता आणि काय आश्चर्य ! सूर्य-देवाच्या सोनेरी किरणात हिमालयाची धवलशुभ्र शिखरे एकामागून एक चमकू लागली. समोरची सुमारे तीनशे कि मी लाबीची रजतमुकुट धारण केलेली चौखम्बा, त्रिशूल, नदादेवी, नंदकोट अशी विशाल शिखरावली निळ्या नभात स्वच्छ, तेज पुंज चमकत होती नगाधिराज हिमालयाची अशी विराट शुभ्र शिखराची दृश्यावली पहावी तर कौसानीला ! काश्मीर, हिमाचल, नेपाळ, आसाम-पर्यंत हिमाच्छादित शिखरांच्या लाबच्या लांब रांगा कौसानीखेरीज दिसत नाहीत म गाधींनी तर कौसानीला भारताचे 'स्वित्झर्लंड' संबोधले होते

विख्यात हिंदी कवी श्री सुमित्रानदन पंत याचा जन्म कौसानीचाच. त्याचे बालपण येथेच गेले कविता करण्याची प्रेरणा त्यांना येथेच मिळाली त्यानी म्हटले आहे– "कविता करनेकी प्रेरणा मुझे सबसे पहिले प्रकृतीके निरीक्षणसे मिली है ।

जिसका श्रेय मेरी जन्मभूमी कूर्माचल प्रदेश को है। कूर्माचलकी छायाकृत पर्वतश्रेणियाँ जो अपने शिखरोपर रजतमुकुट हिमाचलका धारण की हुई है और अपनी उँचाईसे आकाशकी नीलीमाको और भी उपर उठाई हुई है। यह पर्वत प्रातके वातावरणकाही प्रभाव है की मेरे भीतर विश्व और जीवन के प्रती एक गभीर आश्चर्यकी भावना पर्वतकी तरहसे निश्चल रूपसे अवस्थित है।"

**प्रिय हिमाद्रि, तुमको—हिमकणसे घेरे मेरे जीवनके क्षण** । या त्याच्या काव्य पंक्ती प्रसिद्ध आहेत

असे हे हिमालयाच्या कुशीतील छोटेसे कौसानी गर्दीपासून दूर दूर येथील शात निसर्गरम्य वातावरणात पर्यटक स्वतःला हरवून बसतो तसेच तेथील नीरव शाततेत हिमालयाशी गूढगूजन करतो.

भक्तिपूर्ण वातावरणात ओथबून निघालेली कौसानीची सायकाळ अविस्मरणीय होती आणि प्रातःकाळ सोनेरी किरणात न्हाऊन निघालेल्या हिमालयाच्या धवल गिरीशृखलाचे अपूर्व दृश्य दिसलेली तितकीच अविस्मरणीय ।

*

## अलमोडा

कौसानीच अनुपम सौंदर्य पाहिल्यानंतर गांधी आश्रमातील खोलीवर परतलो स्नानाला गरम पाणी मिळाले आठ वाजता आश्रमातील स्वतंत्र स्वच्छ भोजनालयात नाष्टा करण्यासाठी आलो गरम गरम आलू परोटे, दही मिळाल्याने समाधान झाले आश्रमाच्या भोजनालयातील सेवक वर्गाची सौजन्यशील वागणूक उल्लेखनीय आहे गांधी आश्रमाच्या वरील टेकडीवर हेलिकॉप्टर उतरण्यासाठी हेलिपॅड आहे उल्का, यशवंत, सौ. काका सकाळी तेथे फिरून आले गांधी आश्रमातील एक दिवस कसा गेला कळले नाही कौसानीचा निरोप घेताना जड गेले

कौसानीहून अलमोडाला जाण्यासाठी अकराला बस मिळाली कौसानी अलमोडा ५२ कि मी अंतराच्या प्रवासात भेटतात हिरवेगार पहाड, नदीचा दगड गोट्यातून वाहणारा झुळझुळ प्रवाह । वाटेत सोमेश्वर हे एक मोठे गाव लागले सोमेश्वरसंबंधी पौराणिक आख्यायिका अशी आहे चंद्र हा नवग्रहांपैकी असून चंद्राचे दुसरे नाव आहे सोम सोमाचा विवाह दक्ष प्रजापतीच्या २७ कन्याशी झाला होता सोम हा शंकरभक्तीत एवढा मग्न होता की त्याचे आपल्या पत्नीकडे दुर्लक्ष झाले त्याच्या एका पत्नीने सोमाला शाप दिला की तुझा क्षय होईल त्यानंतर शिवाची आराधना केल्याने त्याला शिवाने वर दिला की—

पंधरा दिवस तुझा क्षय होईल व पंधरा दिवस तू वृद्धिंगत होशील पौर्णिमेला तुला पूर्ण रूप प्राप्त होऊन तुझे स्त्रियाबरोबर प्रेम उत्कर्षाला पोहोचेल' सोमाने शकराची जेथे तपस्या केली ते हे सोमेश्वरस्थान सोमेश्वराला पाडवानी बाधलेले प्राचीन मदिर अस्तित्वात आहे सोमेश्वरनतर कोसी नावाच्या गावी बस थाबली कोसी नदीवरील पूल पार करून दुपारी तीनच्या सुमाराला अलमोडाला पोहोचलो

अलमोडा हे कुमाऊ प्रदेशातील स्थान कोसी व शाल्मली नद्याच्या खोऱ्यात काश्य टेकडीवर वसले आहे त्याच्या पश्चिम भागात भगवान विष्णु वास्तव्य करतात असा समज आहे यासबधी सस्कृत श्लोक असा आहे

**कोशिको शाल्मलीमध्ये पुण्य काशीय पर्वत ।**

**तस्य पश्चिम भागे वै क्षेत्र विष्णो प्रतिष्ठतम् ।।**

स्कध पुराणातील मानस खडात वर्णन केल्याप्रमाणे चद्र वशीय राजा बाली कल्याण चद्रने आपल्या साम्राज्याची राजधानी अलमोडा येथे स्थापन केली पूर्वीची राजधानी चपावत येथे होती अलमोडाचे मध्यवर्ती स्थान ध्यानात घेऊन येथे ती स्थलातरित केली राजा रुद्र चद्रने अलमोडाचा किल्ला बाधला अलमोडाचे पूर्वीचे नाव होते आलमनगर, गुरख्याच्या शासन कालात इ स १७८० ते १८१५ अलमोडा कुमाऊ प्रदेशाची राजधानी होती नतर इग्रजाच्या ताब्यात हा प्रदेश आला अलमोडा हे जिल्ह्याचे ठिकाण असून कुमाऊं प्रदेशाचे सास्कृतिक केंद्र मानले जाते. घोड्याच्या नालाच्या आकाराच्या पाच कि मी लाबीच्या टेकडी-वर अलमोडा वसलेले आहे

अलमोडाला पोहोचल्यावर बसस्टँडसमोरच असलेल्या पर्यटन कचेरीत मुक्कामाच्या सोयीबाबत चौकशी केली तेथून दीड कि मी अतरावरील पर्यटन विभागाच्या अतिथीगृहात फोन करून चार बेडची रुम रिझर्व्ह केली स्टँडजवळील एका पजाबी हॉटेलात दुपारचे जेवण घेतले आलूमटार, रोटी, दही, भात असा बेत होता हमालाजवळ सामान देऊन फिरत फिरत पर्यटन विभागाने नव्याने बाधलेल्या तीन मजली अतिथीगृहातील चार बेडच्या फॅमिली रुममध्ये गेलो रुम प्रशस्त होती बेड नवे होते ब्लँकेटस्ची सोय होती स्नानगृहातील गीझर प्रथम सुरू केला हातपाय धुऊन चहा घेतला तासभर विश्राती घेऊन बाजारच्या रस्त्याने फिरायला निघालो

प्रथम बाजारच्या रस्त्याजवळील शिव मंदिर पाहण्यासाठी पायऱ्या उतरून खाली आलो या प्राचीन दगडी मदिराच्या शिखरावर गोलाकार गॅलरी आहे अनेक मदिरे असलेले गाव म्हणून अलमोडाची ख्याती आहे त्यानतर बसस्थानका जवळील सग्रहालय पाहण्यासाठी आलो. सग्रहालयात प्राचीन नाणी, मूर्ती याचा

संग्रह आहे या संग्रहालयाचे मुख्य वैशिष्टच असे की तेथे सुप्रसिद्ध हिंदी कवी कै सुमित्रानंदन पंत यांच्याविषयक स्वतंत्र दालन आहे

सुमित्रानंदन पंत याचा जन्म २० मे १९०० साली झाला त्याचे बालपण कुमाऊ प्रदेशातील कौसानी अल्मोडा येथे व्यतीत झाले त्यानी महाविद्यालयीन शिक्षण अलाहाबाद येथे पूर्ण केले जातिवंत प्रतिभाशाली असलेले सुमित्रानंदन पंत हिंदीतील छायावादी प्रवाहाचे प्रमुख मानले जातात हिंदीप्रमाणे संस्कृत, बंगाली, इंग्रजी भाषांचे सखोल ज्ञान त्यानी प्राप्त केले होते १९५० ते १९५७ आकाशवाणीवर हिंदी विभाग प्रमुख म्हणून व नंतर सल्लागार म्हणून काम पाहिले. त्याना आयुष्यात विविध पुरस्कार व बहुमान प्राप्त झाले १९६२ साली सोव्हिएट लँड नेहरू पुरस्कार त्याना मिळाला १९६५ साली विक्रम विद्यापीठ उज्जयनी यांनी डी लिट् ही सन्माननीय पदवी प्रदान केली १९६९ साली गोरखपूर विद्यापीठानेही त्याना सन्मानित केले हिंदी साहित्य संमेलनाने त्याचा 'साहित्य वाचस्पती' म्हणून गौरव केला 'लोकायतन' या महाकाव्याला भारत सरकारचे पंधरा हजाराचे पारितोषिक मिळाले भारतीय ज्ञानपीठाचा सर्वोच्च पुरस्कार १९६८ साली मिळाला प्रसिद्ध नृत्यविशारद उदय शंकर याच्याबरोबर त्यानी भारतभर प्रवास केला योगी अरविंदाशी संबध येऊन त्याच्या तत्त्वज्ञानाने ते भारावून गेले त्याचे वीणा, पल्लव, गुंजन, युववाणी, स्वर्णकिरण, स्वर्णधूली, युगपथ, उत्तरा, वाणी, चिदम्बरा हे काव्यसंग्रह प्रसिद्ध आहेत सुमित्रानंदन पंत अविवाहित होते २८ डिसेंबर १९७७ साली ते अलाहाबादला हृदय विकाराने मरण पावले त्यांची प्रकाशित पुस्तके संग्रहालयातील दालनात पहायला मिळाली त्याचे हस्ताक्षर, कवितांच्या वह्या या दालनात आहेत त्याना मिळालेली विविध मानपत्रे, भेटवस्तू, छायाचित्रे या दालनात पहायला मिळतात माजी राष्ट्रपती डॉ झाकीरहुसेन यांनी त्याचा सन्मान केला, त्यावेळची तसेच प नेहरू याच्या बरोबरची छायाचित्रे पहायला मिळाली कुमाऊ प्रदेशातील एका महान निसर्गप्रेमी, संवेदनाशील साहित्यिकाचा परिचय झाला

संग्रहालय पाहून अलमोडाच्या मालरोडवर चक्कर मारली बाजारचा रस्ता अरूंद असून दगडी फरसबंदी केली आहे नक्षीदार भांडी, फॅशनेबल वस्तूंची त्याचप्रमाणे पुस्तकाची दुकाने दिसली कुमाऊ प्रदेशाचे सांस्कृतिक वाङ्‌मय तेथे होते काही पुस्तकांची खरेदी केली नंतर फिरत फिरत दोन कि मी अंतरावरील 'ब्राईट एन्डकॉर्नर' या ठिकाणी पोहोचलो हिमालय पर्वतराजीच्या आड होणाऱ्या सूर्यास्ताचे, हिमशिखरांचे, नागमोडी कोसी नदीचे तेथून अपूर्व दर्शन झाले त्या नंतर फिरत मुक्कामी परतलो

अलमोडाच्या वास्तव्याचा दुसरा दिवस उजाडला अलमोडाजवळ कालीमठ

हे पाच किलोमीटर अंतरावर दर्शनीय स्थान आहे चार कि मी. अतरावर सिमतोला हे दर्शनीय स्थान आहे आठ कि मी अतरावर कासार देवीचे मदिर असून तेथील एका खडकावर प्राचीन शिलालेख आहे तसेच सतरा कि मी अतरावर कातरमल येथे आठशे वर्षांपूर्वीचे सूर्यमदिर आहे नैनितालला पोहोचण्याची घाई असल्याने अलमोडाचा मुक्काम नाईलाजाने लवकर संपवावा लागला ब्रिटीशांच्या काळात प जवाहरलाल नेहरू याना येथील जेलमध्ये कैदेत ठेवले होते स्वामी विवेकानदानीही येथे वास्तव्य केले होते रविंद्रनाथ टागोर यानी येथे कांही दिवस राहून साहित्य रचना केल्या होत्या सुप्रसिद्ध नृत्यविशारद उदयशकर यांनी येथे नृत्य, नाट्य, सगीत याचे केंद्र स्थापन केले होते त्यानी ' कल्पना ' हा बॅलेटचा सुदर कार्यक्रम येथे बसवला होता अस हे राजकारणी, धर्मपडित, कवी-साहित्यिक, कलावत यानी वास्तव्य केलेल हिमालयाच्या कुशीतील अलमोडा गाव ! नव्या जुन्याचं मिश्रण असलेल ! ब्रिटीशांच्या काळांत लष्करी ठाणे असल्याने जुन्या पद्धतीने बंगले व आधुनिक पद्धतीचीही घरे असलेले टुमदार गाव !

सकाळी अकराच्या सुमाराला जेवण आटोपून अलमोडा बस स्थानकावर आलो अलमोडा–नैनिताल ६७ कि मी. अतराच्या प्रवासासाठी डायरेक्ट गाडी गर्दीमुळे मिळाली नाही स्टॅंडवर एका प्रवाशाने सुचविले अलमोडा–भवाली गाडीने जा भवालीहून नैनितालला जाण्यासाठी पुढे गाडी मिळेल त्या गाडीने जाणे भाग होते अलमोडा भवाली प्रवास दुपारी बाराच्या सुमाराला कोसी नदीच्या कडेकडेने सुरू झाला गाडीत गर्दी खूप होती वाटेत दुपारी चारच्या सुमाराला खेरणा हे मोठे गाव लागले कुमाऊ प्रदेशातील पहिल्या दिवशी राणीखेतकडे जाताना खेरणा गाव लागले होते तेथे चहा व फराळ झाला गार वारे वाहत होते बस आता भवालीच्या दिशेने निघाली वाटेत कैंची गावाजवळील मदिरे बसमधून पाहिली भवालीला सहाच्या सुमाराला पोहोचलो तेथून नैनितालला जाणारी बस योगायोगाने उभी होती त्या बसमध्ये सामान चढविले बसमध्ये नैनितालच्या सफरीवर जाणाऱ्या कॉलेज विद्यार्थ्यांची गर्दी होती त्याची गाणी ऐकत पाऊण तासात नैनितालला पोहोचलो अंधार झाला होता

❋

## नैनिताल

नैनितालला बस पोहोचल्यावर हमालांनी एकच गिल्ला केला. बसमधून सामान उतरवून घेतले नेहमीप्रमाणे सामानाजवळ आम्ही थांबलो. यशवत व उदय लॉज पहायला निघाले निरनिराळचा हॉटेल्सचे एजट आपापली कार्डे पुढे करून त्यांचा पिच्छा पुरवीत होते. त्याच्यावर ओरडूनही उपयोग होत नव्हता. त्यांच्यातून कशीबशी वाट काढीत जाताना ते दोघे दिसले अर्ध्यातासाने ते परत आले तोपर्यंत ते एजट आम्हालाही हैराण करीत होते मात्र यशवतांनी हमालाला हॉटेल मानसरोवरमध्ये सामान घेऊन चल असे मोठ्याने म्हणताच सर्वजण मुकाट्याने दुसरे गिऱ्हाईक गाठायला निघून गेले लॉज दहा मिनीटाच्या अंतरावरच होते शिवाय जास्त चढावर नव्हते स्टँडजवळच्या सरोवराकाठच्या मालरोडच्या बाजूला अनेक चागली हॉटेल्स आहेत विशेष म्हणजे समोरच्या सरोवराचे सुदर दृश्य तेथून दिसते सरोवराच्या दृश्यासाठी अलका, एल्फिन्स्टन, अजठा, इन्दिया, नटराज ही प्रसिद्ध हॉटेल्स आहेत स्टँडच्या दुसऱ्या बाजूलाही अनेक हॉटेल्स आहेत तुलनेने दर कमी आहेत पण तेथून सरोवराचे दृश्य दिसत नाही

हॉटेल मानसरोवरमध्ये मागे सलग्न स्वच्छताघर, मध्ये तीन बेडची खोली व पुढच्या रूममध्ये एक बेड व सोफा होता. पुढे सरोवराचे सौंदर्य न्याहाळायला

व्हराडा । हॉटेलला जोडून स्वतत्र भोजनालय आहे मात्र ऑर्डर आधी द्यायला हवी उशीर झाल्याने रात्री स्टँडच्या बाजूच्या रस्त्याच्या हॉटेलमध्येच जेवण घेतले सिमलामिरची, दही रोटी असा बेत होता रात्री साडेनऊला हॉटेलमध्ये परतलो व्हरांड्यातून सरोवराकडे पाहिले तर असख्य दिव्याचे प्रतिबिब त्यात चमकत होते

दुसरा दिवस उजाडला सकाळी सहाचा सुमार यशवत सगळ्याना उठवीत होते ' चला उठा पहा सरोवरात पहाडाच किती सुदर प्रतिबिब पडल आहे '' सर्वजण ताड्कन उठून व्हराड्यात धावले खरच, जलाशयाचं पाणी अगदी स्थिर होत त्यात हिरण्यागार पहाडाचे इतके स्वच्छ प्रतिबिब पडले होते की पहाडा-खाली पहाड आहेत असे वाटत होते पहाडावरच्या चढाच्या रस्त्याने जाणाऱ्या जीप जलाशयात उलट्या खोलवर जाताना दिसत होत्या तेव्हढ्यात आकाशात ढग जमू लागले दाट धुक पसरल पाहता पाहता ते समोरचे पहाड, तो जलाशय धुक्यात गुरफटला गेला जणू आता तिथे काहीच नव्हत निसर्गाची किमया काही औरच नाईलाजाने व्हराड्यातून खोलीत परतलो आवरायला सुरुवात केली स्नान, चहा, नाष्टा आटोपून नऊच्या सुमाराला बाहेर निघालो

कुमाऊ विद्यार्थी संघटनेने त्यांच्या मागण्यासाठी दिलेल्या आदेशानुसार नैनिताल बद होते ठिकठिकाणहून आलेले पर्यटक पायीच फिरायला निघाले होते सकाळची वेळ त्यात हवा अति आल्हाददायक, उत्साहवर्धक नैनिताल सरोवराच्या काठावर उन्हात थोडा वेळ थांबलो धुके विरून गेले होते स्वच्छ उन पडले होते नैनितालचे हे सरोवर फार प्राचीन आहे स्कदपुराणातील मानस-खंडात या सरोवराचा उल्लेख 'त्रीऋषी सरोवर' असा केला आहे अत्री, पुलस्त्य व पुलह या तीन ऋषीनी यात्रेच्या वेळी नैना शिखरावर ध्यानधारणा केली पण तेथे प्यायला पाणीच नव्हते त्याना कैलास पर्वतावरील मानससरोवराची आठवण झाली त्यानी तळे खणायला सुरुवात केली तेव्हा मानससरोवरातून येथे पाण्याचा झरा पोहोचला. म्हणून हे पाणी मानससरोवराचे आहे असे आजही मानले जाते व पुण्यप्रद समजले जाते या सरोवरासबधी पौराणिक कथा अशी आहे– राजा दक्ष प्रजापती याची पार्वती ही कन्या व शिवशकराची धर्मपत्नी दक्षप्रजापतीने महायज्ञ केला तेव्हा शिवपार्वतीला आमत्रण दिले नाही तरी पार्वतीच्या आग्रहा-स्तव शिवपार्वती दोघेही यज्ञाला उपस्थित राहिले दक्षप्रजापतीने त्याचा जाणून-बुजून अपमान केला सतापाने पार्वतीने यज्ञात उडी टाकली शिवाने तिचे मृत शरीर खाद्यावर घेऊन दु खाने सर्व भारतभर सचार करण्यास प्रारभ केला सर्वत्र हाहाकार उडाला तेव्हा सृष्टीच्या मदतीसाठी भगवान विष्णु धावून आले त्यांनी बाणाचा सतीच्या शवावर वर्षाव केला ज्या ज्या ठिकाणी सतीचे अवयव

गळून पडले तेथे शक्तीपीठे, मंदिरे निर्माण झाली अशी बावन्न शक्तीपीठे आहेत. पार्वतीचे नयन या सरोवरात गळून पडले नैना म्हणजे नयन आणि ताल म्हणजे सरोवर यावरून नैनिताल नाव पडले

भारतातील बहुतेक थंड हवेची ठिकाणे इंग्रजानीच शोधली, वसवली, विकसित केली नैनितालची हकीकतही अशीच आहे १८३९ सालची गोष्ट पी बॅरन हा साखर व्यवसायातील इंग्रज व्यापारी व त्याचा इंग्रज मित्र शिकारीच्या निमित्ताने हल्द्वानीहून निघाले अलमोडा रस्त्यावरील खेरणा गावी त्याचा मुक्काम होता परतताना ते वाट चुकले घनदाट जंगलाने वेढलेल्या नैनितालच्या डोंगराळ परिसरात ते आले नैनिताल सरोवर त्याच्या दृष्टीला पडले व बॅरन तर कमालीचे मोहित झाले बॅरनने हिमालयाच्या परिसरात बद्रीनाथ केदारनाथपर्यंत पधराशे मैल प्रवास केला होता पण हिमालयाच्या या परिसरात नैनितालसारखा सुरेख प्रदेश कुठलाही नाही असे त्याने नमूद केले आहे नूरसिंह नावाचा पहाडी जमीनदार नैनिताल सरोवर त्याचप्रमाणे आजूबाजूच्या पहाडांवर हक्क सांगत होता बॅरनने त्याच्यापुढे नैनिताल खरेदीचा प्रस्ताव मांडला पण त्याने साफ नकार दिला बॅरनने मग धूर्तपणाने जाळे टाकले बॅरनने त्याला सरोवरात नौका-विहाराचे आमंत्रण दिले जलविहार करताना त्याच्यापुढे त्याने नैनिताल इंग्रजांना विकण्याचे अनुमती पत्र ठेवले त्याने सही केली नाही तर त्याच्या प्राणाला धोका होईल अशी धमकी दिली आपण तळ्याचा हक्क सोडायला लावणाऱ्या या पत्रावर सही केली नाही तर आपल्याला जलसमाधी मिळाल्याशिवाय राहणार नाही हे त्याला समजून चुकले त्याने नाईलाजाने कागदपत्रावर सही केली तळ्याच्या काठावर परतल्यावर पहाडी लोकाना बोलावून त्याना कागद वाचून दाखविण्यास बॅरन विसरला नाही नतर बॅरनने नैनिताल तळ्याच्या बाजूच्या हिरव्यागार परिसरात पहिल घर बाधल आजही ते 'पिलग्रिम कॉटेज' नैनितालला क्लबजवळ दिमाखाने उभे आहे पिलग्रिम कॉटेजनतर बाजूच्या टेकडीवर बारा बंगले बांधण्यात आले १८४० नतर हळूहळू वस्ती वाढली. उत्तर प्रदेशची नैनिताल ही उन्हाळी राजधानी बनली गव्हर्नर येथे उन्हाळ्यात येऊन राहू लागले हळू हळू हॉटेल्सची उभारणी झाली व्हिक्टोरिया राणीच्या नावाने हॉटेल व्हिक्टोरिया बांधण्यात आले

नैनितालचे रम्य सरोवर ४५०० फूट लांब, २५०० फूट रुंद असून ९५ फूट खोल आहे स्टँडजवळच्या तळ्याच्या खालील भागाला तल्लीताल तर वरील भागाला म्हणतात मल्लीताल तळ्याच्या काठावर उभे राहून फोटो काढण्याची पर्यटकाची एकच गर्दी उडाली होती एव्हढ्यात पाढऱ्याशुभ्र बदकाचा एक थवा

पोहत पोहत काठाजवळ आला. आणि मग ही संधी साधून यशवंतनी आमचा फोटो टिपला

त्यानंतर निघालो हनुमानगढीकडे डोंगराच्या कडेकडेच्या रस्त्याने तीन कि मी अंतर पार करताना थकवा असा वाटलाच नाही संप असल्याने रस्त्यात गाड्या अडवणारे विद्यार्थी दिसत होते ठिकठिकाणी त्यांनी पाइप व झाडे आडवी टाकली होती एखादा गाडीवाला ते दूर करण्याचा प्रयत्न करू लागला तर आरडा-ओरड करून त्याच्या अंगावर ते धावून जात होते काही थांबलेल्या गाड्यात बायका मुले अगदी त्रस्त होऊन बसलेली दिसत होती संपाची कल्पना नसलेल्या पर्यटकांचे चांगलेच हाल होत होते चढाच्या रस्त्याने हनुमान गढीवर पोहोचलो, येथील हनुमान मंदिर नीमकरौली महाराजांनी १९५३ मध्ये उभारले मंदिरात संकटमोचन हनुमानाची सहा फूट उंचीची मूर्ती आहे मूर्तीवर चांदीचे दागिने असून हनुमानाच्या उघडून दाखवलेल्या छातीत रामसीतेच्या प्रतिमा आहेत मूर्ती-शेजारी महाराजांचे छायाचित्र असून बाजूने संगमरवरात लंकादहन, रामनाम महिमा अशी चित्रे आहेत मंदिराच्या आवारात बसण्यासाठी बाके असून तऱ्हेतऱ्हेच्या फुलामुळे मन प्रसन्न होते हनुमानजीच्या दर्शनाला पर्यटकांनी गर्दी केली होती या टेकडीवरून सूर्यास्ताचे दृश्य पहाण्यासारखे असते अशी माहिती मिळाली शेजारच्या टेकडीवर वेधशाळेनजीकच्या एका घरात १९२९ साली म गांधी वास्तव्याला होते आज तेथे आश्रम आहे

मंदिराच्या बाजूच्या दुसऱ्या टेकडीवर एक कि मी अंतरावर नैनितालची वेधशाळा आहे ही वेधशाळा 'मनोरा पीक' नावाच्या १९५० मीटर उंचीच्या या पहाडावर १९६१ साली उभारण्यात आली आधुनिक यंत्रसामग्रीने ती सुसज्ज आहे आकाशातील तारागणे पाहण्यासाठी अनेक दुर्बिणी येथे असून सर्वात मोठी एक मीटर व्यासाची आहे सूर्याच्या अभ्यासासाठी स्वतंत्र व्यवस्था आहे एक मीटर व्यासाचा सोलर टेलिस्कोप आहे उपग्रहांच्या रेखाटणीसाठी एक विशेष प्रकारची बेकर–नन दुर्बिण अमेरिकेच्या मदतीने उभारली आहे वेधशाळे-मार्फत विविध तारागणे, धूमकेतू, खगोल शास्त्रीय संशोधन तसेच सूर्याच्या बाह्य-मंडळावर होणाऱ्या क्रियाबाबत, कृत्रिम भू-उपग्रहांचे दृष्ट अनुरेखन असे कार्य करते पृथ्वीची रचना, वायुमंडळाबाबत ज्ञानही प्राप्त होते आंतरराष्ट्रीय मान्यता प्राप्त झालेल्या या वेधशाळेत विविध तऱ्हेचे संशोधन चालू असते येथील लायब्ररीत पाच हजार जर्नल्स व पाच हजार पुस्तके आहेत डायरेक्टर, पंचवीस शास्त्रज्ञ मिळूण एकूण एकशेपंचेचाळीस सेवक वर्ग आहे चार मीटर व्यासाच्या सोलर टेलीस्कोपची उभारणी ही भावी योजना असून त्यासाठी दहा कोटी रुप-याचे प्रोजेक्ट तयार करण्यात आले आहे वेधशाळेचे आवार सुंदर हिरवळ

आणि विविधरंगी तऱ्हेतऱ्हेची फुले यामुळे फार रमणीय दिसते तेथून लांबवरचे दृश्य दिसते परत ढगाची धावपळ सुरू झाली सर्वत्र ढग पसरुन समोरील दृश्य दिसेनासे व्हायचे तर क्षणात ते ढग जाऊन उन्हात चमकणारे सृष्टीसौन्दर्य दिसायचे खरोखर, कोणी अज्ञात हात धुक्याचा पडदा वरखाली करीत होते

वेधशाळेतील एकजण म्हणाले की तुम्ही सर्वजण लवकर परता कारण तुफान पाऊस येण्याची शक्यता आहे पण वेधशाळेचा अंदाज म्हणून आम्ही रमतगमत निघालो दुपारचे बारा वाजले होते मोठया रस्त्यावर आलो तेव्हा एकाएकी समोरून प्रचंड ढग भरून आले सर्व आसमंत त्यांनी वेढून टाकले धो धो पाऊस कोसळू लागला लिंबाएवढया गारा झोडपून काढू लागल्या सर्वत्र अंधारुन आले होते रस्त्याच्या कडेला एका झाडाखाली कसेबसे उभे राहिलो पण आता जोडीला सोसाटयाचा वारा आला त्यामुळे ते झाडही अंगात आल्या-सारखे थैमान घालू लागले विजाचा चमचमाट डोळे दिपवीत होता तर ढगाचा गडगडाट कानठळ्या बसवीत होता संपूर्ण निसर्गानेच रौद्र रूप धारण केले होते रस्त्यात चिटपाखरूही नव्हते तेवढयात पहाडावरून पांच-सहा प्रचंड दगड गडगडत शेजारीच येऊन पडले दरड कोसळून इथे कपाळमोक्षच होतो की काय असेही वाटू लागले मनातल्या मनात संकटमोचन हनुमानाची प्रार्थना केली. तासभर कोसळल्यावर पावसाचा भर थोडा कमी झाला एकूण वेधशाळेचा अंदाज खरा ठरला होता तर! पाण्याचे लोटच्या लोट वाहत होते सर्वजण भिजून चिंब झालो होतो थंडगार वाऱ्याने दातावर दात वाजत होते तसेच पावसात निघालो एका घराच्या सान्निध्याला आलो अर्धा तास थांबून पाऊस कमी झाल्यावर झपाझप निघालो घरे, हॉटेल्स बंद होती फक्त तुरळक विद्यार्थी दिसत होते त्यांच्या बदला पावसानेही जणू हातभार लावला होता हॉटेलमध्ये आलो तेव्हा दोन वाजले होते सर्दी होऊन अंगात ताप भरतो की काय अशी भीती वाटत होती ती काकाचीहि काळजी वाटत होती पण ते मात्र स्वतःची कसलीच काळजी न करता आम्हीच लवकर कोरडे कपडे घालावेत याबद्दल प्रेमळ सूचना करीत होते भूक सपाटून लागली होती हॉटेलच्या भोजनालयात जेवणा-साठी गेलो पण उशीर झाल्याने आमच्या नावचे जेवण त्यांनी दुसऱ्या प्रवाशांना दिले होते विनती केल्यावर त्यांनी आमलेट करून दिले पोळी-आमलेट व लोणचे असे जेवण आटोपले भात तर नव्हताच खोलीवर येऊन प्रत्येकाने स्वतःला गरम ब्लँकेटमध्ये झोकून दिले ' बरसातकी एक दोपहर ' विसरणे अशक्यच

संध्याकाळी सहापर्यंत गाढ झोपलो होतो ती काकाच्या हाकेने जाग आली " अरे उठा, पहा समोरच्या तळयात नौकाविहार सुरू झाला आहे " व्हरांडयात येऊन पाहिले तर मावळतीच्या स्वच्छ सूर्यप्रकाशात तळे अधिकच सुरम्य दिसत

होते. ढगांचा मागमूसही नव्हता निसर्गाच्या या क्षणाक्षणाने बदलणाऱ्या रूपानी चक्रावून गेलो. "क्षणेक्षणे यन्नवताम् उपैति तदेव रूपं रमणीयतायाः !" याचा प्रत्यय आला होता सप सपला होता तळयात नौकाविहार सुरू झाला होता वाहतूक सुरू झाली होती रगीबेरगी कपडे घातलेल्या पर्यटकांनी जलाशयाचा परिसर गजबजून गेला होता घोड्यावर बसून रपेट मारणारे गुलहौशी पर्यटकही दिसत होते अशी सुदर, प्रसन्न सायकाळ खोलीत बसून वाया कोण घालवणार ? आवरून स्टँडजवळच्या तल्लीताल या जलाशयाच्या खालच्या भागाजवळ आलो. तेथे म गाधींचा पुतळा आहे मल्लीताल या वरच्या भागात जाण्यासाठी होडीत बसलो रगीबेरगी शिडाच्या नौका जलाशयात ये जा करीत होत्या नौकाविहार सपूच नये असे वाटत होते नैनितालच्या सरोवरातील नौकाविहारासबधीचा एक मजेदार किस्सा आहे स्व मोतीलालजी नेहरु नैनितालला वास्तव्याला होते तेव्हा त्यांना या सरोवरात नौकाविहाराची इच्छा झाली इग्रजाच्या राजवटीमुळे नौकाविहाराची सुविधा फक्त इग्रज नागरिकांनाच होती त्यामुळे मोतीलालजींन परवानगी मिळाली नाही पण ते हार मानणारे थोडेच होते ? त्यानी लगेच स्वतत्र नाव खरेदी केली. सरोवरात ते दररोज नौकाविहार करू लागले इग्रजांनी त्याच्यावर तासाच्या हिशोबाने दड लादला अलाहाबादला गेल्यावर कायदेशीरपणे भाडून त्यांनी नैनिताल नगरपालिकेने वसूल केलेली सर्व रक्कम परत मिळवली

खरोखर, नैनितालच सर्व सौंदर्य या सरोवरात आहे तिन्ही बाजूच्या आकाशस्पर्शी पहाडाच्या सान्निध्यात व ओक वृक्षाच्या रागात हे सरोवर आहे सरोवराचे पाणी ऋतूप्रमाणे रगही बदलते म्हणे ! वसतऋतूत हिरवा, वर्षा-ऋतूत तांबूस तर शिशिर ऋतूत फिकट निळा ! अशा या सरोवरातील नौका-विहाराचा आनद काय वर्णावा ? सध्याकाळ होऊ लागल्याने रगीबेरगी दिव्याच्या प्रतिबिबामुळे सरोवर उजळून निघाले होते अनेक चित्रपटात नैनितालचे सौंदर्य टिपल आहे

मल्लीतालला पोहोचलो तर बँडवरचे मधुर स्वर कानावर पडले म्युनिसिपल कौन्सिलचे छानसे उद्यान पर्यटकानी, स्थानिक लोकानी गजबजून गेले होते बाजूला सिनेमा थिएटर असल्याने सिनेशौकिनाचीही गर्दी होती समोरच फ्लॅटस् नावाने ओळखले जाणारे मोठे क्रीडागण आहे फूटबॉल, हॉकी अशा खेळाच्या स्पर्धा येथे होतात तेथे घोड्यावर बसून रपेट मारण्याचा आनंद मनमुराद लुटणारे तरुण दिसले सध्याकाळच्या प्रसन्न वेळी शाली पाघरलेले, स्वेटर, कोट घातलेले पर्यटक हसतखिदळत फिरत होते विशेषत बगाली पर्यटकांची गर्दी जास्त होती विविध रगाचे समेलनच भरले आहे असा भास होत होता बाजूच्या रस्त्याने फिरत निघालो प्रथम मूळ महाराष्ट्रीयन पण कुमाऊ

प्रदेशात राष्ट्रकार्य केलेले प गोविंद वल्लभ पत याचा पुतळा दिसतो रस्त्याने फिरत फिरत, बाजूची दुकाने पहात पहात हॉटेलवर परतलो.

नैनितालमधील दुसरा दिवस उजाडला आज पहायचे होते चीना पीक! नैनितालच्या आजूबाजूच्या आठ कि मी च्या परिसरात चीना पीक, नैना पीक, लारिया काता, स्नो व्ह्यू, डोरोथी सीट, लॅन्डस् एन्ड, किलबरी ही सात प्रसिद्ध शिखरे आहेत नैनितालची उची आहे १९३८ मीटर तर सर्वात उंच २१६० मीटर उचीचे शिखर आहे चीना पीक हे शिखर साडेपाच कि मी अतरावर आहे सकाळची वेळ, रात्री मिळालेली चागली विश्राती यामुळे सगळयानाच उत्साह वाटत होता हॉटेलमधून निघून नैनितालचे फ्लॅट हे क्रीडागण पार करून प्रथम नैनादेवी मंदिरात पोहोचलो दर्शन घेऊन शिखराच्या दिशेने निघालो उल्का–उदय पुढे जाऊन आमची वाट पहायचे विश्राती घेत, चढत शिखरावर पोहोचलो दोन तास लागले सुदैवाने ढग नसल्याने हवा स्वच्छ होती हिमालयाच्या एकशे तीस कि मी लाबीच्या हिमाच्छादित रजतशुभ्र शिखरावलीचे मनमोहक दृश्य दिसताच क्षणात श्रमपरिहार झाला पर्यटकांच्या सोयीसाठी रेस्टॉरट व राहण्यासाठी लाकडी केबिन तेथे होत्या नैनिताल शहराचेही सुरेख दृश्य तेथून दिसते डोंगर उतरणीवरचे बगले, हॉटेल्स, रस्ते सर्व काही दिसत होते हिरव्यागार नैनिताल सरोवराचे दृश्य तर देहभान हरपून टाकणारे होते रेस्टॉरटमध्ये चहा घेऊन ही अनोखी सफर सपवून परत निघालो दुपारी हॉटेलवर आलो तेव्हा कडाडून भूक लागली होती अडाकरी, चपाती, पुलाव असे चवदार जेवण झाल्यावर डोळयावर गुगी आली पायही दुखत होते सहा वाजेपर्यंत विश्राती घेतली

सध्याकाळी मुलांच्या आग्रहास्तव त्याना घोडयावर बसवून मल्लीतालला आलो. नैनिताल नौकाविहारासाठीं जसे प्रसिद्ध आहे तसेच अश्वारोहणासाठीही। नंतर मालरोडनेच पायी येताना थोडीफार खरेदी केली नैनितालच्या मेणबत्त्या प्रसिद्ध आहेत रंगीबेरगी, लहानमोठया, आकर्षक डिझाईन्सच्या मेणबत्त्या मिळतात सुदर मेणबत्त्याची खरेदी केली मेणापासून मूर्ती तसेच विविध आकर्षक वस्तूही तयार करतात.

नैनितालच्या वास्तव्यातले दोन दिवस सपले होते आजूबाजूच्या शिखरांवर जायला वेळ नव्हता दुसऱ्या दिवशी जायचे होते १४२ कि मी वरील जिम कॉर्बेट पार्कला त्यासाठी टॅक्सी ठरवली सकाळी जाऊन सध्याकाळी परत यायचे होते खरे तर नैनिताल हे किमान एक आठवडा निवात राहण्याचे ठिकाण। मस्त खाव–प्याव, गिर्यारोहणाचा आनद लुटावा, सरोवरात नौकाविहार करावा निसर्गाच्या बदलत्या रुपानं मोहून जाव।

## जिम कॉर्बेट पार्कची सफर

सकाळी सात वाजता टॅक्सी ड्रायव्हर हॉटेलवर आला जिम कॉर्बेट पार्कला जाण्यासाठी टॅक्सी तयार होती सर्वांचे वेळेवर आवरले होते नैनिताल--काला-ढूगी—रामनगर—ढिकला मार्गे जिमकॉर्बेट पार्ककडे निघालो पहाडांच्या कडेकडेने सर्पाकार वळणाच्या रस्त्याने प्रवास सुरू झाला सकाळच्या प्रसन्न वेळी आजू-बाजूची रम्य वनश्री सुखवीत होती. शीतल आल्हाददायक वारे वाहत होते वाटेत खुरपाताल हे पहाडातील सरोवर दिसले दीड तासाचा चौतीस कि मी चा प्रवास संपवून टॅक्सी कालाढूगी नावाच्या एका छोटेखानी खेडेगावात आली ड्रायव्हरने एका टुमदार बंगल्याच्या आवाराच्या प्रवेशद्वाराजवळ गाडी थांबवली या बंगल्यात प्रसिद्ध जिम कॉर्बेट म्युझियम आहे

बंगल्याच्या आवारात प्रवेश केल्यावर वनविभागाचे रखवलदार श्री शर्मा यानी मोठ्या अदबीने स्वागत केले त्यानी विख्यात शिकारी जिम कॉर्बेट यांचे चरित्र थोडक्यात सांगितले जिम कॉर्बेट याचा जन्म २५ जुलै १८७५ मध्ये नैनिताल येथे झाला त्यांच्या वयाच्या चौथ्या वर्षीच त्याचे वडील मरण पावले त्यांच्या भगिनीने त्याचे पालनपोषण केले जिम यानी तरुणपणीच प्रथम रेल्वे खात्यात फ्युएल इन्स्पेक्टर म्हणून अडीच वर्षे नोकरी केली त्यानंतर रेल्वे वॅगन-मध्ये सामान भरण्याचा व उतरवण्याचा ठेकेदारीचा व्यवसाय एकवीस वर्षे

यशस्वीरीत्या केला पहिल्या महायुद्धात १९१४–१८ साली त्यानी कुमाऊं प्रदेशातील पाच हजारावर जवान ब्रिटिश फौजेत भरती केले तसेच दुसऱ्या महायुद्धात लष्करी जवानाना जगलात, पहाडी प्रदेशात युद्ध कसे करावे याचे शिक्षण दिले लष्करात त्यानी केलेल्या सेवेप्रीत्यर्थ त्याचा हुद्दा लेफ्टनट कर्नल हा होता पुढे प्रकृती ढासळल्याच्या कारणास्तव त्यांनी लष्कराचा राजीनामा दिला आणि नैनिताल येथील आपल्या पिढीजात बगल्यात राहू लागले नैनिताल नगरपालिकेचे ते चोवीस वर्षे सदस्य होते कालाडूगी हे त्याचे हिवाळ्यातील निवासस्थान नैनिताल नगरपालिकेच्या मिटीगसाठी ते येथूनच पायी जात आणि तेथेच त्यांची जीवनकथा ऐकण्यात आम्ही रमून गेलो होतो

जिम कॉर्बेट याना बालपणापासूनच वाघ पाहण्याची उत्सुकता होती ज्या वयात मुले आईला प्रेमाने बिलगतात त्या वयात त्यांनी प्रथम बदूक हातात धरली



कालाडूगीच्या जवळपासच्या जगलात निर्भयपण सचार केला येथील ठाकूर

कन्वरसिंग यांनी केलेल्या मार्गदर्शनाचे ऋण त्यांनी नमूद करून ठेवले आहे वाघाला बंदुकीने आणि कॅमेऱ्यातही टिपण्याची त्यांना आवड होती. लष्कर सेवानिवृत्ती-नतर जिमना शिकारीची आवड स्वस्थ बसू देईना नरभक्षक जनावरांना आपल्या बदूकीने अचूक टिपण्यात त्याचा हातखडा होता गढवाल व कुमाऊ प्रदेशातील अनेक नरभक्षक वाघाची त्यानी शिकार केल्याने त्याना पहाडी प्रदेशातील लोक देवदूतच मानायचे जिम केवळ शिकारीच नव्हते तर लेखकही होते त्यानी लिहिलेली Jungle Lore, My India, The Man Eaters of Kumaon, The Temple Tigress The Man eating Leopard of Rudraprayag ही रोमहर्षक शिकारींच्या सत्यकथाची पुस्तके जगप्रसिद्धच आहेत देशोदेशींच्या आबालवृद्धाना या पुस्तकानी मत्रमुग्ध केले आहे

भारताला स्वातत्र्य मिळाल्यावर जिम कॉर्बेट यांनी पूर्व आफ्रिकेत स्थायिक होण्याचा निर्णय घेतला तेव्हा आजूबाजूच्या परिसरातील पाच हजारावर खेडूत या बगल्याजवळ जमले त्यांनी आठ–दहा दिवस या घराला घेरावच घातला येथेच राहण्याचा त्याना प्रेमळ आग्रह केला भारताला आपल घरच मानलेल्या जिमनी वेळोवेळी अनेक गोरगरीबाना कनवाळू वृत्तीने सकटसमयी केलेली मदत पहाडी लोक विसरू शकत नव्हते त्याची समजूत घालून ते पूर्व आफ्रिकेत केनियात स्थायिक झाले व आठ वर्षांनी १९५५ मध्ये तेथेच मरण पावले [redacted] शिकारी म्हणून सन्यास घेऊन केनियाला जाण्यापूर्वी त्यानी दोन विश्वासू नोकरांकरवी या बगल्याच्या आवारात तीन रायफली व दोन शॉटगन पुरून टाकल्या जाताना त्यानी हा बगला त्यांचे नैनितालचे मित्र चिरजीलाल शाह यांना नाममात्र दोन हजार रुपयांना दिला. आफ्रिकेत ते जरी शरीराने होते तरी त्याचे मन नैनितालच्या परिसरात गुतले होते भारतात परतण्याची त्यांना तळमळ वाटत होती पण प्रकृती अस्वास्थ्यामुळे ते जमले नाही नैनितालच्या आठवणींनी त्याचे मन बेचैन व्हायचे भारतातील मित्रपरिवाराला पाठवलेल्या पत्रात या भावना व्यक्त व्हायच्या तशातच त्याना भारतातून पत्रे गेली की त्याच्या या बगल्याची दुर्दशा झाली आहे त्यानी परत हा बंगला चिरजीलाल याच्याकडून पासष्ट हजार रुपयांना खरेदी केला आता वनविभागातर्फे त्याचे म्युझियममध्ये रूपांतर करण्यात आले आहे जिमच्या जन्मशताब्दीप्रित्यर्थ १९७५ मध्ये भारत सरकारने खास तिकीट काढले होते जिम कॉर्बेटच्या जीवनाची रोमहर्षक कहाणी सागताना श्री शर्मा अगदी रगून गेले होते आणि ऐकताना आम्हीही !

म्युझियमच्या पहिल्या दालनात १९१८ ते २६ पर्यंत एकशेपचवीसहून अधिक लोकाचे भक्षण करणाऱ्या गढवाल येथील रुद्रप्रयागच्या चित्त्याचे छायाचित्र आहे जिमनी झाडावर बसून या चित्त्याची शिकार केली त्यावर आधारित



रामगंगा नदीतील
प्रचंड महसीर मासा


जिम पार्क म्युझियम, कालाढुंगी
↓



लखनवी अदाकारी -- कथक



गोरक्षनाथ मंदिर. गोरखपुर



The man Eaters of Rudraprayag हे त्याचे पुस्तक प्रसिद्ध आहेच शेजारच्या दालनात त्याच्या कुटुंबियाचे फोटो आहेत आई–वडील, लहान बहीण व मोठे भाऊ याच्या बरोबरचे फोटो आहेत जिम व त्याची बहीण दोघेही शेवटपर्यंत अविवाहीतच होते जिमनी शिकार केलेल्या वाघांचे फोटोही आहेत त्याचप्रमाणे या वाघानी प्रत्येक वर्षी किती माणसाचा फडशा उडवला याचाही तक्ता आहे जिमनी शिकार केलेल्या नरभक्षक वाघाची आकडेवारीही आहे एका दालनात त्यानी भारतीय मित्राना लिहिलेली पत्रेही आहेत पुढील दालनात जिम वापरीत असलेल्या वस्तू जतन करून ठेवल्या आहेत चिनी मातीची भाडी, टेबल, कपाटे, आरामखुर्ची, वेताचा सोफासेट, साडेतीन फूट लांबीची छडी, जुना कदील, बदूक ठेवण्याची रॅक अशा अनेक वस्तू आहेत बंगल्याच्या मागच्या बाजूला स्वयपाक घर आहे शिकार करण्याच्या वेळी झाडावर बाधायचे मचाणही एका दालनात आहे त्यासबधी एक मजेदार किस्सा श्री शर्मा यानी सागितला एका शिकारीच्या वेळी घायाळ झालेल्या अवस्थेत वाघाने बावीस फूट उच उडी मारली मचाण तोडले त्यावर बसलेले कॉर्बेट खाली पडत असताना त्यांचा कोट फादीत अडकला पण फाटला नाही त्यामुळेच ते बचावले शिप्याला त्यानी पाचशे रुपयांची बक्षिसी दिली जिम कॉर्बेटचा सर्व शिकाऱ्यांना अनुभवाचा सल्ला आहे की झाडावर बाधायचे मचाण बावीस फूटांपेक्षा अधिक उचीवर बाधावे

म्युझियमच्या आवारात जिमनी लावलेले आब्याचे व लिचीचे वृक्ष आहेत एका कोपऱ्यात रॉबिन व रोशन या त्यांच्या दोन आवडत्या, निष्ठावत कुत्र्यांच्या समाध्या आहेत शिकारीला जाताना यातील एखादा कुत्रा त्याच्या पाठीवर नेहमी असे विशेष म्हणजे कुत्र्याचे मागचे दोन पाय त्याच्या कोटाच्या खालच्या दोन खिशात असत व पुढचे दोन खांद्यावर यातील रॉबिन हा कुत्रा त्यानी पधरा रुपयांना खरेदी केला होता जिम म्हणत– "भारतातील सगळ सोन जरी मला कोणी दिल तरी मी हा कुत्रा त्याला देणार नाही !" रॉबिनच लहानपणच लाडकं नाव होत–पिचा सहा वर्षे हा कुत्रा त्याच्याजवळ होता कुत्र्याच्या समाधीभोवती लोखंडी जाळी आहे

असे हे जिम कॉर्बेटचे अलौकिक व्यक्तिमत्त्व भारतासाठी त्यानी आपले तनमनधन अर्पण केले जंगली पशुपक्षांची, जनावराची भाषा त्याना समजे जनावराला सावध केल्याशिवाय ते त्याची शिकार करीत नसत जंगली हिंस्त्र श्वापदांना त्यांनी नाईलाजानेच बदूकीने टिपले पण बदूकीपेक्षा कॅमेऱ्यात त्यांना टिपणे त्याना जास्त आवडे ! वाघ, सिंह, चित्ते यासारख्या उमद्या जनावरांवर, वन्य पशुपक्षी, निसर्ग, पहाड, जगलातील साधीभोळी माणस याच्यावर मनापासून प्रेम करणारा

तो एक दिलदार अंतःकरणाचा, गोष्टीवेल्हाळ माणूस होता. उत्कृष्ट छायाचित्रकार, रोमहर्षक कथा आकर्षक शैलीत सांगणारे, निधड्या छातीचे असे जिमसारखे व्यक्तिमत्व शतकातून एखादेच निर्माण होते. खरोखर, जिमचे चरित्र म्हणजे एक आख्यायिकाच !

कालाढुंगीचे म्युझियम पाहिल्यावर टॅक्सीने रामनगरकडे वेगाने निघालो. प्रदेश मैदानी होता. शेतात ऊस दिसत होता. आंब्याचीही खूप झाडे होती. रामगंगा नदीवरील बॅरेज पूल ओलांडल्यावर रामनगर गावी पोहोचलो तेव्हा दुपारचे बारा वाजले होते. रामनगरला रेल्वेचे स्टेशन आहे. जिम कॉर्बेट पार्कला भेट देण्यासाठीं रेल्वेने येणारे प्रवासी रामनगरला उतरतात. पार्कमध्ये गेल्यावर जेवणासाठी रामनगरलाच एका हॉटेलमधून आलू परोटे, दहीभात बरोबर घेतला. आता टॅक्सी पार्ककडे निघाली. हिरव्यागार झाडीमधून प्रवास सुरू होता. रस्त्यावर वाहतूकही फार नव्हती. पार्कचे मुख्य प्रवेशद्वार आहे धनगडी येथे. रामनगर–धनगडी पस्तीस कि. मी. चा प्रवास संपवून दुपारी दोनला तेथे पोहोचलो. पार्कच्या प्रवेशद्वारी वनविभागाची कचेरी असून तेथे माणशी आठ रुपये फी वसूल केली गेली. उल्का–उदयचे शाळेचे आयडेन्टीटी कार्ड बरोबर असल्याने त्यांना सवलत मिळून प्रत्येकी एक रु. फी पडली. ड्रायव्हरचे आठ रुपये, तसेच कारची प्रवेश फी आठ रुपये असे एकूण बेचाळीस रुपये पार्कमध्ये प्रवेश करताना भरल्यावर परमिट मिळाले.

जिम कॉर्बेट पार्क नैनिताल व तेहरी गढवाल जिल्ह्याच्या ५२५ चौ. कि. मी. क्षेत्रात पसरलेला आहे. कुमाऊ प्रदेशच्या पायथ्याशी पतलीदूनच्या रुंद हिरव्यागार खोऱ्यात हा पार्क आहे. ब्रिटिशांच्या काळात पतलीदून हा तेहरी गढवालचा भाग होता. पूर्वी येथे घनदाट जंगल होते. गढवाली व रोहिले यांचा या जंगलासाठी वाद व्हायचा. नंतर नेपाळी गुरख्यांनी या प्रदेशात आक्रमण केले. इंग्रजांची मदत घेऊन हा जंगल विभाग तेहरी गढवालचा भाग बनला व इंग्रजी सत्ता त्याच्यावर चालू झाली. समुद्र सपाटीपासून १२०० ते ४००० फूट उंचीवर हा जंगलचा विभाग पसरलेला आहे. पार्कमधून प्रसिद्ध रामगंगा नदी वाहते.

धनगडीहून पार्कमधील ढिकला या मध्यवर्ती स्थानाकडे निघालो. भर दुपारच्या वेळीही उंच उंच पाईन, साल वृक्षामुळे हवा थंडगार होती. जनावरे बिचकून जाऊ नयेत म्हणून टॅक्सीवाला हॉर्न देण्याचे टाळत होता. आम्ही मात्र आजूबाजूला काही जनावरे दिसतात का म्हणून डोळे ताणीत होतो. पण दुपारच्या वेळी कुठलेही जनावर दिसत नव्हते. वाटेत ओढेनाले पार करून ढिकला या मुख्य ठिकाणी आलो. तेथे वनविभागाचे दुमजली अतिथीगृह आहे. विद्यार्थ्यांच्या ग्रूपसाठी हॉल आहे. तसेच पर्यटकांसाठी लाकडी केबिनचीही सोय आहे. एकावेळी

दोनशे पर्यटकांची तेथे सोय होऊ शकते मात्र अगोदर आरक्षण करावे लागते. कँटीनचीही व्यवस्था तेथे आहे पार्कमध्ये पोहोचल्यावर प्रथम उच झाडाखाली जेवणावर ताव मारला वनभोजनाचा खराखुरा आनद मिळाला प्रवासामुळे थकल्याने तासभर झाडाखालीच हिरवळीवर विश्राती घेतली चार वाजल्यावर चहा घेतला तेव्हा सर्वांनाच उत्साह आला बाजूच्या रामगगा नदीच्या विस्तीर्ण प्रवाहात काही हत्ती मस्तपणे जलस्नानाचा आनंद लुटताना दिसले उल्का–उदय नदीपर्यंत चक्कर मारून आले पाणी खळखळ वाहत होते रामगगा नदी मासे व मगरीसाठी प्रसिद्ध आहे हिमालयाच्या उच पर्वतशिखरावर उगम पावलेली रामगगा वृक्ष, वेली, फुलानी बहरलेल्या दऱ्याखोऱ्यातील या अभयारण्यातून दिमाखाने वाहते उन्हाळयात बर्फ वितळून वाहणाऱ्या थडगार पाण्याच्या प्रवाहात अनेक प्रकारच्या मगरी–सुसरी डुबत असतात या नदीतील प्रसिद्ध मासे आहेत महसीर, ट्राऊट, काला बास या नदीत मच्छीमारी करण्यासाठी परमिट लागते जिम कॉर्बेटने एकदा नदीत पन्नास पौंड वजनाचा मोठा मासा पकडला होता महसीर मासा तर पन्नास मीटर उच उडी मारू शकतो जिम कॉर्बेटच्या मते दुथडी भरून वाहणाऱ्या रामगगा नदीच्या पाण्यात महसीर माशासाठी गळ घालून बसण्यासारखा चित्ताकर्षक खेळ दुसरा कुठला नाही !

जलविहार करून हत्ती डुलत डुलत बाहेर आले त्याचे माहूत त्याना सजवू लागले जगलातील प्राणी पाहण्यासाठी पर्यटकाना त्यांना घेऊन जायचे होते ना ! सहा पाळीव हत्तींचा हा ताफा आहे जगलात अडीच तास सफर ते करून आणतात फी आहे माणशी बारा रुपये पण हत्तींवरून जगलात जायचे तर आधीच बुकींग करावे लागते सर्व हत्ती बुक झालेले असल्याने हत्तीच्या पाठीवर बसून जगलात फेरफटका मारण्याची मुलाची इच्छा पूर्ण होऊ शकली नाही नाईलाज झाला टॅक्सीवाला म्हणाला, " मी तुम्हाला जगलात चक्कर मारून आणतो " आनद होतो आहे तोच तो म्हणाला की तीन रु कि मी प्रमाणे एक्स्ट्रॉ चार्ज द्यावा लागेल सरकारी जीप, पिक अप, स्टेशन वॅगन, मिनी बस या गाड्यांचा दरही तो होता व त्या सर्व अगोदरच बुक झाल्या होत्या विचार करायला वेळ नव्हता टॅक्सीवाल्याला म्हटले चल एक फॉरेस्ट गार्ड रायफलसह ड्रायव्हरजवळ बसला उल्का–उदयने गाडीच्या काचा बद केल्या चुकून जनावराने उडी मारली तर ! प्रथम रामगगा नदीच्या कडेकडेने पात्रातून चक्कर मारली अजून थोडे ऊन होते कुठेही जगली श्वापद न दिसल्याने नाराज झालो एव्हढ्यात ड्रायव्हरने बाजूला बोट दाखवले बारशिंगे हरणाचा मोठा कळप डौलदारपणे उभा होता मावळत्या सूर्यकिरणात त्याच्या अगावरचे ठिपके स्पष्ट दिसले चाहूल लागताच टणटण उड्या मारीत तो कळप वेगाने पळू लागला. ड्रायव्हरने नतर गाडी दाट

जगलात नेली जगलात पधरा वॉच टॉवर निरनिराळ्या ठिकाणी आहेत दुर्बिण लावलेले उत्सुक पर्यटक दिसले तर काही ठिकाणी हत्तीवर बसून पाच सहा जणाचा ग्रूप डुलतडुलत जगलात जाताना दिसला त्यातील एक दोन स्त्रियाच्या चेहऱ्यावर भीतीयुक्त भाव दिसत होते हो, न जाणो वाघाने उडी मारली तर ! शिवाय त्याच्या शेजारी बदूकधारी गार्डही दिसत नव्हता झाडावर मचाण बाधून दिवसभर वाघाची प्रतीक्षा करीत तो न दिसल्याने थकलेले पर्यटकही दिसले खरे म्हणजे जगलात वाघ दिसायला नशीबच हवे वीस कि मी चा फेरफटका संपवून परत ढिकल्याच्या गेस्ट हाऊसजवळ परतलो टॅक्सीवाल्याला साठ रु दिले नशीब हरणाचा कळप तरी दिसला होता

एव्हाना सध्याकाळ झाली होती नैनितालला आमच्या लॉजमध्ये शेजारच्या रूममध्ये उतरलेले दिल्लीचे एक पंजाबी कुटुब हत्तीवर फेरफटका मारून आले होते हत्तीवर पहिल्यादाच बसल्याने त्याचे अंग ठणकत होते शिवाय जगलात एकही जनावर दिसले नव्हते त्यामुळेही शीण आला होता हत्तीवर रायफलधारी गार्ड नसल्याने भितीही वाटली होती त्यानी आम्हाला एक रात्र मुक्काम करायचा खूप आग्रह केला अगदी पहाटे जनावरे पहायला मिळतील असा विश्वासही त्याना वाटत होता पण आम्हाला दुसऱ्या दिवशी नैनितालहून काठगोदामकडे परतायचे होते त्यामुळे परत जाणे भाग होते शिवाय टॅक्सीही एक दिवसाच्या बिगर मुक्कामाच्या सफरीची ठरवली होती टॅक्सीवाला परतण्याची घाई करू लागला त्यामुळे परमिटवर सही घेऊन थोडे नाखुषीनेच निघालो खरे म्हणजे जनावरे पहायला पहाटेची वेळ योग्य सकाळी ऊन होण्याच्या आत ती फिरत असतात किवा सध्याकाळी ऊन उतरल्यावर पाचनतर नदीपर्यंत पाणी प्यायला येतात परतताना प्राणी दिसले तर पार्कची सफर वाया जाणार नाही असे वाटत होते

टॅक्सीने थोडे अंतर पार केल्यावर समोरून शेवटची बस आली गाडीच्या टपावर काही परदेशी प्रवासी जगली जनावरे पाहण्यास बसले होते त्यातील एकाने आमच्याकडे पाहून डाव्या बाजूला हाताने खूण केली टॅक्सीतून उतरून रस्त्याच्या कडेला उभे राहिलो दाट झाडीच्या पलीकडच्या मैदानातून रानटी हत्तीचा कळप आपल्याच मस्तीत नदीच्या बाजूला चालला होता शे–दीडशे हत्तीच्या या कळपातील अनेक हत्तींचे सुळे पाढरेशुभ्र लाब होते सोंडेने अंगावर माती उडवीत, चीत्कार करीत ते मद गतीने चालले होते हत्तींचे छोटे बच्चेही मोठ्या हत्तीमध्ये लुडबूड करीत चालले होते अगावर सारखी माती उडवल्याने हत्तींचा रग भुरकट दिसत होता रानटी हत्तीच्या दर्शनाने सर्वांनाच खूप आनद वाटला टॅक्सी थोडी पुढे गेल्यावर हरणाचा कळप दिसला. मोठी शिगे असलेला काळवीट चमकून पाहू लागला त्यांच्या सोनेरी अगावरचे शुभ्र ठिपके चमकत

होते कुठे ती प्राणीसंग्रहालयातली मरगळलेली हरणे आणि कुठे ही तजेलदार डौलदार, तेजस्वी हरणे! गाडीच्या आवाजाने बिचकून मंडळी जंगलाच्या दिशेने उड्या मारीत गेली थोडे पुढे गेल्यावर डौलदार पिसारा असलेले मोर दिसले वाघोबाचे दर्शन मात्र झाले नाही ड्रायव्हर म्हणाला की आजकाल वाघाची संख्या कमी होत होत सुमारे नव्वद वाघ शिल्लक आहेत पण ते दिसायचे तर नशीबच हवे कधी कधी तर ते रस्त्यावर शांतपणे पहुडलेले दिसतात मात्र वेळ अगदी सकाळची किंवा सायंकाळनंतरची हरीण, सांबर, जंगली कुत्रे, अस्वल, कोल्हे, जंगली मांजर, मुंगूस असे अनेक पशु या अभयारण्यात आहेत तसेच जंगली कावळा, रॉबिन, लार्क, वॅगटेश असे पक्षीही आहेत भारतात आढळणाऱ्या बाराशे पक्षांपैकी सातशेपन्नास प्रकारचे पक्षी येथे आहेत

खरोखर, वन्यप्रेमी जिम कॉर्बेटच नाव या अभयारण्याला देऊन त्याचं यथोचित स्मारकच सरकारने केलं आहे सन १९३५ मध्ये हे अभयारण्य ब्रिटीशांच्या काळात जिम कॉर्बेटच्या प्रेरणेने सुरू झाले त्याचे मूळ नाव सर माल्कम हेले या उत्तर प्रदेशच्या गव्हर्नरचे होते नंतर पार्कचे नाव होते रामगंगा नॅशनल पार्क. पावसाळ्यात पार्कमधील रामगंगा नदी, ओढे, नाले पाण्याने तुडुंब भरतात. त्यामुळे जून ते ऑक्टोबर पार्क पर्यटकांसाठी बंद असतो नोव्हेंबर नंतर हिवाळ्यात तो खुला होतो डिसेंबर, जानेवारीत खूप थंडी असते त्यावेळी वाघ, मगरी दिसतात फेब्रुवारीनंतर हवा आल्हाददायक असते झाडे हिरवीगार असतात मार्च ते एप्रिलही आल्हाददायक हवेत पशुपक्ष्याचे दर्शन होते मे जूनमध्ये मात्र हवा दिवसा उष्ण व रात्री थंड असते त्यामुळे या दिवसात प्राणी दिवसा बाहेर न येता कोठेतरी थंड जागेत असतात पहाटे किंवा संध्याकाळनंतर ते दिसतात हा पार्क म्हणजे छायाचित्रकारांच्या कौशल्याला आव्हानच! चॅपमॅन या प्रसिद्ध फोटोग्राफरने १९१९ साली वाघ, चित्ते, बिबळ्याचे शूटींग केले–कॅमेऱ्यात! वन्य पशुपक्षी नैसर्गिक वातावरणात पाहण्यासाठी, पक्षी निरीक्षणासाठी, त्यांचे कूजन ऐकण्यासाठी, मच्छीमारीसाठी, हत्तीवरून फिरण्यासाठी, निसर्गदृश्य चित्रीत करण्यासाठी, विश्रांतीसाठी आणि निवांत लिखाणासाठीही किमान एक आठवडा येथे मुक्काम करायला हवा आमच्यासारखे धावते पर्यटक येतात आणि घाईगर्दीत परततात परंतु मनाचे पूर्ण समाधान होत नाही

अभयारण्याच्या प्रवेशद्वारी–धनगडीला परमिट परत केल्यावर रामनगरला रात्री नऊला पोहोचलो चहा घेऊन नैनितालकडे निघालो कालाढुंगीला पोहोचलो तेव्हा दहा वाजले होते आता फक्त दीड तासाचा प्रवास राहिला होता रस्त्यात बिलकूल वाहतूक नव्हती टॅक्सी ड्रायव्हर बोलका असल्याने व तो नेहमीच या रस्त्याने जा–ये करीत असल्याने मजेत गप्पा मारीत होता रस्ता घाटाचा, वळणा-

कार पहाडाला वळसे घालीत, दऱ्याखोऱ्या, घनदाट झाडी पार करणारा नैनिताल दहा कि मी हा अंतराचा दगड दिसला व हायस वाटलं सर्वजण कंटाळलो होतो अर्ध्या तासात नैनितालला पोहोचू, जेवणावर ताव मारून मस्तपैकी झोपू या सुखद विचाराने उत्साह वाटला तोच-! अकस्मात ब्रेकचा मोठा आवाज आला आणि गाडी कचकन थांबली पेंगणारे उल्का-उदय खाड्कन जागे झाले काळ्याकुट्ट अंधारात गाडी थांबली होती दिव्याच्या प्रखर प्रकाशात दिसले की पहाडाचा कडा कोसळून रस्ता पूर्ण बंद झाला होता कडाक्याची थंडी, निर्मनुष्य रस्ता, जंगलातून येणारा रातकिडयाचा किर्र आवाज आणि हताश झालेले आम्ही ! मनात नाही नाही ते विचार येऊ लागले ज्या वाघाला पहायला आम्ही तळमळत होतो तोच समोर येऊन उभा राहिला तर ? कुणी दरोडेखोराने मारहाण केली तर ? एव्हढेच कशाला, ड्रायव्हरच आम्हाला सोडून गेला तर ? रात्रभर तेथे थांबणे तर शक्यच नव्हते ड्रायव्हर म्हणाला की, "उद्या कडा कोसळल्याची माहिती नैनितालला पोहोचेल. मग पी डब्ल्यू डी. चे कामगार येतील व रस्ता साफ करतील " नेहमी पावसाळ्यात असे कडे कोसळतात आता उन्हाळ्यात कोसळला. कारण सकाळी नैनिताल सोडताना जरी पाऊस नव्हता तरी नंतर तुफान पाऊस पडला असला पाहिजे येथील हवामान फार लहरी आहे खूप पाऊस पडल्याने कडा कोसळला आल्या प्रसंगाला तोंड देणे भाग होते यशवंतांच्या जवळ बॅटरी होती त्या प्रकाशात गाडी हळूहळू मागे घेतली व ड्रायव्हरने अतिशय कौशल्याने त्या अरुंद रस्त्यावर वळवली मी मनातल्या मनात देवाचा धावा करू लागले कारण बाजूला खोल दरी होती थोडे जरी चाक घसरले तरी त्या दरीत ती कोसळली असती गाडी वळवून तर घेतली खरी ड्रायव्हर म्हणाला, " काळजी करू नका नैनितालला दुसऱ्या मार्गाने-हल्द्वानी मार्गे परतू जास्तीच्या मैलांचे पैसे द्यावे लागतील " दुसरा इलाजच नव्हता रात्रभर जंगलात थांबणे शक्य नव्हते. गाडीत पेट्रोलही सुदैवाने होते परत घाटाच्या रस्त्याने उतरून कालाडूंगीपर्यंत पोहोचलो घाट उतरून आल्याने मनावरील दडपण थोडे कमी झाले काळ्याकुट्ट अंधारात एका टपरीत हॉटेल होते मिणमिणत्या दिव्याच्या प्रकाशात चहा-बिस्किटे खाल्ली धास्तीमुळे भूक मेली होती. हॉटेलवाला म्हणाला, हल्द्वानी रस्त्याने जपून जा रात्री गाड्या लुटतात झाले, पुन्हा धास्ती ! रात्रीची बाराची वेळ ड्रायव्हरला दुसऱ्या दिवशी बद्रीनाथला प्रवासी घेऊन जायचे होते त्यामुळे अंधारात, निर्मनुष्य व फारशी वाहतूक नसलेल्या रस्त्याने त्याने वेगाने रात्री दीडच्या सुमारास हल्द्वानीला आणले काठगोदाममार्गे नैनितालला जाऊ या ड्रायव्हरच्या म्हणण्याला मात्र सर्वांनीच नकार दिला पुन धोका पत्करायला आम्ही तयार नव्हतो एखादा कडा पुढे रस्त्यात कोसळला असेल तर पंचाईत व्हायची

टॅक्सीवाल्याला पैसे दिले थोडे जास्त पैसे गेले पण नाईलाज होता निदान त्याने येथपर्यंत आणून तरी सोडले तिथेच घाटात दिले असते सोडून तर ? हॉटेलही चागले दिसले तिथेच रात्रीचा मुक्काम केला सकाळी सहाला बसने निघून आठ वाजता नैनितालला पोहोचलो

स्नान वगैरे आटोपून सामान आवरले हॉटेलचे बिल दिले कुमाऊ प्रदेशाचा निरोप घेऊन परतण्याची तयारी झाली नैनितालहून काठगोदामला जाण्यासाठी टॅक्सी ठरवली वाटेत भवालीहून तीन सरोवरे पाहून संध्याकाळी पाचपर्यंत पोहोचायचे होते हॉटेलच्या गॅलरीतून नैनितालच्या सरोवराचे मनोरम दृश्य शेवटचे डोळ्यात साठवून मग टॅक्सीत बसलो अर्ध्या तासानतर भवालीला पोहोचलो मग प्रथम दक्षिण-पूर्वेला दहा कि मी अतरावरील 'भीमताल' या सरोवराला भेट देण्यासाठी पोहोचलो हिरव्यागार पहाडांच्या कुशीत शातपणे पहुडलेले भीमताल सरोवर नैनितालच्या सरोवरापेक्षा नऊशे फूट लाब आहे. महाभारतकाळातील भीमाच्या नावावरून ओळखल्या जाणाऱ्या याठिकाणी भीमेश्वर महादेवाचे प्राचीन मदिर आहे. नैनितालप्रमाणेच तळयाच्या खालच्या भागाला मल्लीताल व वरच्या भागाला तल्लीताल म्हणतात निळसर रगाच्या या जलाशयात मध्यभागी बेटासारखा भाग पाहून काश्मीरच्या दलसरोवरातील चार चिनारची आठवण झाली. नौकाविहार केला दुपारचे जेवण केले. भीम-तालच्या निसर्गसुदर परिसराचा निरोप घेऊन चार कि मी अतरावरील नौकुचिया तालला पोहोचलो नऊ कोपरे असलेल्या या सरोवरासबधी अशी आख्यायिका सागितली जाते की जो कोणी एकाच वेळी नऊ कोपरे पाहील त्या व्यक्तीला मरण येईल पण हे सरोवर अशा वेडयावाकडया आकारात पसरले आहे की एकावेळी फक्त सातच कोपरे जास्तीत जास्त पाहता येतील त्यामुळे बहुधा येथे सरोवर पाहून कोणी मरण पावल्याचे उदाहरण नसावे जलाशयात कमळाची सुदर फुले आहेत हे सरोवर मच्छीमारीसाठीही प्रसिद्ध आहे सरोवराचे दृश्य पाहण्यासाठी व्ह्यूपॉईंट आहे सरोवर पाहून भवालीला परतलो तेथून अकरा कि मी अतरावर सतताल हा सप्तसरोवराचा समूह आहे उच पाईन ओक वृक्षाच्या सान्निध्यातील सततालचा परिसर निसर्गसुदर आहे रगीबेरगी पाषाणाचे बाक, आकर्षक व्ह्यूपॉईंट सततालच्या शोभेत भर घालतात. सतताल पाहून भवाली मार्गे काठगोदामला पोहोचलो

स्टेशनवरील क्लोकरुममधून दोन सुटकेसेस आणल्या नैनिताल एक्स्प्रेस सातला प्लॅटफॉर्मला लागली रिझर्वेशन असल्याने काळजी नव्हती स्टेशनवरच्या कॅन्टीनमध्ये जेवण उरकले बर्थचा ताबा घेऊन सामान ठेवले कुमाऊ प्रदेशाच्या सफरीच्या रम्य आठवणीचा मागोवा घेत घेत लखनौकडे प्रवास सुरू केला

*

## ऐ लखनौ, तुझे मेरा सलाम हैं

काठगोदामहून रात्री सातला निघालेली नैनिताल एक्स्प्रेस रात्रीचा प्रवास सपवून सकाळी सातला लखनौ जंक्शनला पोहोचली रात्रभर आरामात झोपून प्रवास झाला होता मीटरगेजच्या प्लॅटफॉर्मवर उतरून मुख्य प्लॅटफॉर्मवर असलेल्या रेल्वे विश्रामालयाकडे निघालो विश्रामालय वरच्या मजल्यावर आहे स्वतत्र रुम मिळाली नाही मग मी उल्का, स्त्रियाच्या विश्रामालयात तर उदय, यशवत व ती काका पुरुषाच्या विश्रामालयात गेले नऊ वाजेपर्यंत सर्वांचे आवरले प्लॅटफॉर्मवरच चहाटोस्ट असा नाष्टा केला रात्री बाराच्या रेल्वेने लखनौ–गोरखपूर प्रवास करायचा होता काठगोदामहून दिलेल्या तारेनुसार आरक्षण झाले का याची चौकशी करायची होती आरक्षण खिडकीसमोरील मोठ्या रागेत उभे राहिलो एक तासाने खिडकीजवळ पोहोचलो आरक्षण झाल्याचे कळल्यावर मात्र रात्रीच्या प्रवासाचे टेन्शन कमी झाले

सकाळी साडेदहाच्या सुमारास लखनौ स्टेशनबाहेर आलो राजस्थानी शैलीने बाधलेले लखनौचे चारबाग स्टेशन भव्यच आहे लखनौचा .दिवसभर फेर-फटका मारण्यासाठी टागा ठरवला दोन रिक्षाऐवजी एका टांग्यात सगळेजण बसलो टागा हळू हळू जात असल्याने गावही नीट पाहता येत होते. यशवत

टांगेवाल्याला म्हणाले, " लखनौ अच्छा बताना ! " त्यावर उर्दू मिश्रीत हिंदीत तो अदबीने म्हणाला, ' बाबूजी, पूरा दिनभर घुमाऊंगा ! सब दिखाऊंगा ! ' एक सुस्कारा टाकून तो पुढे म्हणाला, ' लखनौके पहले नबाब तो चल गये ! आज उनके उजडे हुए महल पुरानी यादोंके गवाह है ! ' अजीजीच्या स्वरात तो नतर म्हणाला, ' सब बतानेके बाद खुश होकर आप जरूर ज्यादा बक्षिसी देंगे ।

लखनौत तीन इमाम बारा प्रसिद्ध आहेत छोटा, बडा व शहानजफ हे ते तीन इमामबारे इमाम म्हणजे अवतार व बारा म्हणजे स्थान प्रथम रुमी दरवाजा ओलाडून छोटा इमामबारा पाहण्यासाठी उतरलो नबाब मोहमदअली शाहने १८३९ मध्ये उभारलेल्या या इमामबाराचे प्रवेशद्वार नक्षीकाम व कलाकुसर यानी सजले आहे आत प्रवेश केल्यावर छानदार बगीचा आपले स्वागत करतो छोटा इमामबारात गेल्यावर मुस्लीम गाईड माहिती सांगू लागला. हा इमामबारा पूर्वी आतून सोन्याच्या पत्र्याने मढवला होता १८५७ च्या स्वातंत्र्ययुद्धाच्या वेळी इंग्रजांनी तो लुटून नेला इमामबारात इराणहून आणलेल्या संगमरवराची सुंदर फरसबंदी आहे तेथे चांदीचे सिंहासन असून तेथे बसूनच मुल्लामौलवी धार्मिक पठण करतात कुराणातील पहिला शब्द आहे 'बिस्मील्ला रहमाने रहीम ' तेथील एका काचेवर कबूतराच्या चित्रात हा शब्द चपखलपणे बसवला आहे. एका काचेवर संपूर्ण कुराण कोरले आहे चांदीचे, चंदनाचे ताजिये ताबूतही येथे आहेत एका बाटलीत ताबूताची प्रतिकृती आहे ताबूत मिरवणूकीत हिंदूही भाग घेतात सर्वांना जेवण दिले जाते इमामबारात नबाब व त्याच्या आईची कबर आहे बेल्जियम, इंग्लंड, जपान, जर्मनीमधून आणलेली सुंदर झुंबरे छताला आहेत जुने मोठे आरसे आहेत त्याच्या फ्रेमला असलेले सोने इंग्रजानी नेले. १९६० मध्ये गोमतीला आलेल्या पुराचे पाणी इमामबा रात सहाफूटापर्यंत आले होते त्यामुळे आरसे खराब झाले भिंतीवर कलाकुसर असून अरेबिक भाषेतील वचने कोरली आहेत आकाराने लहान असलेला इमामबारा कलात्मक दृष्ट्या सुबक आहे इमामबाराच्या बाजूला ताजासारखा पांढराशुभ्र मकबरा आहे त्यात नबाबाची मुलगी झीनत हिची कबर आहे

छोटा इमामबाराच्या पश्चिमेला लखनौची सर्वात मोठी जामा मशीद आहे दोन मीनार व तीन घुमट असलेली ही भव्य शानदार मशीद चबुतऱ्यावर उभारली आहे छोटा इमामबारा पाहून परतताना उंचच्या उंच हुसैनाबाद घंटाघर दिसते पुढे तांबड्या विटांनी बांधलेल्या इमारतीजवळ टांगा थांबला तेथे ' पिक्चर गॅलरी ' आहे मोहमदअली शाहने चांद पाहण्यासाठी ही सात मजली इमारत बांधण्याचे ठरवले होते पण चारच मजले पूर्ण झाले बाजूला तलाव असून आत सात विहिरी आहेत सध्या ही इमारत ट्रस्टकडे आहे पायऱ्या चढून

वरच्या मजल्यावर आल्यावर पिक्चर गॅलरी पाहण्यासाठी तिकीटे काढली येथील अवध व लखनौच्या नबाबाची पूर्णाकृती तैलचित्रे पाहण्यासारखी आहेत लखनौला पाच बादशहा व पाच नबाब होऊन गेले लखनौच्या नबाबाचा मूळ पुरुष नबाब सादत अलीखान दिल्लीच्या मोगलसम्राट मोहमदशहाने १७३९ मध्ये फैजाबाद राजधानी असलेल्या अवध राज्याचा पहिला नबाब म्हणून त्याची नेमणूक केली नबाब आसफ औद दौला हा नव्या 'लखनौचा शिल्पकार' त्याच्याच काळात फैजाबादहून लखनौला राजधानीचे स्थलांतर झाले त्याचप्रमाणे मुस्लीम कला संस्कृतीचा वारसा दिल्लीहून स्थलांतरित झाला त्या काळात लखनौची ख्याती केवळ शिल्पकलाकृतींसाठीच नव्हती तर अनेक बागबगीच्यामुळे लखनौला तजेलदार रूप प्राप्त झाले होते लखनौ दरबारात अनेक कवी, कलाकार, खानदानी गायक, संगीतप्रेमी, हस्तकलाकुशल कारागीर, नृत्यविशारद यांना मानाचे स्थान मिळालेले होते नंतरच्या नबाबाच्या कारकीर्दीत लखनौ गजबजलेले होते शेर-शायरी, प्रणयप्रधान रंगढंग, गाणे बजावणे, नृत्याच्या मैफली यांनी मदिरा आणि मदिराक्षी यांच्या ते आहारी गेलेले होते केवळ श्रीमंतच विलासी नव्हते तर फकीरही मिळालेल्या कमाईतून अफू व इतर मादक पदार्थ सेवन करून झिंगलेले असत वाजिद अली शाह हा लखनौचा शेवटचा नबाब त्याला ३६५ बेगमा होत्या त्याचे तैलचित्र असे आहे की ज्या दिशेने जाल त्या दिशेने त्यातील चेहेऱ्याची नजर वळलेली दिसते त्याची कारकीर्द सुखदुःखाने भरलेली आहे संगीत, कला, नृत्य, नाट्य यात तो तासन्तास रमून जाई कथ्थक नृत्याच्या मैफली, कोंबड्यांच्या झुंजी, पतंगाच्या स्पर्धा, बुद्धिबळांचे डाव यात तो तासन्तास रमून जाई स्वतःला कृष्ण समजून तो स्त्रियांशी रासक्रीडा करीत असे स्त्रियांचे पोषाख करून अंतःपुरात वावरे. त्याच्या चैनबाजीत अवध खालसा झाले इंग्रजांनी त्याला १८५६ मध्ये गादीवरून बडतर्फ केले असे सांगतात की इंग्रजी पलटणी जेव्हा त्याला अटक करायला आल्या तेव्हा प्रतिकार न करता पायात जोडे ढकलण्याची त्याने दासींना सूचना केली ! सुप्रसिद्ध हिंदी कथाकार मुन्शी प्रेमचंदजींनी 'शतरंजके खिलाडी' या लघुकथेत वाजिदअली शाह कालीन राजापासून रंकापर्यंत विलासात डुबलेल्या लखनौचे बहारदार वर्णन केले आहे

पिक्चर गॅलरी पाहिल्यावर टांगेवाल्याने नेले बडा इमामबाराकडे या टोलेजंग इमारतीचे काम पूर्ण होण्यास इ स १७७३ ते ८४ अशी अकरा वर्षे लागली त्या काळात फार मोठा दुष्काळ पडला होता एक दुष्काळी काम म्हणून या इमामबाराचे काम झाले असे सांगतात की दुष्काळाने हैराण झालेले श्रीमंत रात्री अंधारात काम करीत व अब्रू वाचवण्याचा प्रयत्न करीत. बांधकाम पुरावे म्हणून सोळा वेळा ते पाडण्यात आले रात्री झालेले काम पाडीत व दिवसा परत बांधत

बांधकाम पाडण्यासाठीही मजुरीदाखल पैसे वाटत असत कैफियतउल्ला या इराणी शिल्पकाराने या इमामबाराचा आराखडा तयार केला रस्त्याजवळील प्रवेशद्वारातून गेल्या गेल्या लांबच्या लांब असा हा इमामबारा दृष्टीला पडतो तो आतून पाहण्यासाठी तिकीटे घेऊन गाईडही ठरवला गाईडशिवाय इमारतीची वैशिष्टये कळत नाहीत नबाब आसफ-औद-दौलाने उभारलेल्या या इमारतीत तीन डिझाईनचे तीन हॉल आहेत यातील प्रमुख हॉल १६३ फूट लांब, ५४ फूट रुंद व ६० फूट उंच आहे आत आधाराला एकही खांब नाही हे विशेष हॉलच्या भिंतीची जाडी सोळा फूट आहे त्यांतून अडीच फूट रुंदीचा जिना काढला आहे आतून वरच्या बाजूला चारी बाजूने गॅलरी आहे सर्व बांधकाम भरीव असून लाकूड अजिबात वापरलेले नाही

इमामबारात दोन कबरी आहेत एक नबाब आसफ-औद-दौलाची व दुसरी त्याच्या बेगमेची कबरीसमोर नबाबांच्या मुकुटाची नकली प्रतिकृती आहे कबरीभोवती चांदीचे रेलींग व वेलवेटचे आच्छादन आहे हॉलमध्ये रंगीबेरंगी झुंबरे दिसतात मोहरमच्या वेळी रोषणाई करून ती प्रकाशमान करतात सकाळ संध्याकाळ येथे कुराणपठण चालू असते इमामबारा तीन मजली असून त्याला अनेक दरवाजे आहेत इमामबाराच्या डावीकडे ८४ पायऱ्यांच्या जिन्याने वरच्या मजल्यावर जाता येते. पंचेचाळीसाव्या पायरीवर गुप्त रस्ता असून तो भूलभुलैया म्हणून ओळखला जातो गाईडशिवाय तेथे अगदी गोंधळल्यासारखे होते बाहेर येण्याचा मार्ग लवकर सापडत नाही

तीनशेतीन फूट लांबीच्या गॅलरीच्या बांधकामात ध्वनितंत्र अचूक सांभाळले आहे गाईडने एका टोकाला कागद फाडला तर दुसऱ्या टोकाला उभे असलेल्या आम्हाला कागद फाडल्याचा आवाज स्पष्टपणे ऐकू आला विजापूरच्या गोल-घुमटाची आठवण झाली टेलीफोनप्रमाणे आवाज स्पष्ट ऐकू आला इमाम-बाराचे वैशिष्टच म्हणजे हॉलच्या मध्यबिंदूपासून दूर पाहिले की मुख्य प्रवेशद्वारासमोरील रस्त्याचा मध्यबिंदू दिसतो त्यामुळे हॉलच्या गॅलरीत मध्यभागी उभे राहिल्यावर बाहेरून येणारा माणूस अचूक टिपला जातो

शेवटी इमामबाराच्या तिसऱ्या मजल्यावर आलो तेथे येण्यासाठी एक डायरेक्ट मार्ग आणि आणखी पाच मार्ग आहेत तेथून जुन्या लखनौचे विहंगम दृश्य दिसते तसेच लक्ष्मणटिळा हा शहराचा प्राचीन मध्यभाग दिसला अयोध्येचा राजा प्रभु रामचंद्राचा भाऊ लक्ष्मण याने लखनौ वसवले होते पुराणकाळात ते 'लक्ष्मणपूर' म्हणून ओळखले जाई शहराच्या मध्यभागी असलेला टेकाडासारखा भाग आजही लक्ष्मणटिळा म्हणून ओळखला जातो दूरवर गोमती नदीही दिसली.

हा इमामबारा आज बऱ्याचशा ढासळलेल्या अवस्थेत आहे. अनेकठिकाणी दुरुस्तीची आवश्यकता आहे

बडा इमामबाराच्या बाजूला मोठी विहीर आहे या विहीरीच्या पाण्यानेच या इमामबाराचे बांधकाम पूर्ण करण्यात आले गोमती नदीचे पाणी वाढले की विहिरीचेही पाणी वाढते विहिरीतील पाणी पारदर्शक व स्वच्छ, नितळ असून वरून नाणे टाकले की खाली तळाला दिसते या विहिरीच्या बाजूला पडक्या अवस्थेतील तीनमजली इमारत आहे विहिरीमुळे हे 'समर हाऊस' उन्हाळ्यात शीतल हवेने व्यापून जायचे बडा इमामबाराच्या प्रवेशद्वारातून बाहेर पडताना खत वाटत होती, की एवढे मोठे ऐतिहासिक स्मारक डागडुजीअभावी ढासळणार व नबाबांची उरली सुरली स्मृती घालविणार काय ?

इमामबाराच्या चारही बाजूला पूर्वी चार भव्य दरवाजे होते त्यापैकी एकच पश्चिमेला अस्तित्वात आहे त्याचे नाव रुमी दरवाजा हा दरवाजा म्हणजे कॉन्स्टॅन्टिनोपल येथील एका दरवाजाची प्रतिकृती होती रुमी दरवाजा सहा फूट उंच असून कमानीवर नक्षीकाम आहे दरवाजाखालून गुप्तमार्ग असून तो थेट आग्र्याला जातो असे म्हणतात इमामबाराजवळ मच्छीभवन राजवाडा आहे. लखनौचा सुभेदार सादतखान याने उभारलेल्या व पूर्वी पचमहाल म्हणून ओळखल्या जाणाऱ्या या राजवाड्यात सध्या वैद्यकीय महाविद्यालय आहे वास्तुशिल्पदृष्ट्या हा राजवाडा प्रेक्षणीय आहे

टांगा आता गोमती नदीच्या किनाऱ्याकिनाऱ्याने निघाला काही वर्षांपूर्वी गोमती नदीला महापूर आल्याने शहरात पाणी पसरून नुकसान झाले होते त्यामुळे गोमतीच्या काठी बांध घातलेला दिसला नदी व रस्ता यामध्ये चांगले बगीचे असून त्याला पतंगपार्क, गौतमबुद्ध पार्क, हाथीपार्क, शहीद पार्क, ग्लोब पार्क अशी नावे दिली आहेत गोमती नदीसमोरील रेसिडेन्सीच्या आवारात प्रवेश करताना मन इ स १८५७ च्या स्वातंत्र्यसमराच्या आठवणींनी उचंबळून आले सन १७५३ मध्ये ब्रिटिश रेसिडेंटच्या निवासासाठी नबाब सादत अलीखानने या भागात वास्तू उभारल्या रेसिडेन्सीचे आवार दोन मैलांचे आहे त्याकाळात येथे त्रेपन्न इमारती होत्या बेली नावाचा इंग्रज अधिकारी क्रमांक एकच्या इमारतीत रहात होता बारा नंबरची इमारत बेगमकोठी नावाने प्रसिद्ध होती. आता फक्त पाचच इमारती शिल्लक आहेत बाकीच्या नष्ट झाल्या १८५७ साली सुसज्ज अशा ब्रिटिश सेनेशी स्वातंत्र्यप्रेमी लोकांनी ८९ दिवस निकराने झुंज दिली. बंदुकीच्या फैरीवर फैरी उडत असत आजही भिंतीवर गोळ्यांची निशाणी दिसून येते येथील एका इमारतीतील म्युझियममध्ये जुन्या वस्तु जतन करून ठेवल्या आहेत त्यावेळी झालेल्या लढाईचे मॉडेल तेथील गाईडने समजावून सांगितले

हत्तीच्या सोंडेत धातूचे गोळे ठेवत हत्ती ते गोळे वेगाने फिरवून मारीत त्यामुळे अनेक स्वातंत्र्य सैनिक मारले गेले लढाईत फाटलेला युनियन जॅकचा तुकडाही फ्रेम करून ठेवला आहे लढाईत हेन्री लॉरेन्स व अनेक इंग्रज ठार झाले इमारतीच्या तळघरात पायऱ्या उतरून आलो येथे इंग्रजांची बायका मुले दोन महिने सहवीस दिवस लपून राहिली होती भिंतीवर तोफेच्या गोळ्याच्या माऱ्याच्या खुणा आजही दिसतात एऱ्हवी विश्रांतीसाठी म्हणून थंडगार अशा या तळघराचा वापर करण्यात येई पण नबाबाच्या सैन्याने वेढा घातल्यावर मात्र त्याना घाम फुटला असेल रेसिडेन्सीत १७२० सैनिक, १२८० बायका मुले असे तीन हजार इंग्रज अडकून पडले होते व बाहेरच्या जगाला अतरले होते. त्यापैकी ४८५ इंग्रज, २३७ स्त्रिया व २६० मुले मारली गेली मेजर जनरल सर जॉनची पत्नी ज्युलीयाही मारली गेली अनेक जण घायाळ झाले होते, रेसिडेन्सीत भयानक दुर्गंधी पसरली होती

तत्कालीन बेसमेंट हॉल, बँक्वेट हॉल, रिसेप्शन रूम पूर्वीच्या वैभवाची कल्पना देतात तर भग्न इमारती स्वातंत्र्यसैनिकाच्या जिद्दीची १८५७ चे स्वातंत्र्य युद्ध उखडून काढण्यासाठी इंग्रज सेनापती आऊटरॅमने प्रथम लखनौच्या आलम बागेत तळ दिला होता. तर शिपायाच्या नेत्यानी प्रतिकारासाठी तोफाचे मोर्चे, घराघरातून बंदुकी सज्ज ठेवल्या या लढाईत फिरंग्यांना मारायचे किंवा आपण मरायचे असा निश्चय केलेल्या हिंदूनी गंगेची व मुसलमानांनी कुराणाची शपथ घेतली होती कॅम्बेलच्या नेतृत्वाखाली ३१,००० सैन्य व १८० तोफाचा सरंजाम आला जोडीला नेपाळातून जंगबहादूर राणाने स्वत नेतृत्व करून गुरखा सैन्य इंग्रजांच्या मदतीला दिले त्याची परतफेड म्हणून जंगबहादूरवर सन्मानाचा वर्षाव झाला गोमती नदीच्या काठी लांबवर पसरलेले राजवाडे, बागा वगैरे ठिकाणे शिपायांनी भरली होती. कॅम्बेलने हे स्वातंत्र्ययुद्ध मोडून काढण्याकरता सर्व तयारी केली होती नदी तरण्याची साधने बरोबर ठेवली होती गोमतीवर पूल बांधून नदीपलीकडून शहरातील सैन्याशी तो भिडला, बेगम कोठीवर शिपायानी इंग्रजाच्या चढाईला तोंड दिले तेथील लढाईत सहाशेवर शिपायाना वीरमरण आले बेगम कोठीच्या लढाईत इंग्रजाची मोठी हानी झाली दिल्लीच्या हुमायून कबरीत मोगल साम्राज्याच्या शेवटच्या वारसाला ठार मारणाऱ्या ब्रिटिश कॅप्टन हडसन याला या युद्धात ठार मारून सूड उगवण्यात आला नतर इंग्रजांनी इमामबारा काबीज केला कैसरबागही जिंकली शिपायानी इंग्रजांना प्रखर प्रतिकार केला पण इंग्रजानी व गुरखा सैनिकानी लूटालूट केली राजवाड्यातील सोने, चांदी, हिरे, पाचू, माणिक, मोती अलंकार यांची लूट केली स्वयपाकाची भांडी, वाद्ये, नर्तकींचे पोषाख, मेजसुद्धा लुटून नेले कोटयवधी रुपयांची लूट झाली महाल उजाड झाले.

लखनौच्या वैभवाला उतरती कळा लागली लखनौची बेगम हजरत महल परागंदा होऊन नेपाळमध्ये गेली

रेसिडन्सी आवारात ब्रिटीशांनी इंग्रज सेनापतीच्या गौरवार्थ उभारलेले स्मारकस्तंभ व भग्न इमारती ब्रिटीशांच्या क्रौर्याची आठवण करून देतात व भारतीयांच्या स्वातंत्र्यप्रेमाची साक्ष देतात १८५७ साली रेसिडेन्सीच्या आवारातील ज्या भूमीवर रक्ताचे पाट वाहिले तेथे आज हिरवळ व बगीचा आहे रेसिडेन्सीच्या आवारातून बाहेर पडताना स्वातंत्र्य संग्रामात लढा देताना सेनापती तात्या टोपे, नानासाहेब पेशवे, झाशीची राणी यांनी केलेले बलीदानही आठवले

रस्ता ओलांडून गोमती नदीच्या किनारी असलेला संगमरवरी 'शहीद स्तंभ' पाहण्यास आलो १९५७ साली स्वातंत्र्यसमर शताब्दीच्या वर्षात पं जवाहरलाल नेहरू यांच्या हस्ते हा स्तंभ उभारण्यात आला गोमती नदीच्या किनारी हे स्मारक उभारण्यात मोठे औचित्य दाखवले आहे कारण याच किनाऱ्यावर अनेक हुतात्म्यांनी आपले रक्त सांडले हुतात्म्यांच्या बलीदानाने पुनित झालेले हे स्थान धार्मिक स्थानाइतकेच पवित्र वाटत होते

शहीद स्तंभ पाहून झाल्यावर टांगेवाल्याने लखनौच्या सेंट्रल ड्रग इन्स्टिटयूटच्या आवाराजवळ टांगा थांबवला. सादत अलीखानच्या काळात 'छत्र मंझिल' नावाने ओळखला जाणारा हा राजवाडा त्या काळात ऐश्वर्याने तळपत होता असे म्हणतात की अरेबियन नाईटस्‌मध्ये वर्णन केलेल्या खलिफाच्या राजवाड्यासारखा हा राजप्रासाद झगमगाटाने उजळून जायचा राजवाड्याचा चकाकणारा घुमट छत्रीच्या आकारासारखा आहे व मध्यभागी तांब्याच्या पत्र्याने मढवलेला आहे पूर्वी त्यातील शाही संगमरवरी स्नानघरे उंची हिरे माणकांनी मढवलेली होती आवारात आकर्षक कारंजी होती तत्कालीन नबाबी वैभव आता केवळ कल्पना करण्याचा विषय आहे छत्र मंझिलशेजारी लाल बारादरी आहे य प्रासादात पूर्वी इंग्रज रेसिडेंटच्या हस्ते शाही दरबार भरवून नबाबांना तख्तावर बसवण्याचा कार्यक्रम होई

लखनौचा तिसरा इमामबारा शहानजफ इमामबारा त्यात अवधचा पहिला राजा गाझिउद्दीन हैदर व त्याच्या बेगमेची कबर आहे या इमामबारात पूर्वी सोन्याचे सिंहासन होते इंग्रजांनी ते लुटून नेले घुमटाकार छताला आतून सोने आहे तेही काढण्याचा इंग्रजांचा विचार होता पण इमारत पडेल म्हणून तो विचार त्यांनी सोडून दिला तेथे बादशहाची कबर आहे तसेच आणखी एक मोठी व लहान कबर आहे बादशहाची एक बेगम मुबारक महल मूळ युरोपियन व नंतर धर्मांतर करून मुस्लीम झाली म्हणून तिचा मान मोठा असल्याने तिची कबर मोठी तर दुसरी लहान सरताजमहल बेगमची आहे इमामबाराची संगम-

खरी फरसबंदी आकर्षक आहे आत परदेशातील सुंदर झुंबरे आहेत मोहरमला ती प्रकाशमान करतात बेल्जियमचे आरसेही प्रेक्षणीय आहेत बादशहा व वजि-राच्या फोटोतील चेहऱ्यांची दृष्टी आपण ज्या बाजूला वळू तिकडे दिसते त्याच्या टोपीवर हात ठेवला की ते इंग्रज वाटतात हे वैशिष्टच

परतताना हजरतगंज भागात तपकिरी रंगाच्या दगडात बांधलेली विधान-सभेची इमारत दिसते १९२८ साली अठरा लक्ष रुपये खर्चून बांधलेली ही इमा-रत लखनौच्या वैभवात भर घालते लखनौच्या ऐतिहासिक स्मारकाचा फेरफटका पूर्ण झाला होता आता पहायचे राहिले होते नवाबाच्या विलासी जीवनाचे साक्षीदार–बगीचे ! शेवटचा नबाब वाजिदअलीशाह याने आपल्या राजवटीत शेवटचे प्रासाद बांधले ते कैसरबागेत ! १८५७ सालच्या स्वातंत्र्यसमरात त्याचा बराचसा नाश झाला राजाच्या करमणुकीसाठी बांधलेल्या अनेक लहानमोठ्या बारादरी–बारा दरवाजे असलेले मंडप आहेत तेथील बगीच्यात असलेला छोटा कॅनॉल शेवटच्या नबाबाच्या काळात गुलाबजलाने भरलेला असे ते गुलाबजल नबाबाच्या शाही स्नानासाठी वापरले जाई

'बनारसी बागेत' सध्या प्राणीसंग्रहालय आहे इंग्रज राजा प्रिन्स ऑफ वेल्स याच्या लखनौ भेटीच्या स्मरणार्थ १९२२ साली ते सुरू झाले अनेक पशु-पक्षी असलेल्या या प्राणीसंग्रहालयाच्या आवारात एक म्युझियम असून त्यात लखनौच्या व आसपासच्या कारागीरांनी तयार केलेल्या अनेक वस्तु आकर्षकरीत्या मांडून ठेवल्या आहेत तळमजल्यात पेंढा भरलेले विविध वन्य पशुपक्षी नैसर्गिक रीत्या ठेवले आहेत कॅंटोन्मेंट भागातील 'दिलखुष बाग' नबाबकालीन शिकारीचे ठिकाण होते 'आलमबागेत' शेवटच्या नबाबाच्या आवडत्या बेगमचा दुमजली महाल होता महालाच्या कडेला चार अष्टकोनी मनोरे आहेत १८५७ सालच्या स्वातंत्र्यसमरात जखमी झालेल्या ब्रिटिश सैनिकांच्या देखभालीसाठी व शुश्रुषेसाठी या जागेचा वापर करण्यात आला 'सिकंदरबाग' ही शेवटच्या नबाबाच्या सिकंदरबेगम हिच्या स्मरणार्थ उभारली तेथे पूर्वी समरपॅलेस होता हल्ली तेथे नॅशनल बोटॅनिकल गार्डन आहे सिकंदरबगीच्यात स्वातंत्र्यसमरात किमान दोन हजार वीरांनी बलिदान केले होते 'विलायती बाग' ही शेवटच्या नबाबाच्या काळात अंतःपुरातील बेगमांच्या खास करमणूकीसाठी उपयोगात आणली जाई 'चार बाग' या ठिकाणी लखनौचे रेल्वे स्थानक आहे बादशाहबागमधील सुंदर बगीच्यात दाट झाडी व हिरवळ आहे आज तेथे लखनौ विद्यापीठाचा परिसर आहे

सर्व बगीचे, राजवाड्यांचे मीनार, घुमट, जुने अवशेष लखनौच्या लुप्त झालेल्या खानदानी वैभवाचे जरी साक्षीदार असले तरी पौर्वात्य कलासंस्कृतीच्य भव्य वारसाचे प्रतीक आहेत जुन्या लखनौचा ढंग वेगळा होता त्यावेळचे

पोषाखही खास होते त्यात डौल व नजाकत दोन्ही होती त्याकाळी अनेक स्वादिष्ट पदार्थांसाठी लखनौ प्रसिद्ध होते नबाबाच्या दररोजच्या सहा परोटचा-साठी पाच किलो साजूक तूप लागे दिल्ली बिर्याणीसाठी प्रसिद्ध तर लखनौ-सारखा पुलाव सर्व दुनियेत मिळणार नाही अशी ख्याती होती नबाबाच्या मुलाच्या लग्नात वेगवेगळे सत्तर प्रकाराचे पुलाव होते अत्यंत स्वादिष्ट जेवण करावे, खुशबूदार तांबूल सेवन करावे, उंची अत्तर व उंची पोषाख करून संध्या-काळी बगीच्यात रमावे, मद्यसेवन करून रात्र गायिका, नर्तिका, तवाइफा यांच्या कोठ्यावर घालवावी नेत्रात सुरमा घातलेल्या नर्तकींच्या मैफलीत चांदीचा हुक्का ओढत इष्काची गाणी ऐकावी, बेहोषीने केलेल्या अदाकारीची तारीफ करावी, असा तो काळ होता विलासप्रियतेला मर्यादा नव्हती लखनौची जुनी शान नाहीशी झाली असली तरी खानदानी चालीरीतींचा पीळ कायम आहे म्हणूनच आजही लखनौत झब्बा कुडता, सलवार टोपी घातलेले बुजुर्ग आणि बुरखाधारी स्त्रिया वावरताना दिसतात त्यांच्या चालण्यातही एक प्रकारची खानदानीपणाची झलक दिसते, बोलण्यात अजीजी असते

स्टेशनवर परतताना नव्या हजरतगंज या मध्यवर्ती फॅशनेबल बाजारात लखनौचे वैशिष्ट्य असलेल्या चिकन एम्ब्रॉयडरी साडीची तसेच झब्ब्याची खरेदी केली पाहता पाहता सूर्य मावळू लागला मावळतीच्या सूर्याची तांबूस पिवळी किरणे लखनौच्या जुन्या घुमटावर सोनेरी रंगाचा मुकूट चढवीत होती

टांगेवाल्याने सर्व शहर, प्रेक्षणीय स्थळे व्यवस्थित दाखविली होती घाई केली नाही त्यामुळे खूष होऊन त्याला बक्षिसी दिली त्याने अदबीने सलाम केला रात्रीचे जेवण स्टेशनवरच घेतले रात्री बाराला मध्यरात्री गोरखपूर एक्स्प्रेसने एके काळच्या नबाबाच्या नगरीचा– लखनौचा निरोप घेताना दोन ओळी आठवल्या

**ऐ लखनौ, तुझे मेरा सलाम है ।**
**तेरा इनाम दुसरा जन्नतका नाम है ।**

*



महाराजाधिराज वीरेंद्र वीर विक्रम शाहदेव,



राजकुमार दीपेंद्र,




महाराणी ऐश्वर्या राज्यलक्ष्मीदेवी शाह



गरूड मूर्ती
काष्ठमडप
काठमाडू

↓ हनुमान ढोका



# गोरक्षनाथांचे गोरखपूर

लखनौ–गोरखपूर २७५ कि. मी. अंतराचा एका रात्रीचा प्रवास बर्थ रिझर्वेशनमुळे आरामात झाला. सकाळी सातच्या सुमाराला जाग आली गाडी बस्ती नावाच्या स्टेशनवर उभी होती. या गावी गौतमबुद्धाने एक दिवस बस्ती म्हणजे मुक्काम केला होता सकाळी आठ वाजता गोरखपूर स्टेशनवर गाडी विसावली

गोरखपूर हे उत्तरपूर्व रेल्वेचे मुख्य रेल्वे स्टेशन राप्ती व रोहिणी नदीच्या संगमावर राप्तीच्या डाव्या तीराला हे शहर वसले आहे अतिशय प्राचीन अशा या गावाचा प्राचीन बौद्धवाङ्मयात रामगाम, रामगढ या नावाने उल्लेख येतो नंतर योगी गोरक्षनाथांचे येथे वास्तव्य म्हणून गोरखपूर नाव पडले

रेल्वे विश्रामालयात जागा मिळाली नाही म्हणून स्टेशनसमोरच्या स्टँडर्ड या चांगल्या हॉटेलमध्ये आलो प्रथम स्नान आटोपून चहा घेतला. गोरखपूरला दोन गोष्टींची चौकशी करायची होती एक तर नेपाळ सरहद्दीपर्यंत जाण्यासाठी बस केव्हा आहे व दुसरे म्हणजे गोरखपूर–सिलीगुडी रेल्वे प्रवासाचे आठ दिवसा- [illegible] चौकशीला गेली. स्टेशनजवळच बस स्थानक आहे एक दीड तासाने ते परत आले तेव्हा खुषीत

होते कारण महत्त्वाची दोन्ही कामे झाली होतो गोरखपूरहून सकाळी सहापासून तासातासाच्या अतराने सुनौलीकडे बसेस धावतात गोरखपूरहून सुनौली आहे १०० कि मी अंतरावर एक्स्प्रेस बसेस तीन तासात जातात सुनौली हे भारत हद्दीतील शेवटचे गाव नेपाळची सरहद्द तेथे लागूनच आहे नेपाळमध्ये एक आठवडा राहून परतणार होतो त्यादृष्टीने आठवड्यानतरच्या तारखेचे गोरखपूर-सिलीगुडी रिझर्वेशनचे महत्त्वाचे काम झाले होते सिलीगुडीहून दार्जिलींगला जाऊन तीन दिवस मुक्काम करायचा होता व न्यू जलपैगुडीला परतायचे होते. म्हणून पुढील प्रवासासाठी न्यू जलपैगुडी ते हौरा या दार्जिलिंग मेलच्या रिझर्वेशन-साठी तारही दिली होती सकाळचे अकरा वाजले होते सगळयानाच भूक लागली होती गोरखपूरच्या बाजारच्या रस्त्यावरील हॉटेलमध्ये शाकाहारी जेवण मिळाले. जेवणानतर स्टेट बँकेत ट्रॅव्हलर्स चेक वटवले

गोरखपूरच्या धावत्या भेटीत ज्यांच्या नावावरून गोरखपूर हे नाव या गावाला पडले त्या गोरक्षनाथांच्या मंदिरात दर्शनाला गेलो नाथयोगी सप्रदायात आदिनाथ, मत्स्येंद्रनाथ, गोरखनाथ हे तीन महान गुरू समजले जातात. गोरक्ष-नाथ हे मत्स्येंद्रनाथाचे शिष्य त्याचे वास्तव्य हिमालयात होते त्याचा काळ नवव्या दहाव्या शतकाचा मानला जातो सध्याच्या गोरक्षनाथ मदिराच्या जागी पूर्वीचे मूळ मदिर होते तपोवनातील या जागेत गुरू गोरखनाथानी सदेश दिला होता. सध्याचे मदिर सगमरवरी असून त्यात गोरक्षनाथांची आसनस्थ मूर्ती आहे बाजूला एका झाडाखाली धुनी पेटवलेली दिसली ही अखड धुनी आहे गुरू गोरक्षनाथ याच ठिकाणी धुनी पेटवत असत येथे त्यांची तपोभूमी होती पन्नास एकर क्षेत्रात हा परिसर आहे. १९६४ साली बांधलेल्या या मदिराची आधुनिक शिल्पकृती वाखाणण्यासारखी आहे रंगीबेरगी सगमरवराचा मुबलक वापर केला आहे आवारात गणेश, कालीमाता, हनुमान, भैरव तसेच महत ब्रह्मनाथ, दिग्विजयनाथ, योगीराज गंभीरनाथ यांचीही समाधी व मदिरे आहेत नाशिकच्या मुक्तिधाम मदिरासारखे हे मदिर व त्याचा परिसर आहे तेराव्या शतकात अल्लाऊद्दीन खिलजीने व नतर औरगजेबाने मूळ मदिरावर हल्ला करून हानी पोहोचवली होती

भाविकांच्या मुक्कामाच्या सोयीसाठी आवारात अनेक खोल्या आहेत महंतासाठी निवासस्थान आहे साधूसाठी शातिनिवास नावाचे दुमजली निवास-स्थान आहे गोशाळा आहे सुदर हिरवळ, फुलांचा बगीचा, आंब्याची कैऱ्या लगडलेली झाडे, सुदर तलाव व त्यातील रंगीबेरगी कारजी यामुळे मन प्रसन्न होते येथील वाचनालयाचाही आवर्जून उल्लेख करायला हवा तेथे धार्मिक, तत्व-ज्ञानाची सदर्भ पुस्तके आहेत विक्रीचीही व्यवस्था आहे. महत श्री दिग्विजयनाथ

याच्या प्रेरणेनेच हा परिसर विकसित झाला हिंदू धर्माच्या भरभराटीसाठी ते प्रयत्नशील आहेत त्याची आणखी एक महत्त्वपूर्ण कामगिरी म्हणजे गोरखनाथ विद्यापीठाची त्यांनी स्थापना केली संस्कृत अध्ययनाची सोय केली हायर सेकंडरी शाळा, पॉलिटेक्निक संस्था तसेच डिग्री कॉलेजची स्थापनाही त्याच्याच प्रेरणेने झाली नाथयोगी सप्रदाय व तत्त्वज्ञान याविषयी इग्रजी, हिंदी पुस्तकेही मंदिराच्या ट्रस्टमार्फत प्रसिद्ध होतात गोरक्षनाथ मदिराच्या शात, स्वच्छ, पवित्र परिसरातून पाय निघता निघेना.

गोरक्षनाथ मदिरदर्शनानतर गोरखपूरच्या 'प्रेमचद भवन'ला भेट दिली सुप्रसिद्ध हिंदी लेखक प्रेमचद १९१६ मध्ये येथील ट्रेनिंग कॉलेजमध्ये पाच वर्षे शिकवीत होते दरम्यान गांधीजींचे असहकार आंदोलन सुरू झाले व त्यांनी प्रेरित होऊन १९२१ साली सरकारी नोकरीचा राजीनामा दिला. प्रेमचदजी गोरखपूरला ज्या घरात राहिले त्या वास्तूचे नाव प्रेमचदभवन आहे या घराच्या पश्चिमेला जुनी मशीद आणि ईदगाह आहे. ईदच्या दिवशी तेथे मोठा मेळा भरतो प्रेमचंदना त्यांच्या 'ईदगाह' या कथेची प्रेरणा येथेच मिळाली प्रेमचद-भवनच्या समोर वडाचा एक मोठा वृक्ष आहे याच वृक्षाच्या दाट सावलीत बसून प्रेमचदानी 'गोदान' या प्रसिद्ध कादबरीची सुरुवात केली प्रेमचद-भवनाच्या आवारात त्याचा छोटा पुतळा आहे त्यांच्या पत्नी शिवरानीदेवी यांनी १९५८ मध्ये या भवनचा शिलान्यास केला होता प्रेमचदभवनचे महत्त्व ओळखून खरे म्हणजे येथे प्रेमचदसग्रहालय व्हायला हवे या भवनजवळची मोकाट जनावरे, रिक्षाचा अड्डा, गजबज पाहून वाईट वाटले

प्रेमचदभवन पाहून शेवटी गोरखपूरच्या सुप्रसिद्ध गीताप्रेसला भेट देण्या-साठी पोहोचलो उशीर झाल्याने गीताप्रेसची नीट माहिती घेता आली नाही याबद्दल रुखरुख वाटली स्वस्त किमतीत धार्मिक वाङ्मय भारतात दूरवर पोहोचविण्याची महत्त्वपूर्ण कामगिरी गीताप्रेस खूप वर्षांपासून करीत आहे गोरखपूरचे राहूल सांकृत्यायन म्युझियमही वेळेअभावी पाहता आले नाही चार लाख लोकवस्तीचे गोरखपूर प्रसिद्ध आहे हातमागाच्या चादरी, टेबलक्लॉथ वगैरेंसाठी! सध्याकाळी सहाच्या सुमारास मुक्कामी पोहोचलो रात्रीचे जेवण स्टेशनवरच घेऊन हॉटेलवर आलो नेपाळमध्ये जास्त सामान न्यायला नको व आठवडाभराने परत गोरखपूरला यायचे होते म्हणून दोन सूटकेस व एक होल्डॉल गोरखपूर स्टेशनच्या क्लोकरुममध्ये ठेवायचे ठरवले सकाळी सातच्या बसने गोरखपूर सोडायचे होते त्यादृष्टीने बॅगा व्यवस्थित भरल्या. रात्री नऊच्या सुमारास सर्वजण निद्राधीन झालो

❋

## काठमांडूच्या वाटेवर

गोरखपूरहून नेपाळ सीमारेषेवरील भारतीय हद्दीतील सुनौलीला पोहो-चण्यासाठी सकाळी सातची बस पकडली त्या अगोदर दोन सूटकेस व होल्डॉल यशवत व उदयनी क्लोकरूममध्ये नेऊन ठेवले होते. सामान अधिकच सुटसुटीत झाल्याने बरे वाटत होते उत्तर प्रदेश रोडवेजच्या बसपेक्षा टूरिस्ट बस वेगवान असून शभर कि मी अंतराचा हा प्रवास तीन तासात सपतो वाटेत नौतनवा हे मोठे गाव लागते भारतीय हद्दीतील मीटरगेजवरील हे शेवटचे रेल्वेस्टेशन गोरखपुर–नौतनवा हा प्रवास ८२ कि मी चा असला तरी रेल्वेने पाच तास लागतात नौतनवाहून सुनौलीला बसने अर्ध्या तासातच पोहोचलो

सुनौलीला सकाळी दहाला पोहोचलो सायकल रिक्षावाल्यांचा तसेच बस एजटाचा गराडा पडला व्यवस्थित सुसज्ज स्टँड नाही, चांगली हॉटेल्स नाहीत आणि एजटाचा ससेमिरा यामुळे पर्यटक गोंधळून जातात रिक्षावाले म्हणत, पाच रुपयात बॉर्डर क्रॉस करून सामान पोहोचवू दोन रिक्षा करा तर बस एजट म्हणाले, काठमांडूपर्यंत तिकीट काढून देतो पुढच्या सीट्स मिळवून देतो यशवंतनी त्या सर्वांच्या तावडीतून सुटका करून घेतली ते बधत नाहीत हे पाहून सर्वजण आम्हाला त्रास देऊ लागले पण आम्ही काहीही न बोलता बॅगा घेऊन सरळ चालायला लागलो हे पाहताच सर्वजण पागले गाड्यांच्या गर्दीतून वाट काढीत

कसेबसे एका हॉटेलमध्ये येऊन चहा-ब्रेड घेतला तोपर्यंत यशवत व उदय बॉर्डर क्रॉस करून गेले नेपाळ हद्द व भारतीय हद्द यात पंचवीस फूटाचा पट्टा आहे. नेपाळ हद्दीवर मोठे गेट असून त्यावर शांतिद्वार असे लिहिले आहे गौतमबुद्धाचे दोन मोठे टपोरे डोळे त्यावर काढले आहेत नेपाळमध्ये प्रवेश करण्याची उत्सुकता वाढू लागली अर्ध्या तासाने दोघेजण परत आले नेपाळ हद्दीत जवळच नेपाळ रॉयल बँक आहे तेथे यशवतनी भारतीय एक हजार रुपये देऊन १४५० नेपाळी रुपये आणले नेपाळच्या हद्दीतील स्टँड तेथे जवळच असून भारतीय हद्दीतून तेथे पोहोचायला पाच-दहा मिनिटे लागतात तेथे बस उभी आहेच असे यशवतनी म्हणताच प्रत्येकाने आपापली बॅग उचलली व निघालो नेपाळ सरहद्दीकडे बॉर्डर क्रॉस करताना कोणीही विचारले नाही बॅगांमधील सामानाचे चेकींगही केले नाही किंवा नेपाळ हद्दीत प्रवेश करण्यासाठी नगरहून आणलेले ओळखपत्र, डॉक्टराचे सर्टिफिकेट हेही कोणी पाहिले नाही पण अशी प्रमाणपत्रे जवळ असलेलीच बरी काठमाडूकडे जाणाऱ्या बसमध्ये बसलो गर्दी विशेष नव्हती माणशी पंचावन्न रुपये (नेपाळी) तिकीट पडले एजटामार्फत तिकीट काढले तर माणशी पाच रुपये विनाकारण भुर्दंड पडतो त्यामुळे एजटाच्या फसव्या, गोड बोलण्याला मुळीच दाद दिली नाही ते बरेच झाले असे वाटले

दुपारचे बारा वाजले सूर्यराज ढगाआड लपल्याने उन्हाचा पत्ता नव्हता हवा थडगार होती नेपाळच्या सरकारी बसचा प्रवास सुरू झाला उल्का-उदयने भारतीय हद्दीकडे मागे पाहून बाय् बाय् केले परदेश गमनाचा मान त्यांना लहान वयात मिळाला होता पाच कि मी प्रवास सपल्यावर बस भैरहवा गावी थांबली. भैरहवा हे नेपाळमधील लुम्बिनी जिल्ह्याचे ठिकाण असून भैरहवाचे नवे नाव आहे सिद्धार्थनगर ! भगवान गौतम बुद्धाचे जन्मस्थान लुम्बिनी भैरहवाहून बावीस कि मी अतरावर आहे भैरहवा, काठमाडू हा सुमारे १७५ कि मी अंतराचा प्रवास असून काठमाडू ते भैरहवा अशी रॉयल नेपाल एअरलाईन्सची दररोज विमानसेवा उपलब्ध आहे भैरहवाला बस पंधरा वीस मिनिटे थांबली स्टँडच्या बाजूला अनेक दुकानात नेपाळी स्त्रिया दुकानात विक्री करताना दिसल्या

भैरहवानतर बुटवल या मोठ्या गावी बस अर्धा तास थांबली बुटवलचा बाजारचा रस्ता मोठा आहे बुटवल हे नेपाळच्या तराई प्रदेशातील मोठे गाव असून तेथून एक फाटा 'पोखरा व्हॅली' या प्रसिद्ध पर्यटन केंद्राकडे जातो सुनौली-भैरहवा-बुटवल-पोखरा हा १८३ कि मी अंतराचा 'सिद्धार्थ राजमार्ग' भारताच्या सहकार्याने १९७१ साली बांधला आता बस तराई प्रदेशातून वेगाने काठमाडूकडे धावू लागली तराई प्रदेशातील हा पूर्व-पश्चिम रस्ता 'महेंद्र राजमार्ग' या नावाने ओळखला जातो ब्रिटन, भारत, अमेरिका, रशिया

## काठमांडूच्या वाटेवर

गोरखपूरहून नेपाळ सीमारेषेवरील भारतीय हद्दीतील सुनौलीला पोहो-चण्यासाठी सकाळी सातची बस पकडली त्या अगोदर दोन सूटकेस व होल्डॉल यशवत व उदयनी क्लोकरूममध्ये नेऊन ठेवले होते सामान अधिकच सुटसुटीत झाल्याने बरे वाटत होते उत्तर प्रदेश रोडवेजच्या बसपेक्षा टूरिस्ट बस वेगवान असून शभर कि मी अतराचा हा प्रवास तीन तासात सपतो वाटेत नौतनवा हे मोठे गाव लागते. भारतीय हद्दीतील मीटरगेजवरील हे शेवटचे रेल्वेस्टेशन गोरखपूर–नौतनवा हा प्रवास ८२ कि मी चा असला तरी रेल्वेने पाच तास लागतात. नौतनवाहून सुनौलीला बसने अर्ध्या तासातच पोहोचलो

सुनौलीला सकाळी दहाला पोहोचलो सायकल रिक्षावाल्याचा तसेच बस एजंटांचा गराडा पडला व्यवस्थित सुसज्ज स्टँड नाही, चागली हॉटेल्स नाहीत आणि एजटाचा ससेमिरा यामुळे पर्यटक गोंधळून जातात रिक्षावाले म्हणत, पाच रुपयात बॉर्डर क्रॉस करून सामान पोहोचवू दोन रिक्षा करा तर बस एजट म्हणाले, काठमाडूपर्यंत तिकीट काढून देतो पुढच्या सीट्स मिळवून देतो यशवतनी त्या सर्वांच्या तावडीतून सुटका करून घेतली ते बधत नाहीत हे पाहून सर्वजण आम्हाला त्रास देऊ लागले पण आम्ही काहीही न बोलता बॅगा घेऊन सरळ चालायला लागलो हे पाहताच सर्वजण पांगले गाड्यांच्या गर्दीतून वाट काढीत

कसेबसे एका हॉटेलमध्ये येऊन चहा–ब्रेड घेतला. तोपर्यंत यशवंत व उदय बॉर्डर क्रॉस करून गेले नेपाळ हद्द व भारतीय हद्द यात पधरावीस फूटाचा पट्टा आहे नेपाळ हद्दीवर मोठे गेट असून त्यावर शांतिद्वार असे लिहिले आहे गौतमबुद्धाचे दोन मोठे टपोरे डोळे त्यावर काढले आहेत नेपाळमध्ये प्रवेश करण्याची उत्सुकता वाढू लागली अर्ध्या तासाने दोघेजण परत आले नेपाळ हद्दीत जवळच नेपाळ रॉयल बँक आहे तेथे यशवतनी भारतीय एक हजार रुपये देऊन १४५० नेपाळी रुपये आणले नेपाळच्या हद्दीतील स्टँड तेथे जवळच असून भारतीय हद्दीतून तेथे पोहोचायला पाच–दहा मिनिटे लागतात तेथे बस उभी आहेच असे यशवतनी म्हणताच प्रत्येकाने आपापली बॅग उचलली व निघालो नेपाळ सरहद्दीकडे बॉर्डर क्रॉस करताना कोणीही विचारले नाही बॅगामधील सामानाचे चेकीगही केले नाही किंवा नेपाळ हद्दीत प्रवेश करण्यासाठी नगरहून आणलेले ओळखपत्र, डॉक्टराचे सर्टिफिकेट हेही कोणी पाहिले नाही पण अशी प्रमाणपत्रे जवळ असलेलीच बरी काठमाडूकडे जाणाऱ्या बसमध्ये बसलो. गर्दी विशेष नव्हती माणशी पंचावन्न रुपये (नेपाळी) तिकीट पडले एजटामार्फत तिकीट काढले तर माणशी पाच रुपये विनाकारण भुर्दंड पडतो त्यामुळे एजटाच्या फसव्या, गोड बोलण्याला मुळीच दाद दिली नाही ते बरेच झाले असे वाटले

दुपारचे बारा वाजले सूर्यराज ढगाआड लपल्याने उन्हाचा पत्ता नव्हता हवा थडगार होती नेपाळच्या सरकारी बसचा प्रवास सुरू झाला उल्का–उदयने भारतीय हद्दीकडे मागे पाहून बाय् बाय् केले परदेश गमनाचा मान त्याना लहान वयात मिळाला होता पाच कि मी प्रवास सपल्यावर बस भैरहवा गावी थावली. भैरहवा हे नेपाळमधील लुम्बिनी जिल्ह्याचे ठिकाण असून भैरहवाचे नवे नाव आहे सिद्धार्थनगर! भगवान गौतम बुद्धाचे जन्मस्थान लुम्बिनी भैरहवाहून बावीस कि मी अतरावर आहे भैरहवा, काठमाडू हा सुमारे १७५ कि मी अतराचा प्रवास असून काठमाडू ते भैरहवा अशी रॉयल नेपाल एअरलाईन्सची दररोज विमानसेवा उपलब्ध आहे भैरहवाला बस पधरा वीस मिनिटे थावली स्टँडच्या बाजूला अनेक दुकानात नेपाळी स्त्रिया दुकानात विक्री करताना दिसल्या

भैरहवानतर बुटवल या मोठ्या गावी बस अर्धा तास थावली बुटवलचा बाजारचा रस्ता मोठा आहे बुटवल हे नेपाळच्या तराई प्रदेशातील मोठे गाव असून तेथून एक फाटा 'पोखरा व्हॅली' या प्रसिद्ध पर्यटन केंद्राकडे जातो सुनौली–भैरहवा–बुटवल–पोखरा हा १८३ कि मी अंतराचा 'सिद्धार्थ राजमार्ग' भारताच्या सहकार्याने १९७१ साली बाधला आता बस तराई प्रदेशातून वेगाने काठमांडूकडे धावू लागली तराई प्रदेशातील हा पूर्व–पश्चिम रस्ता 'महेंद्र राजमार्ग' या नावाने ओळखला जातो ब्रिटन, भारत, अमेरिका, रशिया

'यांच्या सहकार्याने हा राजमार्ग बांधला आहे आजूबाजूला बेफाम जंगलतोडीमुळे झालेला उजाड प्रदेश दिसत होता हिमालयातील उच्च उच्च वृक्षांच्या जंगलाचा गेल्या तीस वर्षांत निम्मा सहार झाला नेपाळच्या ५५०० चौ मैलांपैकी ५७ टक्के प्रदेश जंगलाचा होता. आता फक्त तेवीस टक्के जंगल उरले आहे या माहितीची प्रचीती आली

बस आता नारायणी नदीच्या कडेकडेने धावू लागली नेपाळमधील काली गंडकी, त्रिशुलीचा प्रवाह म्हणजे नारायणी नदी ही नदी पुढे भारतात गंगा नदीला मिळते तिच्यावर भारताच्या सहकार्याने जलविद्युत्–प्रकल्पाचे काम चालू आहे नारायणगढ या जिल्ह्याच्या गावी बस चारला थांबली भूक लागल्या-मुळे पुन चहा ब्रेड घेतला. ड्रायव्हरही चहा घेऊन ताजातवाना झाला नारायण गढहून महेंद्र राजमार्गाने हितोंडा गावी रक्सोल–काठमांडू या त्रिभुवन राजमार्गाला पोहोचता येते

नंतर बस नारायणगढ–मुगलींग या एकतीस कि मी अंतराच्या नव्या रस्त्याने धावू लागली १९८१ साली तो पूर्ण करण्यात आला एका बाजूला हिमालयाचे उच्च पहाड तर दुसऱ्या बाजूला नदीचा प्रवाह, असा वळणाकार प्रवास सुरू होता नदीच्या पात्रात खळखळणाऱ्या पाण्याचा आवाज ऐकू येत होता आकाशातील ढगामुळे सूर्यदर्शन नव्हते त्यामुळे हवेत उष्मा अजिबात नव्हता संध्याकाळी सहाच्या सुमाराला बस मुगलींग फाटयावर थांबली पोखरा–मुगलींग काठमांडू या २०२ कि मी अंतराच्या पृथ्वी राजमार्गावर गाडी थांबली होती चीनच्या सहकार्याने हा मार्ग बांधण्यात आला आहे काठमांडू आता जवळ आले होते

कालीगंडकी नदीच्या सान्निध्यात बस आता निघाली बसमध्ये महाराष्ट्रीयन प्रवासी आम्हीच होतो शेजारच्या नेपाळी प्रवाशाशी गप्पा मारीत प्रवास चालू होता त्यांना हिंदी चांगले बोलता येत होते रात्रीचे आठ वाजले बस धाणकोट गावी थांबली रस्त्याच्या कडेला दुतर्फा अनेक हॉटेल्स होती. ड्रायव्हरने सूचना केली की जेवणासाठी येथे अर्धा तास थांबायचे आहे ड्रायव्हर, कंडक्टर बहुतेक प्रवासी जेवायला उतरले उल्का–उदयला जेवणाचे नाव काढल्यावर बरे वाटले कारण दिवसभर जेवण असे मिळाले नव्हतेच रस्त्याच्या बाजूच्या एका हॉटेल-मध्ये गेलो सामानाबाबत भीती एका प्रवाशाजवळ व्यक्त केली तर तो म्हणाला की हे नेपाळ आहे येथे लोक गरीब असले तरी सचोटीने वागणारे आहेत तुमचे खाली पडलेले पैशाचे पाकिटही ते परत देतील. हॉटेलच्या नेपाळी मालकिणीने हसून स्वागत केले बाकावर झोपलेल्या आपल्या नवऱ्याला तिने हलवून जागे केले गिऱ्हाईक पाहून त्यालाही हुशारी आली. लगबगीने त्याने पाणी आणून

दिले तोपर्यंत मालकिणीने स्टेनलेस स्टीलच्या चकचकीत थाळ्यामध्ये गरमगरम भरपूर भात वरण, फ्लॉवरचा रस्सा वाढला चपाती मात्र नव्हती नेपाळ प्रदेशातील पहिले जेवण भाताने पोट भरले प्रत्येकी पाच रुपये (नेपाळी) प्रमाणे पैसे दिले आजूबाजूच्या हॉटेल्समधूनही स्त्रियाच काम करताना दिसल्या बसमध्ये परतलो काठमांडूचा तासभराचा प्रवास उरला होता थोडा चढाचा रस्ता पार करून बसने काठमांडू खोऱ्यात प्रवेश केला हवेत गारवा चांगलाच जाणवू लागला होता

रात्री साडेनऊ वाजता बस काठमांडूच्या रत्नापार्कच्या बाजूच्या रस्त्यावर थांबली स्वतंत्र मध्यवर्ती मोठा बसस्टॅंड नव्हता सामान उतरून घेतले तोच निरनिराळ्या हॉटेल प्रतिनिधींचा गराडा पडला जो तो आपले कार्ड पुढे करू लागला शिवाय बरेच सायकलरिक्षावालेही जमले. अमुक हॉटेलमध्ये उतरा, ते स्वस्त आहे अशी शिफारसही करू लागले प्रत्येक मोठ्या शहरात हा त्रास असतोच तर ! पण आता त्यांच्याशी कसे वागायचे हे आम्हीही शिकलो होतो. काठमांडूला येताना ती काकांनी बसमध्येच एका प्रवाशाकडून माहिती घेतली होती की न्यू रोडवरील मारवाडी सेवा समितीची धर्मशाळा कुटुंबाला उतरण्यासाठी उत्कृष्ट व्यवस्था असलेली आहे तेव्हा दोन सायकलरिक्षा ठरवून त्यांनी तेथे पोहोचवण्यास सांगितले पण ते मध्येच म्हणू लागले की तेथे जागा मिळणार नाही आम्ही दुसऱ्या चांगल्या हॉटेलमध्ये नेतो हॉटेलवाल्यांकडून त्यांना गिऱ्हाईक आणण्याबद्दल ठराविक कमिशन मिळत असते म्हणून त्यांचा हा खटाटोप असतो. आता मात्र यशवंत रागावून म्हणाले की प्रथम मारवाडी धर्मशाळेत जाऊ, जागा आहे का नाही ते तेथे गेल्यावर पाहू तेव्हा कुठे ते निमूटपणे निघाले.

मारवाडी सेवा समितीची धर्मशाळा स्टॅण्डपासून दीड कि मी अंतरावर आहे पंधरावीस मिनीटातच तेथे पोहोचलो काठमांडूच्या न्यू रोड या मुख्य रस्त्याच्या मागीच बाजूला मध्यवर्ती ठिकाणावर ती आहे तीन मजली कॉंक्रीटची इमारत असून खाली स्वतंत्र भोजनालय आहे वरच्या मजल्यावरील फॅमिली रूममध्ये चार कॉट्स होत्या स्वच्छ चादरी, पांघरण्यासाठी मऊ दुलई, स्वतंत्र संलग्न स्वच्छतागृह, आंघोळीला गरम पाणी, मार्बल मोझेक टाईल्सची फरसबंदी, पुढे व्हरांडा आणि दरही रु ११० म्हणजे भारतीय पाऊणशे रुपये असा वाजवी. पर्यटकांना आणखी काय हवे ? दिवसभरच्या प्रवासाने थकलेलो आम्ही सर्वजण मऊ दुलईत गाढ झोपी गेलो

## नेपाळविषयी थोडेसे

'गरम पानी, चाय चाहिये क्या' दरवाजावरील टकटक आवाजाबरोबर विचारणा झाली. डोळे उघडल्यावर ध्यानात आले की आपण नेपाळच्या राजधानीत काठमाडू नगरीत मुक्कामाला आलो आहोत सकाळचे सात वाजले होते रात्रभर शात झोप झाल्याने प्रवासाचा सर्व शीण गेला होता. खोलीची व्यवस्था पाहणारा नेपाळी मुलगा चुणचुणीत होता त्याने गरम पाण्याच्या बादल्या पटापट आणून दिल्या चहाही आणला सर्वांचे आटोपेपर्यंत साडेआठ वाजले आम्ही आटोपून खाली येईपर्यंत यशवत सकाळीच काठमांडूच्या रस्त्यावर फेरफटका मारून आले होते काठमांडूतील दर्शनीय स्थळाची यादी त्याच्याजवळ होतीच मारवाडी सेवासमितीला लागूनच टॅक्सी स्टॅंड होता जपानी बनावटीच्या टोयाटो गाड्या सर्रास टॅक्सी म्हणून वापरतात कोऱ्या चकचकीत रगीबेरगी गाड्यामधून लाल रगाची टोयाटो काठमांडू दर्शनासाठी ठरवली सकाळी नऊ ते सध्याकाळी पाचपर्यंत दिवसभरच्या स्थलदर्शनासाठी दोनशेपन्नास नेपाळी रुपये ठरले

काठमांडूची सफर सुरू करण्यापूर्वी नेपाळची भौगोलिक व ऐतिहासिक माहिती उद्‌बोधक वाटेल चीन आणि भारत या देशाच्या मध्ये नेपाळ आहे. नेपाळची पूर्व–पश्चिम लाबी आठशे कि. मी आणि उत्तर–दक्षिण लाबी ९० ते

२३० कि मी आहे नेपाळ हे जगातील एकमेव स्वतंत्र हिंदूराष्ट्र आहे नेपाळचा ध्वज आपल्या भगव्या झेंड्यासारखा दोन त्रिकोणाचा आहे नेपाळ राष्ट्र १, ४३, ६५० चौ कि मी क्षेत्र असलेले आहे भौगोलिक दृष्ट्या नेपाळचे तीन विभाग पडतात दक्षिणेकडील विभाग तराई प्रदेश म्हणून ओळखला जातो तो सोळा टक्के आहे मध्यवर्ती विभाग तीन हजार मीटर उचीपर्यंतचा शिवालीक पहाडाचा छप्पन्न टक्के आहे तर उत्तरेकडील आठ हजार मीटर उचीचा हिमालयातील सर्वोच्च पहाडाचा प्रदेश अडोतीस टक्के आहे अशा हिमाच्छादित प्रदेशात याक प्राणी आढळतो तीन हजार कि. मी लाबीच्या नगाधिराज हिमालयाचा आठशे कि मी भाग नेपाळमध्ये पसरला आहे हिमालयाच्या चौदा उत्तुग शिखरांपैकी आठ नेपाळमध्ये आहेत अन्नपूर्णा, मकालू, मन्सालू काचनगगा, धौलागिरी, गौरीशकर ही हिमालयाची प्रसिद्ध शिखरे नेपाळमध्ये आहेत २९०२८ फूट (८८४८ मीटर) उचीचे सर्वात उच गिरीशिखर माऊट एव्हरेस्ट नेपाळचे भूषण होय इ स १८५२ मध्ये इग्रज सर्व्हेयर सर जॉर्ज माऊट एव्हरेस्ट यांनी भारतीय मदतनीस राधानाथ सिखदर याच्या सहाय्याने नेपाळातील Peak-15 या नावाने ओळखले जाणारे शिखर जगातील सर्वात उच आहे, असा शोध लावला सस्कृत, हिंदी, नेपाळी भाषेत या शिखराला 'सागरमाथा' नावाने ओळखले जाते. तिबेटी, शेरपा भाषेत या शिखराला म्हणतात 'चोमोलुग्मा'— जगाची मातृदेवता । सर एव्हरेस्ट यानी शोध लावल्यामुळे माऊंट एव्हरेस्ट नाव प्रसिद्ध आहे ,जगातील गिर्यारोहकाना माऊट एव्हरेस्ट म्हणजे आव्हानच । माऊट एव्हरेस्टवर उत्तरेकडून–तिबेटकडून व दक्षिणेकडून नेपाळमधून अनेक मोहिमा झाल्या इ स १९५२ ते १९७७ पर्यंत वीस मोहिमा होऊन त्यापैकी चार यशस्वी झाल्या १९७७ पर्यंत ५५ गिर्यारोहक व दोन स्त्री गिर्यारोहकानी एव्हरेस्ट जिकले १९५३ साली सर एडमंड हिलरी न्यूझीलड व शेरपा तेनसिग नोरके यानी एव्हरेस्टवर प्रथम पाय ठेवला । शेरपा नोरबू ह्या एकमेव गिर्या-रोहकाने एव्हरेस्टवर दोनदा चढण्याचा मान मिळविला । एव्हरेस्टवर मोहीम करायची म्हणजे काही वर्षे वाट पहावी लागते कारण अगोदर अॅडव्हान्स बुकीग करावे लागते । माऊंट एव्हरेस्टवर मोहीम करण्याच्या परवानगीसाठी पधरा हजार रुपये रॉयल्टी भरावी लागते त्याशिवाय मोहिमेत भाग घेणाऱ्या गाईड, पोर्टर यांचे लाख रुपयापर्यंत विमे उतरवावे लागतात

नेपाळ जसे हिमालयासाठी प्रसिद्ध आहे तसेच नद्यासाठीही । पश्चिम नेपाळमधील सरजू, कर्णाली व राप्ती यांची मिळून वाहणारी घोग्रा नदी काली-नदीला मिळते धवलगिरी व गोसाईठाण या शिखरामध्ये उगम पावलेल्या सेती, कालीगडकी, बिधीगडकी, माडी, मत्स्यांगदी व त्रिशूली या सात नद्या सप्तगडकी-

मिळून गडकीनदी मध्य नेपाळमधून वाहते तर गोसाईठाण व कांचनगगा यातून उगम पावलेल्या इद्रावती, सनकोशी, लिखू, तमकोशी, दूधकोशी, अरुण आणि तमोर या सात नद्या-सप्तकोशी-मिळून कोशी पूर्व भागातून वाहून गगेला मिळते तिबेट व हिमालयाच्या उच्च पर्वतराजीत उगम पावून वाहणाऱ्या कालीगडकी, महाकाली, त्रिशूलगगा, बागमती, विष्णुमती, हनुमती, रुद्रमती या नद्या तराई प्रदेशातून येऊन भारतात गगेला मिळतात नेपाळला हिमवत् खडात उत्तर काशी म्हटले आहे

**उद्गताति शर्व नैव उत्तरेण हिमालयात् ।**

**काशिताभि प्रदीप्तायोत्तरा काशीति विश्रुता ।।**

नेपाळक्षेत्राच्या सीमापूर्वेला कौशिकी-कौसी नदी, पश्चिमेला त्रिशुली नदी, उत्तरेला शिवपुरी पर्वत व दक्षिणेला भारतातील बिहार प्रदेश, तर पूर्वेला बंगाल व सिक्कीम

ऐतिहासिक दृष्टया नेपाळ भारताशी निगडीत आहे 'ने' या नावाचा एक हुशार ऋषी होता व पाल म्हणजे जागा ने ऋषी विष्णुमती व बागमती या नद्यांच्या सगमावर तप करीत असे त्या काळातील राजे त्याच्या आशीर्वादाने त्याच्या आज्ञेप्रमाणे राज्य चालवीत 'ने' मुनीच्या तत्वाने पालीत देश म्हणून नेपाळ नाव पडले भारतवासीयाच्या दृष्टीने जिव्हाळयाची गोष्ट म्हणजे रामायणाची नायिका सीता हिचा जन्म नेपाळमधील जनकपूर येथील[1] इ स पूर्व चौथ्या शतकात समुद्रगुप्ताने अलाहाबादला उभारलेल्या स्तभावर नेपाळचा उल्लेख आहे गौतमबुद्धाचा-सिद्धार्थचा जन्म ही नेपाळमधील लुम्बिनी या गावी इ स पूर्व ६२२ मध्ये झाला सम्राट अशोकाने नेपाळला धर्म प्रसारासाठी भेट दिली. पाटण या गावी चार स्तभ उभारले बुद्धाच्या जन्मस्थानाला भेट देऊन तेथेही स्तंभ उभारला सम्राट अशोकाची कन्या चारुमती नेपाळमध्ये धर्म प्रसारासाठी राहिली येथेच तिने देवपाल या नेपाळी सरदाराशी विवाह केला सुप्रसिद्ध चिनी प्रवासी ह्यू- एन् त्सगने सातव्या शतकात नेपाळला भेट दिली गौतमाची जन्मभूमी पाहण्याचा त्याचा ध्यास होता त्याने लिहून ठेवले आहे की चार हजार ली ($\frac{1}{3}$ मैल) घेर असलेला नेपाळ हा दऱ्याखोऱ्यांचा हिमाच्छादित प्रदेश आहे त्यावेळी ताब्याची नाणी वापरात होती नागहृद सरोवराचा बाध फोडून नेपाळचे खोरे निर्माण करणाऱ्या मजुश्रीचा शिष्य धर्माकर हा नेपाळचा पहिला राज समजला जातो गुप्त, अहीर, किरात, सोमवशीय आणि लिच्छवी वशातील राजानी नेपाळवर राज्य केले

बाराव्या शतकात नेपाळमध्ये मल्ल राजे राज्य करीत होते या वशातील

राजाना मल्ल विद्येची आवड असल्याने ते आपल्यापुढे मल्ल नाव लावू लागले या कारकीर्दीत विविध कला, ब्रांझ व लाकडावरील कोरीव कला यांना आश्रय मिळाला नेपाळच्या इतिहासात हे सुवर्णयुग समजले जाते यक्षमल्ल राजानतर नेपाळ प्रदेशाची तीन मुलांमध्ये तसेच एका कन्येसाठी अशा चार विभागात वाटणी झाली रायमल्ल राजाकडे भक्तपूर उर्फ भडगाव, रत्नमल्लाकडे काठमाडू उर्फ कांतिपूर, राणामल्लकडे बनेपा व कन्येकडे पाटण उर्फ ललितपूर अशी वाटणी झाली

भारतात मुस्लीम आक्रमणामुळे अनेक रजपूत, ब्राह्मण भारतातून नेपाळला आश्रयाला गेले त्याचा हिमालयातील वन्य जमातीतील स्त्रियांशी सबध येऊन जन्मलेले लोक क्षत्रिय मानतात बिहार, बगालमध्ये मुसलमानाच्या आक्रमणानतर विद्यापीठे, ग्रथालयावर हल्ला झाल्याने असख्य हिंदू धर्म पडित यांनी पोथी पुराणे नेपाळात सुरक्षित नेली नेपाळी हिंदू चालीरीती धार्मिक विधी पाळतात

इ. स १७२३ मध्ये 'गोरखा' येथे जन्मलेला पृथ्वी नारायणशाह हा गुरखा महाराजा आधुनिक नेपाळचा शिल्पकार मानला जातो भारतातील राजस्थानमधील चितोडगडच्या राजपूत राजवशातील राजपूत मोगल आक्रमणानंतर तेराव्या शतकात नेपाळमध्ये आश्रयाला गेले त्या राजवशातील या पृथ्वी नारायण शाहने एकवीस वर्षांचा असताना एकसध नेपाळचे स्वप्न पाहिले कांतिपूर, ललितपूर व भक्तपूर या तिन्ही राज्याचे १७६८ मध्ये वयाच्या पचेचाळीसाव्या वर्षी एकत्रीकरण करून हे स्वप्न त्याने पूर्ण केले सपूर्ण नेपाळ एका शासनाखाली आणले नेपाळची पश्चिमेला सतलज, तर पूर्वेला सिक्कीमपर्यंत सरहद्द निश्चित झाली असा हा पराक्रमी, कर्तबगार राजा १७७५ साली मरण पावला

पृथ्वी नारायणशाहनतर कर्तबगार राजे झाले नाहीत सन १८१४ ते १६ ही दोन वर्षे नेपाळी सैन्य व ब्रिटीश ईस्ट इडिया कपनी याच्यात तराई प्रदेशातील तीस खेड्यांच्या हक्काबाबत लढाई झाली सन १८१६ मध्ये सेगुलीचा तह अस्तित्वात आला कुमाऊ, गढवाल, सिमला व सिक्कीमचा काही भाग नेपाळला सोडावा लागल। ब्रिटीश सेनाधिकारी लॉर्ड ऑक्टोगनी याच्याबरोबर केलेल्या तहानुसार काठमांडूमध्ये ब्रिटीश रेसिडेंटला रहाण्यास परवानगी मिळाली तसेच नेपाळची हद्द महाकाली व मेची या नद्यांपर्यंत ठरली

नेपाळचा राजा व पतप्रधान राणा याच्या अंतर्गत स्पर्धेत राजा नाममात्र शासक होता राज्य पतप्रधान राणाच चालवी इ स १८४६ मध्ये जगबहादूर राणाने नेपाळ राज्याचा ताबा घेतला नावाप्रमाणेच तो बहादूर व शूर होता केवळ कुकरीने तो वाघाची शिकार करी. हा राणाही मूळ चितोडगडच्या राजवंशातील राज्य ताब्यात आल्यावर त्याने दरबारातील महत्वाच्या दीडशे विरोधकाना

ठार केले व महत्वाच्या पदी राणा कुटुंबियाची नेमणूक केली त्याने इंग्लंडला भेट देऊन व्हिक्टोरिया राणीची भेट घेतली होती ब्रिटीशाशी मैत्री केली तसेच फ्रान्सलाही भेट दिली परदेशगमन करणारा हा पहिला राणा भारताच्या इतिहासाशी निगडीत महत्वपूर्ण हकीकत म्हणजे जगबहादूर राणाने सहाहजार नेपाळी गुरखा सैन्याच्या फलटणीचे स्वत नेतृत्व करून लखनौला ब्रिटीशाना स्वातंत्र्ययुद्ध दडपण्यास मदत केली लुटालूट केली हिरे, माणिक, मोती, जडजवाहीर लुटले, नानासाहेब पेशव्याकडून मोठा हिरा मिळवला सध्या तो नेपाळच्या राजमुकुटात आहे नानासाहे पेशवे त्याचवेळी नेपाळला आश्रयाला गेले व त्याच्याबरोबरच्या स्त्रिया नेपाळराजाच्या जनानखान्यात भरती झाल्या

सन १८४६ ते १९५० अशी एकशेचार वर्षे राणांनी नेपाळमध्ये सत्ता उपभोगली नेपाळला जगापासून अलिप्त ठेवले १९५० मध्ये मोहन समशेर राणा हा सत्तेवरील शेवटचा राणा होय नेपाळमधील राणाशाहीबद्दल अनेक सुरस कथा आहेत मदिरा आणि मदिराक्षीच्या आधीन झालेल्या राणाच्या जनानखान्यात अनेक स्त्रियांची भरती होई जगबहादूर राणाला विविध स्त्रियापासून शभरवर सतती होती । असे सागतात की सन १९४२ पर्यंत राणा मिरवणुकीने काठमाडूच्या रस्त्यातून प्रत्येक महिन्यात जायचा त्यावेळी रस्त्यात दुतर्फा स्त्रिया व मुलीना उभे राहण्याची सक्ती असायची राणाला आवडलेल्या स्त्रिया, मुली सक्तीने जनानखान्यात भरती व्हायच्या कुणी विरोध केला तर त्यास ठार मारण्यात येई काठमाडूच्या उत्तरेला हिमालयात हलेम्बु नावाचे एक छोटेखानी खेडेगाव पहाडातील सुदर शेरपा स्त्रियासाठी प्रसिद्ध आहे एका राणाने त्या गावातील सर्वच स्त्रिया जनानखान्यात भरती केल्या लग्नाच्या अधिकृत स्त्रीपासून झालेली सतती उच्च प्रतीची राणा कुटुबीय समजली जाई लग्नाव्यतिरिक्त स्त्रियापासून झालेल्या सततीला मध्यम प्रतीचे मानण्यात येई जनानखान्यातील इतर स्त्रियापासून झालेली संतती कनिष्ठ प्रतीची मानली जाई उच्च प्रतीच्या राणाला राज्यातील लष्कराचे जनरलपद भूषविण्याचा मान मिळे मध्यमप्रतीच्या राणाला कर्नलसारखे त्याहून कनिष्ठपद मिळे नेपाळमधील राणाशाही १९५० साली सपुष्टात आल्यानतर बहुपत्नीत्वाला बदी घालण्यात आली परिणामी राणाच्या जनानखान्यातील अनेक स्त्रिया बेघर होऊन काठमाडूच्या रस्त्यावर आल्या त्यावेळच्या पतप्रधानपदी असलेल्या कोईरालांनी अशा स्त्रियाचा प्रश्न नेपाळमधील भारतीय सैनिकांशी लग्न लावून सोडवला

राणाशाहीमध्ये लोकजागृतीचा प्रयत्न प्रथम गोरखालीग या सस्थेने केला त्यानतर नेपाळी प्रजापरिषदेची स्थापना झाली राणाशाहीविरुद्ध राजाच्या सहाय्याने उठाव केला या आदोलनात जयप्रकाश नारायण यांनाही नेपाळी

तुरुगाची हवा खावी लागली त्याचे मित्र विश्वेश्वरप्रसाद कोईराला यानी १९४६ साली बनारसमध्ये नेपाळी राष्ट्रीय कॉंग्रेसची स्थापना केली. कोईराला बधूनी राणाशाहीचा अंत घडवून आणण्यात मोठा भाग घेतला

राणाशाहीत रगडून निघालेल्या नेपाळमध्ये इ स १९५०–५१ साली क्राती झाली नेपाळच्या पृथ्वी नारायणशाहच्या मूळ राजवशातील राजा त्रिभुवन आपल्या दोन राण्या (या सख्ख्या बहिणी होत्या) व तीन राजकन्या यांच्यासह राजवाडयात बंदिस्त अवस्थेत दिवस कठीत होता त्रिभुवन राजाचे वडील व आजोबा यांना नेपाळच्या राणानी लहानपणापासूनच दारूचे व्यसन लावले होते. त्यामुळे त्याचे शरीर व्याधीग्रस्त झाले होते राणानी स्वत कडे सत्ता टिकवण्यासाठी दोन महत्वाची सूत्रे सभाळली होती राजाला दारूने व्यसनाधीन करायचे आणि विषयासक्तही बनवायचे त्यासाठी राजा वयात आल्या आल्या सुदर स्त्रिया त्याच्याकडे पाठवल्या जात राजा त्रिभुवनना महेंद्र हा पुत्र वयाच्या चौदाव्या वर्षी झाला! मात्र पुढे राजा त्रिभुवनने कलकत्त्याहून अर्थशास्त्र, इतिहास, राज्यशास्त्र या विविध विषयांची पुस्तके आणून वाचली भारतात त्याच सुमारास इग्रजाची सत्ता झुगारून देऊन म गांधी, प नेहरू या नेत्यांनी स्वातंत्र मिळवले. या घटनेने नेपाळमध्ये क्राती घडवून आणण्याचे विचार राजाच्या मनात घोळू लागले राजा त्रिभुवनने एका रात्री नेपाळी शेतकऱ्याचा वेष घेऊन गुप्तपणे नेपाळमधील भारतीय राजदूताशी खलबते केली तसेच राणाविरुद्ध लढा देणाऱ्या नेपाळी भूमिगत क्रातिकारकाशीही गुप्तपणे सधान बाधले सहा नोव्हेंबर १९५० ला राजवाडयातून पाच मोटारींतून राजा, त्याच्या दोन राण्या, तीन राजकन्या, तीन राजपुत्र असा ताफा वाघाच्या शिकारीसाठी व पिकनिकसाठी म्हणून बाहेर पडला राणा पतप्रधानांची परवानगी अगोदर घेण्यात आली होती राणाचे अधिकारी राजावर लक्ष ठेवण्यासाठी प्रत्येक गाडीत बसले होते राजाच्या बरोबर असलेल्या खाद्यपदार्थांच्या बास्केटमध्ये अमूल्य हिरे, माणिक, मोती, रत्ने होती. शिकारीला पहाडात जाण्याचा रस्ता भारतीय दूतावासाच्या कचेरीजवळून जातो. तेथील प्रवेशद्वार उघडेच होते लष्करी शीख अधिकारी सरक्षणार्थ हजरच होते. राजाच्या गाडीचे दरवाजे उघडले गेले भारतीय राजदूताने राजाला सागितले— "महाराज, राजकीय आश्रयाची आपली विनती भारताने स्वीकारली आहे" बरोबर असलेल्या राणाच्या अधिकाऱ्यानी तत्काळ राणा पंतप्रधानाला ही खबर पोहोचवली राणाचा राग अनावर झाला त्याच्या आदेशानुसार नेपाळी सैनिक भारतीय राजदूत कचेरीत धावत आले राजा त्रिभुवनला ताब्यात देण्यासाठी सक्ती करू लागले राजाने त्याना सागितले— "मी नेपाळचा खरा राजा आहे राणाशाहीचा राज्यकारभार पसंत नाही" भारतातून आलेल्या दोन विमानातून

शाही कुटुंब सक्त रक्षणाखाली दिल्लीत आश्रयाला गेले व नेहरूना भेटले इकडे नेपाळात क्रांतिकारकाचा उठाव चालूच होता नाईलाजाने जानेवारी १९५१ मध्ये नेपाळी पतप्रधान मोहन समशेर राणाने राजा त्रिभुवनला मान्यता देण्याबाबतचा भारताचा मसुदा मान्य केला राजे त्रिभुवन काठमाडूला परतल्यावर त्याचा मोठा मानसन्मान झाला निम्मे राणा व निम्मे लोकप्रतिनिधी असलेले मंत्रिमंडळ अस्तित्वात आले विदेशी पर्यटकांना नेपाळमध्ये येण्याची परवानगी मिळाली नेपाळच्या निसर्गसौंदर्याने आकर्षित होऊन अधिकाधिक विदेशी पर्यटक येऊ लागले हृदयविकाराचा त्रास असलेले राजे त्रिभुवन दोनवेळा युरोपला जाऊन आले होते स्वित्झर्लंड येथील झूरीचमध्ये ते १९५५ मध्ये मरण पावले त्याचे मृत शरीर विमानाने काठमाडूला आणून बागमतीनदीच्या काठी दहन करण्यात आले

राजे महेंद्र १९५५ मध्ये गादीवर आले नेपाळ पार्लमेंटच्या प्रथम निवडणुका झाल्या पंचायत लोकशाही पद्धतीचा पाया घातला गेला महेंद्र राजांच्या मृत्यूनतर १९७२ साली वीर विक्रमशाहदेव गादीवर आले त्याचे शालेय शिक्षण भारतात दार्जिलिंग येथे झाल्यावर उच्च शिक्षण इंग्लंड, अमेरिकेत पूर्ण केले जगात सर्वत्र प्रवास केला टोकियो विद्यापीठ, हार्वर्ड विद्यापीठ या ठिकाणी राजकीय प्रश्नाचा अभ्यास केला राजा वीर विक्रमशाहदेव याचा २४ फेब्रुवारी १९७० मध्ये राणी ऐश्वर्या राज्यलक्ष्मी देवीबरोबर विवाह झाला त्यांच्या पुत्राचे नाव आहे युवराज दिपेंद्र वीर विक्रमशाह यांच्या नेतृत्वाखाली नेपाळची प्रगती सुरू आहे नेपाळी लोक राजाराणीला फार मान देतात.

असा हा नेपाळी प्रदेश ! दीड कोटी लोकसंख्येचा काठमांडू शहराची लोकसंख्या आहे साडे तीन लाख भौगोलिक दृष्टया काठमाडूचे वैशिष्टय असे की काठमांडू भारताची राजधानी दिल्लीच्या दक्षिणेला आहे काठमांडू दर्शनाला निघालो प्रथम घड्याळाची वेळ दहा मिनिटानी पुढे केली कारण नेपाळची प्रमाणवेळ भारतीय प्रमाणवेळेपेक्षा दहा मिनिटानी पुढे आहे.

*

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
वा. क्र. २८३७०
ग्रंथ. शाखा (स्थळ प्रत)

## कथा दोन शहरांची–पाटण, भडगाव

काठमाडू दर्शनासाठी न्यू रोडने गाडी बाहेर निघाल्यावर रत्नापार्कजवळ प्रथम थांबली रत्नपार्कजवळ 'तुडीखेल' नावाचे विशाल राष्ट्रीय मैदान आहे तेथे नेपाळी सैनिकाची कवाईत होते शाही नेपाळ सैनिक मचही तेथे आहे राष्ट्रीय उत्सव याच मैदानावर साजरे होतात त्यावेळी त्यात सरकारी अधिकारी व सन्माननीय नागरीक सामील होतात तुडीखेल मैदानाच्या बाजूला ५० मीटर उचीचा पांढरा मीनार दृष्टीला पडला भीमसेन थापा या राणा पतप्रधानाने आपल्या राणीच्या स्मरणार्थ इ स १८३० मध्ये तो उभारला पूर्वी हा मीनार अकरा मजली होता दोन भूकपाच्या आघातामुळे तो आता नऊ मजली उरला असून काठमांडू खोऱ्यात तो लाबूनही दिसतो

मैदानाच्या दक्षिण कोपऱ्यावर संगमरवरी शहीद द्वार असून त्यावर चार हुतात्म्याप्रमाणे राजे त्रिभुवन यांचाही ब्रांझचा अर्धपुतळा आहे १९४० साली नेपाळच्या राजाला गुप्तपणे सामील असल्याचा व कट केल्याचा आरोप ठेवून राणा पतप्रधानाने दोन नेत्याना बंदूकीच्या गोळ्यानी व दुसऱ्या दोघाना भर चौकात फाशी देऊन ठार मारले, त्याचे हे स्मारक आहे

मैदानाच्या बाजूला राणी पोखर तलाव आहे राजा प्रताप मल्लच्या


महाराणीने आपला पुत्र मतींद्र याच्या स्मरणार्थ तो बांधला तलावाच्या चारी बाजूला सुंदर बगीचा असून छोटे शिव मंदिरही तेथे आहे

टॅक्सी कांतिपथ मार्गावर आल्यावर भव्य राजप्रासाद दृष्टीला पडला. 'नारायण हिटी' या नावाने राजवाडा प्रसिद्ध आहे नारायणाचे स्थान असलेले व हिटी म्हणजे जलधारा. राजवाड्याच्या प्रवेशद्वारी मोठ्या लोखंडी गेटसमोर नेपाळी गुरखा सैनिक पहारा देत होते राजवाडा पहाण्यास परवानगी आवश्यक आहे राजवाड्याच्या बाजूला काठमांडूची प्रख्यात हॉटेलस्–अन्नपूर्णा, किंग्जवे, मल्ल ही आहेत दरबार मार्गावर 'हॉटेल याक अँड येती' तसेच विमान कंपन्यांची व परदेशी वकीलातीची कार्यालये दिसली


राजवाड्यावरून वळण घेऊन तुंडीखेल मैदानाच्या दक्षिणेला नेपाळच्या प्रसिद्ध 'सिंग दरबार पॅलेस' च्या आवारात टॅक्सी थांबली आज तेथे नेपाळ सरकारचे सेक्रेटरीएट आहे चंद्र राणा याने या सिंग दरबार पॅलेसची विसाव्या शतकाच्या सुरुवातीला उभारणी केली पूर्वी राणा पतप्रधानाचे निवासस्थान असलेल्या या प्रासादात ६१६ दालने आहेत या प्रचंड राजवाड्याला १९७३ मध्ये शॉर्टसर्किटमुळे आग लागली होती राजवाड्यात लाकडाचा विपुल प्रमाणात वापर केला असल्याने आग पसरत जाऊन निम्मी इमारत जळाली होती आगीचा धूर पाचसहा मैलापर्यंत पसरला होता आणखी आग पसरू नये म्हणून राजवाड्या-मध्ये स्फोट करून गॅप निर्माण केली गेली. त्यामुळे पुढील भव्य रिसेप्शन हॉल वाचला अग्नीरोधक बांधकाम साहित्य वापरून परत हा प्रासाद उभारण्यात आला त्यासाठी जनतेनेही उत्स्फूर्तपणे वर्गणी गोळा केली होती

सिंगदरबार पाहून बागमती नदीवरील पूल पार केला हा पूल भारताच्या सहकार्याने बांधला रस्त्यात वीजेवर चालणाऱ्या बसेस दिसल्या पाटण या प्राचीन बौद्धधर्मीय गावी थोड्याच वेळात पोहोचलो काठमांडूहून चार कि मी. अंतरावर असलेल्या या गावाची आज लोकसंख्या आहे सुमारे ऐंशी हजार ! सम्राट अशोकाने इ स पू तिसऱ्या शतकात पाटणला बौद्धधर्म प्रसारार्थ भेट दिली व पाच स्तूप उभारले आजही ते अस्तित्वात आहेत पाटणचे पूर्वीचे नाव ललितपूर होते राजा वीरदेव याने तिसऱ्या शतकात ते वसवले लिच्छवी राजांनी तेथे राज्य केले तसेच मल्ल राजांनीही अधिपत्य केले पाटणची वस्ती प्रामुख्याने बौद्धधर्मीय आहेत


टॅक्सी प्रथम पाटण दरबार चौकात थांबली या चौकातील विविध वास्तु कलाकुसरीने संपन्न आहेत त्यांची निर्मिती सतराव्या शतकात सिद्धी नरसिंह मल्ल राजाच्या काळात झाली प्रथम राजवाड्यात प्रवेश केला प्रवेशद्वारी नरसिंह,



गोल्डन गेट, भक्तपुर



पाटण दरबार चौक



बूढ़ा नीलकंठ

हनुमान, गणेशमूर्ती असून बाजूला नक्षीदार खिडक्या आहेत आतील चौकाचे नाव आहे श्रीसुदरी चौक चौकात मध्यभागी अष्टकोनी कुड आहे सिद्धी नरसिंह मल्ल राजाच्या परिवाराच्या स्नानासाठी या कुंडाचा वापर करीत या कुडाचे जुने नाव आहे ' तुसाहिटी ' कुंडात फणाधारी नागमूर्ती, देवदेवताच्या मूर्ती, विष्णु, अष्ट-भैरव, सिंह याच्या पाषाणमूर्ती दिसतात तसेच अष्टमत्रिका, अष्टभैरव, अष्टनाग कोरले आहेत नाग ही वरुणदेवता मानतात कुडातील पितळी तोटीवर रेखीव गरूडमूर्ती आहे आत उतरण्यासाठी पायऱ्या आहेत. बाजूला काठावर एक दगडी आसन आहे तेथे पूर्वी राजा ध्यान करीत असे बाजूला प्रसिद्ध मूलचौक आहे. आत गंगा-यमुना या नद्यांचे ब्रांझचे पुतळे दिसतात धातूचा नक्षीदार दरवाजा आहे. पलीकडे तलेजू मदिर आहे तेथे फक्त पुजाऱ्याना प्रवेश मिळतो सुदरी चौकासमोर योगेंद्रमल्ल राजाच्या योगमती राजकन्येने राजाच्या स्मृतीप्रित्यर्थ बाधलेले अष्टकोनी कृष्णमदिर आहे

दरबार चौकात रस्त्यावर एक पाषाण स्तभ असून त्यावर मल्लराजा योग नरेंद्र याची मूर्ती अधिष्ठित आहे राजाच्या मस्तकावर धातूचा फणाधारी नाग असून नागाच्या फण्यावर छोटा पक्षी आहे त्याच्यामुळे राज्याचे रक्षण होते अशी समजूत आहे खाली दोन सिंहमूर्ती आहेत समोरच दुमजली कृष्णमंदिर आहे सिद्धी नरसिंह मल्ल राजाने सतराव्या शतकात ते बाधले मदिर उच्च चबुतऱ्यावर विराजमान आहे वरच्या मजल्यावर गेल्यावर राधा-कृष्णाच्या मूर्तीचे दर्शन होते राजा सिद्धी नरसिंह मल्लला स्वप्नात राधाकृष्णाची युगुल मूर्ती दिसली. दृष्टाताप्रमाणे प्रत्यक्षात ही मूर्ती उभारली बाजूला प्रदक्षिणा मार्ग असून रामायण, महाभारतातले प्रसंग तेथे पाषाणात कोरले आहेत हे मदिर नेपाळमध्ये आढळणाऱ्या इतर मंदिरांप्रमाणे पॅगोडा शैलीचे नसून भारतीय शैलीचे-शिखर पद्धतीचे आहे. हे मदिर सपूर्णपणे पत्थरात बांधले असून लाकूड, लोह अजिबात वापरले नाही कृष्णमदिरात जन्माष्टमीला मोठा सोहळा होतो अशी माहिती मिळाली या मदिरासमोरील पाषाणस्तंभावर गरुडमूर्ती दिसते. बाजूला विश्वनाथ मंदिर, तीन मजली भीमसेन मदिर, गणेश व शिवमदिर आहे शिव-मदिराच्या बाजूला दोन गजमूर्ती दिसतात त्याचप्रमाणे छताला आधार देणाऱ्या तिरप्या दगडी ब्रॅकेट्सवर मैथुनशिल्पे कोरली आहेत भीमसेन मंदिरापलिकडे प्राचीन ' मगलहिटी '- पाण्याचे कुंड आहे आजूबाजूच्या पहाडातील पाणी तेथील तीन पाषाणमगरींच्या मुखातून खेळवले आहे दरबार चौकाच्या बाजूला पाटणचा मोठा मगल बाजार आहे अनेक नेपाळी लोक खरेदीविक्रीत मग्न दिसले.

रस्त्याच्या उत्तर पश्चिमेला ' हिरण्यवर्ण महाविहार ' नावाने ओळखल्या जाणाऱ्या सोनेरी मंदिरात आलो प्रवेशद्वारी दोन सिंहमूर्ती दिसल्या. हे मदिर

बाराव्या शतकातील आहे आत भगवान गौतम बुद्धाची सुवर्णमूर्ती आहे प्राग-णाच्या बाजूला धातूची अनेक प्रार्थनाचक्रे आहेत या तीन मजली विहाराच्या तांबे पितळेच्या छताला एका धनवान व्यापाऱ्याने सोन्याचा मुलामा दिल्याने तो चमकतो असख्य कबुतराच्या गुटरगूचा आवाज सर्वत्र घुमत होता या विहाराच्या वरच्या मजल्यावरही बुद्धाची भव्य मूर्ती असून भिंतीवर बुद्धाच्या जीवनातील निवडक प्रसग चित्रीत केले आहेत तिबेटी लामा–धर्मगुरू तेथे धर्मग्रथाचे पठण करताना दिसले

मदिर पाहून दरबारचौकात आलो व दक्षिण पूर्वेला असलेल्या हजार बुद्ध मदिरात पोहोचलो हे मंदिर विटामध्ये बाधले असून भारतातील बिहार राज्या-तील बुद्धगयेच्या धर्तीवर इ स १५८५ मध्ये बाधण्यात आले शिखर पद्धतीच्या या मदिराच्या कळसापर्यंत चारी बाजूला बुद्धाच्या लहान मोठ्या हजार आसनस्थ मूर्ती आहेत म्हणून हे मदिर हजार बुद्ध मदिर म्हणून ओळखले जाते मदिरात बुद्धाच्या मातेची मायादेवीचीही मूर्ती आहे या मदिराला प नेहरूंनी दोन वेळा भेट दिली होती इ स १९३४ मध्ये भूकपामुळे मदिराची हानी झाली होती. आता बरीच दुरुस्ती करण्यात आली आहे आजूबाजूच्या उच्च आधुनिक इमारतींमुळे या मदिराची शोभा कमी झाली आहे

पाटणच्या भेटीत शेवटी पाहिले तीन मजली मच्छिद्रनाथ मंदिर हिंदु व बौद्धधर्मीय मच्छिद्रनाथाला अवलोकीतेश्वराचा अवतार मानतात मदिराच्या चारी कोपऱ्याला प्राण्याच्या, यतीच्या पाषाणमूर्ती आहेत मंदिरासमोर एक मोठा रथ दिसला वैशाख महिन्यात उत्सव साजरा होतो हजारो लोक राष्ट्रीय सण समजून भाग घेतात. यासबधी अशी आख्यायिका आहे की गोरखनाथानी पर्जन्य-वृष्टी करणाऱ्या नऊ नागांना पकडले त्यामुळे पाटणच्या खोऱ्यात एकदा खूप दुष्काळ पडला पावसासाठी सर्वांनी प्रार्थना केली आसाममध्ये मत्स्येंद्र रहात होता तेथून त्याला शोधून सन्मानपूर्वक रथातून आणले तेव्हा पाऊस पडला. मत्स्येंद्रने दुष्काळामुळे होणाऱ्या हानीपासून वाचवले म्हणून एप्रिल महिन्यात त्याची रथातून सन्मानपूर्वक मिरवणूक काढतात रथाला साठ फूट उचीची ध्वजपताका लावतात राजा स्वत उत्सवात भाग घेतो हा उत्सव महिनाभर चालतो. समाधानकारक पाऊस पडून तादळाचे चागले पीक यावे या हेतूने हा उत्सव साजरा करतात

पाटणची भेट आता सपली होती ड्रायव्हर म्हणाला की पाटणमध्ये दसऱ्याचा उत्सव धूमधडाक्यात साजरा होतो बैल, बकरे, कोंबडे, बदक यांचे बळी दिले जातात त्यांच्या रक्ताचा टिळा टॅक्सी, मोटार, एव्हढेच नव्हे तर शाही नेपाळ विमानावरही लावला जातो विनाशापासून, सकटापासून बचाव

व्हावा ही त्यामागे भावना असते पाटण प्रसिद्ध आहे लाकडावरील नक्षीकाम, विविध देवदेवताच्या ब्रांझच्या मूर्तीसाठी। पाषाणशिल्पे तसेच चित्रकला अशा विविध कलांचे माहेरघर असलेले पाटण उत्सवासाठीही प्रसिद्ध आहे

पाटण पाहून रिगरोडने टॅक्सीने भडगावला आलो भडगावचे जुने नाव भक्तपूर–भक्ताचे शहर काठमाडूपासून पूर्वेला तेरा कि मी अतरावर ते आहे राजा आनद मल्लने ते वसवले भडगावचा आकार डमरूसारखा आहे भडगावची लोकसख्या सुमारे साठ हजार असून त्यात हिंदु धर्मीय जास्त आहेत. या प्राचीन गावातील दरबार चौकात उतरलो दरबार चौकातील प्रख्यात वास्तु आहे पंचावन्न खिडक्याचा राजप्रासाद भूपतिंद्र मल्ल राजाने सन १६९७ मध्ये या तीन मजली राजवाड्याची उभारणी केली दरबार चौकात वीस फूट उचीचा पाषाणस्तंभ आहे त्यावर भूपतिंद्र मल्ल राजाचा नमस्कार करणारा ब्राँझचा आसनस्थ पुतळा पाषाणातील कमलपुष्पावर अधिष्ठित आहे चार सिंहही कोरले आहेत राजाच्या मस्तकावर तीन छत्र्या कोरल्या आहेत

राजवाड्यात सध्या राष्ट्रीय काष्ठकला सग्रहालय आहे तिकीट काढून आत प्रवेश केला एक नेपाळी मार्गदर्शक मोडक्यातोडक्या हिंदीत माहिती सांगत होता अशी हिंदी ऐकण्याची तर आपल्याला सवय असतेच त्यामुळे त्याचे बोलणे समजण्यास अवघड गेले नाही विविध कक्षात शिव–पार्वती, कालीदेवी, पद्मपाणी, बोधिसत्व, नर्तकीदेवी, रावण, इद्र, लक्ष्मी यांच्या लाकडात कोरलेल्या सुदर मूर्ती आहेत मुख्य दालनात चारशे वर्षांपूर्वीची मयूरमूर्ती तसेच नृत्यरुप गणेश, इंद्र–इंद्रायणी, भैरव–भैरवी, महादेव–पार्वती, सहा भुजाची वसुधरा यांच्या मूर्ती लक्ष वेधून घेतात तीनशे वर्षांपूर्वीचा लाकडातील आरसाही मार्गदर्शकाने आवर्जून दाखवला आर्यतारा या तिबेटी व आर्यभृकुटी या दोन राण्याचे पुतळेही आहेत. या राजवाड्याचे वैशिष्ट्य आहे तेथील नक्षीदार, बाल्कनीसारख्या डोकावणाऱ्या पंचावन्न खिडक्यात त्या कलेचा उत्कृष्ट नमूना समजल्या जातात. एकंदरीत सर्वच वस्तु नेपाळच्या प्राचीन थोर कलेचे दर्शन घडवतात

राजवाड्यासमोर ब्राँझ धातूच्या दोन घटा दिसतात मोठी घटा रणजित-मल्लने तर दुसरी घटा भूपतिंद्र राजाने सतराव्या शतकात उभारली वाईट गोष्टींचा उपसर्ग होऊ नये, हा ती उभारण्यामागे हेतू होता आजही घटा वाजू लागली की कुत्रे भुकतात व अश्रू ढाळतात असे म्हणतात नेपाळ प्राचीन काळा-पासून घटा घडविण्याबाबत प्रसिद्ध आहे पूर्वी नेपाळच्या घटाना तिबेटमधून मोठी मागणी असे काठमाडू खोऱ्याला Valley of Bells म्हणतात

या राजप्रासादाशेजारी एक सुदर, नाजूक सोनेरी कमान आहे सनधोका (गोल्डनगेट) नावाने ती ओळखली जाते हा दरवाजा रणजित मल्ल राजाने

इ स १७५३ मध्ये उभारला तलेजुमंदिराच्या या प्रवेशद्वारावर सोनेरी मुलामा दिलेला असून त्यावर गणेश, विष्णु व अनेक देवदेवतांच्या मूर्ती नाजूकपणे कोरल्या आहेत मुख्य मूर्ती आहे कमलपुष्पावर आधिष्ठित कालीदेवतेची विष्णूचे वाहन असलेल्या गरूडाची सर्प खात असतानाची मूर्तीही आहे सुप्रसिद्ध वास्तुशिल्पकार पर्सी ब्राऊनने म्हटले आहे की ही सोनेरी कमान नेपाळमधील कलेचा सर्वोत्कृष्ट नमुना आहे या दरवाजाची तुलना इटलीतील फ्लॉरेन्समधील चर्चच्या ब्रांझच्या दरवाजाशी केली जाते

बाजूला काठमांडूतील पशुपतिमंदिराच्या धर्तीवर बांधलेले पशुपतीमंदिर आहे भूपतिंद्रराजाने १६८२ त बांधलेल्या या मंदिराच्या तिरप्या पाषाण ब्रॅकेट्सवर मैथुनशिल्पे कोरली आहेत

सोनेरी कमानीच्या दुसऱ्या बाजूला तीनमजली राजवाड्यात राष्ट्रीय चित्र संग्रहालय– आर्ट गॅलरी आहे ते पहाण्यास तिकीट आहे पहिल्या मजल्यावरील दालनात विष्णु भगवानाची पाषाणमूर्ती, सातशे वर्षापूर्वीचे पंचमुखी शिवलिंग प्रेक्षणीय आहे ब्रह्मा, विष्णु, शिव, भैरव व वर श्रीयंत्र गंगा असे हे शिवलिंग आहे. तीनशे वर्षापूर्वीची काली भैरव, गणेश ही कागदावरील चित्रे आजही चांगल्या स्थितीत आहेत अर्धनारी नटेश्वर, हरिहर, लक्ष्मीनारायण या तीनशे वर्षापूर्वीच्य मूर्तीही प्रेक्षणीय आहेत दुसऱ्या मजल्यावर शाह् राजवंशातील दहा राजांची भव्य तैलचित्रे आहेत पृथ्वी नारायण शाह् हा पहिला राजा तर विद्यमान वीर विक्रम शाह् हा अकरावा राजा एका दालनात कृष्णलीला विषयक अनेक रंगीत चित्रे आहेत सातशे वर्षापूर्वीचे अभयमल्ल राजाचे सचित्र पंचरक्षा हे ताडपत्रावरील हस्तलिखित पुस्तक आहे प्रतापमल्ल राजाचे तीर्थयात्रा हे पुस्तकही आहे. तीनशे वर्षापूर्वीची हरिहरमूर्ती विष्णुदशावतार ही चित्रे आहेत सतराव्या शतकातील महाशिवशक्तीरूप या चित्रात पाच रांगेत हजार हात दिसतात तिसऱ्या मजल्यावर मल्ल राजाचे शयनगृह असून तेथे भिंतींवर तीनशे वर्षापूर्वी काढलेली चित्रे दिसतात

दरबारचौकातून जवळच्या रस्त्याने पाच मिनीटात नेपाळच्या सर्वात उंच प्रख्यात न्याटपोला मंदिराजवळ आलो न्याटपोला म्हणजे पाचमजली पाच शिखरांचे हे सर्वात उंच म्हणजे शंभर फूट उंचीचे मंदिर उंच चौकोनी दगडी चबुतऱ्यावर विराजमान आहे हे मंदिर इ स १७०८ मध्ये भूपतिंद्रराजाने उभारले स्वत भूपतिंद्रराजाने मंदिर उभारणीसाठी विटा वाहिल्या होत्या असे म्हणतात मंदिरावर चढण्यासाठी मध्यभागी उंच उंच पायऱ्या आहेत पायऱ्यांच्या बाजूला पाच टप्प्यात पाषाणमूर्तींच्या पाच जोड्या आहेत पहिल्या पायरीच्या बाजूला जयमल्ल व फटमल्ल या राजरक्षकांची जोडी दिसते दहा

माणसाची शक्ती असलेले हे भक्तपूरचे प्रसिद्ध पहिलवान होते त्यानंतर वर पहिलवानांच्या दहापट शक्ती असलेल्या दोन गजमूर्ती दोन बाजूला दिसतात गजांपेक्षा दहापट शक्तीच्या सिंहाच्या दोन मूर्ती त्यावरच्या टप्प्यावर आहेत सिंहाच्या दहापट अधिक शक्तिमान व्यालमूर्ती त्यावर आणि सर्वात वर दिसते शक्तिमान वाघीण आणि सिंहीण अशी देवताची जोडी मंदिराच्या गाभाऱ्याचा दरवाजा बंद असून आतमध्ये तांत्रिक देवता असल्याने दिसू शकत नाही यम-राजावर अधिष्ठित सिद्धलक्ष्मी, महिषमर्दिनी अशा तांत्रिक देवता आहेत पॅगोडा शैलीच्या या मंदिराचे लाकडी कोरीव काम नाजूक आहे

या मंदिर उभारणीमागची कथा अशी आहे–भूपतिंद्र राजाने हे मंदिर प्रथम तीनजमली बांधून तेथे राज्याच्या रक्षणासाठी भैरवाची स्थापना केली परंतु भैरवाची स्थापना त्रासदायक ठरली राजाला सल्ला मिळाला की तांत्रिक देवतेची स्थापना केल्याने भैरवाचा त्रास कमी होईल म्हणून भूपतिंद्र राजाने आणखी दोन मजले चढवून हे पाचजमली मंदिर उभारले तेथे यमराजावर अधिष्ठित तांत्रिक देवतेची स्थापना केली या मंदिराला नेपाळी भाषेत पचताल असे म्हणतात, तर नेवारी भाषेत न्याटपोला हे पाचमजली मंदिर आकर्षक, प्रेक्षणीय असून नेपाळचे भूषण आहे अनेक पाश्चिमात्य पर्यटक यां मंदिराचे अनेक फोटो घेत होते महान चित्रपटातील अमिताभ व झीनत यांच्या गाण्याचे शूटींग या मंदिरासमोरच झाले चित्रपटात या गाण्याच्या प्रसंगी जमलेली नेपाळी लोकांची गर्दी आठवत होती इथेही अमिताभ बच्चन तुफान लोकप्रिय आहे

मंदिरासमोरील कॅफेन्याटपोलामध्ये चहा घेतला बाजूला भैरवनाथ मंदिर आहे भक्तपूरचे आणखी एक दर्शनीय मंदिर आहे दत्तात्रेय मंदिर. एका हातात शंख व दुसऱ्या हातात चक्र अशी मूर्ती आहे डाव्या बाजूला शंकराचार्य तर उजव्या बाजूला सच्चिदानंद सरस्वती अशा मूर्ती आहेत पंधराव्या शतकात राजा यक्षमल्लने बांधलेल्या या मंदिराचा जीर्णोद्धार राजा विश्वमल्लने केला एकाच वृक्षाच्या खोडातून हे मंदिर उभारण्यात आले थोडेसे आडवळणी जंगलात असलेले सूर्य विनायक गणेशजी मंदिर लक्षात राहते ते स्थापत्य कलेतील अचूकतेमुळे राजा विष्णुदेववर्माने बांधलेल्या या मंदिरात सूर्याचे पहिले किरण मंदिराच्या गाभाऱ्यात पडतील अशी योजना आहे

प्राचीन भक्तपूरची १९३४ साली झालेल्या भूकंपात खूप हानी झाली जुन्या वास्तूशिल्पांना धोका निर्माण झाला सुदैवाने पश्चिम जर्मनीच्या सहकार्याने त्या वास्तूंना मूळ स्वरूप व मजबूती प्राप्त करून देण्यात स्थानिक कारागिरांना यश प्राप्त झाले त्यांनी अहोरात्र मेहनत घेतली व वीट न् वीट चपखलपणे व्यवस्थित बसविली

भडगावहून प्रजासत्ताक चीनच्या सरहद्दीवरील कोडारीपूल येथे जाण्याचा विचार होता ही राजमार्ग चीनच्या सहकार्याने तयार करण्यात आला तिबेट-मधून नेपाळला जोडणारा १०४ कि मी अंतराचा हा मार्ग १९६६ साली बांधला नेपाळमधील तेराव्या शतकातील अनिको या वास्तुशिल्प तंत्रज्ञाने चीनचा क्रूरकर्मा चेंगिझखानचा नातू कुबलाईखानच्या दरबारात भेट दिली होती पेकींगच्या व्हाईट पॅगोडा मंदिराची उभारणी केली होती. काही काळ अनिकोने वास्तु शिल्प मंत्री म्हणून चीनच्या दरबारात मंत्रीपदही भूषविले होते अनिकोचे नाव या नवीन बांधलेल्या राजमार्गाला दिले आहे. टॅक्सीवाला म्हणाला, कोडारीपूलची चीनची सरहद्द पर्यटकांना सुरक्षिततेच्या दृष्टीने बंद केली मग तो हळूच म्हणाला, अति-क्रमण करून चिनी सैनिक या रस्त्याने नेपाळ हद्दीत घुसून त्यांनी नेपाळचा काही भाग गिळकृत केला असावा

पाटण, भडगाव पाहून टॅक्सीने काठमांडू भोवतालच्या रिंग रोड—चक्रपथवर आलो काठमांडू शहराभोवती बत्तीस कि मी लांबीचा, चार पूल असलेला हा रूंद रस्ता चीनच्या सहकार्याने बांधला आहे वाहने गावाबाहेर नेण्याची व्यवस्था या रस्त्यामुळे झाल्याने काठमांडू गावाच्या प्रमुख रस्त्यावरील गर्दी कमी होण्यास मदत झाली रिंग रोडच्या बाजूला नवीन त्रिभुवन आंतरराष्ट्रीय विमानतळाचे काम चालू असलेले दिसले

## विशाल बुद्ध अवलोकन करीत आहे ! ..

रिंग रोडने बोधनाथ या प्राचीन स्तूपाजवळ पोहोचलो. मुख्य रस्त्याच्या बाजूला थोड्या अंतरावर हा शंभर मीटर व्यासाचा प्रचंड स्तूप आहे जगातील मोठ्या स्तूपात त्याची गणना होते पाचव्या शतकात तिबेटी बौद्ध धर्मीयांनी हा स्तूप उभारला स्तूपाला पांढरा रंग दिला असून बुद्धाचे दोन विशाल नेत्र त्यावर रंगवले आहेत ते नेत्र असे दर्शवितात की भगवान गौतम बुद्ध त्याच्या अनुयायांचे अवलोकन करीत आहे गोरखपूरहून नेपाळ सरहद्दीतील प्रवेशद्वाराच्या कमानीवर असेच दोन विशाल नेत्र रंगविले आहेत

बोधनाथ स्तूपावर तेरा पायऱ्या खोदल्या आहेत या तेरा पायऱ्या म्हणजे ज्ञानप्राप्तीचे तेरा टप्पे ! बोधी म्हणजे ज्ञानप्राप्ती म्हणून बोधनाथ नाव पडले

बोधनाथाच्या उभारणीसंबंधी आख्यायिका अशी आहे नेपाळमध्ये पाचव्या शतकात विक्रमादित्य नावाचा राजा राज्य करीत होता तो तेथील बूढा नीलकंठ मंदिरात दररोज जाऊन प्रार्थना करीत असे एकदा तेथील पाण्याचा झरा अकस्मात कोरडा पडला तेथील ज्योतिषांनी राजाला सुचविले की बत्तीस सद्गुण असलेल्या व्यक्तीचा बळी दिला तर जलप्रवाह सुरू होईल राजाला पूर्ण कल्पना होती की असे सद्गुण फक्त तो व त्याचा पुत्र यांच्यातच आहेत राजाने राजपुत्र

मानदेवला सूचना केली की मंदिराजवळ बळी दिल्या जाणाऱ्या व्यक्तीला विवक्षित दिवशी पाठविण्यात येईल त्या व्यक्तीचा तू बळी दे त्याप्रमाणे त्या ठराविक दिवशी त्याने तिथे वस्त्र झाकून उभ्या असलेल्या व्यक्तीचा बळी दिला वस्त्र काढल्यावर आपण दिलेला बळी प्रत्यक्ष आपल्या पित्याचाच आहे हे पाहिल्यावर त्याला जबरदस्त धक्का बसला मग त्याने आपल्या पित्याच्या हत्येच्या पातकापासून वाचण्यासाठी हे बोधनाथ मंदिर उभारले स्वतः मृत्यूला सामोरे गेलेल्या राजा विक्रमादित्याच्या प्राणत्यागाला खरोखरच मोल नाही.

बोधनाथ हे नेपाळमधील तिबेटी संस्कृतीचे केंद्र आहे तेथे आजूबाजूला अनेक तिबेटी निर्वासित राहतात चीनने तिबेटवर १९६२ साली आक्रमण केले तेव्हा काही तिबेटी बौद्धधर्मीय भारतात तसेच नेपाळमध्ये आश्रयाला गेले बोधनाथच्या आजूबाजूला तिबेटी हस्तकला वस्तूंची दुकानेही आहेत सुंदर गालिचे तेथे तयार होतात बोधनाथ स्तूपाच्या उत्तर पूर्वेला आणखी बुद्धविहार आहेत नेपाळी भाषेत त्यांना गोम्प म्हणतात ध्यानधारणेसाठी अनेक बौद्ध धर्मीय बोधनाथला येतात

बोधनाथाचे दर्शन घेऊन टॅक्सीने नारायणगाव पंचायत गावात पोहोचलो. हे छोटेसे खेडेगाव काठमांडूच्या उत्तरेला आठ कि मी अंतरावर शिवपुरी टेकडीच्या पायथ्याला आहे पायऱ्या चढून तेथील बूढा नीलकंठ मंदिरात पोहोचलो. नेहमीच्या मंदिरासारखे हे बंदिस्त मंदिर नाही मध्यभागी मोठे चौकोनी कुंड आहेत त्यातील पाण्यात शेषशायी भगवान विष्णूची पंधरा फूट लांबीची सुंदर मूर्ती आहे चार हात, त्यात गदा, शंख असलेली तसेच पायावर पाय असलेली ही मूर्ती एकाच अखंड पाषाणात घडवलेली आहे नागराजाचे वेटोळे शरीराभोवती असून मस्तकाभोवती नागाची अनेकमुखी फणा आहे चेहऱ्यावर सात्त्विक भाव असलेल्या या मूर्तीचे नेत्र मिटलेले आहेत गंध, फुले वाहिलेली ही सुंदर, पवित्र मूर्ती कितीही वेळ पाहूनही समाधान होत नाही कुंडाच्या बाजूला पिंपळाचा मोठा वृक्ष आहे शिलालेख वगैरे नाही वैकुंठ चतुर्थीला (नोव्हेंबर-मध्ये) येथे मोठा उत्सव भरतो व हजारो भाविक यात्रेकरु येतात त्यांच्या मुक्कामाच्या सोयीसाठी बाजूला धर्मशाळा आहेत

या बूढा नीलकंठ मूर्तीबद्दल अशी आख्यायिका आहे की एका शेतकऱ्याला शेतात खणताना ही मोठी पाषाणमूर्ती सापडली ही घटना सुमारे अडीच हजार वर्षापूर्वीची ! खणताना मूर्तीचा अंगठा तुटला व रक्त वाहू लागले अधिक नीट खणले तर ही मूर्ती मिळाली दर्शनासाठी सर्व गाव लोटले राजाही औत्सुक्याने आला पण प्रवेशद्वारीच नागराजाने अडवले परत जा असे सुचवले कारण नेपाळचा राजा हा विष्णुचा अवतार मानला जातो व गरुड हे विष्णूचे वाहन

आहे अखेर राजा उदास अंतःकरणाने परत गेला पण त्याला स्वप्नात नाग-राजाने दर्शन देऊन सांगितले की तू मूळ मूर्तीप्रमाणे दुसरी मूर्ती घडवून घे. तिचे दर्शन तू घेऊ शकशील राजाने स्वप्नातील आदेशाप्रमाणे मूर्ती घडवून घेतली व स्वयंभूनाथ मंदिराच्या वाटेवरील बालाजू बगीच्यातील कुंडात ती ठेवली राजा त्या मूर्तीचे दर्शन घेऊ शकतो खरोखर बूढा नीलकंठची भेट नेपाळ प्रवासात चुकवू नये अशी आहे पाण्यातील ही निद्रितावस्थेतील सात्विक पाषाणमूर्ती तिच्या संबधीच्या आख्यायिकेमुळे काहीशी गूढ वाटते भक्तिभावाने नमस्कार करून, फुले अर्पण करून तेथून निघालो

त्यानंतर पहायचे होते टेकडीच्या पायथ्याशीच असलेल्या बाला जू या गावातील बालाजू वॉटर गार्डन ! ते पहाण्यासाठी तिकीटे काढून आत प्रवेश केला दाट झाडी, बाबूंचे वृक्ष व रंगीबेरंगी फुलांनी बहरलेल्या या बगीच्यात फिरताना मन प्रसन्न होते पहाडातील पाणी तेथे कल्पकतेने खेळवले आहे पाचसहा तोटचामधून पहाडातील प्रवाह एका छोटचा जलाशयात नैसर्गिकरीत्या पडतो बावीस धारात धबधब्यासारखे पाणी पडते म्हणून बावीसधारा असेही नाव बागेला आहे अनेक पर्यटक तेथे स्नानाचा मनमुराद आनंद लुटताना दिसले छायाचित्रे घेण्यासाठी उत्तम नैसर्गिक पार्श्वभूमी असलेले हे स्थान आहे बगीच्यात एक कुंड असून तेथे राजाने दर्शनासाठी मुद्दाम घडवून ठेवलेली शेषशायी भगवानाची मूर्ती आहे हुबेहुब बूढा नीलकंठप्रमाणे असलेली ही मूर्ती आकाराने मात्र बरीच लहान आहे

आता जायचे होते काठमांडूचा प्रसिद्ध स्वयंभूनाथ हा बुद्धधर्मियांचा स्तूप पाहण्यास ! काठमांडू शहराच्या पश्चिमेला सात कि मी अंतरावरील टेकडीच्या मध्यापर्यंत टॅक्सीने पोहोचलो. थोडचा पायऱ्या चढून टेकडीच्या माथ्यावर आल्यावर दगडी चबुतऱ्यावरील पांढऱ्या रंगाचा प्रचंड स्तूप दिसला. हाच प्रसिद्ध स्वयंभूनाथ स्तूप गौतम बुद्धाच्या जन्मानंतर म्हणजे दोन हजार वर्षांपूर्वी तो उभारला जगातील हा जुना स्तूप समजला जातो हा स्तूप अर्ध-गोलाकार पन्नास फूट उंचीचा असून त्यावर चौकोनी मनोरा आहे त्याला तोरण म्हणतात त्यावर ब्रॉंझ धातूचा सोन्याचा मुलामा दिलेला चमकदार पत्रा लावला आहे चारी बाजूला दोनदोन नेत्र रंगवले आहेत पांढऱ्या, निळचा काळचा तसेच केशरी रंगाने रंगवलेले नेत्र मंगोलियन वंशियांच्या नेत्रासारखे वाटतात नेत्रांवर निळचा रंगात भुवया कोरल्या आहेत तर खाली एक या आकडचासारखी आकृती काढली आहे बुद्धाचे नेत्र त्यांच्या अनुयायांचे अवलोकन करीत आहेत सर्वांत वर धातूचा नक्षीदार छत्रीसारखा सोनेरी सौंदर्यशाली कळस आहे स्तुपा-भोवती रंगीबेरंगी पताका फडकत असतात स्तूपाच्या कळसावर ज्या तेरा गोलाकार लहान लहान होत गेलेल्या धातुच्या रिंगा आहेत त्या ज्ञानप्राप्तीचे तेरा टप्पे दर्शवतात बोधनाथस्तूपात रिंगाऐवजी तेरा पायऱ्या आहेत या कळसाचे

काम सातव्या शतकात लिच्छवी राजाच्या कारकिर्दीत वास्तुशिल्पकार शांतिशील बुद्ध भिक्षूने केले

स्तुपाभोवती तांबे–पितळेची दोनशेअकरा प्रार्थनाचक्रे आहेत घड्याळाच्या काट्याच्या दिशेने ती फिरवली की भक्ताच्या नावे पुण्य जमा होते अशी समजूत आहे तिबेटी बौद्ध भिक्षू 'ओम् आणि पद्मेहम्' हा मंत्र म्हणून प्रार्थनाचक्रे फिरवताना दिसले या प्रार्थनाचक्रावरही ओम् आणि पद्मेहम् असे कोरले आहे त्याचा अर्थ 'कमलपुष्पातील हे रत्ना–भगवान!' असा आहे

स्वयंभूनाथच्या या स्तूप उभारणीबाबत आख्यायिका अशी आहे– नेपाळ-मधील काठमांडू खोऱ्यात पूर्वी या ठिकाणी सरोवर होते त्यात खूप नाग व सर्प होते त्यामुळे त्या सरोवराचे नाव 'नागहृद' 'नागवास' होते श्री विष्णूने खड्गाच्या सहाय्याने पर्वत फोडून बागमती (व्याघ्रमती) नदीला बाहेर पडावयास वाट दिली व त्यामुळे नागवास सरोवर कोरडे पडले पुढे या ठिकाणी वस्ती झाली या खोऱ्याला नेपाळ नाव पडले

बौद्धधर्मियांच्या आख्यायिकेनुसार चीनमधून आलेल्या मंजुश्री नावाचा बोधिसत्व या सरोवराच्या सौंदर्याने मुग्ध झाला सरोवराभोवती तीन प्रदक्षिणा मारून आपल्या अनुयायांसाठी हे पवित्र स्थळ त्याने मानले सरोवराच्या बाजूच्या दोन टेकड्यांना तलवारीने खिंडार पाडल्यावर सरोवरातून पाणी वाहून गेले सरोवरात एक मोठे कमलपुष्प होते त्यातील पाकळ्यातून सूर्यापेक्षा धगधगणारी ज्योत निघाली ही 'स्वयंभू ज्योत बुद्धाचे शिर मानण्यात आली तेव्हापासून हे बौद्धधर्मियांचे पवित्र स्थान मानण्यात येऊ लागले

या टेकडीवरच पश्चिमेला सितलादेवी हे हिंदूधर्मियांचे स्थान आहे. ही देवी लहान मुलांना देवीच्या आजारातून मुक्त करते असा समज आहे लहान मुलांना घेऊन देवीच्या दर्शनाला आलेल्या स्त्रियांची गर्दी तेथे होती मंदिरात चांदीची मूर्ती असून समोर अनेक दिवे प्रज्वलित केलेले दिसले टेकडीवर काही घरे व दुकानेही आहेत स्वयंभूच्या उत्तरेला टेकडीवरच गौतम बुद्धाचे मंदिर आहे मंदिरात बुद्धाची वीस फूट उंचीची पितळेची मूर्ती आहे अनेक बौद्ध भिक्षू तेथे होते स्वयंभूच्या पूर्वेला डंबेल्सच्या आकाराचे ब्राँझ धातूचे सहा फूट लांबीचे चक्र गोलाकार स्टँडवर आहे तिबेटी भाषेत त्याला दोरजे वज्र म्हणतात दोरजे ही बौद्ध धर्माची खूण मानतात

टेकडीवर असंख्य माकडे अगदी धुमाकूळ घालीत होती निर्धास्तपणे ती इतस्तत: उड्या मारीत होती टेकडीवरून आजूबाजूच्या टप्प्याटप्प्यातील हिरव्या-गार भातशेतीचे दृश्य मात्र कमालीचे सुंदर दिसते उत्तरेला हिमशिखरे दिसली तसेच बागमती, विष्णुमती नद्यांचा प्रवाह दिसतो काठमांडू खोऱ्याचे विहंगम

दृश्यही येथून दिसते उच भीमसेन टॉवरही दिसला वाटले की स्वयभूनाथही आपल्या नेत्रांनी हेच दृश्य चौफेर न्याहाळत असणार आपल्या तळाशी चाललेल्या पूजाअर्चेपेक्षा त्याचे सारे लक्ष सृष्टीच्या या अनुपम रूपांकडेच असणार

पायऱ्या उतरून खाली आलो टॅक्सी आता नेपाळ राष्ट्रीय सग्रहालयाकडे निघाली टॅक्सीवाला म्हणाला की, स्वयभू टेकडीवर हरे राम हरे कृष्ण या देव-आनदच्या सिनेमाचे शूटिंग झाले होते नेपाळच्या चित्रसृष्टीबद्दल विचारले असता तो म्हणाला, नेपाळमध्ये प्रादेशिक चित्रपट फार कमी निघतात सर्व हिंदी चित्रपटच येथे चालतात धर्मेन्द्र व अमिताभ हे येथील लोकप्रिय नट पूर्वी या टेकडीवर हिप्पी फार यायचे पण आता त्याची सख्या फार कमी झाली

दुपारचे चार वाजून गेले होते सकाळी भरपूर नाष्टा केला होता म्हणून बरे सग्रहालय पाहून मग जेवायचे ठरले काठमाडूच्या वाटेवरील नेपाळ राष्ट्रीय संग्रहालयाजवळ उतरलो. प्रवेशद्वारी तिकीटे काढून आत प्रवेश केला खरा पण दमल्यामुळे व भूक लागल्यामुळे सर्वांचाच उत्साह मावळला होता उल्का–उदयने तर आत येण्यास साफ नकार दिला आम्ही तिघे मात्र ओढूनताणून उत्साह आणून सग्रहालयातील विविध कक्षातून फिरू लागलो एका दालनात पधराव्या शतकातील सूर्यदेवाची सप्तअश्वाच्या रथावर आरुढ धातूची मूर्ती दिसते त्याचप्रमाणे माया-देवी, नटराज, हरिहर, कालभैरव, महिषासुर मर्दिनी, शिवगौरी यांच्याही मोहक मूर्ती आहेत एका दालनात देवताच्या पाषाणमूर्ती, विविध प्रकारचे दिवे, पूर्वीची वाद्ययत्रे आहेत राजा भूपतीद्रमल्लची बसून नमस्कार करणारी सुबक मूर्ती आहे एका दालनात नेपाळ शाहदेव राजवंशातील पूर्वजाची छायाचित्रे असून त्यात त्यांच्या आयुष्यातील लग्न, शिकार असे अनेक प्रसग चित्रित केले आहेत राजाना परदेशात मिळालेले विविध मानसन्मान भेटी याचा संग्रहही दिसतो. राजाच्या कार्यालयाची प्रतिकृतीही तेथे आहे नेपोलियन बोनापार्ट याने राणा जगबहादूर याला फ्रान्सभेटीत दिलेली तलवार ही येथील वैशिष्ट्यपूर्ण वस्तू आहे तिबेटमधून १८५६ साली आणलेली चामड्याची तोफ आहे दुसऱ्या मजल्यावर विविध शस्त्रांचा सग्रह आहे. तिसऱ्या मजल्यावर जुन्या हस्तलिखिताचा सग्रह असून जुने पोषाख, सेनापतीच्या टोप्या जतन करून ठेवल्या आहेत इ स १९३८ साली स्थापन झालेले हे सग्रहालय नेपाळच्या कलासस्कृतीचे दर्शन घडवते

पाच वाजून गेले होते काठमांडूच्या आजूबाजूच्या परिसरातील दर्शनीय स्थाने पाहून समाधान वाटले होते मारवाडी सेवा समिती धर्मशाळेत परतलो टॅक्सीवाल्याचे बिल दिले टॅक्सीवाल्याने दिवसभर विविध स्थळे पाहण्यासाठी भरपूर वेळ दिला रात्रीचे जेवण आटोपून लवकर निद्राधीन झालो ❋

## श्री पशुपतिनाथ दर्शन

काठमांडूच्या वास्तव्यातील दुसरा दिवस उजाडला सकाळी श्री पशुपतिनाथ मंदिर व त्या बाजूच्या गुहयेश्वरी मंदिराचे दर्शन घेण्याचा कार्यक्रम होता. दुपारनंतर दक्षिणकाली व गोदावरी बोटॅनिकल गार्डन भेटीचा कार्यक्रम ठरवला होता. पशुपतिनाथ मंदिर गावापासून साधारण तीन कि. मी अंतरावर आहे सकाळच्या प्रसन्न वातावरणात श्री पशुपतिनाथ मंदिरासमोरील रस्त्यावर टॅक्सीतून उतरलो

आपल्याकडील देवस्थानाप्रमाणे रस्त्यावर दुतर्फा छोटी छोटी दुकाने होती. रुद्राक्षांच्या माळा, सुंदर मण्यांच्या माळा, लालभडक कुंकू, फोटो, रूद्राक्षे, शिवलिंगे, प्रसादाचे पुडे यानी दुकाने भरली होती नेपाळी स्त्रीपुरुष विक्री करीत होते. नऊवारी साडीतील काही महिला यात्राकंपनी मार्फत आल्या होत्या, त्यांना पाहून महाराष्ट्रातच असल्याचा भास झाला

पशुपतिनाथाच्या दर्शनाची ओढ वाटत असल्याने हार, फुले घेऊन मंदिराच्या प्रवेशद्वारी पोहोचलो मंदिरात कॅमेरा नेण्यास बंदी असल्याने तेथील कार्यालयात कॅमेरा जमा केला मंदिराच्या विशाल आवारात भाविकतेने प्रवेश केला तेव्हा असंख्य कबुतरे दाणे टिपताना दिसली. कोणीतरी जवळ जाताच फडफड आवाज

करीत ती उच उडाली मंदिरासमोर भव्य नंदी आहे. नंदीवर पितळी पत्रा असून त्याला सोन्याचे पॉलिश केलेले असल्याने तो चकाकतो लिच्छवी वंशातील शिवभक्त शंकरदेव याने या नंदीची प्रतिष्ठापना केली नंदीचे दर्शन घेऊन तीन चार पायऱ्या चढून गाभाऱ्याच्या प्रवेशद्वारी आलो दर्शनाला आलेल्या भाविकाची गर्दी होती मद्रासी, बंगाली आणि महाराष्ट्रीयन स्त्रीपुरुष दिसत होते गाभाऱ्यातील शिवलिंगाचे दर्शन घेतले गाभाऱ्यात चार पाच पुजारी होते मस्तकावर, गळ्यात रुद्राक्षाच्या माळा घातलेल्या होत्या पुजाऱ्यांनी आमच्या कपाळावर गंध लावले आपल्याकडील पंढरपूर, वाराणशी, मथुरा क्षेत्राप्रमाणे पुजाऱ्यांनी दक्षिणेसाठी तगादा केला नाही अर्थात् आपण खुषीने दक्षिणा ठेवतोच शिवलिंगावर दुधाचा अभिषेक चालू होता घागरीच्या घागरी भरलेले दूध शिवलिंगावर ओतले जात होते गाभाऱ्याच्या छताला सोन्याचा मुलामा दिला आहे

मंदिराभोवती संगमरवरी प्रदक्षिणा मार्ग आहे तसेच भिंतीवरही संगमरवर होते गाभाऱ्याच्या चारी दिशेला चार चांदीचे दरवाजे असल्याने आतील शिवलिंगाचे चारी बाजूने दर्शन घेता येते गाभाऱ्यात पुजाऱ्याशिवाय कोणी जाऊ शकत नाही चारी बाजूच्या दरवाजामुळे कितीही भाविकाची गर्दी असली तरी दर्शन निवांत होते दरवाज्याच्या चौकटीही चांदीच्या पत्र्याने मढवलेल्या आहेत. गाभाऱ्यातील शिवलिंग काळ्या रंगाचे साडेतीन फूट उंचीचे आहे चारी बाजूला एक एक मुख व दोन दोन भुजा कोरलेल्या आहेत डाव्या हातात अमृताने भरलेला कमंडलू तर उजव्या हातात अभयमुद्रा व जयमाला आहे तसेच शिवलिंगाच्या वरच्या बाजूलाही कोरले आहे अशी ही शिवाची पंचमुखी मूर्ती आहे या मूर्तीची विशेषता अशी की चारी दिशांना शिवाची त्रिमुखमूर्ती एकाच शिळेवर कोरली आहे त्यामुळे प्रत्येक दिशेला शिवाची त्रिमुखी मूर्ती दिसते. पशुपतीची चारी मुखे चार धाम मानतात दक्षिण अघोरमुख असून मस्तकावर रुद्राक्षमाळ असलेले रामेश्वर आहे, पूर्वमुख मस्तकावर जटा असलेले जगन्नाथ आहे उत्तरमुख अर्धनारीनटेश्वर असलेले बद्रीकेदार आहे पश्चिममुख मस्तकावर मुकुट असलेले द्वारकानाथ आहे

पशुपतिनाथाचे धार्मिक महत्त्व पुराणात वर्णन केले आहे काशीत विश्वनाथ, प्रभासक्षेत्रात सोमनाथ, उज्जयिनीत महांकालेश्वर, सेतुबंधमध्ये रामेश्वर तर नेपाळ क्षेत्रात श्रीपशुपतिनाथ ज्योतिर्लिंग बागमतीच्या तीरावर विराजमान आहे. प्राचीनकाळी बागमती नदीच्या तीरावर मनोहर वन होते. एके दिवशी भगवान शंकर व पार्वती काशीक्षेत्राहून यात्रा करता करता येथे आले येथील वनसौंदर्याने मोहित होऊन येथेच मृगमृगिणीचे रूप धारण करून ते गुप्त रीतीने विहार करू लागले इकडे देवदेवतांना याची कल्पना नव्हती. सर्वांनी कैलास

पर्वतापासून तिन्ही लोकात शोध घेण्याचा प्रयत्न केला. परतु शंकरपार्वतीचा शोध लागला नाही शोध घेत ब्रह्मा, विष्णु, इद्र हिमालयाच्या पायथ्याशी बागमती तीरी या ठिकाणी पोहोचले या ठिकाणी पुष्ट अग, सुदर शिंगे व तीन नेत्र असलेल्या एका मृगाला मृगिणीसह विहार करताना त्यानी पाहिले भगवान शंकराला त्यांनी ओळखले मृगाचे शिंग पकडण्याचा प्रयत्न केला त्याबरोबर शिंगाचे तीन तुकडे झाले प्रत्येकाच्या हातात एक एक तुकडा आला आणि त्याचबरोबर मृगरूपी भगवान शकर अतर्धान पावले मात्र पवित्र बागमतीच्या पश्चिम तटावर ज्योतिरूपात प्रकट पावले ब्रह्मा, विष्णु, इद्राने शकराना कैलासात निवासासाठी येण्याची प्रार्थना केली त्याची प्रार्थना ऐकून भगवान म्हणाले " मी येथे पशु (मृग) रूपात राहिल्याने माझे नाव पशुपती होईल जी देवता वा जो माणूस माझे दर्शन घेईल त्याला पृथ्वीवरील पशुयोनीत पुन. जन्म घ्यावा लागणार नाही " या कथेनुसार पंचमुखी शिवाच्या भक्तिपूर्वक दर्शनाने पूर्व जन्मातील सर्व पापापासून मुक्त होऊन पशु जन्म घ्यावा लागत नाही, शिवलोकात प्रवेश मिळतो अशी भाविकाची श्रद्धा आहे

महाभारत युद्ध सपल्यानतर पांडव हिमालयात केदारनाथला दर्शनाला गेले होते शिवाने पाडवानी केलेल्या गोहत्येबद्दल दर्शनाला नकार दिला तेव्हा पाडवांनी त्यांची आराधना केली. पाडवाची परीक्षा घेण्यासाठी भगवानाने महीषरुप घेतले पाडवानी शकरांना ओळखले. त्यानी महिषाची शेपटी पकडली शकरानी जमिनीत मुख लपवले. जमिनीत लपवलेले हे शिर नेपाळमध्ये आले तेथेच पशुपतिनाथ आहे पांडवांनी प्रार्थना केल्यावर भगवान म्हणाले की जगाच्या कल्याणासाठी केदारनाथमध्ये पृष्ठभाग व नेपाळमध्ये मुख–शिर राहील केदारनाथच्या दर्शनानंतर पशुपतीनाथचे दर्शन अवश्य घ्यायला हवे. त्याशिवाय त्या यात्रेचे पुण्य लाभत नाही

पशुपतिनाथाच्या पूजेसाठी विंध्याचलाच्या दक्षिणेत जन्मलेल्या कर्नाटकी, महाराष्ट्रीयन, आध्र तसेच द्राविड जातीच्या ब्राह्मणापैकी पुजाऱ्याची निवड केली जाते प्रमुख पुजाऱ्यास श्रीरावळ म्हणून सबोधले जाते त्याचा मान मोठा असतो फक्त पुजारीच शिवलिंगाला स्पर्श करू शकतात मदिरात एकमुखी ते चौदामुखी रूद्राक्षाच्या माळा, डावा शख व नागमणी, गजमोती अशी रत्ने आहेत कृष्णपक्षाच्या द्वितीयेला त्याचे दर्शन होऊ शकते शिवाची पूजा रुद्राक्षाने करतात थंड पाण्याने अभिषेक केला तर वरुणलोकाची प्राप्ती होते. उष्ण पाण्याने अभिषेक केला तर सूर्यलोकाची प्राप्ती होते दुधाने अभिषेक केल्यास चद्रलोकाची तर तुपाने केल्यास शिवलोकाची प्राप्ती होते. गाभाऱ्यात दुधाच्या भरलेल्या कळशा

सारख्या आणल्या जात होत्या केशरी वस्त्र परिधान केलेले प्रधान पुजारी सारखा दुग्धाभिषेक करीतच होते

श्रीपशुपतिनाथाची नित्यपूजा खालील प्रमाणे असते सकाळी प्रथम पश्चिम दरवाजा उघडण्यात येतो प्रधान पुजारी सकाळी नऊ वाजता गाभाऱ्यात येतात चांदीच्या कलशातून सर्व तीर्थांना आवाहन करीत पहिले आदि-कलश स्नान घालतात नतर बाकीचे दरवाजे उघडतात दोन तास जलस्नान, रुद्राभिषेक होतात नंतर धूप आरती, पचामृतस्नान, तैलाभ्यागस्नान असे पूर्ण कलश स्नान होते नतर पश्चिम दरवाजाखेरीज तिन्ही दरवाजे बद होतात श्रीपशुपतिनाथाचा साज-शृगार होतो चदनाचा लेप दिला जातो, मुकुट, छत्री चढवली जाते मग परत तिन्ही दरवाजे उघडण्यात येतात घटा वाजवून आरती होते साडेतेरा किलो तादळाचा नैवेद्य दाखविला जातो नतर शंखजलाचा अभिषेक होतो दुपारी अडीचला नित्यपूजा सपते सध्याकाळी आरती होते पशुपतिनाथसमोर रोज अर्धा किलो शुद्ध तुपाचा अखड दिवा जळत असतो रात्री मदिराच्या चारी बाजूला दीपमाला प्रज्वलीत होतात प्रत्येक पौर्णिमेला नित्यपूजेनतर महास्नान होते एकादशीला भाविकांची दर्शनाला जास्त गर्दी होते महाशिवरात्रीला तर लाखो यात्रेकरूंच्या गर्दीने हे मदिर गजबजून जाते शिवपुराणात म्हटले आहे की महाशिवरात्रीला व्रत केल्याने अश्वमेध यज्ञाचे फळ मिळते. या दिवशी नेपाळी सैनिक लष्करी सलामी देतात एक विशेष गोष्ट म्हणजे माघशुक्ल चतुर्दशीला श्रीपशुपतिनाथाला बुद्धभगवानाचा शृंगार चढवला जातो एका नेपाळी बुद्धधर्मीय राजाने फार पूर्वी श्रीपशुपतिनाथच्या ऐवजी तेथे बुद्धमूर्ती ठेवण्याचे ठरवले त्यावेळी राजाच्या मंत्रीगणांनी असे न करता माघशुक्ल चतुर्दशीला पशुपतिनाथाला भगवान बुद्धाचा पेहराव चढवून बुद्धाचे रुप देण्यास व राजाला दर्शन घेण्यास सुचवले त्यावेळेपासून ही प्रथा आहे.

पशुपतिनाथचे हे मदिर राजा भूपालसिंग मल्ल याने इ स १६९४ मध्ये उभारले मूळ प्राचीन शिवलिंगाच्या जागी सध्याच्या शिवलिंगाची स्थापना सहाशे वर्षांपूर्वी करण्यात आली होती मंदिराचे शिखर पॅगोडा शैलीचे दुमजली आहे प्रदक्षिणा मार्गाच्या भिंतीवर काममूर्ती कोरल्या आहेत अशा मूर्तींमुळे मदिराचे वीजेपासून रक्षण होते अशी पूर्वी समजूत होती किंवा मनातील कामवासना विकार बाहेरच ठेवून मग दर्शन घ्या असेही भाविकाना त्यातून सुचवायचे असावे

श्रीपशुपतिनाथाचे दर्शन घेतल्यावर मंदिराच्या प्रागणात परिक्रमा करण्यास सुरुवात केली कबुतराप्रमाणेच खूप माकडेही तेथे होती सुरुवातीच्या पश्चिम दरवाजासमोर दगडी चबुतऱ्यावर पितळेचा नदी आहे दक्षिण दरवाजाजवळ कीर्तिमुख भैरव द्वारपाल आहे. समोर पाषाणस्तभावर नम्रतेने प्रणाम करणारे

स्व श्री. राजे महेंद्र व राणी रत्ना याचे पुतळे आहेत दक्षिण द्वाराजवळ शीतला देवीचे छोटे मंदिर आहे हिंदुखेरीज या मदिरात कुणालाही प्रवेश नाही परदेशी प्रवासी त्यामुळे दिसत नव्हते जे लोक या मदिरात जाऊ शकत नाहीत ते दक्षिण टोकाहून शिखराचे दर्शन घेऊन पुण्य मिळवतात ईशान्येला सात फण्याच्या वासुकी नागाच्या छायेत श्री वासुकी नारायणाची मूर्ती आहे वासुकी नागराजाने केलेल्या तपस्येने भगवान शंकर प्रसन्न झाले होते त्यांनी त्याला आपले कंठाभूषण बनवून वर दिला होता की पशुपतिनाथपूजा करणाऱ्यांनी प्रथम वासुकीची पूजा करायला हवी शेजारी श्रीकवींद्र जयप्रताप मल्ल देव राजाचा शिलालेख आहे उत्तरेला दगडी चबुतऱ्यावर त्रिशूळ आहे पूर्वेला लाल गणेश सिद्ध विनायकाची मूर्ती आहे. त्यावर लाल वस्त्र आहे

मदिराची परिक्रमा पूर्ण करून पूर्व दरवाजाने पायऱ्या उतरून बागमती नदीच्या घाटावर आलो काठमांडूची पवित्र बागमती नदी तेथून सुमारे बारा कि मी अंतरावरील हिमालयाच्या शिवपुरी पर्वतात उगम पावते नेपाळ खोऱ्यातून वाहत जाऊन बागमती बिहारमध्ये भागलपूर जिल्ह्यात गंगेला मिळते. हिमवत्खडात म्हटले आहे–

त्रेता द्वापरयोर्मध्ये त्रिंशब्दर्षसहस्त्रकम्

ब्रह्म, सरस्वती गगा वाग्देवी त्व भविष्यति ।

हे वाग्मती, तू त्रेता, आणि द्वापर युगातील तीस हजार वर्षापर्यंत ब्रह्म–सरस्वती–गंगा नावाने पुजित होशील

भगवान शंकराच्या जिव्हेतून निघालेल्या प्रवाहाचे नाव शिवगंगा तथा वाग्मती होय हिमवत् खडात म्हटले आहे–

म जिव्हाग्र समुद्भूता ततस्त्व देविवाग्मति ।

भविता शिवगगा त्व मत्त समुद्भवीयत ।।

"माझ्या जिव्हेच्या अग्रभागापासून उत्पन्न झालेल्या तुझे नाव वाग्मती होय माझ्यापासून उत्पन्न झालेल्या तुझे नाव शिवगंगा होईल"

श्रीकृष्ण भगवानाने देवतांना म्हटले आहे–

शतगगा समाज्ञेया कलौ प्राप्ते दि वाग्मतो ।

कलियुग लागल्यावर वाग्मती शतगंगेप्रमाणे सर्वपूज्य होईल.

वाग्मति शिवगगेति सा वै ब्रह्म सरस्वती.

वाग्मती शिवगंगा, ब्रह्म सरस्वती नावाने ओळखली व पूजिली जाते. हिमालयातील उच्च शिखरातून उगम पावलेल्या बागमती नदीच्या स्नानाने








श्वेतभैरव

← कालभैरव

सिंग दरबार पॅलेस,
काठमाडू








पावले - यतीची ?

← अशोक स्तंभ, लुम्बिनी

↓ मायादेवी मंदिर, लुम्बिनी



वैकुंठप्राप्ती होते आचमनाने स्वर्गप्राप्ती होते अश्वमेध यज्ञ केल्याइतके पुण्य लाभते मरणोत्तर शिवलोकाची प्राप्ती होते व पशुयोनीत पुन: जन्म घ्यावा लागत नाही असा बागमती स्नानाचा महिमा आहे आम्ही सर्वांनी या पवित्र नदीत हातपाय धुतले पाणी मस्तकावर घेतले इतक्यात उदयने शेवटच्या पायरीच्या एका ठिकाणी लक्ष वेधले तेथून एका पत्थरातील गोमुखातून शिवलिंगावरील अभिषेकाचे दूध नदीच्या पात्रात मिसळून वाहत जाताना दिसत होते

बागमतीच्या दोन्ही काठांवर घाट बांधले आहेत सर्वात वरचा घाट 'आर्या घाट' आहे तेथे बागमतीच्या प्रवाहांचा त्रिवेणी संगम होतो आर्या घाटवर राजे त्रिभुवनच्या देहावर शेवटचे अग्निसंस्कार करण्यात आले होते बागमतीच्या घाटावर मृतदेह दहन करण्यात येतात वाराणशीला ज्याप्रमाणे मृत्युपंथाला पोहोचलेले वृद्ध पवित्र गंगेच्या काठी आपले उर्वरित आयुष्य घालवतात त्याप्रमाणे बागमतीच्या काठीही अनेक वृद्ध मृत्यूची प्रतीक्षा करीत राहतात.

पायऱ्या चढून पुन: मंदिरात आलो परत दर्शन घेऊन प्रवेशद्वारी जमा केलेला कॅमेरा परत घेतला मंदिराच्या बाजारच्या रस्त्यावर आलो. नेपाळमध्ये येण्यास निघण्यापूर्वी अनेकांनी रुद्राक्ष आणायला सांगितले होते. त्याप्रमाणे एका दुकानात चौकशी केली रुद्राक्ष खरे की खोटे याची परीक्षा कशी करायची हेही एकजणाने सांगितले होते पाण्यात बुडणारे रुद्राक्ष खरे व तरंगणारे खोटे. दुकानदाराने आतल्याभागातून वेगवेगळ्या बरण्यामध्ये ठेवलेले रुद्राक्ष आणले. बाकाखाली ठेवलेली पाण्याची बादली पुढे सरकवली. त्यात परीक्षा करून रुद्राक्ष घेतले धार्मिक वृतीच्या दुकानदाराने रुद्राक्ष महिमा थोडक्यात सांगितला

रुद्राक्षवृक्ष हिमालयाच्या पर्वतश्रेणीत सापडतात शिवपुराणात वर्णन केले आहे की रुद्राक्षाच्या स्पर्शाने व रुद्राक्षमाला धारण करून शिवमंत्र जपल्याने सर्व पापे दूर होतात तसेच मनोरथही पूर्ण होतात आवळ्याच्या आकाराचा रुद्राक्ष मोक्ष देणारा उत्तम तर बोराच्या आकाराचा सुखसौभाग्य वृद्धिंगत करणारा. गुंजाच्या आकाराचे मनोरथ पूर्ण करणारे मानले जाते जितके लहान रुद्राक्ष तितके जास्त फलदायी गोल, काटेदार, चिकणे रुद्राक्ष श्रेष्ठ किडके, काटे नसलेले, चपटे रुद्राक्ष लाभदायी नसते.

रुद्र अक्ष म्हणजे रुद्राक्ष, शिवाचा नेत्र हा तृतीय नेत्र जगाच्या अध्यात्मिक तेजोबलाचे प्रतीक मानला गेला. रुद्राक्षनिर्मितीची कथा अशी आहे-- त्रिपुरासुराला ठार मारण्यास कालाग्निरुद्राने प्रथम ध्यानार्थ डोळे मिटून घेतले. तेव्हा त्यातून जे अश्रुबिंदु जमिनीवर पडले ते रुद्राक्षमणी बनले मग जेव्हा त्याने

डोळे उघडले तेव्हा ओघळलेल्या अश्रूपासून रुद्राक्ष झाडे उगवली रुद्राक्ष पांढरे, तांबडे, पिवळे व काळे अशा चार रंगांचे असतात पांढरे सर्वश्रेष्ठ व काळे हीन असते पण पांढरे व पिवळे रुद्राक्ष सहसा आढळत नाहीत अकराशे रुद्राक्ष धारण करणारा भक्त देवासमान पूज्य व शंकराच्या समान मानतात रुद्राक्षांचे एकमुखा-पासून चौदा मुखांपर्यंत प्रकार आहेत रुद्राक्ष धारण करणाऱ्या भक्तांनी चौदा रुद्राक्षाचे विविध मंत्र म्हणावे 'ॐ नमः शिवाय' हा शिवजीचा मूळ मंत्र आहे चौदा मुखी रुद्राक्षाखेरीज सोळा, एकवीसमुखी रुद्राक्ष संग्रह करून पूजा, आरती केल्याने मनोवांच्छित फलप्राप्ती होते देशविदेश यात्रेच्या वेळी रुद्राक्षाची पूजा केल्यास, दर्शन घेतल्यास यात्रा सफल होते शुभकार्याच्या शुभारंभात रुद्राक्ष धारणाने विघ्नाचा नाश होतो अशी समजूत आहे एकमुखी रुद्राक्ष जेथे असतो तेथे लक्ष्मी स्थिर राहते अशी समजूत आहे. शारीरिक व्याधींवर रुद्राक्षाचा उपयोग केला जातो

काही दुकानात गुळगुळीत, चकाकणाऱ्या शाळीग्रामाची शिवलिंगे होती हिमालयात आढळणाऱ्या शाळीग्रामपासून ती बनवतात काही पिंडीची खरेदी केली

पशुपतिनाथ मंदिराच्या दक्षिणेला पंचमुखी महादेवाची पाच मंदिरे आहेत त्यात अनेक शिवलिंगे आहेत तसेच प्रवेशद्वाराजवळील आधुनिक मंदिरात जगद्‌गुरु शंकराचार्य व त्यांचे शिष्य यांच्या संगमरवरी मूर्ती आहेत.

श्रीपशुपतिनाथ मंदिराच्या दोन कि मी अंतरावर बागमती नदीच्या काठी 'गुह्येश्वरी' या जागृत देवीचे स्थान आहे ही देवी नेपाळची अधिष्ठात्री देवी आहे उंच पायऱ्या चढल्यावर मोठ्या प्रांगणात प्रवेश केला. मध्ये चौकात हे मंदिर आहे मंदिराच्या भिंती चांदीच्या पत्र्याने मढवलेल्या आहेत तसेच तांब्याच्या पत्र्याला सोन्याचे पॉलिश दिले आहे त्यावर सुंदर नक्षीकाम आहे हे पूजास्थान अतिशय जागृत व महत्त्वाचे आहे म्हणून गुह्येश्वरी पार्वतीची पूजा करून मग पशुपतिनाथची पूजा करणे सार्थक मानतात मंदिरावर छत नाही मुकुटासारख्या कळसावर चार पितळी नागमूर्ती आहेत. त्यांची मुखे मध्यभागी एकत्र आली आहेत मंदिरात खोल कुंड आहे येथे सतीचा गुप्तभाग (योनी) पडला होता म्हणून गुह्येश्वरी देवी असे नाव पडले

या मंदिरात शिलालेख आहे त्यानुसार दक्षिण भारतातील श्रेष्ठ तांत्रिक लम्बकर्णभट्ट नेपाळमध्ये आला होता इ स १६५४ मध्ये त्याच्या संमत्तीने श्री प्रतापमल्ल राजाने या मंदिराची उभारणी केली कुंडावर कलश यंत्र ठेवले आहे पुजाऱ्यांना विनंती केली तर ते कलश काढून त्या कुंडातील जल अभिषेक अथवा आचमनासाठी घेतात विशेष म्हणजे कुंडातील पाणी कमी होत नाही मंदिरा-समोर पश्चिमेला स्तंभावर देवीला नम्रतेने नमस्कार करणाऱ्या महेंद्रराजा व

राज्यलक्ष्मी रत्नादेवी याचे पुतळे आहेत त्यानी या मंदिराचा जीर्णोद्धार केला अश्विनशुक्ल सप्तमीला श्री गुह्येश्वरी देवीला नेपाळी लष्करी सैन्य सलामी देते देवीला नवस फेडण्याप्रीत्यर्थ बळी देण्याची प्रथा आहे आम्ही गेलो तेव्हा नुकतेच बोकड व कोंबडा याचे बळी दिले होते तसेच अनेक लोक बोकड, कोंबडे, बदक घेऊन उभे होते आवारात बरेचसे रक्त पडले होते गुह्येश्वरी मंदिराची भेट आटोपून मारवाडी सेवा समिती धर्मशाळेत परतलो दुपारचे जेवण घेऊन विश्रांती घेतली

दुपारची विश्रांती आटोपल्यानंतर दक्षिणकाली व गोदावरी बोटॅनिकल गार्डन ही दोन दर्शनीय स्थाने पाहण्यासाठी टॅक्सीने निघालो दक्षिणकाली काठमांडूहून पंचवीस कि मी अंतरावर असून तेथे देवीचे मंदिर आहे गोदावरी बोटॅनिकल गार्डन सोळा कि मी अंतरावर दक्षिण दिशेला आहे दोन्ही स्थळे पाहण्यासाठी नेपाळी दोनशे रुपये ठरवले

टॅक्सीने प्रथम दक्षिणकाली मंदिराकडे निघालो वाटेत प्रथम त्रिभुवन विद्यापीठाचा परिसर दिसला १९५९ साली ते स्थापन झाले नंतर एक सिमेंट फॅक्टरी व विटाच्या भट्ट्या दिसल्या तादळाची हिरवीगार शेते, हिमशिखरांचे नयनरम्य दर्शन, चांगला रस्ता आणि टोयाटो गाडीतून आरामशीर प्रवास यामुळे सर्वजणच खुशीत होते पाऊण तासात फार्पिंग गावाजवळ आलो तेथे बुद्ध मंदिर आहे लवकरच दक्षिणकाली मंदिराजवळ पोहोचलो

मंदिरात जाण्यासाठी छोटया दरीत पायऱ्या उतरून गेलो तेथे दोन निर्झराचा संगम आहे त्यावर छोटासा पूल होता डोंगरदऱ्यातले पाणी खळखळ वाहत होते डोंगराच्या कुशीतील छोटया मंदिरात पोहोचलो मंदिरावर पितळी नागाच्या मूर्ती चमकत होत्या. पुजारी मूर्ती पाण्याने धूत होते नंतर तिच्यावर साज चढवला गेला आता मूर्ती सुंदर दिसू लागली. तेव्हढ्यात बोकड, कोंबडे यांचे आवाज आले मागे वळून पाहिले तर काही नेपाळी भक्त आपापले बळी घेऊन आले होते. दर शनिवारी आणि मंगळवारी तर कोंबडे, बदक, बोकड याचे असंख्य बळी दिले जातात नवरात्रात नऊ दिवस बळी दिले जातात एका बोकडाला पकडून बळी देणाऱ्याने त्याची मान अर्धवट कापली त्यातून उसळणारे रक्त एका नेपाळी माणमाने एका वाटीत धरले। वाटी भरल्यावर मग त्या बोकडाची मान संपूर्ण कापण्यात आली रक्ताचा प्रसाद देवीला दाखवण्यात आला विसाव्या शतकातही बळी देण्याची प्रथा असावी– तीही भगवान बुद्धाच्या जन्मभूमीत याचे आश्चर्य वाटले एक नेपाळी माणूस म्हणाला की नवीन टॅक्सी, ट्रक याचे अपघातापासून रक्षण व्हावे म्हणून प्राण्याचा बळी देऊन वाहनाला रक्ताचा टिळा लावतात

दक्षिण कालीचे दर्शन घेऊन परत टॅक्सीने काठमांडूला येऊन दक्षिण पूर्वेला असलेल्या गोदावरीच्या दिशेने निघालो वाटेत नेवारी शेतकरी गव्हाच्या भिजलेल्या ओंब्या रस्त्यात सुकवण्यासाठी ठेवताना दिसत होते ड्रायव्हर म्हणाला की, तीन–चार दिवसांपूर्वी तुफान पाऊस झाला गव्हाचे कापलेले पीक भिजून गेले फार नुकसान झाले लहरी हवामानामुळे शेतकऱ्याचे भवितव्यही अनिश्चितच असते. हृषिदी नावाच्या छोट्या टिपीकल नेवाडी गावात ताबड्या विटांची दुमजली घरे दिसली पूर्वी तेथे राणाची दुमजली कॉटेजेस असत पाऊण तासात गोदावरी गार्डनजवळ पोहोचलो बाजूला डोंगरात चमकदार संगमरवराची खाण आहे. तसेच जेसूइट मिशनरी शाळा आहे

तिकीट काढून बगीचात प्रवेश केला या श्रीशाही वनस्पती उद्यानाचे उद्घाटन सन १९६२ मध्ये राजे महेंद्र यानी केले हिमालयातील विविध साडेसहा हजारांवर वनस्पती येथे आहेत अनेक ओढे, हिरवीगार शेते व ओक वृक्ष तसेच सुंदर पुष्पवाटिका या बगीच्यात आहेत एकूण बहात्तर हेक्टर क्षेत्रापैकी चोवीस हेक्टर क्षेत्रात हे उद्यान विकसित केले आहे बगीच्यातील सर्वांत उच टप्प्यावर असलेल्या काचेच्या खोलीतील कॅक्टस् हाऊस पाहताना मन प्रसन्न झाले कॅक्टस्चे विविध प्रकारचे शभरावर नमुने पाहताना उल्का–उदय रमून गेले कॅक्टस्ची मांडणीही उत्कृष्टरीत्या केली आहे डोंगरातील खेळत्या पाण्याचा कल्पकतेने उपयोग करून हा बगीचा विकसित केला आहे टेरेस गार्डन, जपानी पद्धतीचे गार्डन, वॉटर गार्डन, फर्न व रॉक गार्डन असे विविध प्रकारचे बगीचे येथे आहेत. लिलीपाँडमध्ये कमळाचे अनेक नमुने होते राजा वीर विक्रमशाहच्या राज्यारोहणाप्रीत्यर्थ एका सरोवराला ' कोरोनेशन पाँड ' असे नाव दिले आहे येथील गुलाबपुष्पवाटिकेत गुलाबांचे अनेक नमूने आहेत रॉक गार्डनमध्ये मोठमोठ्या खडकातील उंच उच निवडुंग प्रेक्षणीय आहेत. बगीच्यात ऑरचिड हाऊस तसेच संशोधन विभाग आहे या बगीच्यात तऱ्हेतऱ्हेची रंगीबेरंगी फुलपाखरे, हिमालयन पक्षी आढळतात नेपाळमध्ये शनिवार हा सार्वत्रिक सुटीचा दिवस असतो. त्या दिवशी पिकनिकसाठी हा बगीचा गर्दीने फुलून जातो. एरव्ही मात्र अतिशय शांत वातावरणात निसर्गसौंदर्याचा आस्वाद घेता येतो

संध्याकाळ होऊ लागली होती टॅक्सीने मुक्कामी परत आलो.

*

## जीवितकुमारी देवी, हनुमान ढोका दरबार चौक

काठमांडूमधील तिसरा दिवस ! आज जायचे होते काठमांडूच्या जुन्या राजवाड्याजवळील दरबार चौक परिसरातील प्रेक्षणीय स्थळे पाहण्यास तसेच संपूर्ण संध्याकाळ बाजाराचा फेरफटका मारण्यास व खरेदीसाठी राखून ठेवली होती मारवाडी सेवा समिती धर्मशाळेच्या बाजूला न्यू रोड आहे तेथून दरबार चौक फक्त अर्धा कि मी अंतरावर आहे त्यामुळे टॅक्सी ठरवण्याची गरज नव्हती फिरत फिरत न्यू रोडने जुन्या राजवाड्याच्या चौकाजवळ आलो प्रथम तेथे जोध समशेर राणा (इ स १९३२ ते १९५४) या राणा पतप्रधानाचा मोठा पुतळा दिसला या राणाने १९३४ साली भूकंपाचा धक्का बसल्यानंतर काठमांडूची नव्याने उभारणी केली भूकंपग्रस्त नागरिकांचे कळकळीने पुनर्वसन केले बाजूला काठमांडूचे प्रख्यात मोठे क्रिस्टल हॉटेल आहे उजव्या हाताला तांबड्या विटा, दगडानी बांधलेल्या जुन्या राजवाड्याची लांबच्या लांब व उंच भिंत दिसली राजवाड्याची ही मुख्य इमारत बसंतपूर दरबार नावाने ओळखली जाते या राजवाड्यावर उंच मनोरा असून तो बसंतपूर टॉवर नावाने ओळखला जातो पुढील चौक बसंतपूर नावाने प्रसिद्ध आहे तेथील विशाल प्रांगणात विटाचे पेव्हिंग आहे बाजूला छोटी छोटी हॉटेल्स व तिबेटी दुकाने आहेत

बसतपूर चौकातून पुढे जाताना डाव्या बाजूला कुमारी चौक असून तेथे नेपाळच्या कुमारी देवीचा—जीवित कुमारीचा महाल आहे कुमारी देवीचे दर्शन घेण्यासाठी मोठी राग होती उत्सुकतेने आम्हीही रांगेत उभे राहिलो कुमारी देवीचा राजवाडा राजा जयप्रकाश मल्ल याच्या कारकीर्दीत सन १७५७ मध्ये उभारला राजवाडयाच्या भिंतीतील लाकडी खिडक्यावरील नक्षीकाम नाजूक व प्रेक्षणीय आहे प्रवेशद्वारी दोन पाषाण सिंहमूर्ती आहेत

नेपाळच्या या कुमारी देवीबद्दल विविध मते आहेत काहींच्या मते कुमारी स्कंदमातेचा अवतार आहे तर देवी तलेजू, तुळजा किंवा दुर्गा देवीचा अवतार आहे असे काहींना वाटते काहींच्या मते कुमारी देवी ही अवतार वगैरे नसून देवीचे जीवीत प्रतीक आहे एका आख्यायिकेनुसार नेपाळचा राजा राज्याची रक्षणकर्ती कुलदेवता तलेजूदेवी हिच्या बरोबर पत्त्याचा डाव खेळत होता तिच्या सौंदर्यावर लुब्ध होऊन राजाने तिला स्पर्श केला तेव्हा ती लुप्त झाली पण राज्य अनाथ करण्याची तिची इच्छा नव्हती तिने राजाला कल्पना दिली की कुमारी अवस्थेत नेवाडी मुलीच्या रूपात राज्य रक्षणासाठी ती हजर राहील मात्र अशा जीवित कुमारी देवीची पूजा व्हायला हवी

अशी ही जीवित कुमारी देवी पाहण्यासाठी कुमारी राजप्रासादाच्या वरच्या मजल्यावर आलो 'देवीजी शृंगार कर रही है' असे तेथील एकाने सांगितले अनेक दर्शनोत्सुक व्यक्तीबरोबर आम्ही उभे राहिलो दहा मिनिटांनी सहा सात वर्षांची गोरीपान, देखणी, केशरी रंगाचे परकर पोलके घातलेली मुलगी दोन तीन मुलींसह आली हीच कुमारीदेवी तिचे नेत्र पाणीदार होते काजळामुळे ते अधिकच काळेभोर दिसत होते भुवया रंगवलेल्या होत्या उंच कपाळावर चमकदार लाल कुंकवाची नक्षी काढली होती मध्यभागी कुंकवाचा मोठा टिळा होता तिचे हात अगदी मऊ दिसत होते दंतपंक्ती शुभ्र होती चेहरा निरागस होता एखाद्या नाजूक बाहुलीसारखी ती दिसत होती भक्तगणांनी देवीच्या पायाजवळ रुपया ठेवून दर्शन घेतले आम्हीही त्याचे अनुकरण केले देवीचे छायाचित्र घेण्यास परवानगी नाही

कुमारीदेवीच्या दर्शनाने मनात खूप औत्सुक्य निर्माण झाले कुमारी संप्रदायाबद्दल तेथे माहिती मिळाली नेपाळ प्रदेशात एकंदर अकरा कुमारीदेवी आहेत चार काठमांडूत, तीन भडगावमध्ये, दोन पाटण येथे तर देवपाटण व बुगमती येथे प्रत्येकी एक एक! त्यापैकी बसतपूर चौकातील राजवाडयात राहणारी ही कुमारीदेवी सर्वांत महत्त्वाची रॉयल कुमारी! कारण नेपाळचा राजा तिचे दर्शन वर्षातून एकदा घेत असतो.

या कुमारीदेवीची निवड कशी करतात याबद्दल मिळालेली माहितीही

चमत्कृतीपूर्ण होती कुमारीदेवीच्या निवडीसाठी धार्मिक गुरूचे एक खास निवड मडळ असते त्यात तलेजू देवीचा मुख्य पुजारी प्रमुख असतो नेवाडी बुद्ध जमातीतील सुवर्णकार (शाक्य) कुटुबातील चार-पाच वर्षाच्या, वत्तीस गुण असलेल्या मुलीचा शोध घेतला जातो लाब, निमुळते हात, गोलाकार खादे, मऊ हात पाय, दातामध्ये फट नसलेली उत्तम दतपक्ती, निळे अथवा काळेभोर विशाल नेत्र, छोटी उत्तम जिव्हा, उजवीकडे वळणारे दाट केस, गभीर स्पष्ट आवाज, गरुडासारखा निमुळता गळा, सिंहकटी, गौरवर्ण असे गुण तिच्यात हवेत मुख्य म्हणजे ही कुमारी निर्भय असावी त्यासाठी एक चाचणीही घेतली जाते एका अंधाऱ्या खोलीत निवडलेल्या मुलींना आणले जाते तेथे राक्षसाचे मुखवटे घातलेल्या व्यक्ती भीतीयुक्त आवाज काढतात व विचित्र हावभाव करतात तसेच बळी दिलेल्या रेड्याचे रक्ताने माखलेले शिरही तिला दाखवतात इतक्या सर्व भीतीयुक्त वातावरणात जी घाबरत नाही, ओरडत वा किंकाळचा फोडत नाही ती मुलगी कसोटीला उतरते अशा निर्भय मुलीची निवड झाल्यावर तिच्या कुंडलीची छाननी केली जाते राजाच्या कुंडलीशी तुलना केल्यावर सर्व सोपस्कार पूर्ण होऊन तिची निवड पक्की होते आणि मग या कुमारीची राजवाड्यात प्रतिष्ठापना होते सुमारे सहा-सात वर्षे ती जणू राजवाड्यातील कैदीच बनते, तिच्याबरोबर दोन-चार मैत्रिणी असतात पण त्याना देवीबरोबर भांडण्याची परवानगी नसते तिला शिकविण्यासाठी शिक्षकाची नेमणूक केली जाऊ शकते. परतु ती देवी असल्याने तिला काय ज्ञानामृत देणार ?

कुमारीदेवी वर्षातून फक्त सात वेळा राजवाड्याबाहेर जाऊ शकते. तेही उत्सवाच्या वेळा साधून ! त्यावेळी तिचा फोटो काढता येतो इद्रजत्रा उत्सवात ती रथातून येते राजा तिला अभिवादन करतो राजाच्या कपाळावर गध लावून ती आशीर्वाद देते नेपाळचा हिंदू राजा बौद्धधर्मीय मुलीला अभिवादन करतो यापेक्षा हिंदू बौद्धधर्मीय सलोख्याचे आणखी वेगळे काय उदाहरण असू शकणार ?

जेव्हा या जीवितकुमारीदेवीचा प्रथम मासिक स्त्राव सुरू होतो, किंवा कुठली दुखापत होऊन रक्तस्त्राव होतो तेव्हा तिचे कुमारीपद सपुष्टात येते पैसे, दागदागिने यासह ती मूळ खेडेगावात पुढील जीवन जगण्यास परतते तिला उर्वरित आयुष्यासाठी पेन्शन मिळते तिच्या इच्छेप्रमाणे तिला जगता येते काही आजन्म कुमारी राहतात तर काही अनैतिक जीवन व्यतीत करतात असा एक प्रवाद आहे की अशा कुमारीदेवीशी विवाह केल्यास तिचा पती मृत होतो त्यामुळे तिच्या विवाहात अडचणी येतात अर्थात हा समज खरा नसावा कारण काही कुमारीदेवी विवाह करून सुखाने जीवन जगतानाही दिसतात.

असा हा नेपाळमधील कुमारीदेवी सप्रदाय, जगाच्या पाठीवरील एकमेव

होय तिला सजवले, नटवले जाते किंवा पैसाही मिळतो पण मोकळेपणी खेळ-ण्याच्या--भांडण्याच्या दिवसात तिचे बालपण हिरावून घेतले जाते आणि मोठेपणी पैसा असूनही अविवाहीत आयुष्य जगावे लागल्याने शरीरसुखापासून वंचित सौख्याचा अभाव असलेले असे आयुष्य तिच्या नशिबी येते

कुमारदेवीच्या दर्शनानंतर पुढे चौकात आलो तेथे गरूडाची सुंदर मूर्ती आहे उजवा गुडघा टेकलेली, हात जोडून प्रार्थना करणारी ही मूर्ती तीनशे वर्षापूर्वी राजा प्रतिभेंद्रमल्लची विधवा राणी सिद्धीलक्ष्मी हिने उभारली अर्धा माणूस अर्धा पक्षी असा हा गरूड विष्णूचा अवतार मानला जातो मूर्तीच्या चेहे-यावरील विनम्रतेचा भाव लक्षणीय आहे

गरुडमूर्तीच्या मागे पॅगोडाशैलीचा तीन मजली चौकोनी मंदिरासारखा दिसणारा काष्ठमंडप आहे. पूर्वी धर्मशाळा म्हणून त्याचा वापर केला जाई राजा गुण कामदेवने वसवलेल्या काठमांडू शहराचे पूर्वी नाव होते कांतीपूर-सुंदर शहर ज्या काष्ठमंडपावरून काठमांडू नाव पडले ती ही मूळ वास्तू बागमती व विष्णुमती या नद्यांच्या संगमाशेजारी हा काष्ठमंडप आहे मल्ल वंशातील राजा लक्ष्मी नरसिंहने तो उभारला हा काष्ठमंडप एकाच सालवृक्षाच्या लाकडापासून उभारला आहे या मंडपाला लाकडी स्तंभ असून बाजूने तो उघडा आहे आत एका ठिकाणी गोरखनाथाची मूर्ती आहे. आता तेथे फळाची, भाजीची दुकाने असल्याने खूप गर्दी होती देवआनंदच्या हरेराम हरेकृष्ण सिनेमातील काही प्रसंगाचे शूटींग येथे झाले

काष्ठमंडप पाहून हनुमानढोकाकडे जाताना एका मोठ्या कोनाड्यात श्वेतभैरवाची उग्र मूर्ती दिसते या मूर्तीभोवती पक्की जाळी आहे बारा फूट उंचीची ही मूर्ती इ स १७६१ मध्ये उभारली भैरव हा शिवाचा अवतार मानतात दुर्घटनेपासून भैरव रक्षण करतो अशी समजूत असल्याने नेपाळमध्ये भैरवाला आगळे महत्व आहे श्वेतभैरवाला आठ भुजा आहेत एका हातात माणसाचे शिर आहे मूर्तीला पांढरा रंग दिल्याने श्वेतभैरव नाव आहे भाविक लोक फळे, फुले, नाणी अर्पण करतात इंद्रजत्रा उत्सवात समोरची जाळी काढून टाकतात उत्सवात भक्तगण भैरवाच्या मुखात बांबूच्या चमच्याने तांदळाची बीअर-मद्य नैवेद्य म्हणून ओततात असा हा श्वेतभैरव रॉयल नेपाळ एअर लाईन्सचे प्रतीक-मोनोग्राम आहे

थोडे पुढे गेल्यावर कालभैरवाची उग्र पाषाणमूर्ती दिसली सतराव्या शत-काच्या उत्तरार्धात शेतामध्ये ही मूर्ती सापडली बारा फूट उंचीच्या या मूर्तीच्या गळ्यात मानवाच्या कवटयांची माळ आहे मूर्तीला सहा हात असून एका हातात तलवार, दुसऱ्या हातात तीन शिर आणि तिसऱ्या हातात शिव आहे पायाखाली कलंडलेला नग्न माणूस आहे. कालभैरव ही काळ्या पत्थरातील शिवाच्या

प्रलयकारी रूपाची विशाल प्रतिमा आहे त्या मूर्तीच्या मुखात भक्तानी पेढे भरलेले दिसले प्राण्याचा बळी देऊन रक्त शिपडले होते मूर्तीसमोर उभे राहून फोटो काढला

कालभैरवच्या बाजूला एक मोठी घटा आहे दोन मोठे ढोल आहेत काठमाडूच्या नागरिकांना उत्सवप्रसगी एकत्रित होण्याची सूचना देण्यासाठी त्याचा उपयोग होतो पुढे अरुद रस्ता आहे तेथे बाजार भरतो या भागाला आसनटोल असे नाव आहे तेथील इद्र चौकात दुमजली कृष्णमदिर आहे त्यापुढे आकाशभैरवचे मदिर आहे हे मंदिर एका साध्या इमारतीत आहे कुमारीदेवी, भैरव व गणेश यांच्या रथयात्रा येथे येतात गोरखनाथचे गुरू मत्स्येंद्रनाथाचा रथ स्वत नेपाळनरेश ओढतात इद्र चौकाजवळचा 'आसनटोल' हा काठमांडूचा जुना भाग अरुद रस्त्याचा, विटांची घरे असलेला, केवळ माणसासाठी वाहनाना बदी असलेला आहे मुख्यत नेवारी लोक येथे राहतात काही नेपाळीही आहेत.

हनुमानढोका दरबार येथे पोहोचलो ढोका म्हणजे प्रवेशद्वार नेपाळच्या जुन्या राजवाड्याचे प्रवेशद्वार हनुमानढोका नावाने ओळखले जाते तेथे सर्वात प्रथम दिसते चार फूट उचीच्या चबुतऱ्यावरील हनुमानजीची मूर्ती ही मूर्ती तीनशे वर्षांपूर्वी मल्ल राजाने उभारली मूर्तीवर लाल रगाचे वस्त्र गुडाळलेले आहे तर डोळे लाल वस्त्राने बद केलेले दिसले. पुतळ्याच्या डाव्या बाजूला राजवाड्याच्या भिंतीवर प्रतापमल्ल राजाने १६६४ साली कोरलेला शिलालेख दिसतो कलिकादेवीच्या स्तुतीपर पद्यरा भाषामध्ये तो कोरला आहे जर्मन, फ्रेंच, इग्लिश भाषांचाही त्यात समावेश आहे शिलालेख खराब होऊ नये म्हणून बाजूला लाकडी कुपण आहे

बाजूला तलेजू भवानी हे शाही मदिर आहे मल्ल राजाची तलेजू ही कुलदेवता आहे तसेच तलेजू ही युद्धदेवताही मानली जाते राजे व नेपाळी योद्धे तिची पूजा करतात मदिर दुर्गापूजेच्या वेळी एकच दिवस उघडते हिमालयातील एका योग्याने देवीला एक अमूल्य रत्न प्रदान केले होते असे म्हणतात तलेजू मदिर राजपरिवाराच्या दर्शनासाठी आहे या तुलजा भवानीला प्रत्येक अष्टमीला एक रेडा, १०८ बोकड व सात हस याचा बळी देण्यात येतो तर दुर्गाष्टमीला १५४ रेड्याचा बळी देतात नवरात्रात आठव्या दिवशी रात्री गुरखा योद्धे धारदार कुकरी या हत्याराने एका घावात रेड्याचा शिरच्छेद करून बळी देतात

हनुमानजीचे दर्शन घेऊन राजवाड्याच्या प्रवेशद्वारी प्रत्येकी नेपाळी पाच रुपये देऊन तिकीटे घेतली स्थानिक नेपाळी लोकासाठी मात्र दोन रुपयेच तिकीट आहे प्रवेशद्वारी नृसिंहाच्या दोन मूर्ती आहेत नवविवाहित दांपत्य पुत्रप्राप्तीसाठी त्याची पूजाअर्चा करतात राजवाड्यात प्रवेश केल्यावर मोठे प्रांगण दिसले.

नेपाळ राजाचा राज्यावरोहण समारंभ, विवाह अशी मंगल धार्मिक कृत्ये तेथे होतात विद्यमान राजा वीर विक्रमशाह यांचा राज्यावरोहण समारंभ येथेच झाला मात्र हे प्रांगण एका ऐतिहासिक दुर्घटनेचेही साक्षीदार आहे १८४६ साली जंगबहाद्दर राणाने दीडशेच्यावर राजकुटुंबियांची हत्या येथेच केली होती. त्यामुळे रक्ताचे पाट या प्रांगणात वाहिले होते

राजप्रासाद सात मजली आहे अनेक दालनें त्यात आहेत त्रिभुवन राजाची अनेक छायाचित्रे तेथे आहेत राज्याभिषेकाच्या वेळची छायाचित्रे व कपडे जतन करून ठेवले आहेत पं नेहरू, डॉ राजेंद्रप्रसाद, इंदिरा गांधी यांच्याबरोबर राजे त्रिभुवन यांची छायाचित्रे आहेत राजाची भरभक्कम तिजोरीही तेथे आहे नारायणहिटी राजदरबाराची छायाचित्रेही दिसतात पहिल्या मजल्यावर राजे त्रिभुवन यांच्या जीवनातील विविध हृदयस्पर्शी प्रसंगांची विविध छायाचित्रे, त्यांची विविध पदकेही दिसली त्यांच्या कार्यालयाची प्रतिकृती, खास लाकडा-पासून बनवलेला पलंग, ड्रेसिंग टेबल, तलवार, बूट, व्यक्तिगत पोषाख, फिल्ड मार्शल पदाचा ड्रेस, त्यांच्या आवडत्या पोपटाचा पिंजरा, सायकल या वस्तू तेथे दिसतात राजांनी शिकार केलेल्या प्राण्यांची गेंडा वाघ यांची छायाचित्रे आहेत पिस्तूल, बंदूक, तोफा, ढाली अशा विविध शस्त्रांचेही एक दालन आहे

१९ मार्च १९५५ मध्ये राजे त्रिभुवन यांचा मृत्यू स्वित्झर्लंडमध्ये झाल्यावर त्यांचे मृत शरीर ज्या लाकडी पेटीतून काठमांडूला आणले ती पेटीही येथे दिसते त्यांच्या अंतयात्रेची छायाचित्रे मन हेलावून टाकणारी आहेत राजाच्या मृत्यूनंतर काठमांडूच्या नागरिकांनी तेरा दिवस राष्ट्रीय सुतक पाळले. लोक रस्त्यातून अनवाणी जायचे, मस्तकावरील केसही लोकांनी काढले. ज्या ब्राह्मण धर्मगुरुने बागमतीच्या काठी आर्या घाटावर शेवटचा धार्मिक विधी केला त्याला दहा हजार रुपये दक्षिणा, दोन हत्ती, घोडा दक्षिणारुपाने मिळाला त्याचा मुक्काम राजवाड्यात तेरा दिवस होता

एका दालनात राजाच्या किरण प्रसाद व सुवर्ण प्रसाद या मुख्य हत्तींच्या जोडीची छायाचित्रे दिसतात हत्तीला सजविण्यासाठी वापरात येणाऱ्या वस्तू, चांदीचा, सोन्याचा हौदा आहे चंद्रमुखी, सूर्यमुखी छत्र जसे आहे तसेच राज-सिंहासनही आहे. राज्याभिषेकाच्या वेळी राजाच्या पायावर मातीचा लेप देतात त्या मातीचा नमुनाही तेथे दिसला राष्ट्रीय मुद्रासंग्रहात धातूच्या विविध नाण्यांचा संग्रह असून त्यात चामड्याची नाणीही आहेत

राजप्रासादात एका दालनातून दुसऱ्या दालनात जाताना प्रत्येक ठिकाणचे रक्षक खुर्चीवर बसून डुलक्या घेत होते निरनिराळ्या पोझेस्‌मधले ते आळसाव-लेले रक्षक पाहून उल्का-उदयची करमणूक झाली दुपारचे दोन वाजले होते.

सर्वांना कडकडून भूक लागली होती हनुमान ढोका परिसर पाहून दुपारचे जेवण निवात आटोपले तेवढ्यात आकाशात मेघ जमून पाऊस येण्याची चिन्हे दिसू लागली सेवा समितीवर परतलो आणि पाऊस सुरू झाला गार वारे वाहू लागले दोन तास चांगली विश्राती घेतली

सायंकाळी सहा वाजता बाजारच्या रस्त्याकडे निघालो पाऊस थांबला होता हवा प्रसन्न होती काठमांडूचा न्यू रोड विविध दुकानामुळे गजबजलेला होता परदेशी सौन्दर्य प्रसाधने, इलेक्ट्रॉनिक उपकरणे, घड्याळे, गॉगल्स, छत्र्या, कॅल्क्युलेटरपासून ते टेपरेकॉर्डरपर्यंत हजारो तऱ्हेच्या परदेशी वस्तू येथे उपलब्ध आहेत फ्री मार्केट असल्याने हाँगकाँग, जपान, कोरियामधून येणारे तऱ्हेतऱ्हेचे कापड, साड्या, टी शर्टस, गाऊन्स, फ्रॉक्स घेण्यास गिऱ्हाईकांची झुबड उडाली होती 'हाँगकाँग मार्केट' या नावाने ओळखल्या जाणाऱ्या या बाजारात खरेदी करणारे बहुसंख्य भारतीयच होते पाश्चिमात्य पर्यटक नावालासुद्धा दिसत नव्हता त्याच्या देशात या वस्तु मुबलक असताना ते कशाला इकडे फिरकतील ? नेपाळी स्वेटर विकणारे आपल्याकडे प्रत्येक शहरात दिसतात पण इथे मात्र एकही दिसत नव्हता आम्हीही टीशर्ट, काही सौन्दर्यप्रसाधने, फोल्डींगच्या छत्र्या अशा थोड्याफार वस्तु घेतल्या नेपाळची आठवण म्हणून उदयने नेपाळी टोपीची खरेदी केली हिमालयाच्या शिखरासारखा आकार असलेली नेपाळी टोपी राजापासून सर्वसामान्य नागरिकांपर्यंत अनेकजण अभिमानाने वापरतात विक्रेते हसतमुख होते विविध वस्तू तत्परतेने दाखवीत, कंटाळा करीत नव्हते स्वस्त दाखवू का महाग ? किंवा किती बजेट आहे तुमचे मग त्याप्रमाणे दाखवू असा प्रश्नही करीत नव्हते वस्तु घेतली नाही तर चिडतही नव्हते भारतीय चलनातील पैसेही ते स्वीकारीत होते भारतात परतताना कस्टमच्या चेकींगचा त्रास होतो म्हणून जास्त खरेदीचा मोह आवरला

नेपाळच्या राजा व राणीचे फोटो बहुतेक दुकानात होते एका छायाचित्राच्या मोठ्या दुकानात गेलो नेपाळविषयी काही छायाचित्रे घ्यायची होती तेथे बर्फाच्छादित शिखरावर मोठ्या पावलांचे ठसे उमटलेले छायाचित्र होते. कुतुहलाने माहिती विचारल्यावर फोटोग्राफर म्हणाला की हिमालय पर्वतातील अति उंचावर बर्फात हिममानव–यती वावरत असावा असा नेपाळी लोकात समज आहे हा यती ताबूस, पिंगट केसाचा, अंगावर लव असणारा, प्रचंड शरीराचा, गोरिल्लासारखा, अतिमानवी शक्तीचा असावा असे मानले जाते त्याची लांब रुंद पावले घट्ट बर्फातही खोल उमटतात प्रत्यक्ष यतीचे छायाचित्र उपलब्ध नाही पण पावलाचे घट्ट बर्फात दोन इंच खोल उमटलेले ठसे त्याचे मानले

जातात विशेष म्हणजे यतीविषयक सशोधन अनेक परदेशी गिर्यारोहकानी बर्फाच्छादित भागात मुक्काम ठोकून केले यतीविषयक पुस्तके, लेख, अमेरिकन, ब्रिटिश, जर्मन व इटालियन गिर्यारोहक शास्त्रज्ञानी प्रसिद्ध केले एव्हरेस्टच्या पायथ्याशी राहणारे शेर्पा, नेपाळी लोक असे मानतात की यतीचा चेहेरा पाहिल्यास मृत्यु येईल अर्थात् तो आजपर्यंत दिसला नाही ही गोष्ट वेगळी. गूढ यतीबाबत विचार करीतच दुकानाबाहेर आलो

भीमसेन टॉवरजवळ येऊन पोखराला जाण्याशाठी दुसऱ्या दिवसाचे आरक्षण केले मुक्कामी परतलो नेपाळ प्रदेशातील काठमाडूमधील तीन दिवस जणू मतरलेले होते कुमारी देवी, श्री पशुपतिनाथ, स्वयभूनाथ यांच्या दर्शनाने तृप्त झालो होतो हिंदू व बौद्ध धर्मीय यांच्यात आश्चर्यकारक धार्मिक सहिष्णुता असलेली ही नेपाळभूमी ! पिवळे वस्त्र परिधान केलेले बौद्धधर्मीय लामा जसे दिसले तसेच कपाळावर गध लावलेले, पाढरेशुभ्र धोतर परिधान केलेले पुजारीही दिसले. इथे बुद्धमदिरेही आहेत आणि शिवमदिरेही ! एका दुकानदाराला सहज बोलताना विचारले की, आपण बौद्धधर्मिय का हिंदू ? तर तो हसत म्हणाला, आम्ही दोन्ही धर्मांना मानतो व दोन्ही धर्मांच्या पवित्र स्थानांची पूजा करतो खरच आहे ते पशुपतिनाथालाही बुद्धदेवाचा साजशृगार चढवला जातो बौद्धधर्मिय कुमारीदेवीचा रथ हिंदू राजा अभिवादन करून ओढतो व राजाला गंध लावून कुमारीदेवी आशीर्वाद देते शांत, पवित्र काठमाडू खोऱ्यातील लोक प्रामाणिक आतिथ्यशील, श्रद्धाळू आहेत व दोन्ही हात जोडून ' नमस्ते ' म्हणत नम्रपणे हसतमुखाने स्वागत करतात

*

## ‘ माछापूछरे ’च्या छायेत– पोखरा व्हॅली

पहाटेचे पाच वाजले होते. नेहमीप्रमाणे यशवत लवकर उठून सगळ्यांना जागे करीत होते आदल्या दिवशीच्या रात्री सुचविल्याप्रमाणे नेपाळी छोकऱ्याने पहाटेच सर्वांना गरम पाणी दिल्याने सर्वांचे स्नान झाले गरम चहाही वेळेवर मिळाला मारवाडी सेवा समितीच्या धर्मशाळेच्या अतिथ्यशीलतेचा लाभ सपवून टॅक्सीने भीमसेन टॉवरजवळच्या बस स्थानकावर आलो सहा वाजून गेले होते. स्टँडजवळच काठमाडूचे मुख्य पोस्ट ऑफिस आहे रात्री लिहिलेली रगीत कार्डे टपालपेटीत टाकली

साडेसहाच्या सुमाराला काठमाडू–पोखरा बस स्थानकावर आली अगोदर तिकीटे काढली होती त्यामुळे पुढच्या जागा मिळाल्या होत्या. बसमध्ये पाच-सहा भारतीय पर्यटक होते काही नेपाळी लोक होते तर बरेचसे परदेशी पर्यटक होते. हिप्पींची दोन जोडपीही होती परदेशी पर्यटकाकडचे सामान अगदी सुटसुटीत होते त्यातील बहुतेकांनी हमालावर अवलंबून न राहता बसच्या टपावर स्वत. चढून सामान लावले बरोबर सात वाजता बसने काठमांडू सोडले काठमांडूच्या मुक्कामातील तीन दिवसाच्या सुखद स्मृती घोळवीत पोखराच्या दिशेने प्रवास सुरू केला

पूर्वी काठमांडू–पोखरा पायी ट्रेकींग करीत जावे लागे सहा दिवसांचा हा प्रवास असे पण आता बसची सुविधा झाल्याने अनेक पर्यटक पोखराला भेट देतात काठमांडू–पोखरा हा प्रवास आहे २०२ कि मी अंतराचा, आठ तासाचा बसने तिकीट पस्तीस रु पडते विमानाने हा प्रवास पस्तीस मिनीटांचा असून प्रत्येकी रु ४५० तिकीट पडते काठमांडू खोऱ्यातील पाऊण तासाचा प्रवास संपवून बस थाणकोट गावी थांबली तीन दिवसापूर्वी काठमांडूला जाताना रात्रीचे जेवण तेथे घेतले होते सकाळच्या वेळी हवा स्वच्छ होती आजूबाजूची हिमालयाची बर्फाच्छादित गिरीशिखरे सकाळच्या कोवळ्या उन्हात चमकत होती परदेशी पर्यटक कॅमेऱ्याने दृश्य टिपत होते थाणकोटला चहा व बिस्कीटे घेतली

थाणकोटहून निघाल्यावर नौबिस गावाजवळ उजवीकडे पोखराला जाण्यासाठी फाटा निघतो काठमांडू-नौबिस अंतर सव्वीस कि मी आहे नौबिस पोखरा हा १७६ कि मी. अंतराचा रस्ता चीनच्या सहकार्याने बांधण्यात आला नौबिस नंतर बावीस कि. मी अंतरावरील गालची बाजार गावापासून त्रिशूली नदीच्या कडेकडेने प्रवास सुरू झाला. एका बाजूला हिमालयाच्या रांगा तर दुसऱ्या बाजूला नदीचा फेसाळणारा प्रवाह अशा प्रवासाचा अजिबात कंटाळा येत नव्हता मुगलिंग गावी बस साडेअकराच्या सुमाराला थांबली मुगलिंग गाव काठमांडू पोखरा याच्या साधारण मध्यभागी येते कंडक्टर म्हणाला की जेवणासाठी येथे अर्धातास थांबायचे आहे. रस्त्याच्या दोन्ही बाजूला छोटी छोटी हॉटेल्स होती चकचकीत स्टेनलेस स्टील थाळीत गरम भात, वरण, भाजी असे साधे जेवण मिळाले चपाती, रोटी नव्हती ब्रेड व लोणचे जवळ होतेच भात मात्र भरपूर होता येथेही स्त्रियाच खानावळ चालवताना दिसत होत्या डोंगराळ भाग व लहरी हवामान यामुळे नेपाळमध्ये धान्यही महागच आहे साखर तर पूर्णपणे आयातच करावी लागते त्यामुळे तीही नऊ रु किलो होती जेवण आटोपून ताजेतवाने होऊन प्रवासी बसमध्ये बसले उजवीकडील फाट्याने त्रिशूली नदीवरील पूल पार करून बस पोखराच्या दिशेने निघाली त्रिशूली विधीगंडकी नदीला मिळाली होती बस आता गंडकी नदीच्या कडेकडेने निघाली ही गंडकी भारतात गंगेला मिळते तासभराने डुमरे नावाचे गाव लागले चीनच्या सहकार्याने काठमांडू पोखरा हा रस्ता बांधताना हे नवे गाव वसले पुढे वाटेत केळीच्या बागा दिसल्या आँबू खैरेनी हे गाव पुढे लागले तेथून गोरखा या इतिहासप्रसिद्ध गावाला फाटा जातो नेपाळचा राजा पृथ्वी नारायणशाह देव हा मूळचा गोरखा या गावचा गोरखा हे त्यावेळी राजधानीचे ठिकाण होते गोरखा येथील टेकडीवरील राजवाडा, गोरक्षनाथ मंदिर व कालीमंदिर प्रसिद्ध आहे असे बसमधील शेजारचा नेपाळी

प्रवासी म्हणाला गोरखाजवळ मनकामना नावाचे पवित्र धार्मिक ।
प्रत्येक नेपाळी तेथे जाण्याची इच्छा करीत असतो

त्यानतर मोठे गाव लागले दमौली या जिल्ह्याच्या गावी बाज रस्ता दिसत होता बस टपाल वाहतूक करणारी होती त्यामुळे प्रत्ये गावीही थाबत होती दमौलीजवळ माडी नदीवरील मोठा पूल पार केल्यावर बस आता सेती नदीच्या कडेकडेने धावू लागली बस पोखरा स्टँडवर विसावली तेव्हा दुपारचे अडीच वाजले होते आकाशात कृष्णमेघ दाटले होते

स्टँडवर पाचसहा हॉटेलसचे प्रतिनिधी आपापल्या हॉटेलच्या नावाचे कार्ड पुढे करीत होते. उन्हाळयात खूप पाऊस झाल्याने, हवा खराब असल्याने पर्यटक फारसे आले नाहीत म्हणून सर्वच हॉटेल्सचे दर सवलतीचे होते स्टँडसमोरच हॉटेल न्यू एशिया हे छान हॉटेल आहे उदय व यशवत हॉटेल पाहून आले मग आम्ही सर्वजण तेथे गेलो हॉटेलचे प्रशस्त आवार सुदर हिरवळ, फुले यामुळे शोभिवत दिसत होते हॉटेल तीन मजली असून वर गच्ची होती तेथून माऊटन व्ह्यू चांगला दिसेल म्हणून या हॉटेलची निवड केली होती. सलग्न बाथरूम असलेल्या दोन बेडस्च्या दोन रूम्स घेतल्या तोच बाहेर मुसळधार पाऊस सुरू झाला जोडीला घोंघावता वाराही थैमान घालीत होता हा पाऊस काही आमची पाठ सोडायला तयार नव्हता गीझर चालू केला प्रवासाने थकलो होतो गरम पाण्याने हात पाय धुवून चहा मागवला गरम ब्लँकेटमध्ये शिरून सर्वांनी विश्राती घेतली सध्याकाळचे सहा वाजले बाहेर डोकावले तर पाऊस थाबला होता थडगार वारा मात्र वहात होता अगात स्वेटर चढवून बाहेर निघालो जवळच बाजारचा रस्ता होता बाजारात थोडी चक्कर मारली पावसामुळे गिऱ्हाईक नव्हतेच काठमांडूच्या मोठ्या बाजारात मिळणाऱ्या वस्तूच येथेही होत्या फिरत फिरत मारवाडी भोजनालयात आलो गरम चपाती, मस्त भाजी, लोणचे, मिठाई यावर प्रत्येकाने ताव मारला तोपर्यंत अधार पडल्यामुळे हॉटेलवर परतलो आकाश अभ्राच्छादित असल्याने सूर्यास्ताचे दृश्य पाहू शकलो नाही याची रूखरूख वाटली दुसऱ्या दिवशीच्या पहाटेचा सूर्योदय व त्यावेळचे हिमशिखरांचे अद्‌भुत दृश्य पहायला मिळो अशी मनोमन प्रार्थना केली

पोखराचा सूर्यास्त पहायचा ढगांमुळे चुकला होता पण आता सूर्योदय चुकवून चालणार नव्हता हॉटेलमधल्या मुलाला साडेचार वाजता उठवायला सागितले त्याप्रमाणे त्याने साडेचार वाजता उठवले गरम पाण्याने तोड धुऊन चहा घेतला हॉटेलमधील पर्यटक हॉटेलच्या तिसऱ्या मजल्यावरील गच्चीवर जमू लागले पहाटे पाचची वेळ नेपाळमध्ये सूर्योदय लवकर होतो सूर्योदयाच्या वेळी हिमालय पर्वताच्या शिखरावलीचे दर्शन घेण्याची उत्कठा प्रत्येकाच्या

पूर्वी काठमाडू–पोखरा पायी ट्रेकींग करीत जावे लागे सहा दिवसांचा हा प्रवास असे. पण आता बसची सुविधा झाल्याने अनेक पर्यटक पोखराला भेट देतात काठमांडू–पोखरा हा प्रवास आहे २०२ कि. मी अतराचा, आठ तासांचा बसने तिकीट पस्तीस रु पडते विमानाने हा प्रवास पस्तीस मिनीटांचा असून प्रत्येकी रु ४५० तिकीट पडते काठमांडू खोऱ्यातील पाऊण तासाचा प्रवास संपवून बस थाणकोट गावी थांबली तीन दिवसापूर्वी काठमाडूला जाताना रात्रीचे जेवण तेथे घेतले होते सकाळच्या वेळी हवा स्वच्छ होती आजूबाजूची हिमालयाची बर्फाच्छादित गिरीशिखरे सकाळच्या कोवळ्या उन्हात चमकत होती परदेशी पर्यटक कॅमेऱ्याने दृश्य टिपत होते थाणकोटला चहा व बिस्कीटे घेतली

थाणकोटहून निघाल्यावर नौबिस गावाजवळ उजवीकडे पोखराला जाण्यासाठी फाटा निघतो काठमाडू-नौबिस अतर सहवीस कि मी आहे नौबिस पोखरा हा १७६ कि मी अतराचा रस्ता चीनच्या सहकार्याने बाधण्यात आला नौबिस नतर बावीस कि. मी अतरावरील गालची बाजार गावापासून त्रिशूली नदीच्या कडेकडेने प्रवास सुरू झाला. एका बाजूला हिमालयाच्या रागा तर दुसऱ्या बाजूला नदीचा फेसाळणारा प्रवाह अशा प्रवासाचा अजिबात कटाळा येत नव्हता मुगलिग गावी बस साडेअकराच्या सुमाराला थाबली मुगलिग गाव काठमाडू पोखरा याच्या साधारण मध्यभागी येते कडक्टर म्हणाला की जेवणासाठी येथे अर्धातास थाबायचे आहे. रस्त्याच्या दोन्ही बाजूला छोटी छोटी हॉटेल्स होती चकचकीत स्टेनलेस स्टील थाळीत गरम भात, वरण, भाजी असे साधे जेवण मिळाले चपाती, रोटी नव्हती ब्रेड व लोणचे जवळ होतेच भात मात्र भरपूर होता येथेही स्त्रियाच खानावळ चालवताना दिसत होत्या डोंगराळ भाग व लहरी हवामान यामुळे नेपाळमध्ये धान्यही महागच आहे साखर तर पूर्णपणे आयातच करावी लागते त्यामुळे तीही नऊ रु किलो होती जेवण आटोपून ताजेतवाने होऊन प्रवासी बसमध्ये बसले उजवीकडील फाट्याने त्रिशूली नदीवरील पूल पार करून बस पोखराच्या दिशेने निघाली. त्रिशूली विधीगडकी नदीला मिळाली होती बस आता गडकी नदीच्या कडेकडेने निघाली ही गडकी भारतात गगेला मिळते तासभराने डुमरे नावाचे गाव लागले चीनच्या सहकार्याने काठमाडू पोखरा हा रस्ता बाधताना हे नवे गाव वसले पुढे वाटेत केळीच्या बागा दिसल्या आँबू खैरेनी हे गाव पुढे लागले तेथून गोरखा या इतिहासप्रसिद्ध गावाला फाटा जातो नेपाळचा राजा पृथ्वी नारायणशाह देव हा मूळचा गोरखा या गावचा. गोरखा हे त्यावेळी राजधानीचे ठिकाण होते गोरखा येथील टेकडीवरील राजवाडा, गोरक्षनाथ मंदिर व कालीमदिर प्रसिद्ध आहे असे बसमधील शेजारचा नेपाळी

प्रवासी म्हणाला गोरखाजवळ मनकामना नावाचे पवित्र धार्मिक ठिकाण असून प्रत्येक नेपाळी तेथे जाण्याची इच्छा करीत असतो

त्यानतर मोठे गाव लागले दमौली या जिल्ह्याच्या गावी बाजाराचा मोठा रस्ता दिसत होता बस टपाल वाहतूक करणारी होती त्यामुळे प्रत्येक लहान गावीही थाबत होती दमौलीजवळ माडी नदीवरील मोठा पूल पार केल्यावर बस आता सेती नदीच्या कडेकडेने धावू लागली बस पोखरा स्टँडवर विसावली तेव्हा दुपारचे अडीच वाजले होते आकाशात कृष्णमेघ दाटले होते.

स्टँडवर पाचसहा हॉटेल्सचे प्रतिनिधी आपापल्या हॉटेलच्या नावाचे कार्ड पुढे करीत होते उन्हाळयात खूप पाऊस झाल्याने, हवा खराब असल्याने पर्यटक फारसे आले नाहीत म्हणून सर्वच हॉटेल्सचे दर सवलतीचे होते स्टँडसमोरच हॉटेल न्यू एशिया हे छान हॉटेल आहे उदय व यशवत हॉटेल पाहून आले मग आम्ही सर्वजण तेथे गेलो हॉटेलचे प्रशस्त आवार सुदर हिरवळ, फुले यामुळे शोभिवत दिसत होते हॉटेल तीन मजली असून वर गच्ची होती तेथून माऊंटन व्ह्यू चागला दिसेल म्हणून या हॉटेलची निवड केली होती सलग्न बाथरूम असलेल्या दोन बेडस्च्या दोन रूम्स घेतल्या तोच बाहेर मुसळधार पाऊस सुरू झाला जोडीला घोंघावता वाराही थैमान घालीत होता हा पाऊस काही आमची पाठ सोडायला तयार नव्हता गीझर चालू केला प्रवासाने थकलो होतो गरम पाण्याने हात पाय धुवून चहा मागवला गरम ब्लँकेटमध्ये शिरून सर्वांनी विश्राती घेतली सध्याकाळचे सहा वाजले बाहेर डोकावले तर पाऊस थाबला होता थडगार वारा मात्र वहात होता अगात स्वेटर चढवून बाहेर निघालो जवळच बाजारचा रस्ता होता बाजारात थोडी चक्कर मारली पावसामुळे गिऱ्हाईक नव्हतेच काठमाडूच्या मोठ्या बाजारात मिळणाऱ्या वस्तूच येथेही होत्या फिरत फिरत मारवाडी भोजनालयात आलो गरम चपाती, मस्त भाजी, लोणचे, मिठाई यावर प्रत्येकाने ताव मारला तोपर्यंत अधार पडल्यामुळे हॉटेलवर परतलो आकाश अभ्राच्छादित असल्याने सूर्यास्ताचे दृश्य पाहू शकलो नाही याची रूखरूख वाटली दुसऱ्या दिवशीच्या पहाटेचा सूर्योदय व त्यावेळचे हिमशिखरांचे अद्‌भुत दृश्य पहायला मिळो अशी मनोमन प्रार्थना केली

पोखराचा सूर्यास्त पहायचा ढगांमुळे चुकला होता पण आता सूर्योदय चुकवून चालणार नव्हता हॉटेलमधल्या मुलाला साडेचार वाजता उठवायला सांगितले त्याप्रमाणे त्याने साडेचार वाजता उठवले गरम पाण्याने तोंड धुऊन चहा घेतला हॉटेलमधील पर्यटक हॉटेलच्या तिसऱ्या मजल्यावरील गच्चीवर जमू लागले पहाटे पाचची वेळ नेपाळमध्ये सूर्योदय लवकर होतो सूर्योदयाच्या वेळी हिमालय पर्वताच्या शिखरावलीचे दर्शन घेण्याची उत्कठा प्रत्येकाच्या

चेहऱ्यावर ओसडून वाहत होती पोखराची ख्याती आहे तेथून अगदी जवळ दिसणाऱ्या हिमालयाच्या शिखरांच्या रागाच्या दर्शनासाठी, कारण पोखरा जरी समुद्रसपाटीपासून केवळ २५०० फूट उचीवर असले तरी हिमालय पर्वताचा पायथा सरळ रेषेत केवळ सतरा मैल अंतरावर आहे तर २७,००० फूट उंचीची शिखर सरळ रेषेत केवळ २४ मैलावर आहेत ! प्रचड उचीच्या हिमालयाचे इतक्या कमी अतरावरून दर्शन होणारे पोखरा हे एकमेव स्थान आहे प्रथम पूर्वेकडील आकाश फिकट नारिंगी रगाने उजळून निघाले हळूहळू लालसर नारिंगी कडा गडद होऊन त्रिकोणी रजतशुभ्र हिमशिखरे सोनेरी किरणात उजळून निघाली सर्वांच्या मुखातून हर्षोत्फुल्ल उद्‌गार बाहेर पडले आज आकाश अभ्राच्छादित नव्हते ही परमेश्वराची केव्हढी कृपा ! फिकट निळ्या आकाशात सावलीतल्या बर्फमय भागावर जाभळी निळसर छटा दिसू लागली हे अनुपम दृश्य सपूच नये अस वाटत होत पण.. ! पधरावीस मिनिटानी सूर्यकिरणाचा कवडसा भूभागावर पडला आणि दिवस उजाडला. पश्चिमेला २६,७५५ फूट उचीचे धौलागिरी, त्यानतर २६,५४५ फूट उंचीचे अन्नपूर्णा (१), २४,७८७ फूट उचीवरील अन्नपूर्णा (३), २६,६८८ फूट उचीवरील अन्नपूर्णा (४) व २६,०४१ फूट उचीचे अन्नपूर्णा (२) याशिवाय लामजुंग हिमल, मन्सालू व हिमचूली ही पूर्वेकडील शिखरेही दिसतात

खर तर नेपाळमधील हिमाच्छादित शिखरांच्या दर्शनासाठी रॉयल नेपाळ एअर लाइन्सच्या 'माऊटन फ्लाईटने' गिरीभ्रमणाचा आनद लुटायला हवा एक तासाची ही रोमाचकारी सफर हवामानाच्या अनुकूलतेनुसार काठमांडू विमान-तळावरून दररोज सकाळी ४४ सीट्सच्या अॅव्हरो विमानाने आयोजित केली जाते वीस हजार फूट उचीवरून हिमशिखरापासून केवळ चौदा मैल अतरावरून विमान उड्डाण करते ! या माऊटन फ्लाईटने प्रवास करणाऱ्याना हिमालयातील विविध शिखराच्या उचीचा चार्ट दिला जातो विशेष म्हणजे प्रत्येक प्रवाशाला Everest has had the Prilviege of greeting him on todays flight" असे सर्टिफिकेट दिले जाते आमचा नेपाळचा प्रवास मे महिन्यात झाल्याने या सफरीचा लाभ चुकल्याने निराशा झाली

पोखराचा मानबिंदू आहे 'माछापूछरे' हे अन्नपूर्णाचे शिखर ! नेपाळी भाषेत माछापूछरेचा अर्थ आहे माशाचे शेपूट.–Fish Tail. २२,९५८ फूट व २२,९३५ फूट उचीची ही माशाच्या शेपटीच्या आकाराची, पिरॅमिडसारखी दिसणारी अन्नपूर्णाची दोन शिखरे पोखरा व्हॅलीचे अप्रतिम लेण आहेत अन्नपूर्णाला नेपाळी लोक पिकाची देवता मानतात त्यामुळे माछापूछरेला नेपाळी

श्रद्धाळू लोक देवदेवताचे निवासस्थान मानतात सन १९५७ मध्ये गिर्यारोहक माछापूछरेपर्यंत जाऊन आले पण प्रत्यक्ष शिखरावर गिर्यारोहकांनी पाय ठेवला नाही कारण देवदेवताचे निवासस्थान आहे ना ते !

देहभान हरपून टाकणारा, अनुपम सौदर्यशाली असा तो पोखराचा सूर्योदय पाहिल्यावर खोलीत परतलो स्नान–चहा आटोपून पोखरा दर्शनासाठी बरोबर आठ वाजता बाहेर निघालो टोयाटो टॅक्सी रु ऐंशीला ठरवली

प्रथम पाहायची होती 'महेंद्रगुफा' पोखरा गावानजीक दहा कि मी अंतरावर बटूले चौर हे छोटे खेडेगाव आहे या गावाबाहेरील टेकडीच्या पायथ्याशी असलेल्या 'महेंद्र गुफा' या ठिकाणी पोहोचलो पायऱ्या उतरून खाली आलो गुफा पाहण्यासाठी माणशी दोन रुपये तिकीट होते गुफेत बाहेरून खूप अंधार दिसत होता एक छोटा नेपाळी मुलगा गाईडचे काम करणार होता आमच्याबरोबर काही नेपाळी विद्यार्थी तर दोन बंगाली माणसे होती प्रत्येकाच्या हातात पेटवलेली मेणबत्ती देण्यात आली नेपाळी मुलाच्या पाठोपाठ आत प्रवेश केला मनात थोडी भीतीच वाटत होती जवळजवळ एक कि मी लांबीची ही गुफा चुन्याच्या खडकात आहे गुफेतील वाट नागमोडी, खालीवर अशी होती प्रचंड खडक मेणबत्तीच्या प्रकाशात भेसूर दिसत होते उल्का-उदय उत्साहाने पुढे जात होते. आम्ही मात्र थबकत वाटचाल करीत होतो. नेपाळी मुलाने विविध आकाराचे खडक दाखवले हे आकार, त्याना नैसर्गिकरीत्याच प्राप्त झाले होते. त्यात होता गणेशाच्या मुखाचा आकार तसेच शंकराची पिंड, हत्तीची सोंड, राजमुकुट असे विविध आकार पाहून मौज वाटली गुफेच्या छतावर एका ठिकाणी हुबेहुब गाईच्या मुखाचा आकार तयार झाला होता मोडक्यातोडक्या हिंदीत तो नेपाळी मुलगा माहिती सागत होता पटापट इकडेतिकडे चढून ते ते खडक दाखवीत होता मेणबत्तीच्या प्रकाशात खडकातील चुनखडी चमकत होती या गुफेतून बाहेर पडण्यासाठी दुसरा एक अरुंद मार्ग आहे एक अमेरिकन पर्यटक ऑक्सिजन घेऊन सरपटत त्या अरुंद मार्गाने गेला होता अशी माहिती एका नेपाळी विद्यार्थ्याने दिली बाजूने आणखीही दोन मार्ग बाहेर येण्यास होते पण ते अतिशय अरुंद आहेत असे कळताच आम्ही मात्र आलो त्याच मार्गाने जाण्याचा आग्रह धरला गुफेबाहेर केव्हा एकदा निघतो असे झाले होते हळू हळू बाहेर आलो आमच्याबरोबरचे नेपाळी विद्यार्थी मात्र बाजूच्या अत्यंत अरुंद रस्त्याने मोठ्या प्रयत्नाने बाहेर आले खरोखर, महेंद्रगुफा म्हणजे निसर्गाची गूढ, अद्भुत किमयाच होय

त्यानंतर टॅक्सी थांबली सेती नदीवरील दगडी पूलावर ! सेतीवर दोन नवे व एक जुना पूल आहे गावातील स्टॅंडजवळ बाजारच्या रस्त्याच्या बाजूला

जुना पूल आहे. आम्ही थांबलो तो पूल विमान तळाजवळ मेन हायवेवर आहे. या दगडी पूलावर उभे राहून खाली पाहिले तर डोळे गरगरू लागले सेती नदीची खोली रुंदीच्या मानाने खूप आहे रुंदी तीस फूट तर खोली दीडशे फूट पाण्याच्या प्रवाहाचा खळखळ आवाज येत होता पण पाणी दिसत नव्हते खरोखर सेती नदी म्हणजे निसर्गाचा अजब चमत्कार !

विमानतळाजवळील राजमार्गावर सेती नदीच्या पूलाजवळ 'डेव्हिस फॉल' हे एक पर्यटन स्थळ आहे प्रत्येकी तीन रुपये देऊन तिकीटे घेतली इतकी फी कशाबद्दल असे विचारल्यावर माहिती मिळाली की येथे जमा होणारे पैसे नजीकच्या शाळेला मदत म्हणून दिले जातात तिकीटे घेऊन पायऱ्या उतरून खाली गेलो पोखराच्या प्रसिद्ध फेवाताल सरोवराच्या खालच्या बाजूला एक प्रवाह दऱ्याखोऱ्यात टप्प्याटप्प्याने धबधब्यासारखा पडतो तो पाहण्यासाठी रेलींग लावलेले खास टप्पे केले आहेत मोठमोठ्या खडकातून पडणारा हा प्रवाह भूगर्भात लुप्त होतो या पर्यटनस्थळाशी एक करुण कहाणी निगडित आहे पधरा वर्षापूर्वी या प्रवाहात एक युरोपियन प्रेमी युगुल पोहोण्याचा मनसोक्त आनद लुटत होते या आंग्ल युवतीचे नाव होते डेव्हिस ! फेवा सरोवरातील पाणी अकस्मात वाढल्याने ते पाणी वाहून जावे म्हणून फ्लडगेट अकस्मात उघडण्यात आले त्याबरोबर वेगवान प्रवाहात ही आंग्ल युवती दुर्दैवाने वाहून गेली तिचा पत्ता शेवटपर्यंत लागला नाही तिचा प्रियकर व त्याचा कुत्रा मात्र सुदैवाने वचावले त्यावेळेपासून या ठिकाणाला डेव्हिस फॉल हे नाव रूढ झाले खोल खोल खडकातील हे स्थळ भूगर्भशास्त्रदृष्टया एक अजब नमुना आहे काहीशा गूढ वाटणाऱ्या या स्थळाचा निरोप घेताना वेगवान प्रवाहात वाहत जाऊन लुप्त झालेल्या दुर्दैवी डेव्हिसबद्दल करुणा वाटली

टॅक्सी ड्रायव्हरने पोखराच्या 'बिंधवासिनी' या प्रसिद्ध देवस्थानाजवळ आणले एका लहान टेकडीवर हे मंदिर आहे दगडी पायऱ्या चढून मंदिराजवळ पोहोचलो देवीच्या मंदिराभोवती दगडी फरसबंदी आहे देवीसमोर बोकड, कोंबडे, बदक यांचे बळी दिले जात होते. बळी देणारा सराईतपणे एका घावात मानेपासून दोन तुकडे करीत होता बळी देण्यासाठी मोठी रांगच होती. मान तोडल्यावरही तडफड करणारे प्राण्यांचे अनेक देह तेथे पडले होते विळीने कांदा कापावा त्याप्रमाणे मोठ्या धारदार विळ्यावर एक माणूस सपासप कोंबडे कापत होता. त्यांचे देह तडफडून मग हळूहळू शांत होत होते ताज्या रक्ताचा नैवेद्य देवीला दाखवला जात होता त्यामुळे मंदिराच्या आवारात सर्वत्र लाल रक्त दिसत होते या ठिकाणी रोज चाळीस ते पन्नास बळी चढवले जातात. बिंधवासिनी देवीचे दुसरे नाव आहे भगवतीदेवी अष्टभुजा असलेल्या या देवीचे दर्शन घेतले.

आजूबाजूला देवदेवतांची देवळे आहेत. मंदिराच्या मागून दूरवरची हिमशिखरेही दिसतात. पायऱ्या उतरून खाली आलो बाजूला नेपाळी स्त्रिया चालवीत असलेले हँडीक्राफ्टचे छोटे दुकान आहे

फेवा सरोवर या रम्य ठिकाणी पोहोचलो तेव्हा नौकाविहार करायला मिळणार म्हणून उल्का–उदयला आनद झाला नेपाळी भाषेत पोखर म्हणजे तळे–ताल पोखरा व्हॅली प्रसिद्ध आहे नैसर्गिक तळ्यासाठी फेवाताल, बेग्नाताल, रूप-ताल, खस्तेताल ही येथील प्रसिद्ध तळी पोखरा जिल्हा नेपाळचा सरोवराचा जिल्हा म्हणून ओळखला जातो विमान तळापासून केवळ तीन कि मी अतरा-वरील फेवाताल तीन कि मी लांबीचे व पन्नास मीटर खोल आहे हिमालयाच्या पहाडातून झुळझुळ वाहत पाणी फेवातालमध्ये येते उत्कृष्ट नैसर्गिक पार्श्वभूमी लाभलेले हे सरोवर म्हणजे पोखराचे नदनवनच ! या फेवा सरोवराला अगदी प्रात:काळी सूर्योदयाच्या वेळी भेट द्यायला हवी त्यावेळी पाणी स्थिर असते आणि 'माछापूछरे' शिखराचे स्वच्छ स्पष्ट प्रतिबिंब पाण्यात दिसते ती शोभा अवर्णनीयच असते पौर्णिमेच्या रात्रीही या सरोवरातल्या निळ्याशार पाण्यात धवलशुभ्र हिमशिखराच मनमोहक प्रतिबिंब दिसत

फेवातालमध्ये छोटेसे बेट आहे एका छोट्या होडीतून तेथे पोहोचलो बेटावर पॅगोडा शैलीचे बाराही मदिर आहे मदिराभोवती दगडी फरसबदी आहे देवीसमोर कोंबडे, बदक यांचे बळी दिले जात होते देवीसमोर ताज्या लाल रक्ताचा सडाच पडला होता हे दृश्य आता पहावेसे वाटत नव्हते त्यापेक्षा हिमा-च्छादित शिखरांचे दर्शन घेत बसावे असे वाटू लागले होडीतून पुन्हा काठावर आलो

फेवातालच्या जवळ रॉयल पॅलेस, रत्नामदिर आहे तसेच फिशटेल, न्यू क्रिस्टल, माऊट अन्नपूर्णा ही प्रसिद्ध पचतारांकित हॉटेल्स आहेत मध्यमवर्गियांना परवडतील अशीही काही हॉटेल्स आहेत कित्येक पर्यटक सरोवरदृश्यासाठी फेवातालच्या आसपासच्या हॉटेलमध्ये उतरतात. टॅक्सीने बाजारच्या रस्त्यावर आलो

पोखराचा बाजारचा रस्ता साधारण दोन कि मी लांबीचा आहे येथील व्यापार, खरेदी-विक्री तिबेटबरोबर चालते. तसेच हाँगकाँग बाजारातून चैनीच्या वस्तू, टेपरेकॉर्डर, विविध इलेक्टॉनिक वस्तू, जपानी कापड, तयार परदेशी कपडे, कॅमेरे अशा अनेक वस्तु पोखराच्या या बाजारपेठेत स्वस्त मिळतात हा बाजा-रचा रस्ता बसस्टँडच्या उत्तरेला आहे तर सरोवर दक्षिणेला आहे पोखराला गुरुग या नेपाळी योद्धा जमातीतील लोकाची सख्या जास्त आहे गुरुग ही पहाडात

टोळी करून राहणारी जमात लढवय्यी असून पूर्वी ब्रिटिशांच्या सेनेतील गुरखा पलटणीत भरती झालेली असे १९४७ च्या स्वातंत्र्यप्राप्तीनतर गुरखा ब्रिगेडचे विभाजन झाले सहा पलटणी भारतीय सैन्यात दाखल झाल्या तर चार ब्रिटिश सैन्यात। पोखरा गावात आजही अनेक मिलीटरी पेन्शनर आहेत मिळणाऱ्या पेन्शनवर ते उदरनिर्वाह करतात तर काहीजण लहानमोठे व्यवसाय करतात काहींनी हॉटेल व्यवसाय सुरू केला गुरुंग जमातीतील स्त्रियामध्ये बहुपतित्वाची चाल आहे समजा पती सैन्यात भरती होऊन गेला तर रक्षणासाठी दुसरा अधिकृत पति असतो पोखरा गावात कानात मोठमोठ्या रिंगा घातलेल्या सुंदर गोऱ्यापान मुली दिसतात पोखरातील घरांभोवती रंगीबेरंगी फुलांनी फुललेल्या वेलींचे मांडव दिसतात शेतात संत्री, केळी यांच्या बागा आहेत हिंदू आणि बौद्ध धर्मीय अशी संमिश्र वस्ती येथे आहे लोक देवभोळे आहेत कुंडली पाहूनच प्रवासाला निघणारे, महत्त्वाचे निर्णय घेणारे सचोटीने वागणारे।

पोखरा गाव काठमांडूपेक्षा सातशे मीटर कमी उंचीवर आहे म्हणून हवा समशीतोष्ण आहे वर्षाऋतूत तर सतत पाऊस पडतोच पण उन्हाळ्यातही पावसाच्या सरी पडतात पर्वतराजीतील या गावात हवामान व पाऊस फार अनिश्चित असतो हिमालयदर्शनासाठी पर्यटकांना नोव्हेंबर, डिसेंबर, जानेवारी, फेब्रुवारी हा चार महिन्याचा काळ अनुकूल असतो त्या वेळी कोरडे ढग भराभर सरकत असतात व त्यामुळे आकाश सकाळी व संध्याकाळी पुष्कळ वेळा निरभ्र असते नोव्हेंबरखेरीज पुढील तीन महिने कडाक्याची थंडी असते त्यामुळे नोव्हेंबर महिनाच उत्कृष्ट असतो एरव्ही मात्र एखादे वेळी जाड ढगांचा थरच्या थर हिमशिखरावर बसून तो काही केल्या तेथून हलत नाही आणि तुम्ही कितीही तळमळलात तरी हिमशिखरांचे दर्शन होत नाही म्हणूनच येथील सूर्योदयाचं आणि सूर्यास्ताच अद्‌भुत दृश्य दिसायला 'नशीब' हवं असं म्हटलं जातं ते उगीच नाही। आकाशात ढग केव्हा जमतील, हिमशिखर ढगाआड केव्हा जातील आणि धुवांधार पाऊस केव्हा सुरू होईल काही नेम नाही

पोखरामध्ये निसर्गाने कमाल केली आहे निसर्ग सौंदर्याचा अनमोल खजिना मुक्तहस्ताने उधळून दिला आहे। हिमालयाच्या अन्नपूर्णांची आठ हजार मीटर उंचीची शिखर अगदी जवळून दिसतात असं हे पोखरा म्हटल तर खेडेगाव म्हटल तर डोंगराळ प्रदेशातील टुमदार शहर! विमानतळ असलेलं, चायना डिशेश मिळणारं, चारशेवर टोयाटो गाड्या असलेलं, पर्यटकांनी गजबजलेलं। पोखराबद्दल जे म्हटलं जातं की, 'A valley to remember and not to be missed' ते तेथे गेल्यावर पूर्णपणे पटतं खरं तर पोखराला भेट देणारा

पर्यटक पोखराच्या प्रेमातच पडल्याशिवाय रहात नाही पोखराला पाच-सहा दिवस फेवाताल काठी मुक्काम करावा, सूर्योदयाच्या वेळी व चादण्या रात्री पाण्यात पडलेलं माछापूछरेच प्रतिबिंब मनसोक्त न्याहाळावं, बोटींग करीत निसर्गसौंदर्य डोळचात सामावून घेण्याचा प्रयत्न करावा, अजब सेती नदीच्या काठी निसर्गाच्या गूढ किमयेबाबत अचबा करीत हिंडाव, ट्रेकींग करीत अन्नपूर्णाच्या पायथ्यापर्यंत जाव, माछापूछरेकडे तासन्तास टक लावून पहात रहाव, हिम-शिखरांना वेढून टाकणाऱ्या मेघापैकी आपणही एक व्हाव अशी मनाशी इच्छा बाळगावी । मोठ्या अनिच्छेनं पोखराची धावती भेट संपवली खरी पण पुन: पोखराला निवात भेट देण्याचा निर्धार करूनच !

*

## पोखरा ते भैरहवा

सकाळी बरोबर साडेअकराला बसने पोखरा सोडले. बसमधून 'माछापूछरे' शिखराकडे शेवटचा कटाक्ष टाकला शिखराची फक्त टोक दिसत होती बाकीचा भाग दाट मेघांनी आच्छादून गेला होता एखाद्या हट्टी मुलासारखे ते ठाण मांडून बसले होते, काही केल्या हलायला तयार नव्हते पोखरा-भैरहवा हा दोनशे कि मी अंतराचा प्रवास सुरू झाला हा राजमार्ग भारताच्या सहकार्याने तयार झाला प्रथम नौदंडा हे छोटेखानी गाव लागले नौदंडाहून अन्नपूर्णा शिखराकडे डायरेक्ट ट्रेकींगचा मार्ग आहे नंतर बालींग गाव लागले वरण, भात भाजी असे साधं जेवण तेथे मिळाले वळणाकार रस्त्याने बस पुन: निघाली प्रत्येक लहान ठिकाणीही बस थांबत होती त्यामुळे प्रवाशांच्या चढ-उताराने वेळ जात होता

कालीगंडकी नदीवरील पूल रामदीघाट येथे ओलांडून तानसेन या गावी बस थांबली तेव्हा सायंकाळचे पाच वाजले होते हे गाव मुख्य रस्त्यापासून फाट्याने आत चढावर आहे नेवारी लोकांची येथे वस्ती आहे. बस अर्धातास थांबणार होती कंडक्टरने सुचविले की स्टँडच्या वरच्या टप्प्यावर टेकडी आहे. तेथे चक्कर मारून या प्रथम चहा घेतला स्टँडच्या बाजूने चढाचा रस्ता चढून तेथील परेड ग्राऊंडवर पाच मिनीटातच पोहोचलो तेथे नेपाळच्या राजाचा पुतळा आहे

बाजूला गुलाब फुलांची सुंदर बाग आहे. हिमालयाच्या धौलगिरी ते मन्साल पर्वतराजीच्या शिखरांचे सुरेख दृश्य दिसले. तानसेन हे पश्चिममध्य नेपाळचे महत्त्वाचे गाव असून लष्करी ठाणे आहे. आम्ही मराठीतून गप्पा मारीत रस्त्याने जाताना लोक कुतूहलाने वळून आमच्याकडे पाहत होते.

तानसेन गाव सोडल्यानंतर महाभारत आणि शिवालीक पर्वतांच्या रांगा पार करून बुटवल या तराई प्रदेशातील गावी सायंकाळी साडेसातला पोहोचलो. पाच दिवसापूर्वी काठमांडूकडे जाताना बुटवलला अर्धातास थांबलो होतो. बुटवलला सर्वजण उतरलो. भैरहवाला जाण्यासाठी दुसऱ्या बसमध्ये चढायचे होते. बुटवल–भैरहवा गाडी समोरच उभी होती. सामान त्या बसवर चढवले. अंधार झाला होता. रात्री नऊच्या सुमारास भैरहवाला पोहोचलो. नेपाळप्रदेशातील शेवटची रात्र! स्टँडजवळच हॉटेल राप्ती होते. आणखी हॉटेलची चौकशी करायला उत्साह नव्हता. दिवसभराच्या प्रवासाने थकलो होतो. हातपाय धुऊन जेवणाची ऑर्डर दिली. आमच्या शेजारच्याच रूममध्ये दोन युरोपियन तरुण व एक तरुणी होते. ट्रेकींग केल्याने त्यांचे पाय सुजले होते पण हिमालयदर्शनाचा आनंद त्यांच्या बोलण्यातून ओसंडत होता. दही, भात, रोटी, दालफ्राय, आलू-मटार असे मस्त जेवण मिळाले. जेवण आटोपून रूमवर परतलो. पडल्यापडल्या सर्वांना झोप लागली.

✳

## बुद्धदेवांच्या जन्मभूमीत–लुम्बिनी

नेपाळच्या वास्तव्याचा शेवटचा दिवस उजाडला सकाळचे सहा वाजले हवेतला बदल जाणवला आघोळीला गरम पाण्याची जरूर नव्हती मस्त थडगार पाण्याने स्नान आटोपले चहा–ब्रेडचा नाष्टा केला नेपाळच्या भेटीतील शेवटचे स्थान होते लुम्बिनी–भगवान गौतम बुद्धाचे जन्मस्थान भैरहवाहून पचवीस कि मी अतरावर, अर्ध्या तासाचा प्रवास ! बसेस अर्ध्या तासाने होत्या पण वेळ थोडा असल्याने छोटा टेम्पो ठरवला. लुम्बिनीला जाऊन परत भैरहवाला येऊन, सामान घेऊन तेथून पाच कि मी अतरावरील सुनौली या भारताच्या सरहद्दी-वरील गावी सोडण्याचे सव्वाशे नेपाळी रुपये ठरले भैरहवाहून लुम्बिनीकडे सात वाजता निघालो गौतम बुद्धांची जन्मभूमी पाहण्याची खूप उत्सुकता होती

अनेक जातक कथांत उल्लेख असलेल्या लुम्बिनीचे मूळ नाव रुम्मिनदेइ प्रचालित लुम्बिनी हे नाव अपभ्रष्ट रुप आहे लुम्बिनीला पोहोचल्यावर तेथील विशाल उद्यानात एक प्राचीन दगडी स्तभ दिसला स्तभाच्या चारी बाजूला लोखंडी जाळीचे कुपण केले आहे तेथील मार्गदर्शकाने सागितले की सन १८९६ पर्यंत गौतम बुद्धाच्या जन्मस्थळाचा–लुम्बिनीचा अधिकृत ठावठिकाणा लागत नव्हता जर्मन पुराण वस्तुसशोधक डॉ. फ्युहरर यांना या निर्जन स्थळी हा स्तभ

सापडला सुप्रसिद्ध चिनी प्रवासी ह्यू-एन्-त्सग याने अनेक सकटाना तोंड देत या अशोकस्तभाला भेट दिल्याचे नमूद केले आहे तेरा फूट उचीच्या या स्तभाचा परीघ सात फूट आहे स्तभाचा दहा फूट भाग जमिनीत आहे इतर अशोक स्तभाप्रमाणे या स्तभावर सिंह किंवा अन्य पशूची आकृती कोरलेली नाही ह्यू-एन्-त्सग च्या वर्णनाप्रमाणे या स्तभावर अश्वमूर्ती कोरली होती स्तभाचा वरचा भाग खंडित वाटतो भुरकट रगाच्या या स्तभावर ब्राह्मी लिपीत पाच ओळीचा पुढील मजकूर कोरला आहे

> **" देवाच्या प्रिय प्रियदर्शी अशोकराजाने राज्याभिषेकानतर वीस वर्षांनी येथे येऊन या स्थानाची पूजा केली त्याने येथे पाषाण-स्तभ उभारला येथे भगवान गौतम बुद्धाने जन्म घेतला म्हणून लुम्बिनी गाव करमुक्त केले पिकाचा आठवा भाग जो राजाला मिळायचा तो या गावाला लावून दिला "**

अशोकस्तभाच्या बाजूला छोट्या टेकाडावर पुरुषभर उचीच्या दगडी चबुतऱ्यावर एका प्रचड वृक्षाच्या छायेत मायादेवीचे मदिर विराजमान आहे इ स पूर्व ६२३ ची हकीकत कपिलवस्तू राजधानीच्या शहरात शुद्धोधन राजा राज्य करीत होता मायादेवी हे त्याच्या राणीचे नाव राणीचा प्रसूतीसमय जवळ आला होता मायादेवीचे माहेर देवदहन नामक नगरात होते तिने माहेरी जाण्याची इच्छा प्रदर्शित केली शुद्धोधन राजाने आनदाने अनुमती दिली कपिलवस्तु नगरापासून देवदहनापर्यंतचा मार्ग केळीची पाने, पूर्ण घट, ध्वजपताकांनी सजविण्यात आला वाटेत लुम्बिनीला घनदाट वन होते तेथील उद्यानातील निसर्गसौंदर्य पाहून मायादेवीला तेथे थोडा वेळ सचार करण्याची इच्छा झाली फिरता फिरता एका शालवृक्षाखाली ती आली माया-देवीने त्या वृक्षाची एक फांदी मोठ्या परिश्रमाने हात लाब करून पकडली एवढ्यात प्रसववेदना सुरू होऊन सिद्धार्थचा जन्म झाला वसतऋतूतील वैशाखी पौर्णिमेचा तो शुभदिन होता मायादेवी मंदिराच्या गाभाऱ्यात एका पाषाणावर उजव्या हातात वाकलेल्या शालवृक्षाच्या फांदीला धरलेल्या मायादेवीची मूर्ती कोरलेली आहे तिच्या चेहऱ्यावर वात्सल्ययुक्त भाव आहेत मायादेवीच्या डाव्या बाजूला नवजात बालक सिद्धार्थ, बाजूला सिद्धार्थची मावशी गौतमी यांच्या प्राचीन अस्पष्ट मूर्ती आहेत इद्र, ब्रह्म, देवगणाच्या पुष्पवृष्टी करणाऱ्या मूर्तीही आहेत बाजूला नव्या सगमरवरी पाषाणावर सिद्धार्थ, मायादेवी, गौतमी यांच्या मूर्ती कोरल्या आहेत जातककथात सिद्धार्थच्या जन्मासबंधी म्हटले आहे ' जन्मा-नतर सिद्धार्थने सात पाऊले टाकली त्यामुळे सात कमलपुष्पे विकसित झाली.'

मायादेवी मंदिराशेजारी एक पुष्करणी आहे तेथे उतरण्यासाठी विटांच्या पायऱ्या आहेत एका जातककथेनुसार बालक सिद्धार्थच्या जन्मानंतर स्वर्गातून उष्ण व शीतल धारा या जलाशयात वाहू लागल्या आज या सरोवराला 'सिद्धार्थ पोखरी' नावाने ओळखले जाते सरोवराशेजारी एका प्राचीन विहाराचे भग्नावशेष दिसले तसेच नेपाळ सरकारने उभारलेला आधुनिक स्तंभ आहे

लुम्बिनीचे आणखी एक दर्शनीय स्थान आहे गौतम बुद्धाचे मंदिर. इ स. १९५६ साली हे मंदिर नेपाळ सरकारने उभारले ब्रह्मदेशचे यू थांट यांनी मंदिर उभारणीत हातभार लावला तेथून भगवान बुद्धाची भव्य मूर्ती पाठवली मंदिराचा लाकडी दरवाजा व लाकडी खिडक्यांवर सुंदर कोरीवकाम आहे भित्तीचित्रात 'संसारचक्र' चित्रित केले आहे. या संसारचक्रापासून मुक्ती मिळवण्यासाठी भगवान बुद्धांचा उपदेश आहे

मंदिराच्या बाजूला धर्मस्वामी महाराजांचा बौद्धविहार आहे. मंदिरात बुद्धाची दहा फूट उंचीची आसनस्थ पितळी मूर्ती आहे तिबेटी चित्रकला शैली-मध्ये भिंतीवर गौतमाच्या जीवनातील महत्त्वपूर्ण प्रसंग साकार केले आहेत.

असे हे जगातील तीस कोटी बौद्धधर्मियांचे श्रद्धास्थान असलेले पवित्र जन्मस्थान लुम्बिनी ! आम्ही गेलो तो वैशाखी पौर्णिमेचाच दिवस होता दूरदूर-हून आलेल्या अनेक बुद्धधर्मिय तसेच हिंदूधर्मिय यांच्यामुळे हे उद्यान गजबजून गेले होते. एखाद्या उत्सवासारखे सर्वत्र वातावरण होते सिद्धार्थ पोखरीत स्नान करणारे, मायादेवी व बुद्धमंदिरात पूजाअर्चा करणारे, ध्यानमग्न होऊन मनःशांती प्राप्त करून घेणारे अनेकजण दिसत होते

**बुद्धं शरणं गच्छामि**
**धम्मम् शरणं गच्छामि**
**संघम् शरणं गच्छामि**

या सूत्राची अलौकिक प्रचीती लुम्बिनीच्या भेटीत आली होती

लुम्बिनीचा निरोप घेऊन हॉटेल राप्तीमध्ये परतलो सर्व सामान घेऊन ठरल्याप्रमाणे त्याच टेम्पोने भारतीय सरहद्दीवर आणून सोडले भारतीय सरहद्दी-वर प्रवेश करण्यापूर्वी नेपाळहद्दीत सामानाची नाममात्र तपासणी करण्यात आली नेपाळची सफर संपली होती त्यामुळे हुरहुरणाऱ्या मनानेच सुनौलीला आलो

## सिलीगुडीकडे

सुनौलीहून दुपारी बाराच्या सुमारास बसने गोरखपूरकडे निघालो वाटेत दोन वेळा चेकिंगसाठी बस थांबवण्यात आली बसच्या टपावर चढून चेकिंग अधिकारी दमदाटी करू लागले. यशवंतांनाही टपावर बोलावण्यात आले सर्व सुटकेस उघडून त्यातील सामान बाहेर काढले गेले एक फौजदार यशवंतना म्हणाला, "बहुत माल लाया है आपने, सरकारजमा करना पडेगा!" फार सामान म्हणजे काय तर उल्कासाठी फ्रॉक, उदयचा व त्यांचा स्वत:चा टी शर्ट, आणखी थोडे तयार कपडे व किरकोळ लहान लहान वस्तू. चेकिंगच्या भानगडीने आम्ही फार थोड्या वस्तू आणल्या होत्या. शिवाय प्रत्येकाला दोनशे रुपयांपर्यंत वस्तूची खरेदी करता येते आम्हाला खरेदीपेक्षा हिमालय दर्शनात अधिक रस होता हे या अधिकाऱ्यांना कसे सांगणार? स्मगलिंग करणारे बाजूलाच राहिले इतरानाच दमदाटी होऊ लागली तुम्हाला जप्तीसाठी येथेच उतरून थांबावे लागेल या त्याच्या म्हणण्याला यशवंतनी शांतपणे 'थांबतो आम्ही असे सांगितले तेव्हा मात्र ह्याच्याकडून काही प्राप्ती होत नाही, हे दमदाटीला घाबरत नाहीत पाहून त्यांनी त्या किरकोळ वस्तू टपावरच टाकून दिल्या व म्हणाले की जा तुम्ही समोरच्या प्रवाशाने घाबरून काही दिले तर त्याना हवेच असते. चेकिंग पाहण्यासाठी बसच्या आजूबाजूला बरीच गर्दी जमली होती चेकिंगमुळे

बसला अर्धा तास उशीर झाला कुणाही प्रवाशाच्या सुटकेसमध्ये काहीच सापडले नाही म्हणून ते अधिकारी मात्र नाराज होऊन काठच्या आपटीत निघून गेले बसमध्ये लग्नसराईमुळे तुफान गर्दी होती बस पुढे निघाली कंडक्टर म्हणाला की रोहिणी नदीवरील कॉंक्रीटच्या पूलाला भेगा गेल्याने पुलाअलीकडेच सर्वांना उतरावे लागेल बस पूलावरून जाऊ शकणार नाही नाईलाजाने सर्व प्रवासी उतरले ऊन मी म्हणत होते सुदैवाने हमाल मिळाला त्याच्याकडे सामान देऊन नदीच्या किनाऱ्यापर्यंत अर्धा कि मी पायी चालत गेलो पैलतीरी जाण्यासाठी होडीची व्यवस्था विनाशुल्क होती समोरून प्रवाशानी, लोकांनी भरून होडी आली ती रिकामी होताच सर्वजण एकदम होडीत चढू लागले त्यामुळे भीती वाटली पाचच मिनिटात पलीकडे पोहोचलो उतरतानाही लोकानी इतकी घाई केली की होडी पार एका बाजूला कलली उतरून लोक जीप व टेम्पो पकडण्या-साठी पळू लागले तेथून गोरखपूर २० कि मी अतरावर होते अनेक जीप, टेम्पो, रिक्षा तेथे उभ्या होत्या जीपने अर्ध्या तासातच गोरखपूरला पोहोचलो तेव्हा हायसे वाटले

दुपारचे चार वाजले होते गोरखपूर सिलीगुडी गाडी सातला निघणार होती रेल्वेपूल ओलांडून शेवटच्या मीटरगेजच्या प्लॅटफॉर्मवर आलो रिझर्वेशनमुळे काळजी नव्हती आठ दिवसापूर्वी क्लोकरूममध्ये ठेवलेले सामान घेतले प्रवासाचा आता शेवटचा टप्पा सुरू झाला होता. गोरखपूर सिलीगुडी हा ७१० कि मी अंतराचा व तब्बल चोवीस तासाचा प्रवास होता थोड्याच वेळात गोहत्ती एक्सप्रेस प्लॅटफॉर्मवर आली रिझर्वेशनमुळे व्यवस्थित जागा मिळाली रात्री बरोबर सात वाजता गाडीने गोरखपूर सोडले बर्थवर आरामात झोप झाली दिवस उजाडता गाडी बरौनी जंक्शनला थाबली तेथे तेलशुद्धीकरणाचे मोठे केंद्र आहे स्टेशनवर चहा, पुरीभाजी घेतली त्यानतर रेल्वे बिहार प्रदेशातून धावू लागली कंटाळवाणा प्रवास चालू होता दुपारी मानसी जंक्शनवर जेवणाची ताटे आली जेवण अत्यत बेचव होते त्यापेक्षा तेथे मिळणारी लिचीची ताबडी फळे स्वस्त व मस्त होती रुपयाला पचवीस असा भाव असलेल्या लिचीचा आबटगोड स्वाद मुलांना खूप आवडला भरपूर लिची फळे खाऊन पोट भरले. दुपारी दोनच्या सुमारास कटिहार जंक्शनला गाडी अर्धातास थाबली किशनगज स्टेशनवर चहा घेतला सिलीगुडी स्टेशनवर रात्री आठला पोहोचलो चोवीस तासाच्या प्रवासाने फार कटाळलो होतो स्टेशनवर रेल्वे विश्रामालयातही जागा मिळाली नाही तेव्हा स्टेशनजवळील एका लॉजमध्ये रात्रीचा मुक्काम केला

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क्र.
ग्रं. शाखा (स्थळ प्रत)

## कांचनगंगेच्या छायेत-दार्जिलिंग

सिलीगुडी मधील सकाळ तर चागली उजाडली कारण झोप चांगली झाल्याने थकवा दूर झाला होता सिलीगुडीहून दार्जिलिंगला जाण्यासाठी यशवत सकाळीच मेनरोडवर गाडी पाहण्यासाठी गेले होते सिलीगुडी–दार्जिलिग हा प्रवास टॉयट्रेनने पण करता येतो पण प्रवासाला आठ तास लागत असल्याने रेल्वेच्या या प्रवासाचा बेत सोडून दिला त्यामुळे मुले नाराज झाली बस स्टँडवर बसलाही गर्दी होती दार्जिलिंगला पंचायत निवडणूकीसाठी काही जीप निघाल्या होत्या त्यापैकी एक स्वतत्र जीप सवलतीच्या दरात म्हणजे फक्त सव्वाशे रुपयात ठरवली होती

सकाळी नऊच्या सुमाराला जीपने सिलीगुडी सोडले सिलीगुडी समुद्र-सपाटी पासून ११९मी उचीवर आहे तर दार्जिलिंग २१३४ मीटर उचीवर आहे. सिलीगुडी सोडल्यानतर चहाचे हिरवेगार मळे दिसू लागले पहाडांच्या सान्निध्यात व दाट जगलातून वळणावर रस्त्याने जीप चालली होती गाडी जसजशी उचावर जाऊ लागली तसतसे आजूबाजूचे, दूरवर पसरलेल्या तिस्ता, महानदीच्या खोऱ्यांचे विहंगम दृश्य दिसू लागले रस्त्याच्या बाजूबाजूनेच छोटया रेलगाडीचा मार्ग होता या दार्जिलिग हिमालयन रेल्वेचे काम शभर वर्षापूर्वी सन १८८१ मध्ये सुरू

झाले कलकत्त्याहून दार्जिलिंग पर्यंत प्रवासाला पूर्वी पधरा दिवस लागत. सुरूवातीला सिलीगुडी ते तिंधारीया वीस मैल पर्यंत रेल्वेमार्गाचे काम झाले. नतर पुढे अकरा मैल कार्सियाग पर्यंत व नतर दार्जिलिंगपर्यंत असे काम पूर्ण झाले कार्सियांगला बाजारच्या रस्त्यातून ही छोटी रेल्वे जाते आम्ही चहासाठी कार्सियागला उतरलो तेवढ्यात ही छोटी रेल्वे आली गाडीतील प्रवासी डब्यात बसून बाजारातील दुकानातून मस्तपैकी खरेदी करताना दिसले ४८६० फूट उचीवरील कार्सियांग हे पहाडातील छोटे टुमदार गाव वाटले सिक्कीम राजाकडून इग्रजांनी हे गाव १८३५ मध्ये हस्तगत केले. हे गाव रेल्वे लाईनवर आल्याने त्याचे महत्व वाढले. या गावातील मिशन स्कूलस् प्रसिद्ध आहेत स्वस्त दरातील हॉटेल्स तसेच शैक्षणिक केद्र म्हणून कार्सियाग प्रसिद्ध आहे

कार्सियांगहून दार्जिलिंगपर्यंतचा तेहतीस कि मी अतराचा प्रवास सुरू झाला आजूबाजूच्या पहाडाच्या उतारावरील चहाच्या मळ्याचे सुदर दृश्य दिसत होते गाडीने घूम गाव पार केले आणि दार्जिलिंग दृष्टीक्षेपात आले दुपारी बाराच्या सुमारास दार्जिलिंग स्टेशनजवळ उतरलो थडगार वारे वाहत होते उदय व यशवत लॉज पाहण्यासाठी गेले आम्ही स्टेशनवर सामानाजवळ थाबलो दार्जिलिंगलाही हॉटेल एजटांचा सुळसुळाट आहे मालरोडवर बरीच हॉटेल्स आहेत ओबेराय, माऊट एव्हरेस्ट, पर्यटन विभागाचे टूरिस्ट लॉज, विडमियर ही महागडी हॉटेल्स आहेत ब्रॉडवे, कॅपिटल, एम्बॅसेडर ही थोड्या कमी खर्चातील हॉटेल्स आहेत यशवतनी हॉटेल समरबून पसत केले कारण तेथील टेरेसवरून हिमालयाच्या शिखरावलीचे सुदर दृश्य दिसत होते हमालामार्फत तेथे सामान हलवले हॉटेलच्या रुममधील पाच बेड, संलग्न बाथरूम शिवाय समोर प्रशस्त टेरेस पाहून सर्वजण खूष झाले सामान लावून जेवण आटोपले दोन तास छानपैकी विश्राती घेतली चारच्या सुमारास बाहेर निघालो हवेत गारठा होता प्रत्येकाने स्वेटर अगात चढवले

फिरत फिरत मालरोडवरील चौरस्ता या प्रसिद्ध मध्यवर्ती चौकात आलो पर्यटकांच्या गर्दीने चौरस्ता फुलला होता. लालबुद चेहऱ्याची पहाडी मुले, जीनपॅंट घातलेले तरुण, फॅशनेबल तरुणी, रगीबेरगी स्वेटर, कोट घातलेले देशाच्या निरनिराळ्या भागातले पर्यटक यांच्यामुळे एक वेगळेच उत्साहाचे वातावरण दिसत होते घोडेवाले मुलांना घोड्यावरून फिरण्यासाठी आग्रह करीत होते उल्का उदयने घोड्यावर बसून चक्कर मारली. घोडेस्वार बनलेल्या त्या दोघाचा फोटो ती-काकानी काढला चौरस्त्याच्या बाजूला तऱ्हेतऱ्हेच्या वस्तूची शोभिवत दुकाने होती कॅमेरे, छायाचित्रे, पुस्तके, दार्जिलिंग चहा, स्वेटर्स, कपडे, भेट

दण्यासाठी तऱ्हेतऱ्हेच्या वस्तु दुकानात भरगच्च होत्या खरेदीसाठी पर्यटकांची झुबड उडाली होती या दुकानाच्या बाजूला रस्त्याच्या कडेने नेपाळी, भूतानी स्त्रिया, मुली स्वेटर्स, मफलरी, शाली याचे शेकडो नमुने माडून विक्री करीत होत्या दुकानापेक्षा येथे पर्यटकाची जास्तच गर्दी होती कारण दुकानातल्यापेक्षा त्याच्याजवळ वस्तू स्वस्त होत्या मात्र भाव कमी करण्याची, घासाघीस करण्याची चिकाटी हवी आहे त्याच किंमतील वस्तू घेतली तर नक्कीच महाग पडणार


चौरस्त्याच्या वरच्या बाजूला छोटेसे उद्यान आहे तेथे प्रवेश करण्यासाठी प्रवेश फी आहे बगीच्यात फोटोग्राफर्सची वर्दळ होती सर्वांचा ग्रूप फोटो काढून घेतला. चौरस्त्याच्या उत्तरेला चढ चढून गेल्यावर महाकाल मंदिर लागले दार्जिलिंगचे संस्कृतमधील नाव दुरज्य लिंग ! हे शिवाचे स्थान मूळ तिबेटी शब्द दोरजेलिंग दोरजे म्हणजे डबेलसच्या आकाराचे धर्मचक्र, लिंग म्हणजे स्थान, जागा या टेकडीवर प्राचीन, पवित्र बुद्धविहारही आहे थोड्या अंतरावर दार्जिलिंगची वेधशाळा आहे बाजूला राजभवन आहे निळा घुमटधारी व मूळ बरद्वान राजाचा हा राजवाडा १८७९ मध्ये बांधण्यात आला. टेकडी उतरून परत चौरस्त्यावर आलो तेथून बाजूच्या रस्त्याने पाच मिनीटाच्या अंतरावरील 'स्टेपअसाईड' या घराला भेट दिली बंगाली स्वातंत्र्यप्रेमी देशभक्त चित्तरंजन दास यांचा मृत्यु १९२५ मध्ये येथे झाला या ऐतिहासिक दृष्टया महत्त्वाच्या वास्तूत पहिल्या मजल्यावर त्याचे कपडे जतन करून ठेवले आहेत

चौरस्त्याजवळ व्हिक्टोरिया पार्कच्या खाली नॅचरल हिस्टरी म्युझियम आहे. रंगीबेरंगी फुलपाखरे, तसेच हिमालयातील पक्षी, सर्प, अंगावर ठिपके असलेला नेपाळी चित्ता, हिमालयात आढळणारी सोनेरी मांजर असे विविध पशुपक्षी तेथे पेंढा भरून आकर्षकरीत्या ठेवले आहेत नंतर फिरत फिरत एका मारवाडी भोजनालयात आलो तेथेही गर्दी होती. चपाती, वरण, भाजी, पापड, दही असे गरम, चांगले जेवण मिळाले हवेत गारठा वाढला होता चढ उतार करून पायही दुखायला लागले होते कारण संपूर्ण दार्जिलिंग शहरच टप्प्याटप्प्यावर वसले आहे ना ! हॉटेल समरबूनमध्ये मुक्कामी परतलो

दार्जिलिंगमधील दुसरा दिवस ! गुलाबी थंडीत यशवंत सर्वांना उठवत होते. "चला, दार्जिलिंगचा सूर्योदय पहायचा ना ! समोर टेरेसवर या दहा मिनिटानी होईलच सूर्योदय !" लगबगीने सर्वजण उठलो चूळ भरून चहाचे कप हातात घेऊन समोर टेरेसवर आलो हॉटेलमधील इतर सात–आठ प्रवासीही तेथे जमले होते थोड्याच वेळात सूर्याच्या सोनेरी प्रभेत समोर कांचनगंगाची हिमशिखरे न्हाऊन निघाली दूरवर हिमालयाची पंधरावीस शिखरं कोवळ्या सूर्यप्रकाशात चमकत होती सुदैवाने धुके आणि पाऊस नव्हता टेरेसवरून परत रूमवर आलो

दार्जिलिगच्या मुक्कामात पाणी आणि वीजेच्या तुटवड्याचा तडाखा चांगलाच जाणवला दार्जिलिगच्या मूळ वीस हजार लोकसख्येच्या वस्तीला पाणीपुरवठा करणारा सेंचल तलाव सध्याच्या ऐंशी हजार व त्यातही सीझनमध्ये दुपटीने वाढणाऱ्या गावाला पाणी कसे पुरवू शकणार ? प्रत्येकी एक बादलीभर पाण्यात तोंड धुणे, आघोळ करणे शिवाय कपडे धुणे कसे शक्य होते ? हॉटेल व्यवस्थापकांकडून भांडून थोडे जास्त पाणी मिळवले खरे पण पाणीच नसल्यावर ते देणार तरी कुठून ? खर म्हणजे एवढया प्रसिद्ध हिलस्टेशनला मुबलक पाणी पुरवठा व्हायला हवा वारवार जाणारी वीज व पाण्याचे दुर्भिक्ष यामुळे पर्यटकाचे दार्जिलिगमध्ये हालच ! कसेतरी आवरून सकाळी नऊ वाजता दार्जिलिग दर्शनासाठी निघालो

मालरोडवर येऊन जीप ठरवली प्रत्येकी चौदा रुपये ठरवले प्रथम गेलो दोन कि मी अंतरावरील जवाहर प्रभात रोडवर तेथे हिमालयन झूऑलॉजिकल पद्मजा नायडू पार्क आहे तिकीट घेऊन या पार्कमध्ये प्रवेश केला आत प्राणीसग्रहालय असून त्यात सिंह, सैबेरियन वाघ, हरणे, तिबेटी याक हिमालयन पक्षी आहेत पार्कमध्ये हिमालयन माऊंटेनियरीग इन्स्टिटयूटही आहे प्रवेशद्वारावरील भित्तीचित्र आकर्षक आहे. तिकीट काढून आत प्रवेश केला आत गिर्यारोहणविषयक म्युझियम आहे पं नेहरूनी १४ नोव्हेंबर १९५४ रोजी त्याचे भूमीपूजन केले होते माऊट एव्हरेस्टवर आजपर्यंत झालेल्या विविध मोहिमाची छायाचित्रे तेथे आहेत १९५३ साली एव्हरेस्टवर पदार्पण करणारा शेर्पा तेनसिंग मूळचा नेपाळचा दार्जिलिगमध्ये हमाली काम पोर्टर व्यवसाय करून हिमालयावरील गिर्यारोहण मोहीमेत भाग घ्यायचा पश्चिम बगालचे तत्कालीन मुख्यमत्री डॉ बिधनचद्र रॉय यानी तेनसिंगच्या पराक्रमाचा कायम गौरव म्हणून ही गिर्यारोहण सस्था उभारली व तेनसिंग याची सचालक म्हणून नेमणूक केली आजकालच्या पुतळे उभारण्याच्या जमान्यात अशा प्रकारे कायम स्वरुपी उपयुक्त अशा सस्था काढण्यात मुख्यमत्र्यांची दूरदृष्टी दिसते एव्हरेस्ट विजेता तेनसिंग नोर्के याना मिळालेली अनेक बक्षीसे, मानपत्रे दिसतात त्याची छायाचित्रे आहेत एव्हरेस्ट मोहिमेसाठी लागणारी विविध साधने, त्यावेळचे खास अन्न, थडीवाऱ्यापासून बचाव करणारा कोट, टोपी, स्नोगॉगल हातमोजे यावस्तू आहेत तसेच गिर्यारोहण करताना वापरायच्या दोऱ्या, बूट, आयुधे आहेत मार्गात मुक्कामासाठी उभारायच्या तबूची प्रतिकृती आहे हिमालयन पक्षी, प्राणी फुलपाखरे, दगड यावरून तेथील प्राणिजीवनाची कल्पना येते हिमालयाच्या त्रैमिती नकाशाप्रमाणेच हिमालय प्रदेशातील लोकाचे कपडे, भाडी आहेत. एव्हरेस्टशिखर जिंकलेल्या देशोदेशांचे नकाशे तसेच एव्हरेस्ट पादाक्रांत केल्यावर तेथे लावलेल्या त्या त्या देशांच्या




हिमालयन माऊंटेनियरींग इन्स्टिटयूट, दार्जिलिंग



बोटॅनिकल गार्डन - दार्जिलिंग


काचनगगा



घूम बौध्द विहार



मिरीक सरोवर



ध्वजाचे नमुनेही आहेत दुसऱ्या मजल्यावर हिमालयाच्या बर्फाच्छादित शिखरांची छायाचित्रे आहेत गिर्यारोहकाच्या मेळाव्याची छायाचित्रे तसेच जगाच्या नकाशात जगातील पर्वत दिसतात एव्हरेस्ट कक्षात एव्हरेस्टचा इतिहासाचा फलक आहे दोन महिने एव्हरेस्टवर राहिलेल्य कुत्र्याचे छायाचित्र तसेच सव्वीस हजार फूटावर सापडलेला मृत गरूडही दिसतो एव्हरेस्ट विजेता जॉन हट याने लिहिलेली गिर्यारोहण मोहिमेची पुस्तकेही तेथे होती खरोखर, आजपर्यंत पाहिलेल्या अनेक म्युझियमपेक्षा हे म्युझियम अगदी वेगळे होते धाडस, जिद्द, उत्तुग ध्येय अशा गुणाच्या जोपासनेला अप्रत्यक्ष उत्तेजन देणार ! देशाच्या कानाकोपऱ्यातील तरुणाची गर्दी तेथे दिसत होती गिर्यारोहणविषयक चित्रपटही तेथे बाजूच्या रूममध्ये दाखवला जात होता

जीपने नतर पॅसेंजर रोपवे पाहण्यासाठी निघालो दार्जिलिगहून सिंगला येथील चहाच्या मळ्यापर्यंत आठ कि मी लाबीचा वीजेवर चालणारा मार्ग रोपवे केला आहे दोन मनोऱ्यात अंतर ४६२० फूट आहे सिंगला दार्जिलिगहून आठशे फूट खाली आहे ट्रॉलीत एका वेळी सहा माणसे बसतात ट्रॉली पंचेचाळीस मिनीटात आठ कि मी अतर पार करते खरोखर, रोपवेमधून सफर हा एक रोमाचकारी अनुभव आहे घनदाट जगल, डोंगरदऱ्या, धबधबे, चहाचे मळे, झुळझुळ वाहणारे निर्झर याच्या सान्निध्यातून होणाऱ्या या प्रवासाची मजा काही औरच ! तीस लक्ष रुपये खर्च करून ही योजना सिगला चहाच्या मळ्यापर्यंत नेली असून पुढे सिक्कीमपर्यंत ती वाढविण्याची योजना आहे सिंगला येथे पधराशे एकर वनक्षेत्र असून तेथे छान पिकनिक स्पॉट आहे तेथे रंगीत नावाची नदी असून ती पुढे तिस्ता नदीला मिळते तेथून रंगीत नावाच्या व्हॅलीचे सुदर दृश्य दिसते या रोपवेच्या सफरीसाठी बुकीग मात्र अगोदर करणे जरूर आहे.

जीपने नतर तिबेटी निर्वासितांनी चालवलेल्या पुनर्वसन कॅम्पकडे गेलो रस्त्यापासून खूप चढावर हे तिबेटी रेफ्यूजी हेल्प सेंटर आहे ड्रायव्हरने अतिशय कौशल्याने जीप उच चढावरच्या टेकडीवर नेली या सेंटरमध्ये अनेक तिबेटी कुटुबे दिसली रगीबेरगी सुंदर गालिचे तेथे तयार होतात लोकर विणण्यापासून ते रग देण्यापर्यंत विविध विभाग तेथे होते पुरुष व स्त्रिया कामात मग्न होते. गालिच्याची विक्रीही तेथे होत होती मात्र किमती फार जास्त वाटल्या जीपमधून उतारावरून खाली येताना अवघड वळणामुळे भीती वाटत होती बाजूच्या खोल दऱ्यामुळे डोळे गरगरत होते ड्रायव्हर मात्र सहजपणे ड्रायव्हिग करीत होता.

रस्त्याच्या बाजूच्या एका उच खडकाजवळ जीप थांबली हा खडक म्हणजे एक लांबलचक सुळकाच होता. तेथे विद्यार्थ्यांना गिर्यारोहणाचे शिक्षण देतात.

बाजूला चहाचे मळे होते ड्रायव्हरला विनती केल्यावर त्याने नमुन्यासाठी म्हणून चहाच्या झाडाची पुढची तीन कोवळी पाने आणून दिली चहाचे झाड लहानसे असते त्याच्या पानावर प्रक्रिया करणारे अनेक कारखाने दार्जिलिंगमध्ये आहेत. पुढच्या कोवळ्या पानापासून तयार होणारा श्रेष्ठ प्रतीचा चहा पाचशे रुपये किलो असतो तो सर्व परदेशी निर्यात होतो

जीप शेवटी लेबाँग रेसकोर्सजवळ थांबली हे जगातील उंच व तसेच लहान रेसकोर्स दार्जिलिंगहून आठ कि. मी अंतरावर आहे या रेसकोर्सजवळ मिलीटरी परेड ग्राऊंड व जिमखाना क्लब आहे रेसच्या सीझनमध्ये हा छोटेखानी रेसकोर्स गर्दीने फुलून जातो असे ड्रायव्हर म्हणाला

रेसकोर्स पाहून मालरोडवर परतलो दार्जिलिंगचा अर्ध्या दिवसाचा फेर-फटका संपला होता दुपारचे जेवण घेतले विश्रांतीसाठी हॉटेलवर परतलो आणि मुसळधार पाऊस सुरू झाला दुपारी चार वाजेपर्यंत विश्रांती घेतली तोपर्यंत पाऊस थांबला होता हॉटेलच्या टेरेसवरून पाहिले तर हिमालयाची शिखरावली पूर्णपणे मेघानी आच्छादून गेली होती हवेत गारठाही खूप होता दुपारनंतर बोटॅनिकल गार्डन व बाजारामध्ये फेरफटका मारायचा होता प्रथम बाजारचा रस्ता ओलांडून बसस्टँडजवळील उताराच्या मार्गाने बोटॅनिकल गार्डनजवळ आलो जगप्रसिद्ध लॉईड बँकेचे मालक लॉईड यानी डोंगर उतारावरची सोळा हेक्टर जागा बगीच्यासाठी दिली तेथे टप्प्याटप्प्यात हा बगीचा उभारला आहे विविध हिमालयन वनस्पती तेथे आढळतात लिली, गुलाब, फर्न, कॅक्टस् याचे अनेक नमुने तेथे आहेत वरील टप्प्यात देशी वनस्पती आहेत खालील भागात सुंदर हिरवळ, फुलझाडे, आहेत रॉक गार्डन, मेडिकल गार्डन तसेच ग्लासहाऊस आहे, ग्लासहाऊसमधील नाजूक वनस्पतीवर काचेतून सूर्यकिरणे येतात चीन, जपान आफ्रिका, न्यूझीलंड, ऑस्ट्रेलिया येथून आणलेल्या अनेक दुर्मिळ वनस्पती या बगीच्यात आहेत बोटॅनिकल गार्डनमध्ये फिरण्यात सर्वजण रमून गेलो वेळ कसा गेला ते कळले नाही

त्यानंतर दार्जिलिंगच्या बाजारच्या रस्त्यावर चक्कर मारली नेपाळी गुरखा, सिक्कीमी, भूतानी, तिबेटी, मंगोलियन, शेरपा, गुरुंग, हिंदू बौद्ध असे विविध जाती, वंश, धर्मांचे लोक दिसतात संपूर्ण दार्जिलिंग शहर टप्प्याटप्प्यावर वसले असल्याने रस्ते चढउताराचे म्हणून रिक्षा, टांगे यासारखी वाहने नाहीत वरच्या टप्प्यावर जाण्यासाठी रस्त्याप्रमाणे पायऱ्या पण आहेत. अशा शॉर्ट-कटच्या पायऱ्यांनी लवकर वरच्या अथवा खालच्या टप्प्यावर पोहोचता येते इतर हिलस्टेशन्सप्रमाणे दार्जिलिंगही इंग्रजानी वसवले मूळचा हा भाग सिक्कीम राज्याचा होता. १७८० मध्ये नेपाळी गुरख्यांनी सिक्कीमवर तिस्ता नदी पार

करून आक्रमण केले इंग्रजांच्या मध्यस्थीने सिक्कीम हे नेपाळ, भूतानमध्ये बफर स्टेट बनले १८२९ मध्ये इंग्रजानी येथे प्रथम पाय ठेवला येथे सहा दिवस राहिले येथील गुरखा वस्तीला दार्जिलिंग नाव दिले सिक्कीम राजाकडून दार्जिलिंग टेकडीचा भाग मात्र तीन हजार रुपये नुकसान भरपाई देऊन मिळवला ब्रिटिश रॉयल इंजिनियर पथकातील लॉर्ड नेपीयरने दार्जिलिंगची आखणी केली १८३९ मध्ये प्रथम वीस घरे बांधली तेव्हा वस्ती होती १०० लोकांची दहा वर्षांनी ती दहाहजार झाली दार्जिलिंगचा खरा विकास केला डॉ कॅम्पबेल यांनी १८४१ मध्ये रस्ते, हॉस्पिटल उभारले, बाजार वसवला स्वातंत्र्यानंतर भारताच्या पर्यटन विभागाने दार्जिलिंगचा थंड हवेचे ठिकाण म्हणून विकास केला तथापि पाण्याचे दुर्भिक्ष्य व वीजेची टंचाई यामुळे दार्जिलिंगला तडाखा बसला आहे दार्जिलिंगबद्दल म्हणता येईल Land of Contrasts येथे निसर्ग सुंदर आहे पण गाव फार अस्वच्छ आहे रस्ते अरुंद, पत्र्याच्या छताची घरे बाजार तर खूप गर्दीचा ब्रिटिशाच्या काळातील खुणा दर्शवणाऱ्या लॅंड रोव्हर जीप रस्त्याने दिसल्या बाजारात स्वेटर्स, शाली यांची खरेदी केली

बाजारात फेरफटका मारून स्टेशन जवळ आलो तेथे नजीकच धीर धाम मंदिर आहे १९३९ मध्ये हे पॅगोडा धर्तीचे मंदिर उभारण्यात आले नेपाळच्या पशुपति मंदिरासारखे हे मंदिर आहे लहानसे पण स्वच्छ आहे दर्शन घेऊन हॉटेल समरबूनमध्ये परतलो दुसऱ्या दिवशी जायचे होते टायगर हिलला सूर्योदय पाहण्यासाठी ! हॉटेल व्यवस्थापकानी जीपची व्यवस्था केली होती जीप पहाटे साडेचारला येणार होती म्हणून लवकर झोपी गेलो

दार्जिलिंगच्या वास्तव्यातील शेवटचा दिवस ! पहाटे चार वाजता हॉटेलमधील नोकराने उठवले आमच्या जीपमध्ये शेजारच्या रूममध्ये उतरलेले सरदारजींचे कुटुंबही येणार होते त्यांनाही त्या नोकराने उठवले त्यांना आवरायला उशीर झाला तर सूर्योदय बघता येणार नाही म्हणून उदय परत शेजारी दारावर टकटक करून आला थंडी खूपच होती हॉटेलमध्ये चहा वेळेवर मिळाला साडेचारला सर्वजण जीपने टायगर हिलकडे निघालो दार्जिलिंगहून अकरा कि. मी जायचे होते तेथील उंची समुद्र सपाटीपासून २५९० मीटर आहे प्रथम सहा कि मी अंतरावरील घूम येथे पोहोचलो फटफटायला सुरुवात झाली होती पहाटेच्या अंधूक प्रकाशात आजूबाजूच्या दऱ्याखोऱ्या धूसर दिसत होत्या त्यानंतर अतिशय कठीण असा चढाचा रस्ता होता. ड्रायव्हरचे खरोखर खूपच कौशल्य ! चढावर आस्ते आस्ते गाडी चढवीत होता रस्त्याने टायगर हिलकडे जाण्यासाठी गाड्यांची रांग लागली होती काही पर्यटक पायी चालले होते सगळ्यानाच वेळेवर पोहोचून सूर्योदय पहायचा होता ड्रायव्हर म्हणाला की, सूर्योदय पहायलाही

नशीब हव ! कारण ढग केव्हा जमतील व पूर्व दिशा आच्छादून टाकतील काहीच सांगता येत नाही आदल्या दिवशीही पर्यटकांना घेऊन तो टायगर हिलवर गेला होता पण ऐनवेळी ढग जमले आणि सूर्योदय दिसला नाही त्या पर्यटकानी ड्रायव्हरला पैसे देण्यास नकार दिला होता पण ड्रायव्हरचा त्यात काय दोष ? हवेचा अदाज अखेरपर्यंत लागत नाही अखेर त्याला भाडून पैसे वसूल करावे लागले काल शेकडो पर्यटकाची निराशा झाली पण आज सूर्योदय निश्चित दिसेल. आज हवा स्वच्छ आहे असे तो म्हणाला तेव्हा बरे वाटले पण तरी या लहरी हवेचे काय सागावे ? नशीबावर हवाला ठेवतच दार्जिलिगपेक्षा पधराशे फूट उचीवरच्या टायगर हिलवर पोहोचलो तेव्हा साडेपाच वाजले होते पाच–सहाशे गाडयाची तेथे गर्दी झाली होती स्वेटर, कोट घातलेले, मफलर्स गुडाळलेले शेकडो पर्यटक लगबगीने पायी निघाले उदय गाडीचा नबर टिपून घेण्यास विसरला नाही

टायगर हिलला सूर्योदय पाहण्यास खास कठडा केला आहे त्यामागे कॅंटीन आहे देशाच्या कानाकोपऱ्यातून आलेले पर्यटक मुलाबाळासह दाटीवाटीने उभे होते सर्वांचे लक्ष होते पूर्वेकडे अनेक कॅमेरे समोरचे अद्‌भुत दृश्य टिपण्यास सज्ज होते एव्हढयात चहूबाजूनी ढगांचे लोटच्या लोट आक्रमण केल्यासारखे वेगाने आले आणि तेवढयाच वेगाने ते खाली खाली गेले आमच्या समोर खालच्या बाजूला दाट ढगांचा थरच्या थर बसला रगभूमीवरचा पडदा उघडून एखादे अद्‌भुत दृश्य दिसावे त्याप्रमाणे ढगाचा पडदा बाजूला होऊन गुलाबी रगात न्हाऊन निघालेली पूर्व दिशा दिसली सूर्य राजाचे आगमन होत होते डोळयात प्राण आणून सर्वजण पहात होते पावणेसहाच्या सुमारास एक सोनेरी किरण चमकला आणि चहू-बाजूनी हर्षोत्फुल्ल उद्‌गार बाहेर पडले लहान मुलांनी आनदाने टाळया पिटल्या. हळू हळू सूर्याचा लाल लाल गोळा अवतीर्ण होऊ लागला क्षणातच त्या गोलाने शिखराआडून उडी मारल्यासारखी आकाशात झेप घेतली हिमालयाची धवलशुभ्र शिखरावली एकामागून एक चमकू लागली सूर्याचा उगवता लाल गोळा अगदी भरीव दिसला अनेक ठिकाणचे सूर्योदय पाहिले होते पण टायगर हिलच्या सूर्योदयाचे सौदर्य केवळ अनुपमेय !

उत्तर पूर्वेला चोमलहरी हे तिबेटचे मनोहारी शिखर आहे कांचनगगाचे २८,१४६ फूट उचीचे सुदर शिखर कब्रू हे २४,००० फूट उचीचे व जुनू हे २५,३०० फूट उचीचे शिखर दिसले येथून एव्हरेस्ट, गौरीशकर १०७ मैलावर आहे टायगर हिलवर उभे राहिल्यावर असा भास होतो की आपण जगाच्या शिखरावर उभे आहोत सूर्योदय व त्यावेळच्या शिखरांचे मनोहारी दृश्य वर्णन करायला काव्य अपुरे पडेल, रगवायला रग अपुरे पडतील परमेश्वराच्या अगाध लीलेचा, नव्हे परमेश्वराच्या अस्तित्वाचा साक्षात्कार या ठिकाणी होतो!

मात्र हा साक्षात्कार होण्यास नशीबाची साथ हवी कारण ढग आणि सूर्य याचा लपडाव जणू चाललेला असतो

सूर्योदय झाल्याबरोबर पर्यटकांनी कॅन्टीनमध्ये कॉफीसाठी एकच गर्दी केली कॉफी घेऊन जीपच्या शोधार्थ निघालो अनेक जीपमधून उदयने जीप बरोबर शोधून काढली सरदारजीचे कुटुबही तेव्हढ्यात आले सूर्योदयाच्या अद्‌भुत दृश्यामुळे सारे वातावरणच कसे भारल्यासारखे वाटत होते ड्रायव्हरने आमचे नशीब चांगले असल्याबद्दल अभिनदन केले आणि गाड्यांच्या गर्दीतून कौशल्याने आमची गाडी पुढे नेली त्यानतर घूमच्या बौद्धविहाराजवळ सर्व गाड्या थावल्या-आठ हजार फूट उचीवरील हा विहार तिबेटी बुद्धधर्मीय लामा ग्यानरसो यानी १८७५ मध्ये बाधला या बौद्धविहाराची समोरील भित पिवळ्या व तांबड्या रगाने रगवली आहे आतमध्ये गौतमबुद्धाची पधरा फूट उचीची भव्य मूर्ती आहे मैत्रेय बुद्धशिष्याच्या मूर्तीही आहेत मदिरात जुन्या ताडपत्रीवरील हस्तलिखिते आहेत धातूची प्रार्थनाचक्रे तिबेटी लामा फिरवीत होते पर्यटकानीही ती फिरवून पुण्यप्राप्तीचा प्रयत्न केला या बौद्धविहारात प्राचीन रामदिन दिवा आहे शभर वर्षांपूर्वी बांधलेला हा विहार चकचकीत नव्यासारखा वाटला

घूम हे दार्जिलिगच्या अलीकडचे सहा कि मी अतरावरील ७४०७ फूट उचीवरील जगातील एक उच्च रेल्वे स्टेशन ! घूमचा बौद्धविहार पाहून परतताना एक कि मी अतरावर घूमची प्रसिद्ध दुहेरी बटासिया लूप पहायला उतरलो अनेक पर्यटकांसह छोट्या रेल्वेच्या रूळावर चढलो रेल्वेचा एक छोटासा पूल पार करून जावे लागते बटासिया म्हणजे वादळी जागा या ठिकाणी रेल्वेने इग्रजी 8 आकड्याचे वळण घेतले आहे व रेल्वेचा दार्जिलिगकडे एक हजार फूट उतार आहे ही लूप म्हणजे प्रगत तात्रिक ज्ञानाचा उत्कृष्ट नमुनाच होय या ठिकाणी गाडी गोलाकार वळताना आपण परत उलट दिशेला तर जात नाही ना, असा भास झाल्याखेरीज रहात नाही जीपकडे परतताना छोट्या पूलावर पर्यटकांनी एकच गर्दी केली ज्याला त्याला अगोदर जाण्याची घाई व त्यामुळे कोणीच लवकर पुढे जाऊ शकेना नशीब त्या धक्काबुक्कीत कोणी खाली पडले नाही कसेतरी मार्ग काढीत जीपमध्ये परतलो थोड्याच वेळात जीपने हॉटेल समरबूनमध्ये आलो

## दार्जिलिंग ते हौरा

दार्जिलिंगची भेट आटोपली होती आता परतायचे होते सिलीगुडीला नाष्टा करून बॅगा आवरल्या सिलीगुडी–कार्सियाग–घूम–दार्जिलिंग या आलेल्या मार्गाने न परतता दार्जिलिंग–घूम–मिरीकलेक–सिलीगुडी या मार्गाने जाण्याचे ठरवले टॅक्सी ठरवली दार्जिलिंग सोडताना नैनितालप्रमाणे हुरहुर मात्र लागली नाही दार्जिलिंगचा आजूबाजूचा परिसर मात्र जुनाट, अस्वच्छ आहे पाणी व वीज यांच्या टचाईने हैराण झालेले पर्यटक केवळ निसर्ग सौन्दर्यावर लुब्ध होऊन अडचणी सोसतात. सकाळी दहाच्या सुमारास मिरीक सरोवराकडे निघालो

दार्जिलिंग–घूम प्रवास संपवून उजवीकडील मार्गाने मिरीककडे निघालो दार्जिलिंग–मिरीक ४९ कि मी अतर दोन तासात पार करताना वाटेत चहाचे मळे जसे दिसले तसेच सत्र्यांच्या बागाही दिसल्या मिरीक हे १७००मीटर उचीवरील पधरा हजार वस्तीचे छोटेखानी पहाडी गाव आहे तेथील सरोवर सव्वा कि मी लाबीचे असून जलाशयाला कमानीच्या पुलामुळे शोभा प्राप्त झाली आहे विशेष म्हणजे जलाशयातील पारदर्शक पाण्यात काचनगगाची हिमशिखरे चमकतात ! मुलाच्या आग्रहास्तव बोटीग केले वेळ दुपारची होती निळ्यानिळ्या आकाशात विरळ ढग तरगत होते जलाशयाच्या बाजूला बगीचा, फुले, उंच उंच

वृक्ष असे निसर्ग सुदर वातावरण आहे तळ्याभोवती फिरण्यासाठी रस्ता आहे. गर्दीपासून दूर, शात वातावरणातील मिरीकची सफर सर्वांनाच आवडली नवीन पर्यटनस्थळ म्हणून या स्थानाचा विकास होत आहे

मिरीकनतर सिलीगुडीकडे निघालो वाटेत पशुपती हे नेपाळ सरहद्दीवरचे गाव लागले तेथे परदेशी बनावटीच्या विविध वस्तु मिळतात पण त्या घ्यायच्या, मग परत चेकींगच्या कटकटी त्यामुळे त्या बाजाराकडे फिरकलो नाही सिलीगुडीकडे जाणारा रस्ता दाट जंगलातून जातो टॅक्सीवाला सागत होता की केव्हा केव्हा हरणे, हत्तीचा कळप या रस्त्याने दिसतो. सिलीगुडीला सध्याकाळी पाचच्या सुमारास पोहोचलो तेथून न्यूजलपैगुडी हे ब्रॉडगेजवरील स्टेशन दहा कि मी अतरावर आहे तेथून कलकत्त्याकडे जाणाऱ्या गाड्या सुटतात.

न्यूजलपैगुडी स्टेशनवर पोहोचल्यावर प्रथम तेथे हौरापर्यतच्या रिझर्वेशनबाबत चौकशी केली गोरखपूरहून आठ दिवसांपूर्वी तार केली होती तार तेथे मिळाली होती पण रिझर्वेशन पक्के झाले नव्हते वेटिंग लिस्ट मध्ये नाव होते त्यामुळे रात्रीच्या प्रवासाची काळजी होती न्यूजलपैगुडी ,स्टेशनवर उदयचा मित्र जितेंद्र गांधी त्याच्या वडिलाची जीप घेऊन आम्हाला भेटायला आला होता त्याचे वडील तिस्ता नदीवरील प्रकल्पाचे इजिनियर म्हणून हिंदुस्थान कन्स्ट्रक्शन कपनीत काम पाहतात मे महिन्याच्या सुटीत नगरहून निघण्याच्यावेळी ,त्याने आमत्रण दिले होते जितेंद्रने घरी चलण्याचा, राहण्याचा फारच आग्रह केला पण कलकत्याला परतून नगरच्या परतीच्या प्रवासाचे वेध लागले होते त्यामुळे अगदी नाईलाज झाला उदयच्या मित्राच्या आग्रह असूनही तिस्ता प्रकल्पावर जाता आले नाही याची हळहळ वाटली उदयचा मित्रही नाराज झाला पण कलकत्ता गाठणे जरूर होते. तेथील रिझर्वेशन साठी दोन तारखांच्या तारा दिल्या होत्या केव्हाचे रिझर्वेशन मिळाले आहे ती चौकशी ,करायची होती कलकत्ता नगर प्रवासाचा छत्तीस तासाच्या प्रवासाचा मोठा टप्पा असल्याने रिझर्वेशन चुकवून चालणार नव्हते

स्टेशनवर जेवण आटोपले दार्जिलिगहून परतलेल्या पर्यटकांनी स्टेशन गजबजून गेले होते दार्जिलिग मेल प्लॅटफॉर्मवर लागली तुफान गर्दीतून वाट काढीत कसेबसे स्लीपर बर्थ असलेल्या डब्यात घुसलो बर्थ अथवा सीटस् रिझर्व झालेल्या नव्हत्या काही सज्जन प्रवाशांच्या कृपेमुळे बाकावर बसायला मिळाले. पाचजण पाच ठिकाणी बसलो रात्री नऊ वाजता एन् जे पी स्टेशनचा निरोप घेतला भाऊगर्दीत बसून जागूनच प्रवास चालला होता सामानाचीही काळजी होतीच मध्यरात्रीच्या सुमारास माल्डा स्टेशन आले येथे चांगले आंबे विक्रीसाठी आले होते नाहीतरी आता रात्रभर झोप नव्हतीच तेव्हा आंबे खाल्ले मध्यरात्री

आबे खाण्याचा हा पहिलाच प्रसग स्टेशनवर सगीनधारी पोलीस गाडीत शिरले गाडी आता सुप्रसिद्ध फराक्का बॅरेजवरून जाणार होती गगेवरील हे प्रसिद्ध धरण पाहण्यासाठी डब्यातील सर्वांनी खिडक्याजवळ गर्दी केली गगोत्रीला उगम पावलेली भारतीयांची ही पवित्र नदी अनेक मैल अंतराचा प्रवास करून गगासागरला मिळते अलाहाबाद-वाराणसी–कलकत्ता या मार्गाने येऊन ती बगालच्या विशाल उपसागरात मिळते तसेच गगा अनेक मुखानी बागला देशातूनही येऊन या उपसागराला मिळते दीडशे वर्षांपूर्वी अलाहाबादहून कलकत्त्यापर्यंत बोटी ये जा करीत होत्या परतु गगेत साठलेल्या गाळाने जलवाहतुकीला अडथळा निर्माण झाला आहे वीस वर्षांपूर्वी फराक्काला मोठे बॅरेज–धरण बाधण्याची योजना सुरू झाली तेथून जगीसूर गावापर्यंत एकेचाळीस कि मी लांबीच्या कालव्याने हुगळी नदीत पाणी सोडून हुगळीचे मुख स्वच्छ ठेवण्यासाठी गाळ बगालच्या उपसागरात सोडला जातो जरी हे धरण भारताच्या हद्दीत असले तरी बांगला देशने त्याला हरकत घेतली आहे गगा व ब्रह्मपुत्रा याच्या सयुक्त प्रवाहाला बागला देशात पद्मा असे नाव आहे फराक्का धरणातून हुगळीत पाणी सोडल्यास पद्मा नदीतील पाण्याचे प्रमाण कमी होईल असे बागला देशचे म्हणणे असून गगाजल वाटपात अधिक हिस्सा हवा आहे

फराक्का धरणावरून रेल्वे हळूहळू चालली होती धरणाला १२० गेट आहेत. काही गेट उघडया होत्या त्यातून गंगेच्या पाण्याचा प्रवाह वेगाने वाहत होता धरण अडीच कि मी लाबीचे आहे दूरवर पलीकडे काही दिवे दिसत होते-गाडीतील एका प्रवाशाने सागितले की ते दिवे बांगला देशचे आहेत मागील प्रवासात पश्चिम पाकिस्तानची सरहद्द सतलज काठी पाहिली होती आता पूर्व पाकिस्तानचा–नव्या बागला देशाचा भाग दुरून पहायला मिळाला खरे तर हा सर्व पूर्वी हिंदुस्थानचाच भाग होता पण आता पाण्यासाठीही भाडणे होत आहेत फराक्का बॅरेजवरून जाताना पवित्र गगामाईच्या प्रवाहात नाणी टाकून दर्शन घेतले मध्यरात्रीचे हे गगामाईचे दर्शन अलौकिकच होते हा बॅरेज होण्यापूर्वी दोन्ही कडेच्या चामग्राम व खेजुरीघाट या स्टेशनवर रेल्वे थाबत व स्टीमरने वाहतूक होई नदीपलीकडचे स्टेशन आल्यावर गाडीतील सगीनधारी सैनिक उतरले मध्यरात्र उलटून गेली होती रात्रभर बसून प्रवास करावा लागल्याने सर्वजणच ताठून गेलो होतो रात्रभर झोप तर नाहीच पहाटे बोलपूर स्टेशन आले रविंद्रनाथाच्या कर्मभूमीतून गाडी निघाली नतर बरद्वान स्टेशन आले दोन तासात हौरा स्टेशनमध्ये पोहोचलो सकाळचे दहा वाजले होते हवेत फारच फरक जाणवला भयकर ऊन व घामाच्या धारा यानी हैराण झालो स्टेशनसमोर चांगली हॉटेल्स आहेत कोणार्क ते कन्याकुमारी प्रवासात १९७६ साली ज्या नटराज हॉटेलमध्ये उतरलो

होतो तेथे पोहोचलो लिफ्टने चौथ्या मजल्यावर येऊन मिळालेली खोली ताब्यात घेतली नेहमीप्रमाणे उदय व यशवत आवरून कलकत्ता–नगर रिझर्वेशनच्या चौकशीला गेले आम्ही स्नान वगैरे आटोपून आराम केला दुपारी दोघेजण परत आले एक्सप्लनेड येथील रेल्वेच्या कार्यालयातला अनुभव उदय सांगू लागला रिझर्वेशन खिडकीसमोर दोन तास रांगेत उभे राहून नंबर आल्यावर क्लार्कला नगरहून महिन्यापूर्वी निघताना केलेल्या तारेबाबत विचारले तो क्लार्क उद्धटपणे तार मिळाली नाही असे सागू लागला रात्रभरचा जागून केलेला प्रवास, दोन तास रांगेत उभे राहणे आणि आकाशातून आगीचे लोळ ओतले जावेत असा उन्हाळा या सर्वांवर त्या क्लार्कच्या उद्धटपणाने कळसच चढवला यशवत फारच चिडले क्लार्कशी वादविवाद करूनही तो दाद देईना मग ते वरच्या मजल्या-वरील मुख्य रिझर्वेशन इन्स्पेक्टरकडे गेले तेथील रजिस्टर पाहिले तर त्यात तारेची नोंद झालेली होती तेथील अधिकाऱ्याची चिठ्ठी घेऊन खाली परत येऊन ती त्या क्लार्कला दाखवली तो परत वर साहेबाना भेटायला गेला आल्यावर मात्र सॉरी म्हणाला चिकाटीमुळे पाच बर्थचे रिझर्वेशन तिसऱ्या दिवसाचे मिळाले रिझर्वेशनचे काम झाल्याने प्रवासाचे टेन्शन बरेच कमी झाले हॉटेलच्या खालच्या डायनिंग हॉलमध्ये येऊन जेवण घेतले मग तीन चार तास चागली झोप घेतली सध्याकाळी पाचच्या सुमारास टॅक्सी करून चौरगी भागाकडे निघालो.

*

## कलकत्ता महानगरी

हौरा ब्रिजवरून टॅक्सी धावत होती आणि कलकत्याचा चलत् चित्रपट जणू नजरे समोरून सरकत होता भारताच्या सांस्कृतिक इतिहासात बगालचे स्थान वैशिष्ट्यपूर्ण आहे बगाल ही धर्म, शास्त्र, काव्य, नाट्य, कला, राजकारण चित्रपट या सर्व क्षेत्रात तळपलेल्या कर्तबगार वगबधूच्या वास्तव्याची भूमी धर्मपडित रामकृष्ण परमहस व त्याचे तेजस्वी शिष्य स्वामी विवेकानद, थोर समाजसुधारक राजा राममोहन रॉय, ईश्वरचद्र विद्यासागर, नोबेल पारितोषिक विजेते रविंद्रनाथ टागोर, स्वातंत्र्यासाठी आहुती देणारे निधडया छातीचे सुभाषचंद्र बोस, स्वातत्र्य सैनिक खुदीराम बोस, राजकरणपटु चित्तरंजन दास देशबध, महान साहित्यिक शरच्चद्र चटर्जी, आजही कार्यमग्न मदर तेरेसा ही नाव तर सुप्रसिद्धच आहेत कलाक्षेत्रात यामिनी राय, शभू मित्र, सत्यजित रे, मृणाल सेन, अपर्णा सेन, हृषिकेश मुखर्जी याचीही नावे सुपरिचित आहेत

कलकत्ता म्हटले की आठवतो जॉब चारनॉक! सन १६६५ मध्ये चारनॉक या इग्रजाने हुगळी नदीच्या काठी कालिकता या खेडेगावी ब्रिटीशांचा झेंडा उभारून कलकत्ता शहराची मुहुर्तमेढ रोवली कालिकता हे गाव प्रसिद्ध होते मच्छीमारीसाठी व्यापाराच्या निमित्ताने आलेले इग्रज पुढे राजसत्तेचे मालक


बनले. १७५७ च्या प्लासीच्या लढाईनतर रॉबर्ट क्लाईव्ह, वॉरन हेस्टींग्ज, लॉर्ड डलहौसी, लॉर्ड कर्झन याचा कलकत्त्याच्या जडणघडणीत महत्त्वाचा वाटा आहे इग्रजांच्या कुटील नीतीने बगालची फाळणी झाली पुढे कलकत्त्याहून १९१२ साली दिल्लीला राजधानी स्थलांतरीत झाली तरी बगालचे व्यापारी व राजकीय महत्त्व कमी झाले नाही स्वातत्र्यानतर बगालचा पूर्व भाग पूर्व पाकिस्तान म्हणून निर्माण झाला आणि पुढे बागलादेशची निर्मिती झाली सर्व इतिहास आठवत होता

उदयने यशवताना विचारले की या लोखडी पूलाला नदीत आधारासाठी खाब नाहीत का ? त्यावर ते म्हणाले की हुगळी नदीच्या पात्रात कसलाही आधार न देता हा पूल उभारण्यात आला १९४३ साली म्हणजे चाळीस वर्षांपूर्वी हा सस्पेन्शन ब्रिज बांधला गेला एकशेवीस फूट लांबीचा, सत्तर फूट रुंदीचा हा पूल म्हणजे स्थापत्यशास्त्रातील एक अद्भुत किमयाच दीडशे फूट उंचीच्या या लोखंडी पुलासाठी सत्तावीस हजार टन लोखड वापरले हा पूल तपमाना प्रमाणे रात्री आकुचन व दिवसा प्रसरण पावतो हेऐकून आश्चर्य वाटले दिवसा या पुलाची लाबी चार फूट वाढते एका वेळी आठ गाड्या या पुलारून जाऊ शकतात बाजूने पादचाऱ्यांसाठी रस्ता आहे पुलाच्या बाधकामाचा खर्च त्यावेळी साडेतीन कोटी रुपये झाला खरोखर हौरा ब्रिज म्हणजे कलकत्त्याची धमनीच ! पूल पार करून प्रथम डलहौसी स्क्वेअर या कलकत्त्याच्या मध्यवर्ती चौकात आलो

लॉर्ड डलहौसीने हिंदुस्थानचे गव्हर्नरपद १८४८ ते १८५६ पर्यंत भूषवले त्यांच्या नावाने हा विस्तृत चौक ओळखला जातो तेथे नैसर्गिक जलाशय आहे. तेथील अनेक नैसर्गिक झऱ्यातून सतत स्फटिकशुभ्र जलधारा वाहत असतात इग्रजी सत्तेचा पाया कलकत्त्यात रोवणाऱ्या जॉब चारनॉक व त्याच्या सहकाऱ्याना याच तळ्याने पाणी पुरविले त्यावेळी हा भाग 'दी ग्रीन' म्हणून ओळखला जाई कारण या तळ्याभोवती पचवीस एकर क्षेत्राचे विस्तृत हिरवेगार शेत होते. नतर हा भाग 'दी पार्क' नावाने ओळखला जाई या तळ्याच्या बाजूच्या भिंती तांबड्यालाल विटांनी बांधल्या असून पूर्वपश्चिम बाजूला लाबच्या लाब पायऱ्या आहेत लाल रगामुळे लालबाग, रेडटँक या नावानेही हा भाग पूर्वी ओळखला जाई या तळ्याभोवती अनेक भव्य इमारती दृष्टीला पडतात 'रायटर्स बिल्डींग' या ऐतिहासिक इमारतीत पूर्वी ईस्ट इंडिया कंपनीची कचेरी होती आता तेथे सचिवालय आहे नवे चौदा मजली सेक्रेटरीएट, टेलिफोन भवन, घुमटधारी जनरल पोस्ट ऑफिस, रिझर्व बँक अशा अनेक इमारती आहेत उत्तरपूर्व बाजूला निमुळते शिखर असलेले अँन्ड्र्यूज चर्च जुन्या कलकत्त्याची आठवण करून देते

कलकत्त्याचे प्रसिद्ध सेंट जॉन चर्च नजीकच आहे ब्रिटिशाच्या वास्तव्याच्या

अनेक स्मृतींशी ते निगडीत आहे याच चर्चच्या आवारात जॉब चारनॉक



CHARNOCK'S MAUSOLEUM

चिरनिद्रा घेत आहे इ स १६५५ मध्ये चारनॉक बंगालच्या उपसागरातून हिंदुस्थानच्या पूर्वतीरावर हुगळीला आला ब्रिटिशांच्या मालकीच्या ईस्ट इंडिया कंपनीतर्फे व्यापारवृद्धीसाठी तो आला होता दरमहा वीस पौंड पगारावर ब्रिटिश नौदलात खलाशी म्हणून त्याने प्रथम काम केले व्यापारासाठी वखार उभारली पुढे बंगालमध्ये फिरत असताना पधरा वर्षाची एक सुंदर पण अभागी तरुणी पतीच्या चितेवर सती जाताना त्याला दिसली. त्या ब्राह्मण मुलीला त्याने सती

जाण्यापासून वाचवले एवढेच नव्हे तर पुढे त्याने तिच्याशी विवाहही केला त्याच्यावर भारतीय पद्धतीचे संस्कार झाले तो त्याप्रमाणे आचरणही करू लागला पुढे तो गव्हर्नर झाल्यावर कलकत्त्याच्या प्रसिद्ध वटवृक्षाखाली दरबार भरवीत असे त्याला तीन मुली झाल्या त्यापैकी मोठ्या मुलीचा ज्या इंग्रजाशी विवाह झाला तोही पुढे बंगालचा गव्हर्नर झाला चारनॉकच्या हिंदु पत्नीचे प्रथम निधन झाले त्याने आपल्या निधनापूर्वी आपले शव पत्नीच्या समाधीशेजारी दफन करावे अशी इच्छा व्यक्त केली होती त्याची अंतिम इच्छा पूर्ण करण्यात येऊन त्या जागेवर अष्टकोनी चारनॉक मॉसेलियम उभारण्यात आले चारनॉकच्या मृत्यूनंतर १८९२ मध्ये त्याचे थडगे उकरण्यात आले तेव्हा अस्थीचा हात त्याच्या छातीवर ठेवलेला आढळला चारनॉकची स्मृतीशिला पाहताना आठवते त्याची अलौकिक प्रेमकथा !

सेंट जॉन चर्चच्या आवारातच विल्यम हॅमिल्टन यालाही चिरनिद्रा देण्यात आली आहे मोगल राजावर दिल्लीला उपचार करणारा, त्याच्याकडून सवलती घेणारा हा सर्जन होता या चर्चमध्ये विवाह नोंदणीचे जुने रेकॉर्ड आहे त्यात वॉरन हेस्टिंग्जच्या विवाहाची नोंद आहे कलकत्त्याच्या कुप्रसिद्ध ब्लॅक होल प्रकरणात एक इंग्रज तुडवला जाऊन मरण पावला त्याच्या विधवा इंग्रज पत्नीला दोन मुली होत्या वॉरन हेस्टिंग्जची व तिची भेट झाली तेव्हा त्याने तिच्याशी विवाह केला ! या चर्चचे पेव्हींग राखी रंगाच्या पत्थराचे असून आतमध्ये पेंटिंग्ज आहेत १९४२ च्या स्वातंत्र्यलढ्यात या चर्चला बॉम्बचा तडाखा बसला होता

नजीकच कलकत्त्याचे हायकोर्ट आहे शिल्पशास्त्राच्या गोथिक पद्धतीने बांधलेल्या या इमारतीच्या नक्षीदार स्तंभाची रांग आकर्षक आहे शेजारी पश्चिम बंगालचा असेंब्ली हॉल आहे तेथून जवळच राजभवन ही राजप्रासादासारखी इमारत आहे १८०३ साली लॉर्ड वेलस्ली याने या इमारतीचे उद्‌घाटन केले तर १९०३ साली इमारतीची शताब्दी लॉर्ड क्लाईव्हने धूमधडाक्यात साजरी केली होती राजभवनचे आवार सहा एकर इतके विस्तृत आहे गेटमधून उंच उंच पायऱ्या दिसत होत्या आवार तऱ्हेतऱ्हेच्या फुलांनी, उंच वृक्ष व हिरवळ यामुळे सुशोभित दिसत होते १९१२ मध्ये दिल्लीला राजधानी हलवेपर्यंत येथे व्हाईसरॉय रहात असे ही इमारत एवढी मोठी आहे की व्हाईसरॉयला स्वतःच्या दालनातून आपल्या मुलाच्या वा मुलीच्या खोलीत जाण्यास पाव कि. मी चालावे लागे व्हाईसरॉयनंतर येथे बंगालचा गव्हर्नर रहात असे सध्या राज्यपाल राहतात

डलहौसी स्क्वेअरवरून चौरंगी या जगप्रसिद्ध रस्त्यावर आलो चौरंगी या मूळच्या खेडेगावच्या नावावरून अठराव्या शतकात हे नाव पडले एक कि मी. लांबीचा मोठा सरळ रस्ता, बाजूची मोठी व्यापारी दुकाने, बँका, सिनेमागृहे,

हॉटेल्स यांनी गजबजला आहे मुंबईच्या फोर्ट भागाची व दिल्लीच्या कॅनॉट प्लेसची आठवण झाली या मोठ्या रस्त्याला काटकोनातून छेदणारे रस्ते आहेत प्रसिद्ध धर्मताला रोड, बाजूचे न्यूमार्केट चौरंगीपासून नजीकच आहे

चौरंगीला लागूनच प्रशस्त मैदान आहे अठराव्या शतकात तेथे घनदाट जंगल होते गव्हर्नर जनरल तेथे वाघाची शिकार करीत तेथे आज असलेल्या प्रशस्त हिरवळीवर कलकत्त्याचे नागरिक सायंकाळची रम्य वेळ व्यतीत करतात हौशी बंगाली पुरुष, भांगात सिंदूर व केसात फुले माळलेल्या स्त्रिया, रंगीबेरंगी आइस्क्रीम मजेत खाणारी मुले यांनी मैदान फुलले होते. मैदानाच्या पश्चिमेला १६५ फूट उंचीचा स्तंभ आहे ईस्ट इंडिया कंपनीतील सर डेव्हिड ऑक्टर्लोनी हे लष्करी अधिकारी होते आपल्या चाळीस वर्षांच्या कारकीर्दीत १८१४ ते १६ यामध्ये नेपाळवर यशस्वी मोहीम करून त्यानी विजय मिळवला या विजयाच्या स्मरणार्थ हा स्तंभ ऑक्टर्लोनी यांनी १८४१ साली उभारला त्याच्या मोगल शैलीवरील प्रेमामुळे या स्मारकावर मुस्लिम शिल्पकृतीचा प्रभाव आहे इजिप्शियन, सिरीयन व तुर्कीश शिल्पकृतीचे मिश्रण या स्तंभाच्या शिल्पकृतीत झाले आहे स्वातंत्र्यानंतर या स्तंभाचे नवे नाव ठेवण्यात आले 'शहीद मीनार' या मनोऱ्याच्या परिसरात कलकत्त्याच्या राजकीय सभा होतात मैदानाच्या एका भागाला ईडन गार्डन म्हणतात लॉर्ड ऑकलंड या ब्रिटिश गव्हर्नरच्या वहिणीच्या मिसेस ईडनच्या नावाने ते ओळखले जाते फूटबॉल व क्रिकेट शौकिनांचे तर ईडन गार्डन हे मोठे आकर्षण आहे. टी व्ही वर पाहिलेले ईडन गार्डन प्रत्यक्ष पहा ला मिळाल्याने उदयला आनंद झाला

कलकत्त्यातला हा अर्धा दिवस मध्य विभाग पाहण्यात गेला चौरंगीवरून टॅक्सीने मुक्कामी हौरा स्टेशनजवळील हॉटेल नटराजमध्ये परतलो डायनिंग हॉलमध्ये जेवण घेत असतानाच व्हिडिओवर 'धुआँ' चित्रपट सुरू केला एक चांगला चित्रपट पहायला मिळाला

कलकत्त्यामधील दुसऱ्या दिवशी सकाळी नऊलाच आवरून कलकत्ता दर्शनासाठी बाहेर निघालो सकाळपासूनच ऊन तापायला लागले होते. टॅक्सी ठरवली प्रथम दहा कि मी अंतरावरील बेलूरमठाच्या भव्य आवारात पोहोचलो

बेलूर येथे रामकृष्ण मठाची स्थापना सन १८९८ मध्ये रामकृष्ण परमहंस यांचे शिष्य स्वामी विवेकानंद यांनी केली रामकृष्ण परमहंसाच्या प्रथम जन्म-शताब्दिनिमित्ताने सन १९३५ मध्ये नवीन मंदिराची पायाभरणी झाली. मंदिर उभारणीसाठी नऊ लाख रुपयांवर खर्च झाला त्यासाठी दोन अमेरिकन भक्तांनी आर्थिक मदत केली हुगळी नदीच्या काठावर हा मठ आहे उत्तर प्रदेशच्या

चुनार येथील खाणीतून आणलेल्या गुलाबी रंगाच्या पत्थरांनी ते उभारले एका बाजूने पाहिले तर हा मठ चर्चसारखा, दुसऱ्या बाजूने मशिदीसारखा तर तिसऱ्या बाजूने मंदिरासारखा दिसतो बेलूरमठ म्हणजे सर्वधर्मसहिष्णुता व विश्वबंधुत्व यांचे प्रतीकच! मंदिरात रामकृष्ण परमहंसाची संगमरवरी मूर्ती आहे मंदिरात ध्यानस्थ बसून मूक भावांजली वाहणारे अनेक भक्त दिसले वातावरण शांत व पवित्र वाटत होते आत्मा हा ईश्वराचा अंश असून ईश्वर निर्गुण, निराकार, सर्वशक्तीमान व सर्वव्यापी आहे अशी रामकृष्णाची विचारप्रणाली आहे 'तन्नो हंस प्रचोदयात' हे रामकृष्ण मिशनचे बोधवाक्य आहे स्वामी विवेकानंदांनी स्वत हे बोधवाक्य ठरवले होते लाटा उसळणारे पाणी, उमललेले कमलपुष्प, उगवता सूर्य, हंस व गोलाकार कृष्णसर्प असे दृश्य बोधवाक्यावर आहे त्यातून धर्म, ज्ञान, भक्ती व योगसाधन हे ईश्वर साक्षात्काराचे विविध मार्ग असून ज्याने त्याने आपल्या स्वभावधर्मानुसार त्यातील कोणताही आचरावा असे सूचित केले आहे भारतात व भारताबाहेर रामकृष्ण मिशनच्या ११८ शाखा शिक्षणप्रसार, अनाथालय, वाचनालय चालवणे या प्रकारची सामाजिक, सांस्कृतिक व धार्मिक कार्ये करतात दुष्काळ, चक्रीवादळ, महापूर, साथी, दंगली यात झळ पोहोचलेल्यांना या शाखा मदतीचा हात पुढे करतात स्वामी विवेकानंदांनी घालून दिलेल्या तत्त्वाच्या आधारे समाजसुधारणेचे महान कार्य त्या करतात

या मठाच्या आवारात नवीन मंदिर होण्यापूर्वी स्वामीजी जेथे ध्यानस्थ बसत ते जुने मंदिरही आहे स्वामीजी जेथे राहिले व ४ जुलै १९०२ ला समाधिस्थ झाले ती खोलीही पाहिली व थोडा वेळ शांत बसून, डोळे मिटून भावांजली अर्पण केली स्वामीजींच्या पलंग, खुर्ची, टेबल, खडावा या वस्तु तेथे जतन करून ठेवल्या आहेत जवळच असलेल्या स्वामी ब्रह्मानंद मंदिरात ब्रह्मानंदाची संगमरवरी मूर्ती आहे श्री परमहंसाचे त्यांच्यावर अपार प्रेम होते ते बेलूरमठाचे पहिले अध्यक्ष होते सन १९२२ मध्ये ते मरण पावल्यानंतर दोन वर्षांनी हे मंदिर बांधले परमहंसाच्या धर्मपत्नी शारदादेवी यांच्या दहनभूमीवर १९२० साली एक मंदिर बांधण्यात आले स्वामी विवेकानंदांनी स्वत: आपल्या क्रियाकर्मासाठी निवडलेल्या जागेवरही मंदिर उभारण्यात आले आहे अलौकिक गुरु व अलौकिक शिष्य यांच्या कर्मभूमीची भेट संपवताना मन भारावून गेले होते

बेलूरमठ पाहिल्यावर हुगळी नदीवरील सात कमानींचा विवेकानंद पूल ओलांडून उजव्या तीरावर प्रख्यात दक्षिणेश्वर मंदिर पाहण्यास आलो राणी रासमणी ही बंगालमधील राजचंद्र या कोळी जमीनदाराची पत्नी ती बालपणापासूनच अत्यंत धार्मिक वृत्तीची होती रामायण–महाभारत या धर्मग्रंथांचा पगडा बालपणीच तिच्यावर बसला होता तीन मुली व अडुसष्ट लाखांची इस्टेट मागे



दक्षिणे२


ठेवून राजचंद्र मरण पावले धार्मिक वृत्तीच्या धनाढ्य राणी रासमणीला स्वप्ना-मध्ये अन्नपूर्णा देवीचे दर्शन झाले देवीच्या इच्छेनुसार राणी रासमणीने हुगळी नदीच्या काठी बालीघाटाजवळ हे शिवमंदिर उभारण्यास साठ बिघे जमीन घेतली १८४७ साली मंदिराच्या बांधकामास सुरुवात झाली आठ वर्षांनी ते पूर्ण झाले सहा लाख रुपये खर्च झाला राणी रासमणीने मंदिर उद्घाटनाच्या दिवशी अनेक विद्वान धर्मपंडितांना आमंत्रित केले होते पण मंदिर ब्राह्मणेतर व्यक्तीने बांधले म्हणून पुजारी मिळेना पण ती अडचण रामकृष्ण परमहंसांनी दूर केली रासमणीने या मंदिरात आपल्या आयुष्याचा अखेरचा काळ व्यतीत केला रामकृष्ण तिला उपदेश करीत असत

मंदिराच्या आवारात प्रवेश केल्यावर प्रथम विष्णुमंदिर लागते. शेजारी मुख्य मंदिरात कालीमातेची मूर्ती आहे ही देवी 'दक्षिणेश्वरी भवतरिणी' या नावाने ओळखली जाते काली ही शिवाची पत्नी दुष्टांचा व दुष्कृत्यांचा संहार करणारी कालीमातेला चार हात आहेत एकामध्ये तलवार, दुसऱ्यामध्ये राक्षसाचे मस्तक, तिसऱ्यात शस्त्र असून उजवा हात आशीर्वाद देत आहे तिच्या गळ्या-भोवती बत्तीस माणसाच्या कवट्यांची माळ आहे देवीला भरजरी साडी व तांबड्या फुलांनी सजवले होते एक हजार चांदीच्या पाकळ्या असलेल्या सुंदर कमलपुष्पात महाकालाची–शिवाची संगमरवरी मूर्ती आहे ही मूर्ती आडवी आहे व कालीमातेचा उजवा पाय त्याच्या छातीजवळ आहे यावद्दल पौराणिक कथा अशी आहे–पुराणकाळात शुंब व निशुंब हे राक्षसाचे सेनापती व देवांचे सेनापती यांच्यात युद्ध झाले त्यात देवांचा पराभव झाला तेव्हा देवांच्या विनंतीनुसार कालीमातेने राक्षसावर हल्ला करून त्यांचा पराभव केला शुंब व निशुंब यांचाही शिरच्छेद केला त्या वेळी देवीने इतके रौद्ररूप धारण केले होते की जो कोणी समोर येईल त्याचा ती शिरच्छेद करू लागली परत देवांची सभा भगवान विष्णूच्या उपस्थितीत भरली त्यांनी ठरवले की महाकालाला-शिवालाच आता पाठवायला हवे शिव लोळत लोळत युद्धस्थानी आला. एकेकाळी देवीचा पाय शिवाच्या छातीवर पडला शिवदर्शनामुळे कालीमातेचे रौद्ररूप शांत होऊन ती लज्जित झाली मंदिरातील कालीमातेच्या चेहऱ्यावरील सलज्जता व मधुर हास्य या भावनांचा उलगडा या कथेने होतो

दक्षिणेश्वर मंदिराला नऊ घुमट आहेत मंदिरासमोर गायनमंडप आहे हातात लाल फुले घेतलेल्या बंगाली बंधु-भगिनींची दर्शनासाठी गर्दी होती. आपल्याकडे श्रीगणेशाच्या उत्सवाचे जे महत्त्व ते कलकत्यात दुर्गापूजेचे व उत्स-वाचे नवरात्रात नऊ दिवस या उत्सवात बंगाली बांधव जणू बेहोष होतात कालीमातेच्या मूर्ती करून आरास केली जाते मोठ्या मिरवणुकीने विसर्जन



चहाचे मळे–दार्जिलिंग



दक्षिणेश्वर मंदिर, कलकत्ता



ती. काका, उदय, सौ. मेधा, उल्का, यशवत - दार्जिलिग

डायमड हार्बर, कलकत्ता



केले जाते कालीमातेला बंगाली लोकांच्या जीवनात अविभाज्य स्थान आहे मंदिराच्या उत्तरेला रामकृष्णाच्या निवासाची खोली आहे रामकृष्ण येथे राहिले व शेवटी येथेच त्यांनी देह ठेवला त्यांच्या वास्तव्याने पुनीत झालेल्या खोलीत त्यांच्या वस्तू जतन करून ठेवल्या आहेत कालीमंदिरासमोर हुगळी नदीच्या काठावर सारख्या आकाराची बारा शिवमंदिरे आहेत यज्ञेश्वर, जलेश्वर, जगदीश्वर, नांदेश्वर, नंदीश्वर, नरेश्वर ही सहा मंदिरे संपल्यावर हुगळी नदीत स्नानासाठी उतरण्याचा घाट आहे तेथून सात कमानींचा पूल दिसतो नंतर योगेश्वर, रत्नेश्वर, जटिलेश्वर, नकुलेश्वर, नागेश्वर, निर्झरेश्वर ही सहा मंदिरे आहेत ही बारा शिवमंदिरे बांधण्यामागे कल्पना अशी की योगेश्वर हा खरा शिव व बाकीचे अकरा त्याचे रक्षण करणारे ! दक्षिणेश्वरपाशी पडावात बसल की बाली पुलाखालून हुगळीच्या पैलतीरावर बेलूर मठात जाता येत मंदिराबाहेर एक प्रचंड वृक्ष असून तेथे रामकृष्ण बसून ध्यानधारणा करीत मंदिराच्या बाहेर पिंडी, मूर्ती, प्रसाद, कुंकू यांची अनेक दुकाने आहेत

टॅक्सीने आदिनाथ जैन मंदिराजवळ आलो हे मंदिर रायबहादूर मुकीम यांनी १८६७ मध्ये उभारले सुंदर बगीच्यात जैन तीर्थंकर शीतलनाथजी यांचे हे मंदिर आहे संगमरवरी पायऱ्या चढून आत प्रवेश केला इटालियन मार्बल, रंगीबेरंगी बेल्जियम काचा यांनी सजवलेल्या या सुंदर मंदिरात आनंदस्वामी व गौतमस्वामी यांच्या पांढऱ्याशुभ्र संगमरवरी मूर्ती आहेत. त्यांच्या पायाशी चांदीचे कमळ आहे गळ्यात सोन्याची माळ असून कपाळ हिरेजडित आहे या मंदिरात एक अखंड ज्योती आहे मंदिर स्थापनेपासून ती जळत आहे विशेष म्हणजे त्यावर बिलकूल काजळी धरलेली नाही या मंदिराचे आवार अत्यंत स्वच्छ असून सुंदर पुतळे, कारंजी, वर्तुळाकार वाटिकांनी ते सजले आहे मंदिर पाहून मन प्रसन्न होते

शेजारीच पार्श्वनाथ जैन मंदिर आहे या मंदिराचे प्रवेशद्वार सांची-मध्यप्रदेश- प्रमाणे आहे या पांढऱ्याशुभ्र संगमरवरी मंदिरात पार्श्वनाथ यांची संगमरवरी मूर्ती आहे शेठ दयाचंद या धनाढ्य व्यापाऱ्याने व्हिक्टोरिया मेमोरियल उभारणाऱ्या ब्राऊन या वास्तुशिल्पतंत्रज्ञाला चार हजार रुपये देऊन या मंदिराला नवे स्वरूप दिले पांढरा संगमरवरी दगड राजस्थानातील मकराना येथून तर तांबडा दगड मिर्झापूर येथून आणला राजस्थानी कुशल कारागिरांनी हे मंदिर उभारले मंदिरासमोर सुंदर तलाव आहे.

मार्बल पॅलेस पाहण्यासाठी राजा राजेंद्र मलिकबहादूर यांच्या राजप्रासादाजवळ उतरलो प्रवेशद्वारीच रखवालदाराने प्रवेशपत्र आणले का म्हणून अडवले. या पॅलेसला भेट देण्यासाठी पर्यटन विभागाचे परवानगीपत्र लागते. दुरून आलो

आहोत असे सांगितल्यावर तो कसाबसा तयार झाला राजवाड्याच्या आवारात हिरवळ असून बगीच्यातही अनेक संगमरवरी पुतळे आहेत राजा राजेंद्र हे हुगळीच्या पूर्व किनाऱ्यावरील कलकत्त्याच्या तीन मूळच्या खेड्यापैकी गोविंदपूर येथील मूळचे रहिवासी त्यांना मलीकबहादूर हा किताब मोगलराजाने दिला तर ब्रिटिशांनी 'राजा' किताब दिला त्या श्रीमंत दानशूर घराण्याचा हा खाजगी संग्रह आहे या राजवाड्यात एकूण सात दालने आहेत जगातील सुमारे नव्वद देशामधील रंगीबेरंगी संगमरवराच्या, काचेच्या अनेक मौल्यवान वस्तु येथे आहेत भिंती, फ्लोअरिंग सर्व संगमरवराने सजवलेले आहे व्हिक्टोरिया राणी तसेच कोलंबस यांचे संगमरवरी पुतळे, चायनीज धूपदान, दीडशे वर्षांपूर्वीचा पियानो, जुने सोन्याचे घड्याळ अशा वस्तु लक्ष वेधून घेतात बेल्जियमचे मोठे आरसे आहेत नृत्यगृहात झोके घेणारी व्हीनस ही अखंड लाकडात कोरलेली सुंदर कलाकृती आहे आतील व्हराड्यात परदेशातील रंगीबेरंगी पक्षी पिंजऱ्यात ठेवले आहेत त्यातील अमेरिकन व आफ्रिकन रंगीत पक्षी डौलदार होते एका दालनात उत्कृष्ट पेंटिंग्जचा संग्रह आहे राजा रविवर्मा यांचे दुष्यंत-शकुंतला हे मूळचे पेंटिंग येथे आहे रुबेन या चित्रकाराचे सेंट कॅथेरीनचा विवाह हे पेंटिंग ऐंशी वर्षानंतरही ताजे टवटवीत वाटते या चित्राला १९०५ साली पंधरा हजार पौंड इतक्या किंमतीची मागणी आली होती अर्थात ती नाकारली गेली सर्पाबरोबर खेळणारा लहानगा हर्क्युलस हेही एक उत्कृष्ट चित्र आहे एका दालनात राजा राजेंद्र यांच्या परिवारातील व्यक्तींचे पुतळे आहेत संगमरवरी महालातून बाहेर आलो तेव्हा एका वेगळ्याच विश्वात वावरल्याचा भास झाला अशा प्रकारचे हे भारतातील एकमेव संग्रहालय असावे मलीकबहादूर हे दानशूरही होते. त्यांनी लक्षावधी रुपयांच्या देणग्या देऊन माधवपूर विद्यापीठासारख्या संस्था उभारल्या त्यांच्या दानशूरपणाची प्रचीती राजप्रासादाबाहेर जाताना आली आजही तेथे या घराण्याचे विद्यमान वंशज गोरगरीबांना दररोज जेवण देतात गरीब लोकांची बरीच मोठी रांग तेथे दिसली

रविंद्रनाथ टागोरांच्या घराला भेट देण्यासाठी चितपूर रोडवर जोरासांको विभागात 'ठाकुरवाडी' या त्यांच्या निवासस्थानी आलो रविंद्रनाथांचे वडील महर्षी देवेंद्रनाथ टागोर यांनी १८८४ साली 'महर्षी भवन' नावाची ही वास्तु बांधली रवींद्रनाथांचा जन्म येथेच झाला येथेच त्यांनी अजरामर कविता केल्या त्यांचे निम्मे आयुष्य येथेच व्यतीत झाले १९१० साली त्यांचा 'गीतांजली' हा बंगाली काव्यसंग्रह प्रसिद्ध झाला लंडनचे सुप्रसिद्ध कवी येट्स यांनी गीतांजलीचा इंग्रजी अनुवाद १९१२ साली प्रसिद्ध केला व सर्व विश्वात रवींद्रनाथांचे नाव प्रसिद्ध झाले १९१३ साली त्यांना साहित्याचे नोबेल पारितोषिक मिळाले या

दुमजली इमारतीत पहिल्या मजल्यावर टागोर वस्तु संग्रहालय आहे त्यात त्यांचे कपडे, लिखाणाचे कागद, खुर्ची, मानपत्रे अशा वस्तु आहेत त्यांना मिळालेल्या नोबेल पारितोषिकाची प्रतिकृतीही तेथे आहे मूळ पारितोषिक शांतीनिकेतनमध्ये आहे याच घरात ७ ऑगस्ट १९४१ साली रवींद्रनाथांचे निधन झाले त्या खोलीत त्यांचे छायाचित्र, कलश, दोन कलात्मक पात्रे आहेत कलशात रोज ताजी टवटवीत फुले ठेवण्यात येतात रवींद्रनाथांचे निवासस्थान म्हणजे १९ व्या शतकातील बंगालच्या काव्य, संगीत, नाट्य, कला, तत्वज्ञान या सांस्कृतिक जीवनाचे प्रतीकच होय या निवासस्थानाजवळच सात लक्ष रुपये खर्चून उभार-लेले ' रविंद्र भारती विद्यापीठ ' आहे तेथे संगीत, नृत्य, नाट्य कलाविषयक दालने आहेत एकंदरीत गुरुदेव टागोर यांच्या निवासस्थानाच्या परिसराचे वाता-वरण शांत पवित्र, उदात्त वाटते आधुनिक भारताच्या सर्वश्रेष्ठ कवीवर्यांच्या घराला भेट दिल्याशिवाय कलकत्त्याची भेट पूर्ण होऊ शकत नाही

आता शेवटी प्रसिद्ध नखोदा मशीद पहायची होती चितपूर रोडवरील ही मशीद साठ वर्षांपूर्वी पंधरा लक्ष रुपये खर्चून कच्छी मेमन या श्रीमंत मुसलमान गृहस्थांनी बांधली ही मशीद 'बडा मस्जिद' नावानेही प्रसिद्ध आहे एकाच वेळी दहा हजार लोक नमाज पढू शकतात मशीदीच्या मध्यभागी मोठा घुमट आहे कडेला दीडशे फूट उंचीचे दोन मीनार आहेत तसेच छोट्या घुमटाची रांग आहे आग्र्याच्या 'सिकंदरा' या अकबराच्या मकबऱ्याच्या धर्तीवर ही मशीद बांधली असून ती हिंदी व सिरीयन शिल्पकलेचा नमुना आहे आतमध्ये एक विशाल हौद असून सर्वत्र चकचकीत संगमरवरी फरसबंदी आहे वर जायला दोन्ही बाजूंनी जिने असून मशिदीचे स्तंभ, कमानी आकर्षक आहेत प्रवेशद्वाराची कमानही विशेष सुंदर आहे या मशिदीभोवती मुसलमानांची दाट वस्ती आहे

सध्याकाळी हॉटेलवर परतलो तरी हवेतला उष्मा कमी झाला नव्हता. व्हीडीओवर 'स्वामीदादा' चित्रपट पहात पहात जेवण आटोपले तोच मुसळधार पावसाला सुरुवात झाली रात्रभर तुफान पाऊस कोसळत होता

कलकत्त्यामधील तिसऱ्या दिवशी सकाळी लवकरच आवरून टॅक्सीने प्रथम चौरंगीला आलो रात्रीच्या पावसामुळे थोडा उष्मा कमी झाला होता चौरंगी-मधील इंडियन म्युझियम पाहण्यासाठी तिकीटे काढून प्रवेश मिळवला इंडियन म्युझियमची भव्य इमारत शंभर वर्षांपूर्वीची असून सर्व बाजूंनी व्हरांडा असलेल्या या इमारतीच्या मध्ये चौकोनी प्रांगण आहे प्रथम पुरातन विभागाच्या दालनात मोहेंजोदारो व सिंधू खोऱ्यातील संस्कृतीचे अवशेष दर्शवणारी मातीची भांडी, मूर्ती, तांब्याची हत्यारे आहेत इजिप्तमधील चारहजार वर्षांपूर्वीची ममी-मृत शरीर एका पेटीत आहे मध्ययुगीन मूर्तीत मध्यप्रदेशातील खजुराहो व कर्नाटक-

मधील हळेबीड येथील नृत्यागनाच्या आकर्षक मूर्ती आहेत मुस्लिम कक्षात कुराणाची जुनी हस्तलिखिते, जुने फरमान, लाहोरला मिळालेली उमरखय्यामच्या रूबाईची पत्रे आहेत कलाविभागात तिबेटी पद्धतीची चित्रे आहेत तसेच नागा-प्रदेश, निकोबार बेटे यथील जातीजमातीनी केलेल्या वस्तू, त्याच्या वापरातील अवजारे, हत्यारे, कपडे त्यांच्या सस्कृतीचा परिचय करून देतात भूवैज्ञानिक विभागात विविध खनिजांचा सग्रह आहे प्राणीविभागात निरनिराळे वन्य पशुपक्षी पेंढा भरून ठेवले आहेत

इडियन म्युझियमनतर बिर्ला प्लॅनिटोरियम पाहण्यासाठी आलो भारतात ग्रहतारे, नक्षत्रमडळ स्थापन करण्याचा पहिला मान कलकत्त्याला मिळाला बावीस लक्ष रुपये खर्चून हे प्लॅनिटोरियम पूर्व जर्मनीच्या सहाय्याने उभारण्यात आले या एकमजली इमारतीचा घुमट ८२ फूट व्यासाचा असून आतमधील वातानुकूलीत सभागृहात एकाचवेळी पाचशे प्रेक्षक बसू शकतात तिकीट काढून आत प्रवेश केला सभागृहात अधार करण्यात आला मग आकाशातील विविध तारे, नक्षत्रे यांची सोप्या, शास्त्रीय भाषेतील ध्वनिमुद्रित माहिती प्रोजेक्टरच्या सहाय्याने घुमटाच्या छतावर साकार केली गेली असख्य तारे जेव्हा डोळचासमोर चमकू लागले, तेव्हा विशाल आकाशाचे आपण अगदी जवळून अवलोकन करीत आहोत असा भास झाला हिंदी व इग्रजी दोन्ही भाषातून माहिती सागितली जाते. आकाशाचे मनोज्ञ दर्शन घडवणाऱ्या या एक तासाच्या कार्यक्रमाने उल्का–उदय खूष झाले

आता निघालो कलकत्त्याच्या प्रख्यात व्हिक्टोरिया मेमोरियलकडे ! आकाशात काळेमेघ दाटून आले होते कमालीच्या उकाडचाने घामाच्या धारा वहात होत्या. एवढचात पावसाला सुरुवात झाली व्हिक्टोरिया मेमोरियलच्या विशाल आवारात प्रवेश करून प्रवेशद्वारी पोहोचेपर्यंत पावसाने चागलेच रौद्ररूप धारण केले हे भव्य स्मारक १९०१ साली ब्रिटनची महाराणी व्हिक्टोरिया मरण पावल्यावर त्यावेळचे व्हाईसरॉय लॉर्ड कर्झन यानी उभारले लॉर्ड कर्झनला कलकत्त्याबद्दल विलक्षण प्रेम होते त्यांनी म्हटले होते की 'लंडनच्या खालोखाल कलकत्ता हे ब्रिटीश साम्राज्यातील सर्वात महत्वाचे शहर आहे' या स्मारकाचा शिलान्यास १९०६ साली पचमजॉर्जने केला व १९२१ साली या स्मारकाचे बाधकाम पूर्ण झाले इग्रजी H या अक्षराच्या आकाराचे हे स्मारक ३३८ फूट लांब व २२८ फूट रुद असून जमिनीपासून उची १८४ फूट आहे घुमटावर सोळा फूट उचीचा, तीस टन वजनाचा विजयदेवतेचा पुतळा आहे घुमटाच्या चार बाजूला कला, स्थापत्य, न्याय, औदार्य याचे प्रतीक असलेल्या मूर्ती आहेत या मूर्ती इटलीमध्ये बनवल्या आहेत एकसष्ट एकर क्षेत्रातील हे स्मारक ग्रीक व

इटालियन धर्तीचे आहे राजस्थानातील पांढऱ्या संगमरवरी पत्थराचा त्यात वापर करण्यात आला पाश्चात्य व पौर्वात्य वास्तुशिल्पांचा संगम असलेल्या व एक कोटी रुपये खर्चून बांधलेल्या व्हिक्टोरिया मेमोरियलमध्ये पचवीसच्यावर दालने आहेत साडेतीन हजाराच्यावर दर्शनीय वस्तूचा सग्रह आहे

उत्तरेकडील प्रवेशद्वारातून प्रवेश केल्यावर लॉर्ड कर्झन याचा ब्राँझचा पुतळा दिसला पहिल्या दालनात ब्रिटन राजघराण्यातील पचम जॉर्ज, राणी मेरी, सातवे जॉर्ज, राणी एलिझाबेथ, लॉर्ड माऊटबॅटन याचे पुतळे दिसतात रॉयल गॅलरीत व्हिक्टोरिया राणीच्या जीवनातील निवडक प्रसग कलापूर्ण शैलीने चित्रीत केले आहेत राणी बालपणी अभ्यासासाठी वापरत असलेली टेबल खुर्ची तेथे आहे राणी ज्यावर प्रथम शिकली तो रोझवुडचा पियानोही आहे या गॅलरीतील रशियन चित्रकाराचे २३ ' × १६ ' असे विशाल तैलचित्र भारतात सर्वात मोठे समजले जाते या चित्रात प्रिन्स ऑफ वेल्स, जयपूर महाराजाबरोबर जयपूर नगरात हत्तीवर बसून प्रवेश करीत आहेत असा देखावा रगवला आहे व्हिक्टोरिया राणीने १४ डिसेंबर १९०० ला पाठवलेले शेवटचे पत्रही येथे जतन करून ठेवले आहे राणीकक्षात घुमटाखाली व्हिक्टोरिया राणीचा सिंहासनावर अधिष्ठित पुतळा आहे भिंतींवर राणीने भारतीयाना दिलेला सदेश विविध भाषामध्ये कोरला आहे पोर्ट्रेट गॅलरीत सती जाणाऱ्या हिंदू स्त्रीचे चित्र आहे रवींद्रनाथ टागोर याचे आजोबा द्वारकानाथ टागोर याची चित्रे तेथे आहेत टिपू सुलतानाची पर्शियन भाषेतील डायरी, अकबरकालीन अबुलफजलने लिहिलेली ऐने अकबरी, गुरुमुख भाषेतील सचित्र भगवद्गीता, दारा सिकोहने केलेला उपनिषदांचा अनुवाद ही जुनी हस्तलिखिते पहायला मिळतात मोगल व राजपूत शैलीची सुदर चित्रे आहेत वॉरन हेस्टिंग्जचे रिव्हॉल्व्हर व टिपूची तलवारही दिसली एका दालनात १७५७ साली झालेल्या प्लासीच्या लढाईचे तसेच टिपू सुलतानच्या श्रीरगपट्टणचे मॉडेलही आहे हेस्टिंग्ज हॉलमध्ये टिपूच्या मुलाना बळजबरीने पकडल्याचे व टिपूच्या मृत्यूचे अशी दोन चित्रे आहेत टिपूची मुले लॉर्ड कॉर्नवॉलीसला ओलीस म्हणून स्वाधीन करतानाचे चित्र पाहून करुणा वाटते

राष्ट्रीय नेत्याच्या चित्रांच्या गॅलरीत भारतीय महापुरुषांच्या तैलचित्राचा संग्रह आहे राजा राममोहन रॉय, दादाभाई नौरोजी, लो टिळक, रवींद्रनाथ टागोर, म गांधी, स्वामी विवेकानंद, सुभाषचद्र बोस, प नेहरू या नेत्याच्या तैलचित्राचा समावेश त्यात आहे महाकवी कालिदासाच्या संस्कृत शाकुंतलाचा इग्रजी अनुवादही येथे दिसतो १८५७ चा स्वातत्र्यवीर तात्या टोपे याच अगरखाही आहे दस्तऐवज दालनात जुन्या महत्त्वाच्या सनदी, संधीपत्रे आहेत.

टिपूच्या विरुद्धचे इंग्रज, मराठे, निजाम यांचे १७९० मधील संधीपत्र महत्त्वपूर्ण आहे १८५७ च्या स्वातंत्र्य युद्धासंबंधाची महत्त्वाची कागदपत्रेही आहेत

ताजमहालसारख्या भव्य वाटणाऱ्या या व्हिक्टोरिया मेमोरियलच्या आवारात सुंदर हिरवळ आहे ब्रिटीश राजवटीचा हिंदुस्थानवर ठसा उमटवणाऱ्या अनेक इंग्रजांच्या कार्याचा परिचय करून देणारे हे मेमोरियल आहे फिरून पाय थकले होते सर्वांनाच भूक लागली होती पाऊस बराच थांबला होता हवेत बराचसा गारवा आला होता पावसाची रिमझिम मात्र चालू होती आधी जेवण आटोपले तेव्हा हुरुप आला

चौरंगी रोडने नंतर जवाहरलाल नेहरू शिशुभवन पाहण्यास आलो पहिल्या मजल्यावर देशविदेशच्या सुंदर बाहुल्या आकर्षकरीत्या एका दालनात ठेवल्या आहेत स्पेन, जपान येथील बाहुल्या खूपच आवडल्या अनेक बालके बाहुल्यांच्या विश्वात रमून गेलेली दिसली दुसऱ्या मजल्यावरील दालनात मुलांची विविध खेळणी आकर्षकरीत्या ठेवली आहेत एका दालनात महाभारतातील निवडक प्रसंग छोट्या छोट्या बाहुल्यांच्या द्वारे साकार केले आहेत आपल्याकडे गणेश उत्सवाच्या वेळी देखाव्याची आरास केली जाते त्याच धर्तीवर महाभारतातील महत्त्वाचे प्रसंग दिसतात कर्ण कुंतीच्या भेटीचा प्रसंग मनाला चटका लावतो उल्का–उदयला तेथून निघावेसे वाटेना

बिर्ला इंडस्ट्रीयल अँड टेक्नॉलॉजिकल म्युझियममध्ये रोजच्या वापरातील विविध उपकरणांची कार्यपद्धती प्रत्यक्ष पाहता येते उदा टेलिफोनची यंत्रणा कशी कार्य करते याचे प्रत्यक्ष दिग्दर्शन होते वीजेवर चालणारी विविध उपकरणे तेथील बटणे दाबल्यावर त्यांची कार्यपद्धती दाखवीत होती उल्का–उदय बटणे दाबून ती ती कार्यपद्धती पाहण्यात गुंग झाले दूरदर्शनची कार्यपद्धती दर्शविणारे दालन आकर्षक होते दूरदर्शन कॅमेऱ्यासमोर गाणी म्हणणारी मुलगी लगेच दूरदर्शनवर दिसत होती रोजच्या व्यवहारातील विविध यंत्रे, उपकरणे यांची कार्यपद्धती या म्युझियमद्वारे पहायला मिळाली सर्वसामान्य माणसाच्या ज्ञानात निश्चितच भर पडते

दक्षिण कलकत्त्यातील प्रसिद्ध कालीमातेचे दर्शन घेण्यासाठी टॅक्सीने कालीघाटला आलो कालीदेवीचे मूळ मंदिर सध्याच्या मंदिरापासून मैलभर अंतरावर आदिगंगेच्या काठी होते त्या वेळी गंगेचे पात्र विशाल होते सध्याचे मंदिर संतोषराय चौधरी या जमिनदाराने १८०९ साली बांधले आम्ही तेथे पोहोचलो तेव्हा मंदिर उघडण्यास अवकाश होता बरोबर चार वाजता ते उघडणार होते आवारातील साचलेले पावसाचे पाणी बाहेर काढण्याचे काम चालू होते अनेक भक्तगण मंदिर उघडण्याची वाट पाहत बसले होते एव्हढयात दोन पुजारी

मुलानी दरवाजाला हात लावण्याचा मला आग्रह केला वाटले की एखाद्या सुवासिनीच्या हाताने दरवाजा उघडत असावेत. म्हणून भक्तीभावाने दरवाजाला हात लावून नमस्कार केला तोच त्या मुलानी अकरा रुपयांची मागणी केली बंद दरवाजाला हात लावण्याचे अकरा रुपयेच आम्ही घेतो असे ते म्हणू लागले पण पैसे देण्यास साफ नकार देताच ते अद्वातद्वा बोलू लागले इतक्यात दुसरे एक जोडपे तेथे आले तेव्हा त्यानाही 'बहेनजी दरवाजेपे हाथ लगाओ' म्हणून आग्रह करू लागले त्या स्त्रीने हात लावताच पुन अकरा रुपयाची मागणी ! ते जोडपेही भाडू लागले तेथील एकजण म्हणाला की पैसे लुबाडण्याची याची अशीच पद्धत आहे तुम्ही भाडता तरी पण गरीब भोळ्याभाबड्या स्त्रियाकडून तर ते बळजबरीने पैसे उकळतात नाहीतर दमदाटी, अडवणूक करतात मंदिरात भक्ताची गर्दी वाढू लागली व चारही वाजले तेव्हा मंदिराचा दरवाजा उघडावाच लागला

या मंदिराचे छत वैशिष्टचपूर्ण आहे मंदिराभोवती प्रदक्षिणामार्ग आहे कालीदेवीची काळचा रंगाची चतुर्भुज मूर्ती आहे देवीचे मुख उघडे असून जीभ बाहेर आली आहे देवीच्या गळ्याभोवती माणसांच्या कवटचाची माळ आहे. पायाजवळ शिवमूर्ती आहे. सतीच्या उजव्या पायाचा अंगठा येथे गळून पडला होता म्हणून येथे हे देवीचे स्थान आहे मंदिराच्या दक्षिणेला बळी देण्याची जागा आहे तेथे रोज बकऱ्याचा बळी दिला जातो ईस्ट इंडिया कंपनीच्या काळातही काही इंग्रज भक्तीभावनेने या मंदिराला देणगी देत दुर्गापूजेच्या उत्सवात देवीला फुलानी, उंची वस्त्रानी, दागदागिन्यानी खूप सजवले जाते मंदिरातील पुजारी मात्र पंढरपूरच्या बडव्याप्रमाणे पैसे गोळा करीत होते

कालीमातेचे दर्शन घेऊन अलीपूर भागातील प्राणिसंग्रहालयात आलो. कलकत्त्याचे हे प्राणिसंग्रहालय पंचेचाळीस एकरात असून आशिया खंडात मोठे आहे येथील आकर्षण आहे बंगालमध्ये व रेवाप्रांतात आढळणारे जातिवंत वैशिष्टचपूर्ण पांढरे वाघ ! हे वाघ दुर्मिळ होत चालले आहेत त्याना पाहण्यासाठी वेगळी फी द्यावी लागते वाघ व सिंहीण याच्या संयोगाने जन्माला आलेले लायगर व टिगॉन पाहून चकीत झालो अजस्त्र गेंडे, पाणहत्ती, हरणे, विविध पक्षी पहायला मिळाले स्वतंत्र असलेल्या सर्पालयात निरनिराळे अजगर, नाग, साप आहेत कासव, मगरी, सुसरीही आहेत अनेक प्रकारची माकडे पाहतानाही मजा वाटली त्यातले एक वृद्ध माकड पिंजऱ्याच्या दारात डोक्याला हात लावून बसले होते आणि तोंडातल्या तोंडात काहीतरी पुटपुटत होते उदय म्हणाला की कदाचित आज त्याच्या पिंजऱ्यात खायला काही टाकले नसावे व म्हणून ते रागाने पुटपुटत असावे " बाकीची माकडे मात्र उड्या मारीत होती कदाचित काय ही

तरुण पोरे म्हणूनही ते पुटपुटत असेल गर्द हिरवळ, निसर्गरम्य तळी, दाट वृक्ष, सुंदर फुले यानी आकर्षक वाटणाऱ्या या प्राणिसंग्रहालयात फिरताना पाऊस पडल्याने अधिकच प्रसन्न वाटत होते

प्राणीसंग्रहालयानजीकच नॅशनल लायब्ररी आहे ही इमारत म्हणजे पूर्वीचे वॉरन हेस्टिंग्जचे निवासस्थान 'बेल्वेडर हाऊस' या नावाने ते प्रसिद्ध होते. वॉरन हेस्टिंग्ज हे अत्यंत दूरदृष्टीचे गव्हर्नर होते त्यांनी उर्दू, हिंदी, बंगाली, पर्शियन भाषा आत्मसात केल्या होत्या ब्रिटीश अधिकाऱ्यानी भारतीय भाषा शिकल्या पाहिजेत असा त्याचा आग्रह होता १८५४ ते १९१२ पर्यंत येथे बंगालचे गव्हर्नर रहात कलकत्त्याच्या मूळच्या पब्लिक लायब्ररीची सुरुवात १८३५ मध्ये झाली नंतर लॉर्ड कर्झनने पब्लिक लायब्ररी व इम्पेरियल लायब्ररी यांचे एकत्रीकरण केले स्वातंत्र्यानंतर या लायब्ररीचे नॅशनल लायब्ररीत रूपांतर करण्यात आले भारतातील ही सर्वात मोठी लायब्ररी आहे दररोज किमान दोनशे पुस्तके येथे येतात तर वृत्तपत्रे व मासिके आठहजार! यातील पुस्तकांच्या रॅक्सची लांबी पधरा मैल भरेल लायब्ररीत ८२ लाख ग्रंथ आहेत अनेक दुर्मिळ ग्रंथ व हस्तलिखिते येथे आहेत कायद्याप्रमाणे प्रत्येक भाषेतील प्रसिद्ध झालेले नवीन पुस्तक येथे पाठवावे लागते प्रवेशद्वाराजवळच प्रत्येक भाषेतील लेखकांच्या नावाच्या कार्डांचे ड्रॉवर्स आहेत तसेच प्रत्येक भाषेतील पुस्तकाच्या नावाच्या आद्य अक्षरावरून बनविलेल्या कार्डांचे ड्रॉवर्सही आहेत नॅशनल लायब्ररीचा रीडींग हॉल लांबच्या लांब भव्य आहे एकेकाळचे ब्रिटीश राजसत्तेचे हे निवासस्थान ग्रंथांचे निवासस्थान बनले आहे लहान मुलांसाठी खास बालवाचनालय आहे

शेवटी हुगळी नदीच्या पश्चिम तीरावर सिब्रपूर येथील बोटॅनिकल गार्डनमध्ये आलो प्रथम तेथील विशाल वटवृक्षाजवळ आलो या वटवृक्षाचे वय आहे २१४ वर्षांचे! त्याचा घेर १३६७ फूट इतका प्रचंड आहे हजारावर पारंब्या त्याला आहेत त्याची उंची शंभर फूट आहे हे झाड जणू एखाद्या स्वतंत्र लहान जंगलासारखेच वाटते. आशिया खंडातील हा मोठा वटवृक्ष समजला जातो या बगीच्याचे एकूण क्षेत्र दोनशेसत्तर एकर आहे त्याची सुरुवात ईस्ट इंडिया कंपनीने केली भारतात आढळणारे विविध हजारो वृक्ष, वेली या बगीच्यात आहेत शास्त्रीय संशोधनाच्या दृष्टीने या बगीच्याची निर्मिती करण्यात आली बगीच्यातील पाम हाऊसमध्ये अनेक जातीचे उंचच्या उंच पाम वृक्ष आहेत यातील काही दोनशे फुटाच्यावर उंच आहेत येथील वातावरण कसे शांत होते

बोटॅनिकल गार्डन पाहून मुक्कामी परतलो व्हिडीओवर 'जुगनू' चित्रपट होता पण दमल्यामुळे जेवण आटोपून लवकर झोपी गेलो

कलकत्त्यातील शेवटचा दिवस उजाडला प्रवास संपत आला यामुळे एक प्रकारची हुरहुरही मनाला वाटत होती. आमचा प्रवास गंगेला मिळणाऱ्या अलकनदेच्या दर्शनाने बद्रीनाथला सुरू झाला होता आता प्रवासाच्या शेवटच्या दिवशी बंगालच्या उपसागराला मिळणाऱ्या गंगेच्या–हुगळीच्या दर्शनाने तो संपवायचा होता सकाळी दहाच्या सुमारास हौरा स्टेशनसमोरून टॅक्सीने हावडा ब्रिजवरून चौरंगीला पोहोचलो कलकत्त्याहून दूर ५१ कि मी अंतरावरील डायमंड हार्बर येथे जायचे होते

डायमंड हार्बरला जाण्यासाठी साध्या व एक्स्प्रेस अशा दोन प्रकारच्या बसेस होत्या एक्स्प्रेस बसने निघालो कलकत्त्याच्या दक्षिण भागातून बाहेर पडायला एक तास लागला त्यानंतर दुपारी बाराच्या सुमाराला डायमंड हार्बरला पोहोचलो हुगळी नदीच्या कडेकडेने छानसा रस्ता आहे पर्यटन विभागाचे मोठे हॉटेल तेथे आहे गेल्यावर प्रथम शहाळी विकत घेतली नदीकडेच्या कट्ट्यावर बसून त्यातील थंडगार पाणी पिताना, खोबरे खाताना मजा वाटली. दोन सायकल रिक्षा ठरवून डायमंड हार्बरला चक्कर मारली हुगळी नदीने उजवीकडे वळण घेउन समुद्रात झेप घेतलेली दिसली दूर पर्यंत बंगालचा उपसागर अथांग पसरला होता नजरेत मावत नव्हता ! हिमालयात उगम पावलेली गंगा अनेक मुखानी बंगालच्या उपसागराला मिळते दूरवर जहाजे दिसत होती जुना किल्ला, कपिल कुटीर आश्रम पाहिला डायमंड हार्बरहून काकद्विप ४२ कि मी अंतरावर आहे मोटारबोट लाँचने शेवटी गंगासागरला पोहोचता येते

डायमंड हार्बरहून बसने चारच्या सुमारास चौरंगीला परतलो जवळच्या धर्मताला भागाच्या बाजूच्या न्यू मार्केटमध्ये चक्कर मारली तऱ्हेतऱ्हेचे कापड, कातडी बॅगा, तिबेटी ताईत, कलकत्ता हॅंडलूमच्या साड्या, कातडी बूट अशा अनेक प्रकारच्या वस्तूंची फॅशनेबल बाजारपेठ आहे कलकत्ता हॅंडलूमच्या दोन साड्याची खरेदी केली रसगुल्ले, राजभोग, चमचम अशी मिठाईही खरेदी केली टॅक्सीने हॉटेलकडे निघालो

कलकत्ता महानगरीचा निरोप घेताना ही विरोधाभासानी भरलेली महानगरी आहे असेच चित्र डोळ्यासमोर येते एका बाजूला कलकत्त्याचे बकाल चित्र दिसते तर कलकत्त्याचा इंग्रजानी विकास केलेला भाग पॉश, चकचकीत वाटतो प्लासीच्या लढाईनंतर कलकत्त्याला धनाढ्य जमीनदारानी उंच हवेल्या बांधल्या कलकत्ता भारतातील आयातनिर्यातीचे महत्त्वाचे केन्द्र असल्याने व्यापार, संपत्ती असलेली ही कुबेर नगरीही आहे एका बाजूचे कलकत्त्याचे चित्र प्रशस्त बंगले, रुंद रस्ते, सुंदर इमारती असे आहे तर दुसऱ्या बाजूला मुंग्यांसारखी धावणारी माणसे, बकाल, गलिच्छ वस्ती असेही आहे या अतिप्रचंड नगरीची, मेट्रोपोलीयन

शहराची आजूबाजूची उपनगरे धरून लोकसंख्या एक कोटीवर पोहोचली आहे. त्यापैकी एक तृतीयांश झोपडपट्टीत राहतात एका चौरस मैलात एक लाखावर लोक राहतात इतकी दाट वस्ती आहे. पूर्वीच्या काळी पालखीतून माणसाची वाहतूक व्हायची आणि आता तीन हजार बसेस, पाचशे मिनी बसेस, सात हजार टॅक्सी, दोन लक्ष मोटारी, चाळीस हजार मोटारसायकली, तीनशेवर ट्राम धावत असतात टणटण आवाज करीत सापासारखी वेडीवाकडी वळणे घेत धावणाऱ्या ट्राम जुन्या कलकत्त्याच्या खुणा जपताना दिसतात हातगाड्यावर सामानाचे ओझे ओढणारे गरीब मजूर तर असंख्य दिसतातच पण वीतभर पोटाची खळगी भरण्यास घोड्यासारखे स्वत:ला जुंपून माणसांसकट हातरिक्षा ओढणारेही दिसतात तापलेल्या रस्त्यांवर अनवाणी पायानी या रिक्षा ओढणारे, घामाने थबथबलेले मजूर पाहून विलक्षण बेचैन वाटते.

कलकत्त्याच्या रस्त्यांच्या नावातही विविधता आहे जॉब चार्नाक रोड, क्लाईव्ह रोड, राणी व्हिक्टोरिया, वॉटर्लू, प्रिटेरीया रोड या जुन्या इंग्रज साम्राज्याशी निगडीत नावाची जागा म. गांधी, जवाहरलाल नेहरू, गोखले यांच्या नावानी घेतली आहे एका लेखकाने म्हटल्याप्रमाणे भारतात थोर माणूस मरण पावल्यावर अक्षरश: रस्त्यावर येतो म्हणजे त्याचे नाव रस्त्याला दिले जाते हे येथेही पटते साम्यवादी विचाराच्या या नगरीत मार्क्स, लेनिन, ही-चि-मिन्ह रोड अशी नावेही दिसतात रामायणकार वाल्मिकी, साहित्यिक टागोर, शेक्सपिअर, शरच्चंद्र, गालीब यांच्या नावाचेही रस्ते आहेत संगीत, कला, नाट्य क्षेत्रात अग्रेसर अशी ही कलकत्ता नगरी आहे सत्यजित रे यांच्या चित्रपटानी भारताचे नाव परदेशातही गाजवले आहे कलकत्त्यातील गर्दीचा ताण कमी करण्यासाठी भुयारी रेल्वेचे काम चालू असलेले दिसते अर्थात १९७३ साली सुरू झालेल्या या कामात फारशी प्रगती नसली तरी भुयारी रेल्वेचा मान भारतात प्रथम कलकत्त्यालाच मिळेल. हौरा पुलावरील ताण कमी करण्यासाठी हुगळी नदीवर नवा प्रचंड पूल बांधण्याचे काम चालू आहे शिवाय फ्लाय ओव्हरची कामेही चालू आहेत हौरा ब्रिजवरून टॅक्सी जात होती तेव्हा हुगळी नदीत दूरवर गलबते दिसत होती सायंकाळच्या धूसरवेळी नदीचा विशाल प्रवाह गूढ वाटत होता पुलावर असंख्य वाहनांची ये जा चालू होती

हॉटेलवर पोहोचलो तेव्हा सहा वाजून गेले होते प्रथम बॅगा आवरल्या जेवण आटोपले हॉटेलचे बिल देऊन दोन हमालाकरवी सामान हौरा स्टेशनवर आणले

## टू अप हौरा बॉम्बे मेल

हौरा स्टेशन ! वेळ सायकाळी सातची ! प्लॅटफॉर्म गर्दीने खचाखच भरलेला माणसाच्या गर्दीत सुटकेस, बॅगा सामानाचीही भर होतीच हवेतील उष्म्याने हैराण होऊन हातातील पख्याचा वारा घेतला तरी गरम झळा येत होत्या रिझर्वेशनचा चार्ट लागल्यावर पुन झुबड उडाली उदय, यशवत कसेबसे गर्दीत घुसून बर्थ व नबर पाहून आले. रात्री आठला टू अप ,मेल प्लॅटफॉर्मवर लागली डब्यात शिरण्यासाठी प्रचड रेटारेटी झाली वास्तविक रिझर्वेशन डब्यात शिस्तबद्ध जायला काहीच हरकत नाही पण थाबायला कुणालाच वेळ नव्हता आणि जो थाबेल तो थांबलाच म्हणून समजा. धक्के देत व घेत कसेतरी डब्यात शिरलो. क्षणभर युद्धभूमीवर असल्याचा भास झाला एखाद्या योद्धयाच्या आवेशातच प्रत्येकजण डब्यात शिरत होता आत जाऊन पाहतो तर आमच्या बर्थवर प्रचड सामानाची चवड लावून मुबईचे गुजराथी प्रवासी सहकुटुब बसलेले ! त्यांना आम्ही सागितले की रिझर्वेशन चार्ट प्रमाणे आमच्या जागा द्या त्यावर आवाज चढवून सर्व कुटुबच आमच्या अगावर धावून 'या आमच्याच जागा आहेत, तुमचेच नबर्स चुकले आहेत' अशी हुज्जत आमच्याशी घालू लागले वर, पुन बाहेर जाऊन चार्ट पहावा तर डबा गच्च भरलेला. कुठे हलायला जागा नाही. टी सी. येण्याची वाट पहात बसण्याशिवाय गत्यंतर नव्हते हल्ली म्हणे बनावट टी. सी.

पण निघाले आहेत एक या बाबतचा घडलेला प्रसग आठवत होता मध्यतरी हौरा स्टेशनवर टी सी च्या वेशातील एका बनावट टी सी ने पॅसेंजरकडून तपासणीसाठी तिकीटे गोळा केली व गाडी सुटण्याच्या आत पोबारा केला स्टेशनवरून बुकीग क्लार्ककडून गोळा केलेल्या तिकीटाचा रिफड घेतला बिचाऱ्या प्रवाशांना खरा टी सी आल्यावर नव्याने तिकीटे काढावी लागली व भुर्दंड पडला गाडी सुरू व्हायच्या वेळात असताना एक टी सी आला हा खरा की खोटा ? धास्ती होती म्हणून तिकीट व रिझर्वेशन दाखवून परत घेतली त्या मुबईच्या कुटुबाला दटावून आमचा बर्थ त्याने द्यायला लावले सामान लावेपर्यत गाडी निघाली गाडीने उशीरा म्हणजे रात्री नऊला हौरा सोडले

गाडीचा वेग झपाट्याने वाढू लागला परतीच्या प्रवासातील रात्री दीर्घ प्रवासातील आठवणी चलत्‌चित्रपटाप्रमाणे डोळ्यासमोर येऊ लागल्या प्रवासातील प्रथम रात्र झेलम एक्स्प्रेसमधील काळजीने भरलेली तर आजची रात्र होती विविध सुखद स्मृतींनी भारलेली ! प्रवासाच्या सुरुवातीला हिमालयातील अवखळ अलकनदेचे दर्शन झाले होते आणि प्रवासाच्या शेवटी अलकनदा, भागीरथी मिळालेल्या, बगालच्या विशाल सागरात विलीन झालेल्या हुगळीचे दर्शन झाले होते अलकनदेने हुगळीपर्यंत गगेच्या विशाल प्रवाहाला मिळणाऱ्या नेपाळमधील गडकी, बागमती, त्रिशूळी या नद्याच्या खोऱ्यात फिरण्याचा योग आला होता नद्याची खोरी जशी पाहिली तशी अन्नपूर्णा, नदकोट, धौलागिरी, काचनगगा अशी हिमालयाची उत्तुग शिखरेही पाहिली नैनिताल, भीमताल, फेवाताल, मिरीकताल या सरोवरात नौकाविहाराचा आनद लुटला पोखराव्हॅली तर अविस्मरणीयच ! जिम कॉर्बेट पार्कची सफर एक रोमाचकारी अनुभव होता. हिमालयातील ऋषीमुनींचं दर्शन झाल होत काश्मीरपासून कन्याकुमारीपर्यंत विविध ठिकाणचे सूर्यास्त पाहिले होते पण हिमालयातील कौसानीचा, नेपाळमधील पोखरा व्हॅलीतील व दार्जिलिंगच्या टायगीर हिलचा सूर्योदय अलौकिकच ! अन्नपूर्णाच्या माछापूछरेचं, दार्जिलिंगच्या कांचनगंगेचं अपूर्व दर्शन झालं होत तांदूळ व गव्हाची हिरवी व सोनेरी शेते पाहिली तसेच चहाचे मळे पाहिले, कॅक्टस गार्डन पाहिले कधी भाजून टाकणारे ऊन तर कधी गाराचा पाऊस अशा बदलत्या हवामानाचा अनुभव घेतला

सुमित्रानदन पत, प्रेमचद, रवींद्रनाथ टागोर याची कर्मभूमी पाहताना मन भारावून गेले होते म गाधींच्या वास्तव्याने पुनीत झालेल्या कौसानीची गांधी आश्रमातील भक्तीरसाने ओथबलेली सायकाळ वारवार डोळ्यासमोर येत होती हैडाखान बाबा मंदिरातील त्या गौरवर्णीय पुजाऱ्याचे आर्त स्वर मनाला हुरहूर लावत होते भगवान गौतमबुद्धाचा जन्म जेथे झाला त्या लुम्बिनी बगीच्याच्या

दर्शनाने मनाला सात्त्विक आनंद प्राप्त झाला होता पण त्याचबरोबर नेपाळमधील मंदिरात बळी दिल्या जाणाऱ्या असंख्य जनावराचे करुण स्वरही आठवत होते नाथपंथीय गोरखनाथाच्या मंदिराचे दर्शन जसे झाले तसेच रामकृष्ण परमहंस व स्वामी विवेकानंद या थोर धर्म पंडिताना दक्षिणेश्वर व बेलूर मठात श्रद्धांजली वाहताना धन्य वाटले भारताच्या महान हिंदू सांस्कृतिक वारशाची प्रचीती तर ठिकठिकाणी आली होतीच पण भारतावाहेर नेपाळ प्रदेशातील हिंदू संस्कृतीची प्रचीतीही आली बद्रीनाथधाम व पशुपतिनाथ दर्शनाने पुण्य पदरी पडले शंकर-पार्वती, भैरव, रामायण-महाभारतातील राम-लक्ष्मण, हनुमान, पंचपांडव, श्रीकृष्ण हेही प्रवासात ठिकठिकाणी भेटले होते विशेषतः भगवान शंकराचे अस्तित्व सर्वत्र जाणवले विविध जातिपंथाचे भारतीय भेदभाव विसरून त्याच्या समोर नतमस्तक होताना पाहून त्याना एकत्र आणण्याचे महान सांस्कृतिक कार्य ते करतात याची साक्ष पटली सर्वसामान्य भारतीय धार्मिक वृत्तीचे असल्याने श्रद्धेने का होईना हिमालयाच्या शिखरांचे, नेपाळमधील पशुपतिनाथचे दर्शन घेण्यास जाताना दिसतात धर्मभावनेमुळे विविध स्थाने पहायला मिळून त्याच्याकडून प्रवास होत असतो प्रवासात मंदिरे पाहिली तशाच मशिदी व गुरुद्वारेही पाहिली पहाडात राहणाऱ्या साध्याभोळ्या पण सचोटीने वागणाऱ्या भारतीयांच्या व नेपाळी लोकांच्या वृत्तीचा परिचय झाला दीर्घ प्रवासातील विविध सुखद स्मृती आठवताना झोप केव्हा लागली कळले नाही

सकाळी रायपूर स्टेशन आले गाडी आता मध्यप्रदेशातून धावत होती रायपूरला चहा घेतला नंतर भिलाई स्टेशन आले--रशियाच्या सहाय्याने बांधलेला स्टील्प्लँट भिलाईला आहे, उदयने त्याचे शालेय भौगोलिक ज्ञान प्रकट केले दुपारी तीनला गोंदिया स्टेशन आले मराठी पाट्या पाहून महाराष्ट्राच्या पूर्व हद्दीत प्रवेश केल्याचा आनंद वाटला गाडी पाच वाजता नागपूर स्टेशनवर आली कॉफी—केक घतले मराठी मासिके पेपर मिळाल्याने ती काका ते वाचण्यात मग्न झाले अंधार पडू लागला अकोला स्टेशन गेले बर्थवर पुन पथारी पसरली प्रवासात कित्येक चांगली, मदतीचा हात पुढे करणारी माणसे परराज्यात भेटली होती पण डब्यातले शेजारचे मुंबईचे कुटुंब मात्र कमालीचे आढ्यताखोर होते गाडीतील प्रत्येक प्रवाशाशी त्यानी भांडणे दिवसभरात या ना त्या कारणावरून केली होती त्याच्या कलकलाटामुळे दिवसभर वैतागून गेलो होतो रात्री बर्थवर झोपताना प्रत्येकाने एकमेकाला म्हटले की रात्री तीनला मनमाड आल्यावर उठवा मनमाडला उतरून गाडी बदलून नगरला जायचे होते सर्वांनाच घराची ओढ लागली होती महिन्याभराच्या प्रवासात तापलेल्या उन्हाने किंवा मुसळधार पावसात भिजल्याने कुणी आजारी पडले नाही व जवळच्या औषध गोळ्यांचा

वापर करण्याची वेळच आली नाही याबद्दल परमेश्वराचे मनातल्या मनात आभार मानले विशेष काळजी वाटत होती ती ती काकांची ! पण अतिशय उत्साही अशा काकानी प्रवासात कधीच कसलीही तक्रार केली नाही तरुणाच्या उत्सुकतेने सर्व पर्यटन स्थळे आनदाने पाहिली

पहाटे तीनला मनमाड स्टेशनवर गाडी थांबली सामान उतरून घेतले पलीकडे प्लॅटफॉर्मवर मनमाड–नगर–दौन्ड पॅसेंजर उभी होती. डब्यात लाईट नव्हते बॅटरीच्या सहाय्याने सामान नीट ठेवले तोंड धुवून चहा घेतला तासाभराने गाडीने मनमाड सोडले कोळसा टचाईमुळे डिझेलवर चालणारी ती नवी गाडी होती शेवटचा प्रवास तरी मस्त सुरू झाला दिवस उजाडू लागला घरट्याकडे परतणाऱ्या पाखरांसारखी आमची अवस्था झाली सकाळी साडेआठला नगर स्टेशनवर गाडी थावली. ‘ बद्रीनाथ ते पशुपतिनाथ ’ ‘अलकनदा ते काचनगगा’ प्रवासाची सागता झाली होती

※ ※

REFBK-0024347

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
ग्रं. क्र. २७३४७
अ. प्र. १५/१०/८२
ग्रं. शाखा (स्थळ प्रत)